म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. न.

क सभा-मुंबई

श्री

# कैलासमानससरोवरदर्शन



लेखक

श्रीगुरुभक्तिपरायण
गजानन पांडुरंग नाटेकर

REFBK-0000651

सत्कार्योत्तेजक सभा-धुळें

श्री

# कैलासमानससरोवरदर्शन

लेखक

श्रीगुरुभक्तिपरायण गजानन पांडुरंग नाटेकर

नाना पुरश्चरणें करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं ।

[illegible] । वैराग्यबळें ॥

दासबोध

REFBK-0000651

धुळें येथें आत्माराम छापखान्यांत छापिलें.

शके १८३२

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

किंमत आठ आणे.

लय हा महा मेरु पर्वताचा एक भाग आहे. मेरु पर्वताचीं सर्वांत उच्च शिखरें तीन आहेत, ( १ ) ब्रह्मशृंग अथवा सत्यलोक हा मृत्तिकेचा आहे, ( २ ) विष्णुशृंग अथवा वैकुंठ हा मगज[illegible] ( पाचेचा ) आहे, व (३) शिवशृंग अथवा श्री कैलास हा स्फटिकाचा आहे. यावरून लक्षांत येईल कीं, हिमालय पर्वत हा श्री कैलास शिखराच्या कितीतरी अलिकडे आहे. असो; कैलास, वैकुंठपुरी, सत्यलोक इत्यादि स्थलांची वर्णनपर माहिती आपणांस आजपर्यंत पुराणांतून व इतर ग्रथांतून वाचावयास मिळत असे व त्यावरून आपण त्या स्थलांविषयीं आपल्या परीनें कल्पना करीत असूं; परंतु आज श्री कैलास पर्वत व मानससरोवर या सर्वपरी वंदनीय व पवित्र परंतु आजपर्यंत अपरिचित असलेल्या स्थलांच्या प्रत्यक्ष दर्शनस्पर्शनानें पुनीत होऊन आलेले आमचे परम प्रिय व पूज्य मित्र **श्रीयुत गजानन पांडुरंग नाटेकर ऊर्फ हंस** यांच्या मुखानें, त्यांनीं आपल्या प्रवासांत अवलोकन केलेलीं निरनिराळीं रम्य व पवित्र स्थलें, त्या प्रशांत ठिकाणीं आत्मानुभव घेत असणाऱ्या तपोनिष्ठ महापुरुषांचा समागम व त्यांच्या दर्शनानिमित्त त्यांना सोसाव्या लागलेल्या आपत्ति व त्यांजवर वेळोवेळीं गुजरलेले जिवावरचे बिकट प्रसंग, यांचें वर्णन आपणास समक्ष ऐकावयास मिळत आहे, हें खरोखर आपलें परम भाग्य होय. हें वर्णन त्यांनीं प्रत्येक जिज्ञासु मनुष्यास प्रत्यक्ष सांगून त्याची इच्छा पुरवू म्हटलें तर तें अशक्य होय, हें जाणून त्यांनीं सन १९०८ च्या केसरी वर्तमान पत्राच्या काहीं अंकांतून हंस या सहीनें आपल्या प्रवासासंबधीं त्रोटक हकीकत लोकोपयोगार्थ प्रसिद्ध केली. ती च हकीकत काहीं जिज्ञासु सद्गृहस्थांच्या सूचनेवरून जास्त विस्तृत रीतीनें व सगतवार लुटवून प्रस्तुत पुस्तकरूपानें आम्ही छापून प्रसिद्ध करीत आहोत.

आमचे प्रवासी ज्या सुमारास श्री कैलास व मानस सरोवराची

यात्रा करण्यास गेले होते, त्याचे किंचित अगोदर दुसरे एक पाश्चात्य प्रवासी, डॉक्टर स्वेन हेडिन्, हे आपल्या सर्व लव्याजम्यासह सगळा [illegible] पादाक्रांत करतां करतां मानस सरोवराचा शोध लावून, थोडे दिवस राहून व सरोवरावर यथेच्छ क्रीडा करून सुखें च परत फिरले होते. त्यानीं आपल्या प्रवासाची हकीकत पुस्तकरूपानें गतवर्षी दोन भागात प्रसिद्ध केली आहे. डॉक्टर साहेबाचा, त्यांच्या या धाडसी कृत्यांत यशस्वी होऊन परत आल्याबद्दल किती गौरव झाला हें प्रसिद्ध च आहे. त्यांच्या च प्रमाणें आमचे महाराष्ट्रीय प्रवासी हे एकटे, एकाकी व निराश्रित होते तरी आपली इच्छित यात्रा संपवून सुखरूपपणें आह्मांमध्यें परत आले, याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनदन करणें इष्ट आहे या पाश्चात्य व पौर्वात्य दोघा हि प्रवाशांच्या हकीकतीचा तुलनात्मक विचार करीत बसण्याच्या भानगडींत आह्मी पडू इच्छित नाही. तें काम सूज्ञ वाचक करितील.

आपल्या सनातन हिंदुधर्मीयात एक पवित्र समजूत आहे व ती वास्तविक असून तिला शास्त्रपुराणांचा आधार हि आहे, ती अशी की, ज्यानें सप्तपुरी, बारा ज्योतिर्लिंगें व चार धाम इतक्या यात्रा केल्या, त्याचीं सर्व पातकें भस्म होऊन तो अतिशय पुण्यवान प्राणी होतो, व त्याची या आयुष्यांतील पारमार्थिक इतिकर्तव्यता संपली असे मानतात. यापेक्षां कष्टतर यात्रा या आपल्या आर्यावर्तांत आहेत अशी त्यांना कल्पना हि येत नाहीं. उघड च आहे, यात्रा करण्यास उतार वयात आरंभ केल्यामुळे वरील सर्व यात्रा करता करतां त्यांच्या नाकीं नव येतात, आयुष्य देखील पुरें पडत नाहीं, यामुळें त्या सर्व यात्रा संपवून जगले वांचले च तर, त्यापेक्षां जास्त कष्टतर यात्रा करण्याची त्यांना हिंमत कशी राहावी ? अशी स्थिति असल्यामुळें, व श्री कैलास, मानस सरोवर हीं व यासारखीं च इतर ज्ञात व अज्ञात पवित्र स्थलें हीं परमेश्वराची निवास-

लय हा महा मेरु पर्वताचा एक भाग आहे. मेरु पर्वताचीं सर्वांत उच्च शिखरें तीन आहेत; (१) ब्रह्मशृंग अथवा सत्यलोक हा मृत्तिकेचा आहे, (२) विष्णुशृंग अथवा वैकुंठ हा [illegible] (पाचेचा) आहे, व (३) शिवशृंग अथवा श्री कैलास हा स्फटिकाचा आहे. यावरून लक्षांत येईल कीं, हिमालय पर्वत हा श्री कैलास शिखराच्या कितीतरी अलिकडे आहे. असो; कैलास, वैकुंठपुरी, सत्यलोक इत्यादि स्थलांची वर्णनपर माहिती आपणांस आजपर्यंत पुराणांतून व इतर ग्रंथांतून वाचावयास मिळत असे व त्यावरून आपण त्या स्थलांविषयीं आपल्या परीनें कल्पना करीत असूं; परंतु आज श्री कैलास पर्वत व मानससरोवर या सर्वोपरी वंदनीय व पवित्र परंतु आजपर्यंत अपरिचित असलेल्या स्थलांच्या प्रत्यक्ष दर्शनस्पर्शनानें पुनीत होऊन आलेले आमचे परम प्रिय व पूज्य मित्र **श्रीयुत गजानन पांडुरंग नाटेकर ऊर्फ हंस** यांच्या मुखानें, त्यांनीं आपल्या प्रवासांत अवलोकन केलेलीं निरनिराळीं रम्य व पवित्र स्थलें, त्या प्रशांत ठिकाणीं आत्मानुभव घेत असणाऱ्या तपोनिष्ठ महापुरुषांचा समागम व त्यांच्या दर्शनानिमित्त त्यांना सोसाव्या लागलेल्या आपत्ति व त्यानंतर वेळोवेळीं गुजरलेले जिवावरचे विकट प्रसंग, याचें वर्णन आपणास समक्ष ऐकावयास मिळत आहे, हें खरोखर आपलें परम भाग्य होय. हें वर्णन त्यांनीं प्रत्येक जिज्ञासु मनुष्यास प्रत्यक्ष सांगून त्याची इच्छा पुरवूं म्हटलें तर तें अशक्य होय, हें जाणून त्यांनीं सन १९०८ च्या केसरी वर्तमान पत्राच्या कांहीं अंकांतून हंस या सहीनें आपल्या प्रवासासंबंधीं त्रोटक हकीकत लोकोपयोगार्थ प्रसिद्ध केली. ती च हकीकत कांहीं जिज्ञासु सद्गृहस्थांच्या सूचनेवरून जास्त विस्तृत रीतीनें व सगतवार जुळवून प्रस्तुत पुस्तकरूपानें आह्मी छापून प्रसिद्ध करीत आहोंत.

आमचे प्रवासी ज्या सुमारास श्री कैलास व मानस सरोवराची

यात्रा करण्यास गेले होते, त्याचे किंचित अगोदर दुसरे एक पाश्चात्य प्रवासी, डॉक्टर स्वेन् हेडिन्, हे आपल्या सर्व लव्याजम्यासह सगळा [illegible] पादाक्रांत करतां करतां मानस सरोवराचा शोध लावून, थोडे दिवस राहून व सरोवरावर यथेच्छ क्रीडा करून नुकते च परत फिरले होते त्यांनीं आपल्या प्रवासाची हकीकत पुस्तकरूपानें गतवर्षी दोन भागात प्रसिद्ध केली आहे. डॉक्टर साहेबांचा, त्याच्या या धाडसी कृत्यांत यशस्वी होऊन परत आल्याबद्दल किती गौरव झाला हें प्रसिद्ध च आहे. त्यांच्या च प्रमाणें आमचे महाराष्ट्रीय प्रवासी हे एकटे, एकाकी व निराश्रित होते तरी आपली इच्छित यात्रा संपवून सुखरूपपणें आह्मामध्यें परत आले, याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनंदन करणें इष्ट आहे. या पाश्चात्य व पौर्वात्य दोघा हि प्रवाशांच्या हकीकतीचा तुलनात्मक विचार करीत बसण्याच्या भानगडींत आह्मी पडू इच्छित नाहीं. तें काम सूज्ञ वाचक करितील.

आपल्या सनातन हिंदुधर्मीयांत एक पवित्र समजूत आहे व ती वास्तविक असून तिला शास्त्रपुराणांचा आधार हि आहे; ती अशी कीं, ज्यानें सप्तपुरी, बारा ज्योतिर्लिंगें व चार धाम इतक्या यात्रा केल्या, त्याचीं सर्व पातकें भस्म होऊन तो अतिशय पुण्यवान प्राणी होतो, व त्याची या आयुष्यातील पारमार्थिक इतिकर्तव्यता संपली असें मानतात. यांपेक्षां कष्टतर यात्रा या आपल्या आर्यावर्तांत आहेत अशी त्यांना कल्पना हि येत नाहीं. उघड च आहे; यात्रा करण्यास उतार वयात आरंभ केल्यामुळे वरील सर्व यात्रा करता करता त्यांच्या नाकीं नव येतात, आयुष्य देखील पुरें पडत नाहीं, यामुळें त्या सर्व यात्रा संपवून जगले वांचले च तर, त्यापेक्षां जास्त कष्टतर यात्रा करण्याची त्यांना हिंमत कशी राहावी? अशी स्थिति असल्यामुळें, व श्री कैलास, मानस सरोवर हीं व यासारखीं च इतर ज्ञात व अज्ञात पवित्र स्थलें हीं परमेश्वराचीं निवास-

स्थानें असल्यामुळें त्यांचें दर्शन घडणें, ही साधारण माणसाच्या शक्तीबाहेरची व अशक्य गोष्ट होय, अशी त्यांची समजूत झालेली असल्यामुळें ते तीं पवित्र स्थळें पाहण्याविषयीं विशेष उत्सुक नसतात व ते त्याबद्दल कधीं विचार देखील करीत नाहीत. परंतु आमच्या इसराजानीं ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली आहे. त्यांनीं हिंदुस्थानच्या मर्यादेंतील बहुतेक यात्रा सपवून त्या बाहेरची श्रीकैलासनाथाची यात्रा हि करून ते आले आहेत; त्याबद्दलची हकीकत त्यांनीं पुढें दिली च आहे. ती वाचण्यापूर्वीं वाचकांपुढें असा एक प्रश्न उभा राहील कीं, इतकी अचाट शक्ति व हिंमत त्यांच्या आंगीं आली कोठून ? या गोष्टीचा विचार केला व पुढील हकीकत वाचली तर आपल्या असें लक्षात येईल कीं, दुसऱ्या कांहीं अद्भुत शक्तींचा त्यांना पाठिंबा होता व त्यामुळें च त्याचा कार्यभाग सुकर होण्यास पुष्कळ मदत झाली. त्या शक्ती ह्मणजे ह्या च; एक तर सद्गुरुकृपेवरील त्यांची अचल निष्ठा व आत्मविश्वास आणि दुसरी, इच्छित वस्तु प्राप्त होईपर्यंत लागणारा दृढ निश्चय अथवा चिकाटी. या च शक्तीमुळें साधारण मनुष्य असाधारण कामें करू शकतो, ही गोष्ट जर मनुष्याचे मनावर पूर्णपणें बिंबली तर त्याचें केवढें हित होईल ? **निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तें चि फळ ॥** या तुकाराम महाराजांच्या वचनाची सत्यता रा. गजाननरावानीं आपल्या आचरणानें आह्मांस यथार्थपणें पटवून दिली आहे, तिचें अनुकरण करण्याची आह्मांस बुद्धि होवो !

आतां कथानकास प्रारंभ करण्यापूर्वीं, असा हा पुण्यवान प्राणी आहे तरी कोण व त्यास अशा अल्प वयात तीर्थें, क्षेत्रें पहात फिरण्याची स्फूर्ति कशी झाली, अशी साधारण अपरिचित वाचकांस जिज्ञासा होणें साहजिक आहे, तिचें निरसन करण्याकरितां रा. गजाननरावांचें आजपर्यंतचें चरित्र त्रोटकपणें या

ठिकाणी दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटल्यामुळें तें येथें देत आहें. तें वाचकास बोधप्रद व मनोरंजक होईल अशी [illegible] आहे.

रा. गजाननराव यांचा जन्म शके १८०१ मध्यें झाला. ' रा पांडुतात्या नाटेकर ' ह्मणून धुळ्याच्या जुन्या व मोठ्या वकिलांपैकीं एक वकील होते. त्याचे गजाननराव हे धाकटे चिरंजीव लहानपणीं च मातोश्री वारल्यामुळें त्यांचे तीर्थरूप व वडील बंधु यांजवर गजाननाचा सर्व भार पडला आपल्याकडील इतर बहुतेक मुलां प्रमाणे गजानन हा लहानपणीं अत्यन्त भित्रा असे; परंतु तो च गजानन पुढें अनोळखी व अनभिज्ञ भाषा बोलणाऱ्याचे मुलुखात, हिमाचलाच्या घोरतर अरण्यांतील हिंस्र पशूंच्या घातुक सहवासांत, निर्मनुष्य तर काय पण जेथें पशुपक्ष्यादि जीवांचा संचार देखील होत नाहीं व युगानुयुगें पडत असलेल्या बर्फानें आच्छादित, अशा गौरीकुंडाच्या आसमंतात भागीं निदान त्रिरात्र तरी कसा राहिला असेल? अंधारांत पाऊल टाकण्यास ज्यास सोबत लागत असे त्या गजाननास तुसला काल्पनिक नव्हे तर प्रत्यक्ष भीतिप्रद अशा प्रसंगीं धैर्य कोठचें आलें ? याचें कारण, पुढे दिलेल्या आपल्या प्रवासवृत्तांत रा. गजाननराव ह्मणतात त्याप्रमाणें, एक 'आत्मविश्वास' हें च होय. असो

रा. गजाननरावाचा अभ्यास इंग्रजी प्रवेश परीक्षेपर्यंत होतो न होतों तों च त्याचे वडील निवर्तले. पुढें एक वेळ प्रवेश परीक्षेस जाऊन तींत अपयश मिळाल्याकारणानें त्यांनीं तो नाद सोडून देऊन, तारेच्या कामाची परीक्षा द्यावी या हेतूनें तो अभ्यास सुरू केला. ती परीक्षा दोन तीन महिने राहिली अशा सुमारास ते श्रीतुकाराम महाराजाच्या पदविन्यासानें पावन झालेल्या श्री देहू क्षेत्रीं आपल्या मामाकडे राहण्यास ह्मणून गेले. तेथें इंद्रायणीच्या डो-

ह्यावर सायंकाळीं आऊन बसण्याचा त्यांचा नित्यक्रम असे. त्याप्रमाणें एके दिवशीं तेथें विचार करीत बसले असतां रा. गजाननरावाचें 'पूर्वपुण्य' फळास आलें व आपण या मृगजळा [illegible] विनाकारण लागलों आहोंत अशी त्यास जागृति झाली. [illegible] एखाद्या उद्योगी मनुष्यास पहाटच्या थंड वाऱ्यानें बराच वेळ झोंप लागावी व त्या झोंपेतून त्याला जागा केल्याबरोबर आपला सकाळचा वेळ व्यर्थ गेला याबद्दल त्यास जसें वाईट वाटावें, तद्वत् आमच्या गजाननरावांची स्थिति झाली ! असार वस्तूंचा त्याग करण्याचा निश्चय करून त्यांनीं तत्क्षणींच बरोबर असलेले आपले कपडे, पुस्तकें वगैरे सर्व वस्तु बिऱ्हाडाहून आणून डोहार्पण केल्या ! मला वाटतें या रूपानें त्यांनीं सर्व 'उपाधि' च श्रीतुकोबाचरणीं अर्पण केली व आपण त्यांतून मोकळे झाले. न जाणों कदाचित् तो पुण्य प्रदेश व तो पुण्यतर डोह यांचे सान्निध्यानें च रा. गजाननरावास बौद्धिक स्फूर्ति झाली असावी व आजपर्यंत झालें तें झालें, आतां आपला मार्ग निराळा आहे अशी त्यांस स्फूर्ति झाली असावी या वेळीं रा. गजाननरावांचें वय सारें १८-१९ वर्षांचें होतें.

रा. गजाननरावास वैराग्योद्भव कसा व केव्हां झाला हें वर सांगितलें, परंतु खरें बोधप्रद चरित्र असें पुढचें च आहे. त्यावरून यानीं आपली मनोभूमिका कशी तयार केली व तत्प्रीत्यर्थ किती कष्ट सोसले, हें कळून येईल.

वैराग्याचा उद्भव झाला खरा, पण तें वैराग्य कायमचें बाणलें जावें अशी इच्छा असल्यास त्यास अभ्यासाची व विवेकाची जोड देणें भाग आहे. अभ्यासानें मन शुद्ध होतें व विवेकानें बुद्धि स्थिर होते आणि मन व बुद्धि हि अनुचित भगवच्चरणीं अर्पण केल्यावांचून इष्टसिद्धि होत नाहीं.

तरि मन हें येक । माझां स्वरूपीं वृत्तिक ।
करूनि घालीं आणिक । बुद्धि ही दे ॥
अर्थे दोन्ही सरिसीं । मजमाजीं प्रेमेसीं ।
रिगालीं तरी पावसी । मातें चि तूं गा ॥

आणि ह्मणून परीक्षेचा नाद सोडून देऊन रा. गजाननराव देहू-हून तडक पुण्यास आले, व लागलीं च त्यांनीं उग्र तपास सुरवात केली. पूर्वींची उच्छृखल व विनोदी वृत्ति टाकून त्यांनीं आतां कडक मौन स्वीकारलें, व पूर्वींचा विलासी गजानन आतां पूर्ण विरागी झाला. 'देह हाचि देव' ही ज्याची आजपर्यंत प्रवृत्ति होती, त्या देहाच्या शुश्रुषेंत सर्व दिवस ज्यानें घालवावा, त्याला आता तो च देह तपाचें एक साधन झाला. रोज सबंध गुरुचरित्राचें पारायण व नंतर गायत्रीचा जप करून रात्रीं प्राणधारणापुरतें फक्त दुग्ध प्राशन करावयाचें, याप्रमाणें कठीण तपश्चर्या प्रथम वर्ष दीड वर्ष त्यांनीं केली. अशा अविरल नियमानें मनःशुद्धि किती झाली असेल याची कल्पना वाचकांनीं च करावी. त्यानंतर पुढें रा. गजाननराव यांस श्रीसत् हंसस्वरूप स्वामींचा सहवास होऊन त्यांजकडून आसनप्राणायामादिकाची दीक्षा मिळाली. याप्रमाणें अष्टांग योगाचा क्रमाक्रमानें अभ्यास करतां करतां त्यांनीं ध्यानाचे भूमिकेवर आपलें पाऊल टाकलें यात आश्चर्य काय ? अभ्यासानें त्यांचा ध्यानयोग इतका दृढ झाला कीं, त्यांच्या उपास्यदेवतेचें स्तुतिस्तोत्र किंचित्काल जरी त्यांचे कानीं पडले तरी; त्यांची वृत्ति तन्मय होऊन बाह्य विषयांचें त्यांचें भान नाहीसें होतें.

अशा रीतीनें मनोनिग्रह व इंद्रियपरिवर्तन यांचे योगानें सातव्या भूमिकेवर स्थित झाल्यावर रा. गजाननराव यांस पवित्र स्थलांचें दर्शन घेण्याची इच्छा उत्पन्न झाली व ते प्रवासास निघाले. अशा पूर्ण तयारीनें केलेली यात्रा च खरी यात्रा होय. पुण्य स्थलाचें हृद्गत

जाणण्यास व तद्भूत आनंद भोगण्यास मन हि पुनीत च हवें. मकरंद
क्षारशांत प्रत्यक्ष रवि पण त्याचें हि प्रतिबिंब कसें पडेल ? ज्याचें
मन तपानें शुद्ध झालें नाहीं, ज्यास क्षेत्रस्थ देवते [illegible] न
आपले मनांत स्थिर करण्याची शक्ति नाहीं ह्मणजे
ज्याची धारणा इतकी दृढ नाहीं, त्यास फार तर त्या त्या स्थलांचें
नवीनत्व व तेथील सृष्टिसौंदर्य यांपासून आनंद होईल, परंतु तो
खरा आनंद नव्हे, त्या त्या स्थलाचें चैतन्याशीं ' आपल्या
' चित्ताचें ' तादात्म्य करून जो आनंद भोगणें तो च खरा आनंद
व तें च खरें यात्रागमन होय श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं
हि प्रथम एक तपपर्यंत पुरश्चरण करून चित्तशुद्धि केली व नंतर
बारा वर्षे तीर्थयात्रा केल्या या च खऱ्या यात्रा होत. अशा च
रीतीनें, अल्प प्रमाणांत कां होईना, पूर्वतयारी करून रा. गजानन-
रावांनीं ५।६ वर्षें यात्रागमन केलें. या अवधींत त्याचेवर वेळोवेळीं
जिवावरचे प्रसंग किती व कसे आले, मनुष्यवस्तीपासून दूर एकां-
तांत त्यांनीं कसे दिवस घालविले, आबूसारख्या घोरतर स्थलीं
श्रीदत्ताच्या पादुकापाशीं अहोरात्र सात दिवसपर्यंत त्यांनां गुरुच-

दर्शनें कशीं झालीं, इत्यादि गोष्टींचें सविस्तर वर्णन आज आपणांस जरी वाचावयास मिळत नाहीं तरी त्यांचें वैराग्य व तप हीं मनांत घेतलीं, व प्रस्तुत पुस्तकांत दिलेली एका यात्रेसंबधीं हकीकत वाचली ह्मणजे वाचकांस स्वतःला वरील व आणखी न सांगण्यासारख्या इतर गोष्टींची कल्पना सहज करतां येईल असें वाटतें. असो.

याप्रमाणें रा. गजाननरावांचें आजपर्यंतचें त्रोटक चरित्र आहे; तें अर्थात अपुरें आहे; परंतु त्यापासून साधारण मनुष्यास काय बोध घेण्यासारखा आहे तें पाहू.

साधारण नियम असा आहे कीं, प्रत्येक प्राणिमात्रास, त्याच्या आयुष्याचा शेवटचा क्षण गांठेपर्यंत तीन अवस्थांतून क्रमा-

क्रमानें जावें लागतें; बाल्य, तारुण्य व वार्धक्य; पैकीं बाल्यावस्था सर्व प्राण्यांची बहुतेक सारखी च जावयाची; ह्मणजे भय, शोक, आनंद, खाणेंपिणें यांशिवाय दुसरें कांहीं त्यांस सुचावयाचें च नाहीं. तारुण्याच्या प्रारंभापासून मात्र मनुष्य व इतर प्राणी यांत फरक पडण्यास सुरवात होते. परमेश्वरानें वैखरी वाणी व बुद्धीची प्रगल्भता हे दोन विकार इतर प्राण्यांपेक्षा मनुष्यप्राण्यामध्ये जास्त देऊन ठेवले आहेत, ते हा वरील फरक दाखविण्याचे हेतूनें च दिले आहेत, व ह्मणून च मनुष्यप्राणी इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ होय. या विशेष देणग्यांचा जर मनुष्यप्राण्यानें योग्य उपयोग करून घेतला नाहीं व इतर प्राण्यांप्रमाणें च आहार, निद्रा, भय, मैथुन, एवढ्या च विकारांत जर तो गुरफटून राहिला तर त्याची योग्यता पशूपेक्षां खालीनें जास्त नाहीं, असें सांगून आमचे साधुसंत आह्मांस जागे करीत असतात; परंतु या उपदेशाचा परिणाम मनावर होऊन त्याप्रमाणें वर्तन करणारे प्राणी फार च विरळा असतात, ज्यांचें पूर्वपुण्य फळास येण्याचा समय प्राप्त झाला असेल असे च लोक या उपदेशानें जागे होतात. अशा असामान्य गृहस्थांपैकीं च आमचे मित्र रा. गजाननराव हे एक आहेत असें ह्मणण्यास आह्मांस हरकत दिसत नाहीं.

ज्या वयात सर्व तऱ्हेचे मनोविकार बलवत्तर असतात, जेव्हा सर्व प्रकारच्या विषयसुखाकडे मनाची सहज प्रवृत्ति असते, जेव्हां विचार लुप्तप्राय असतो, अशा वेळीं, यौवनावस्थेस आपले बरोबर घेऊन ऐहिक विषयोपभोगरूपी मंदिरात प्रवेश करण्याकरिता उचललेले पाऊल मागें घेऊन, त्यानीं त्या मंदिराकडे पाठ का बरें फिरविली? (या ठिकाणीं एवढें सांगणें जरूर आहे कीं, रा. गजाननराव यांचें लग्न झालेलें असून त्यांस दोन अपत्ये हि आहेत; असें असून हि संसारांत राहून अलिप्त अशी त्यांची खरोखर स्थिति आहे; ह्मणून च त्यांचे ठिकाणीं वैराग्य पूर्णपणें बाणलें आहे असें आह्मी ह्मणतों.)

मोठमोठ्या लोकांना हि दुस्त्याज्य अशा विषयलोलुपतेचा यांनीं तिरस्कार कां केला? असलें हें कठोर वैराग्य उत्पन्न होण्यास कांहीं अपूर्व संकट हि त्यांनेवर आलेलें कोणास माहित नाहीं. ... हा नश्वर व दु:खमय आहे याची वारवार स्मृति व्हावी ह्मणून, परमकारुणिक परमेश्वर सदयतेनें जीं कित्येक संकटें मनुष्यप्राण्याची परीक्षा पाहण्यासाठीं त्यावर आणतो, तसलीं संकटें इतराप्रमाणें रा. गजाननराव यांचेवर हि आलेलीं होतीं, परंतु यास च तीं शिक्षणप्रद कां व्हावीं? याचें कारण आह्मास एक च दिसतें, तें हें कीं, रा. गजाननराव यांची वैराग्यवृत्ति ही या जन्मांतील नव्हे, ती पूर्वार्जित आहे; तिचा विशिष्ट कालीं व स्थलीं त्यांचे ठिकाणीं पुनरुद्भव झाला इतकें च!

**परि येतुलें चि एक घडे। जे माझारें विसावें पडे॥**

याप्रमाणें मध्यतरीं किंचित् विसावा घेऊन रा. गजाननराव यांनीं या जन्मींचा आपला पुढील मार्ग आक्रमिला आहे, व ह्मणून च विशेषशीं संकटें न येतां हि केवळ तारुण्योद्गमीं च त्यांना वैराग्य धारण करतां आलें.

**दशेची वाट न पहातां। वयसेचिया गांवा नैयेतां।**
**बालपणीं च (विरागता)। वरी तेयातें॥**

रा. गजाननराव यांच्या चरित्रक्रमावरून दिसून येणारी दुसरी गोष्ट ह्मणजे ही कीं, सच्चिताचा उद्गम एकाद्याचे ठिकाणीं जरी झाला तरी तो वाढीस लागण्यास त्याला पुरुषप्रयत्नाची जरूर असते व असा प्रयत्न केला तर तो विफल कधीं हि होत नाहीं. कारण प्रयत्नाला दु:साध्य असें कांहीं नाहीं.

**अगा अभ्यासयोगु ह्मणिजे। तो हा येकु जाणिजे।**
**येणें कांहींयेक न निफजे। ऐसें नाहीं॥**
**ह्मणौनि अभ्यासासि कांहीं। सर्वथा दुष्कर नाहीं।**
**यालागीं माझां ठायीं। अभ्यासें मिळ॥**

असो. रा. गजाननराव यांस, त्यांनीं प्रस्तुतच्या प्रवासास प्रारंभ करण्यापासून तों कैलास पर्वत व त्याजवळचें गौरीकुंड गांठे-पर्यंत, कशा प्रकारच्या व किती आपत्ति भोगाव्या लागल्या, त्यांची हकीकत हें पुस्तक वाचल्यानंतर वाचकाचे ध्यानीं येईल च.

येथपर्यंत ग्रन्थकार याच्या योग्यतेसंबधानें विचार झाला. आतां प्रस्तुत ग्रन्थासंबंधानें इतकें च सांगावयाचें कीं, ज्या कार्यांत मन आहे त्यांत बुद्धीचा उद्गम झाला च पाहिजे असा साधारण नियम असल्यानें रा. गजाननराव हे विशेष शिकलेले नसून हि त्याचें 'प्रवासवर्णन' अत्यंत हृदयंगम झालेलें आहे. विशिष्ट स्थलीं त्यानीं केलेल्या प्रातःकालचें वर्णन, गौरीकुंडाची हकीकत, एक दोन वेळ झालेलीं वादळें, हे व असे इतर प्रसंग इतके कांहीं मनोहर वर्णिले आहेत कीं, ते वाचतांना वाचकाची वृत्ति तन्मय होऊन तो स्वतःच ते सर्व अनुभवीत आहे असें त्यास वाटतें. असो.

इतर बऱ्या च क्षेत्रांचीं वर्णनात्मक पुस्तकें आजपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत, परंतु श्रीकैलासमानससरोवराचें वर्णनात्मक पुस्तक मराठींत तरी हें पहिलें च आहे असें वाटतें, व याचें कारण हि उघड दिसतें. तें हें कीं, या पवित्र क्षेत्राचें दर्शन घेऊन परत आलेले महाराष्ट्रीय यात्रेकरू आमचे मित्र रा. गजाननराव हे पहिले च होत. या वरील कारणामुळे च आह्मी हें पुस्तक छापून प्रसिद्ध करीत आहोत. तें वाचून रा. गजाननराव यांचें अंशतः तरी अनुकरण करण्याची बुद्धि वाचकांस होवो, त्यांच्या चरित्रक्रमावरून व प्रवासाच्या हकीकतीवरून ज्याला जो योग्य वाटेल तो बोध वाचकवर्ग घेवो व रा. गजाननराव यांस त्यांच्या व्यवसायांत अधिकाधिक यश मिळो, अशी त्या जगच्चालक प्रभूजवळ अनन्यभावें प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

धुळें
गुरुवार, चैत्र वद्य ११
शके १८३२

चिटणीस
सत्कार्योत्तेजकसभा–धुळें.

# श्रीकैलासमानससरोवरदर्शन

श्रीकैलास व मानस सरोवर हीं पवित्र व रम्य स्थळें हिमालय पर्वताचे पलीकडे पश्चिमे तिबेटांत आहेत. आज तीन चार वर्षांपासून ह्या स्थलाचे दर्शनास जावें, असें मनांत येत होतें व दिवसानुदिवस ती इच्छा उत्कट होऊन शेवटीं श्री सद्गुरुमहाराजाचे कृपाप्रसादानें तो माझा मनोदय पूर्ण झाला.

श्री बदरीनारायण, केदार, गंगोत्री, पशुपती, वगैरे पवित्र व रम्य अशीं हिमालय पर्वतातील स्थळें अवलोकन करीत करीत मी कैलास व मानस सरोवराला गेलों. हिमालयातील हीं सर्व स्थळे पाहण्यास मला जाता येता चार वर्षें लागलीं. ह्या अवधींत तेथील थंड हवा, प्रवासातील खाण्या-पिण्याचे हाल व अरण्यें, डोंगर, नद्या, खोरीं, इत्यादि अवघड स्थळीं येणाऱ्या अडचणींना तोंड देण्याचा अभ्यास मीं केला असें ह्मणणें अयोग्य होणार नाहीं. ह्या चार वर्षांत मीं हिमालयास जो प्रवास केला व मजवर जीं संकटें आलीं त्यामुळें कष्ट सोसण्यास मला पुष्कळ च शक्ति आली.

नेहमींच्या यात्रेकरूपेक्षा मला जास्त हाल सोसावे लागले व मजवर जास्त जीवावरचीं हि संकटें आलीं; कारण मी नेहमीं आडमार्गानें व एकटा फिरत असे. आता, अशा अडचणीचे मार्गाचा मी कां अवलंब केला असा प्रश्न सहज उद्भवतो. ह्याचें उत्तर येवढं च कीं, ह्या चार वर्षांत मी एका विशिष्ट

हेतूनें वेडा झालेला होतों. वेड्याचे स्थितींत फिरत असतांना हिमालयाचे जंगलातून माझे हाल कसे व किती झाले असतील, हें जर मी लिहित बसलों, तर मजवर अतिशयोक्तिचा आरोप येईल. असें जरी आहे तरी ते प्रसंग मजवर येऊन गेलेले आहेत, त्या संकटांना गुरुमहाराजाचे कृपेनें तोंड देण्यास मला शक्ति हि आलेली होती व त्या हालांतून महाराजाचे च कृपेनें माझ्या शरीराचें व प्राणाचें रक्षण हि झालेलें आहे; त्यामुळें वरील आक्षेपाला न भिता, मी त्या प्रसंगांचें थोडेसें दिग्दर्शन करितों.

एके दिवशीं, मी आणि माझा वृद्ध परंतु मजबूत बांध्याचा नेपाळी वाटाड्या, असे देहरादूनचे अरण्यातील भागातून चाललों होतों. ती दुपारची वेळ होती. दाट झाडीचें व हिरवेंगार असें एक ठिकाण आह्माला वाटेनें लागलें. मी मागें व वाटाड्या पुढें, असे अरण्यातील शोभा अवलोकन करीत व बोलत बोलत चाललों होतों, व एके ठिकाणीं एका झाडावर एक नीळ वानराचा समूह पाहात उभे होतों, इतक्यात पलीकडे सुमारें पांच पन्नास हातावर माझे वाटाड्यानें एक हत्ती पाहिला. ह्या अरण्यांत जंगली हत्ती असतात असें त्यानें मला सांगितलें होतें. तो हत्ती मजावर आलेला असल्यामुळें एकसारखा झुलत होता व त्याचे गंडस्थळातून मद वाहात होता. सोंडेनें आजूबाजूचीं झुडुपें उपटून स्वतःचे पाठीवर फेंकीत होता. असा वनातील मनसोक्त फिरणारा गजराज पाहण्याचा मला हा पहिला च समय आलेला असल्यामुळें मी आनंदानें व कौतुकानें त्या हत्तीकडे पाहात उभा राहिलों. पुढें येणाऱ्या संकटाची मला कल्पना देखील नव्हती. माझे वाटाड्याचे लक्षात भावी संकट येऊन,

तें कसें टाळावें ह्याविषयीं तो विचार करूं लागला होता; कारण त्याचें लक्ष माझ्या बोलण्याकडे बिलकुल नव्हतें.

आमचा रस्ता हत्ती उभा होता त्याच दिशेकडे अस-ल्यामुळें, मी त्या मार्गानें पुढें चालूं लागलों तो हत्ती हि उभा हो-ता तेथून गेला व एका जाळीआड दिसेनासा झाला आह्मी चालूं लागलों. कांहीं वेळानें आमचे पाठीमागें एका झाडाजवळ सळसळ असा आवाज झाला व लागलीं च माझा वाटाड्या ओरडला, " महाराज, भागो, पीछेसे हत्ती आ रहा है. " आह्मी जोरानें पळूं लागलों व हत्ती आमच्या मागें लागला. वाटाड्या पुढें व मी मागें. माझ्यांत व हत्तींत एक दोन हाताचें अंतर राहिलें; इतक्यांत, आह्मीं एक तुटलेला कडा पाहिला. एकमेकाकडे पाहिलें त्या वेळेस माझे अंगावर हत्तीचे सोंडेंतून फुसकाऱ्याचें शितोडे येत होते. तो चवताळलेला होता. माझी वाऱ्यानें मागचे बाजूस उडत असलेली कफनी धरून आपलेकडे खेंचून मला चेंगरणार तों, आह्मीं कड्यावरून खाली उडी घेतली. हत्ती, कड्याचे काठावर येऊन, संतापानें सोंड पुढें ताठ करून फुसकारीत, परंतु निराश होऊन स्वस्थ, उभा राहिला होता असें मागाहून एका शेतकऱ्यानें सांगितलें. कडा सारखा तुटलेला होता. खोल बराच असावा. कड्यावरून खालीं येताना च आह्माला घेरी आली. वाटाड्या दहा अकरा तासांनीं शुद्धीवर आला. त्याचे पाय हिरवे निळे झाले होते. त्याला इतर ठिकाणीं कोठें लागलें नव्हतें. माझ्या वाटाड्याला वनस्पतींची हि माहिती होती, हें मला त्या वेळीं कळलें. मी एक दिवस बेशुद्ध होतों. माझी कंबर बरी च

सुजली होती, परंतु हाडाला काहींएक इजा झाली नव्हती. माझे पाय कंबरेपर्यंत हिरवे निळे होऊन सुजले होते. त्या च ठिकाणीं एका झाडाखालीं आह्मीं वस्ति केली. ह्या प्रसंगीं माझ्या वाटाड्यानें माझी शुश्रुषा फार च कळकळीनें व मनः-पूर्वक केली. त्याचे पाय वनस्पतीच्या लेपानें दोन तीन दिवसात बरे झाले. मी दहा पंधरा दिवस आजारी होतों. कमरेचा ठणका दोन दिवसात च राहिला, परंतु पायात शक्ति येण्यास बरे च दिवस लागले. ह्या वेळेस कड्याचे खालीं उडी घेण्याशिवाय आह्मास दुसरा इलाज च नव्हता. कड्यावरून उडी घेतली तेव्हा च महा-राजाच्या चरणारविंदाचें ध्यान करून देह फेंकला होता. मला वाटलें परमेश्वराची इच्छा च कीं, आह्माला फारशी इजा न होतां आह्मीं वाचावे !

ह्याचप्रमाणे वाघ, अस्वलें, वगैरे हिंस्र पशूंचे तडा-क्यांतून आह्मी जिवंत सुटलों. तहान, भूक, थंडी, वगैरेपासून मला व माझे वाटाड्याला बरा च त्रास होत असे. एकदा तर असें झालें की, एका मोठ्या अरण्यात, आह्मी रस्ता चुकलों व सात दिवस आह्माला मनुष्यप्राणी दिसला च नाहीं. तीन दिवस आह्माला झाडाचे पाल्याशिवाय काहीं च आहार मिळाला नव्हता. सारांश, मानस सरोवर व कैलासाचे भावी प्रवासात होणाऱ्या हालाची मला काहीं च दिक्कत वाटू नये ह्मणून च कीं काय मजवर हे व असे च इतर प्रसंग त्या चार वर्षांत आले. बद-रीनारायण, केदार, गंगोत्री वगैरे स्थलाचें वर्णन मी येथें अशा-साठीं देत नाहीं कीं, एकतर पुष्कळ लोक ह्या स्थळीं जातात व दुसरें मुंबईचे व्यंकटेशसमाचार छापखान्यांत ह्या स्थलाचें

सविस्तर वर्णनात्मक हकीकतीचें पुस्तक छापून निघालेलें आहे.

श्रीकैलास व मानस सरोवराला जाण्याच्ये हेतूनें मी मुंबईहून मित्रमंडळीचा निरोप घेऊन सकाळीं दिल्ली एक्सप्रेस गाडीनें निघालों. दुसरे दिवशीं सकाळीं बीना स्टेशनला मुक्काम केला. दुपारीं अकरा वाजता पंजाब मेलनें बीनाहून निघून कानपूरला संध्याकाळीं व लखनौला रात्री आठ वाजता पोहोंचलों येथें गाडी बदलावी लागते. रात्री साडे नऊ वाजता मी लखनौहून निघालों व बरेलीला सकाळीं पांच वाजता येऊन पोहोंचलों. काथगोदामला जाणारी गाडी येथून सकाळीं साडे सात वाजता निघते; त्या गाडीनें, मी शेवटचें रेल्वे स्टेशन जें काथगोदाम, तेथे दुपारी साडे अकरा वाजता पोहोंचलों. येथें माझा रेल्वेचा प्रवास संपला. मुंबईपासून काथगोदामपर्यंत माझा एकसारखा अठ्ठेचाळीस तास प्रवास झाला रेल्वे स्टेशनचे बाहेर आल्याबरोबर दोन कुली ( मजूर ) व एक घोडा भाड्यानें केला. मला मायावतीला जावयाचें होतें. परंतु तेथपर्यंत कुली व घोडा भाड्यानें मिळेना, त्यामुळें मी अलमोरापर्यंत भाड्यानें घोडा व कुली घेतले. दुष्काळामुळें मला भाडें जास्त पडलें. कुलीला प्रत्येकी दीड रुपया व घोड्याला सहा रुपये द्यावे लागले. कुलीमक्तेदार म्हणून एक सरकारी नौकर स्टेशनवर असतो त्याचे मार्फत वरील व्यवस्था मीं केली होती. कांहींएक न खाता पहाड चढण्यास मीं सुरवात केली. सुमारें संध्याकाळीं पांच वाजता नऊ मैलावर “ भीमताल ” येथें मुक्काम केला. एका भाड्याचे जागेंत राहिलो होतों. ह्या जागेला हिंदुस्थानी डाक बंगला म्हण-

सात. माणशी दोन आणे रोज भाडें पडलें. सरकारी डाक बंगल्यात जागा हि नव्हती व तेथें रुपया रोज भाड पडतें. पहाडांतील "भीमताल" हा पहिला मुक्काम. अडीच दिवस एकसारखा प्रवास केल्यामुळें मी थोडासा थकून गेलों होतों. भीमतालला एक रात्र राहिलों होतों. 'भीमताल' नावाचे एक मोठें सरोवर येथे आहे. मला वाटतें, ह्या सरोवराचा परीघ सुमारें तीन मैलाचा असावा. उन्हाळा असल्यामुळें तलावाचा बरा च भाग कोरडा पडलला होता. भीमतालाभोंवतीं सरकारी अधिकाऱ्याचे व श्रीमंत लोकाचे अतरा अतरावर बगले आहेत. तलावा भोंवतीं चागली सडक आहे. युरोपीयन लोक तसें च श्रीमत लोक नैनीताल व अल्मोरा येथें जाताना या ठिकाणीं दोन दोन दिवस राहतात भीमताल येथील वनश्री देखील उत्तम जरी नाहीं तरी चागली आहे.

हिंदुस्थानी डाक बगल्यात उतरण्याची सोय झाल्यावर माझे कुली स्वैंपाकपाण्याची व्यवस्था करण्याचे कामास लागले व मी भीमतालचे काठानें फिरावयासाठीं जावें ह्मणून बाहेर पडलों ही सध्याकाळची वेळ होती. तळ्याचे काठानें स्वतःशीं च गुणगुणत हळु हळु मी चाललों होतों. थंड परतु मद मद वारा वाहण्यास प्रारभ झाला होता. अडीच दिवसाचे प्रवासामुळ व पोटात कांहीं नसल्यामुळें माझें डोकें थोडेंसें त्रासलें होतें. शीत व मद वाऱ्याची झुळुक लागू लागली; सभोंवार डोंगरावरून असलेल्या बगल्यातून दिवे दिसू लागले; सहल करावयास आलेल्या लोकांचे थवे जलक्रीडा, व्यायाम, वगैरे करमणूक संपवून आपआपले वसतिस्थानाला जाऊ लागले;

किंचित् अंधःकार पडून जिकडे तिकडे शांत होऊ लागलें; अशा वेळीं, मी त्या तलावाला एक लहानसा लाकडी पूल आहे, त्यावरून एकदां आकाशाकडे, एकदा तलावातील शांत व गंभीर जलसमूहाकडे, तर एकदा सभोंवतालचे पर्वतशिखराकडे पाहात पाहात चाललों होतों. ह्या समयीं, माझें डोकें अगदीं शांत झालें होतें; अंतःकरण प्रसन्न होऊन मनाला व त्यामुळें शरीराला हुषारी वाटूं लागली.

भीमताल येथें एक लहानसा बाजार आहे. सुमारें पंधरा वीस निरनिराळीं दुकानें आहेत. ह्या बाजारात हलवाई, धान्य-वाले, व किराणा जिन्नस विकणारे ह्यांची दुकानें आहेत. येथें तार ऑफिस आहे. भीमतालला आल्याबरोबर तेथील एकंदर सौंदर्य पाहून मनाला बरें वाटतें, ह्यात संशय नाहीं.

मायावतीस जावयास मला चौकशीअतीं येथें एक घोडा मिळाला. दहा रुपये भाडें पडलें. पहिला घोडा येथून च परत केला. त्याला तीन रुपये अगाऊ दिले होते. पूर्वी इकडील पहाडी लोक प्रामाणिक असत; पण तो प्रामाणिकपणा आतां त्यांच्यांत दिसून येत नाहीं. नऊ मैलांचा भाड्याचा आकार सरकारी रीतीनें दीड रुपया होतो, बाकीचा दीड रुपया माया-वतीचे पत्त्यावर मला पाठवून देण्यास तुझे मालकास सांग व हें पत्र त्याला दे, असें मीं त्या घोड्याबरोबरच्या नोकरास सांगितलें. पण ही बाकीची रकम मला परत मिळाली नाहीं.

दोन कुलींना एक एक रुपया जास्त देण्याचें कबूल केलें व दुसरे दिवशीं पहाटे तडक मायावतीला जावयास मी भीमतालहून निघालों, तों साडे नऊ मैलांवर "धारी" येथें

सकाळीं नऊ वाजतां पोहोंचलों. येथें डाक बंगला व सरकारी वाण्याचें दुकान आहे.

धारीला मी सबंध दिवस मुक्काम केला नाहीं. भीमताल-प्रमाणें येथें वस्ति नाहीं. डाक बंगला एका उंच टेकडीचे माथ्यावर असून टुमदार आहे. ह्या बंगल्याचे बाहेरचे ओट्या-वरून समोर असलेल्या खोऱ्याची फार च मौज दिसते. येथें एकांत वाटतो. माझे कुली जेवणखाण करण्याचे तयारीस लागले. जेवावयाची वेळ होईतों स्नान वगैरे आटोपून मी बंगल्याचे ओटीवर ध्यान, पूजा, वगैरे करावयास बसलों. एकान्तामुळें मला येथें फार समाधान वाटलें. हिमालयांत कोठें हि जा, त्या स्थळाला शोभेल अशी वनश्री आपली असावयाची च. त्याप्रमाणें येथें हि वनश्री होती. माझे नित्यनैमित्तिक आटोपल्यावर मीं भोजन केलें व थोडा वेळ वामकुक्षी केली. मीं सुमारें दोन तास विश्रांति घेऊन, कुलींना पुढें जाण्यास सांगितलें. ' मोरनौली 'ला रात्रीचे मुक्कामासाठीं जावयाचें होतें. धारीपासून मोरनौली सुमारें अठरा मैल असून मोरनौलीचें जंगल हि फार दाट आहे.

मोरनौलीला जातांना वाटेंत दोन नद्या लागतात. त्यावर झोंबते पूल ( Hanging bridges ) आहेत. उन्हाळा असल्यामुळें नद्यांना पाणी थोडें होतें व ह्मणून आह्मी फेरा न घेता मधून च गेलों. धारी सोडल्याबरोबर एक खडी चढण लागते. काथगोदाम व भीमताल ह्याचेमध्यें जी चढण आहे, त्यापेक्षा ही थोडीशी लहान आहे खरी, परंतु खडी असल्यामुळें त्रास होतो. वाटेनें मी माझा घोडा हळु हळु चालवीत होतों; व मधून मधून दाट व थंड छायेखालीं कांहीं वेळ उभा करीत

होतों. वाटेनें मला बोलावयास कोणी नव्हतें व मला ती उणीव हि भासली नाहीं. मी माझे दिलांतच करमणूक करून घेत असे.

मोरनौलीचा धुरा ( घाट ) चढून सूर्यास्ताचे सुमारास मी अरण्यात शिरलों. डाक बंगला तीन चार मैलावर होता. रात्र अंधारी होती. जिकडे तिकडे अगदीं काळोख पडला होता, इतक्यांत आकाश एकदम काळ्याभोर मेघानीं आच्छादून टाकिलें. मग काय विचारतां ! इतका काळोख पडला कीं शेजारची वस्तु दिसेना. सुमारें आठ वाजता पर्जन्य पडण्यास सुरवात झाली. मेघाची गर्जना होऊ लागली. मधून मधून आकाशात वीज चमकत असे व लागलीं च भयंकर कडकडाट होई. मेघाचें गडगडणें, विजाचें कडकडणे, पर्जन्याच्या सळ सळ असा आवाज, ह्यानीं तें जंगल अगदीं दुमदुमून गेलें. एक दोनदां वाघाचें डुरकणें व ( बार्किंग डिअर ) भुंकणाऱ्या हरिणाचें ओरडणें ऐकू आलें. त्याचप्रमाणे अरण्यातून वृक्षावर किर्र आवाज करणारे किडे आपल्या त्या कर्कश व भयप्रद शब्दानें रात्रीला जास्त च भयाण रूप देत होते. तशात थंडी हि मी ह्मणत होती.

अशा वादळात व मोरनौलीसारख्या दाट जंगलात काळोख्या रात्रीं मी घोड्यावर बसून हळु हळु चाललों होतों माझे कुली आधीं च पुढें गेले होते. माझा घोडेवाला पधरा सोळा वर्षांचा लहान मुलगा असून त्याला त्या जंगलाची माहिती नव्हती. मी आस्ते आस्ते घोडा चालवीत होतो व घोडेवाला विजेच्या प्रकाशांत रस्ता पाहात हळु हळु घोड्याचे पुढें चालला होता. घोडेवाला वयानें जरी लहान होता तरी हुषार व धैर्यवान होता. घोड्याचा लगाम धरून तो चालला होता. तो, मी व घोडा

पावसानें ओले चिंब झालों. थंडीमुळें अंगांत हुडहुडी भरली, पण काय उपयोग ! तशा च स्थितींत आह्मी चालत होतों. नऊ साडे नऊ वाजता आह्मी डाक बंगल्याजवळ येऊन दाखल झालों. वाटेनें माझ्या मनात विचाराचें अगदीं काहुर उडून गेलें होतें. वादळांत शांपडलों तेव्हा आधीं दोन तीन क्षण मला कांहीं सुचेना. मी घाबरून गेलों होतों. परतु नंतर मी शुद्धीवर आलों व श्रीसद्गुरूचरणारविंदाचें स्मरण करून मन स्थिर केलें. बरें, बंगल्याजवळ येऊन पाहतों तों सर्व च निराळा प्रकार ! जिकडे तिकडे आगाट्या दिसू लागल्या; माण-साची गर्दी भासूं लागली, डाक बगला, तबेला, सरकारी वाण्याचें दुकान, व त्याची च एक खाजगी झोंपडी, हीं सर्व ठिकाणें माणसानीं व्यापून गेलेलीं आहेत असें माझे नजरेस पडलें. रात्रीपुरती एक पाऊलभर देखिल निवाऱ्यासाठीं जागा मिळेना! मी कुलींना हाका मारू लागलों. ते अंधारांत एका झाडाखालीं पावसात भिजत व थंडीनें कुडकुडत माझी वाट पहात बसले होते ! दोन तास मी तसा च पावसात उभा होतों. खाणें पिणें सर्व बंद ! त्या वेळीं त्या ठिकाणीं डेप्युटी कमिशनर साहेबाचा मुक्काम असल्यामुळें मला वरीलप्रमाणें पावसांत उभे राहण्याचा व उपास काढण्याचा प्रसंग आला होता. शेवटीं शिरस्तेदार साहेबास दया येऊन, त्यांनीं एका झोंपडीचे एका कोपऱ्यात मला बसण्याजोगी जागा देवविली व पिण्यास थोडेंसें दूध दिलें. ती सारी रात्र मीं बसून काढली; उपास तर पडला च, व रात्रभर पाऊस हि पडत होता.

मोरनौली धूरा आठ हजार फूट उंच आहे. त्यामुळें येथें

स.अं.नं. ७२



थंडी फार असते. येथें झाडी अतिशय दाट आहे, त्यामुळें व्याघ्रादि हिंस्र पशूंची फार भीति असते. युरोपियन लोक शिकारीसाठीं येथें वारंवार येतात, ह्मणून रहदारी बंगला बहुतेक रिकामा नसतो, व उतरण्यास दुसरी जागा नसल्यामुळें इतर प्रवाशाचे फार हाल होतात. येथील अरण्याची शोभा उत्तम दिसते. देवदारु, पाईन, ओक, वगैरे झाडाचें हें अरण्य आहे. वेलींच्या मोठमोठ्या जाळ्या बनलेल्या असल्यामुळें जिकडे तिकडे हिरवेंगार दिसतें. येथें पाणी खोल दरींतून व लांबून आणावें लागतें. मोरनौलीला मी पहिल्यानें संकटात सांपडलों, तेव्हां मला वाटलें कीं भावी संकटाची मला कल्पना यावी ह्मणून हें वादळ उत्पन्न झालें असावें. भर उन्हाळ्यात पूर्वी कांहींएक चिन्ह दिसत नसता एकदम वर्षाऋतूतील वादळाप्रमाणें किंबहुना कांकणभर जास्त भयंकर वादळ होऊन त्यात मी सांपडावें ह्याचा अर्थ काय ? ईश्वराची च इच्छा कीं मला भावी संकटास पाठ देता यावी व माझें धैर्य खचूं नये; असो.

"मोरनौली" हून आह्मीं पहाटे च निघण्याचा विचार केला व त्याप्रमाणें पाच वाजता चालूं लागलों. सुमारें आठ मैलांवर "देवीधूरा" ह्या नावाचा पडाव आहे, तेथें आह्मांला जेवावयास जावयाचें होतें. पांच सहा मैलाचा उतार आह्मी सपाट्यानें उतरून गेलों. पुढें देवीधुऱ्याची चढण लागली. ती चढून आह्मी सुमारें दहा वाजतां मुकामाला पोहोंचलों. येथें एका देवदारू झाडाखालीं आह्मीं जेवणखाण करण्यासाठीं मुकाम केला. साल दुष्काळाचें असल्यामुळें पाण्याचे भारी हाल झाले. वाटेंत पाणी मिळविण्यास श्रम पडले. ह्या समयीं कुमाऊन

जळालेल्या सागवृक्षाचें खोड होतें, असें दिसलें. असो.

'धूनाघाट' चे डाक बंगल्यांत मी संध्याकाळीं पोहोंचलों. घोड्यावरचें जीन काढून घेतलें. घोड्याला जरा थोपटून गवत वगैरे घातलें व कुलींची वाट पहात तेथें पडवींत बसलों. सुमारें अर्ध्या तासानें घोडेवाला व कुली असे दोघे आले. जेवण वगैरे आटोपून माझे नोकर तबेल्यांत स्वस्थ झोंपीं गेले. मला झोंप येईना, ह्मणून पडवींत इकडे तिकडे फिरू लागलों. गार वारा हळु हळु वहात होता. ती रात्रीची दहा अकरा वाजण्याची वेळ असल्यामुळें जिकडे तिकडे शांततेचें साम्राज्य होऊन गेलें होतें. मी पडवींतून बाहेर आलों. ती रात्र मला फार च रमणीय वाटली. आकाशांत चंद्रमा स्वच्छ प्रकाशमान असून, चांदणें शुभ्र पडलें होतें, वर जिकडे पहावें तिकडे तेजःपुंज तारे चमकत होते; बंगल्याचे समोर सुमारें वीस हातावर एक तुटलेला कडा होता, त्यावरून समोरील दरीचा रात्रीचा देखावा फार च सुंदर दिसत होता. एकंदर तो चांदण्या रात्रीचा मनोहर देखावा पाहून त्या प्रशांत समयीं माझें चित्त फार च प्रसन्न झालें. रात्रीं दीड दोन वाजेपर्यंत मी आनंदसागरांत पोहोंत होतों. एकांतांत बसून सृष्टि व परमेश्वर ह्यांविषयीं विचार करण्याचा ज्यांना अभ्यास आहे, त्यांना च त्या आनंदाची कल्पना होईल. ह्या रात्रीं मी फक्त एक दोन तास निद्रा घेतली असेल. 'धूनाघाट' ला सरकारी वाण्याचें दुकान आहे. डाक बंगला हि मोठ्या मजेदार ठिकाणीं बांधलेला आहे.

सकाळीं चार वाजतां मीं नोकरांना जागें केलें; व शौच

मुखमार्जन करून पांच वाजता आम्ही 'धूनाघ्र ट' हून 'मायावती'स जाण्यासाठीं निघालों. 'चपावती'चे रस्त्यानें मी मायावतीला गेलों. त्या रस्त्यानें सुमारें दोन कोसाचा वळसा पडतो. मधला पायरस्ता अरण्यांतून होता व ह्या समयीं त्या रस्त्यानें गेलों असतों तर चुकलों असतों, असें 'मायावती'स गेल्यावर मला समजलें. 'मायावती' ला 'अद्वैताश्रमात' मी चौथे दिवशीं दुपारीं बारा वाजता पोहोंचलों.

मुंबई सोडल्यापासून मायावतीस येईपर्यंत मी सात दिवस एकसारखा प्रवास करीत होतों. अद्वैताश्रमात माझा एक महिना मुक्काम होता. पुढच्या प्रवासासंबंधीं माहिती मिळाल्यास ती मिळवावी व कांहीं दिवस स्वस्थ एकांतात विश्रांति घ्यावी ह्या हेतूनें मी मायावतीस एक महिना राहण्याचें ठरविलें. मायावतीला ह्यापूर्वीं मी एकदा गेलों होतों. दुपारीं बारा वाजता जेव्हा मी आश्रमात पोहोंचलो, तेव्हा मला माझ्या परिचयापैकीं कोणी च दिसेना. आश्रमात शिरल्याबरोबर जिकडे तिकडे अव्यवस्थितपणा माझे नजरेस आला. शिवाय जिकडे पहावें तिकडे उदास दिसत होतें! पूर्वीं क्याप्टन् सेव्हिअर साहेबांचे वेळेस ह्या संस्थेची चांगली व्यवस्था होती, असें म्हणतात. मी पहिल्यानें जेव्हा येथें आलो होतों, त्या वेळीं कैलासवासी स्वामी स्वरूपानंद (हे १९०६ सालीं समाधिस्थ झाले) हे ह्या आश्रमाचे अध्यक्ष होते. तेव्हा देखील येथील व्यवस्था बरी होती. त्या वेळचे आणि आताचे स्थितींत मला किती तरी अंतर दिसलें! अशी गैरव्यवस्था पाहून

माझें मन थोडेसें खिन्न झालें! एखाद्या गृहस्थास, कांहीं दिवस एकातांत राहून परमार्थसाधन करावयाची इच्छा झाली तर त्याचे राहण्याची व जेवण्याची सोय ह्या आश्रमात केलेली आहे. महिना वीस रुपये माणसी घेतात. हल्लीं वीसाचे पचवीस रुपये केले आहेत. तसें च येथें सहकुटुंब राहतां यावें अशी योजना देखील केलेली आहे; परंतु तसे येथें विशेष कोणी येत नाहींत.

मायावती ही एक डोंगराची रांग आहे. आगगाडीपासून 'कुमाऊन' परगण्यात हा पहाड पूर्वेस सुमारें पाऊणशें मैल आहे. सडक चांगली आहे. ह्या पहाडाची उंची सात हजार फूट आहे. त्या सबंध परगण्यात असें दुसरें रमणीय स्थल नाहीं. ह्या पहाडाचे माथ्यावर च "अद्वैताश्रम" ह्मणून अतिशय रम्य ठिकाण आहे. येथील हवा थंड असून निरोगी आहे व पाणी हि शीतल व पाचक आहे. कैलासवासी प्रसिद्ध स्वामी विवेकानंद यांनीं हा आश्रम या ठिकाणीं स्थापन केला. हें स्थल एकांत ठिकाणीं असल्यानें योगाभ्यास करण्यास फार च योग्य आहे. ह्या पहाडावर ओक, रोडडम, देवदार, पाईन, साग वगैरे वृक्षाचें मोठें व सुंदर असे अरण्य आहे. तें सुमारें तीन चार मैलाचें आहे. पंधरा वीस हजार रुपये खर्च करून हें रम्य स्थान श्री स्वामी विवेकानंद यांनीं तयार करविलें. स्वामींचे युरोपियन शिष्य क्याप्टन् सेव्हिअर यानीं ह्या कार्याचा बराचसा भाग उचलला होता. हे गृहस्थ ह्या च आश्रमात शेवटीं हा मृत्युलोक सोडून गेले. हल्लीं त्यांची वृद्ध पत्नी ह्या च आश्रमात रहात आहे.

अद्वैताश्रमाची इमारत पहाडाचे अगदीं माथ्यावर आहे. सुमारें चार पाचशें फूट [redacted] एका शिखरावर दुसरा एक सुंदर लहानसा बंगला बांधलेला आहे. त्याला " कुटीर " असें नांव ठेविलेलें आहे. ह्या बंगल्याचे सज्जातून सृष्टिसौंदर्य फार च चांगलें दिसतें. ह्या च शिखरावर सुमारें पन्नास फूट खालीं आणिखी एक तिसरा बंगला आहे. जवळ च एक गोशाळा हि बांधलेली आहे. ह्या च बंगल्याचे मागचे बाजूस भाजी-पाल्याचा एक सुंदर लहानसा बाग असून त्यात निरनिराळीं फुलझाडें आहेत. बागेंत भाजी बहुतेक विलायती च आहे. मायावती पहाडावर सहल करण्यासाठीं अरण्यातून पथ तयार केलेले आहेत व ठिकठिकाणीं विश्रांतीसाठीं वृक्षाखाली साधीं बाकें ठेवलेलीं आहेत. सारांश हें स्थल फार च रम्य व सुंदर आहे.

अद्वैताश्रमात " प्रबुद्ध भारत " नावाचें मासिक इंग्रजींत निघत असतें. ह्या आश्रमात एक लहानसें वाचनालय हि आहे. तेथें इंग्रजी मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचावयास सांपडतात. ह्या ठिकाणीं एक दोन सन्यासी व दोन ब्रह्मचारी आहेत. एक अमेरिकन तरुण गृहस्थ आहे, त्यानें योगदीक्षा घेतलेली आहे. आश्रमात नोकर चाकर मिळून सुमारें वीस मनुष्यें आहेत. आसमंतात तीन चार मैलात एक हि गाव नाहीं; त्यामुळें लोकाचा त्रास नाहीं. " लोहाघाट " म्हणून एक तीन मैलावर गाव आहे, तेथें पोस्ट ऑफिस आहे. मायावतीहून लोहाघाटपर्यंत टपालची नेआण करणारा माणुस आहे, त्यामुळें रोज पत्रव्यवहार करण्यास कांहीं च अडचण पडत नाहीं.

अद्वैताश्रम ज्या पहाडाचे माथ्यावर आहे, त्या पहाडाचे तीन दिशेस उच्च डोंगर आहेत; उत्तरेस मात्र मैदान आहे; यामुळें त्या बाजूस दृष्टि बरी च लांबपर्यंत पोंहोंचते. आश्रमाचे बाहेर सभोंवार चांगलें पटांगण आहे. ह्या पटांगणात उभें राहून एकदा चोहोंकडे दृष्टि फेंकली ह्मणजे मोठी मौज दिसते. उत्तरेकडील दरीकडे त्यावर पाहिलें कीं लहान लहान टेंकड्या हिरव्यागार तृणांकुरांनीं आच्छादित असल्यामुळें डोळ्यांना संतोषवीत असतात; त्याचे पुढें पूर्वपश्चिम अर्धचंद्राकार पसरलेली हिमाच्छादित पर्वतशिखरांची ओळ नेत्रास फार च आनंद देते. जिकडे पहावें तिकडे हिरवेंगार अरण्य असून त्याचे पलीकडे डोंगराची रांग आपली आहे च. कधीं कधीं मेघ इतके आपल्या जवळून भ्रमण करीत असतात कीं, मनुष्य मेघसमूहांत अदृश्य होतो! कधीं कधीं मेघांचे वर मनुष्य राहतो, व मेघ पहाडाचे मध्यरेषेनें इकडून तिकडे व तिकडून इकडे पळत असतात! रात्रीं जंगली श्वापदांचा शब्द ऐकू येतो. येथें प्रातःकाळीं व सायंकाळीं जें सृष्टिसौंदर्य पहावयास सांपडतें, तसें इतर कोणत्या हि वेळीं सांपडत नाहीं. मायावतीला मी होतों, त्या समयीं एकदा गाराची वृष्टि झाली. त्या वेळची शोभा काय विचारावयाची! जिकडे पहावें तिकडे शुभ्र जमीन! झाडें हिरवींगार व टव-टवीत दिसत होतीं. सभोंवार शांततेचें पूर्ण साम्राज्य होतें. मधूनमधून वनांतील पक्ष्यांच्या मंजुळ शब्दानें मात्र त्या शांत-तेचा भंग होत असे. हा रम्य देखावा पाहून माझें चित्त एकदम एकाग्र व तल्लीन झालें.

मायावतीस असताना माझा काळ फार च आनंदांत जात असे. बहुतेक वेळ मी [illegible]त च घालवीत असे. कांहीं वेळ एखाद्या देवदारुचे झाडाखाली बसावें तर कांहीं वेळ वनात इकडे तिकडे स्वतःशीं च गात भ्रमण करीत असावें. डोंगराचे पायथ्याशीं असलेल्या एखाद्या लहानशा नदीचे कांठीं एखाद्या खडकावर बसून एकांतात वनश्रीचें सौंदर्य अवलोकन करून मी आपल्या नेत्राचें पारणें फेडून घेत असताना परमेश्वरचिंतनांत तासचे तास घालवीत असे ! आश्रमांतील लोकांत मी अगदीं मिसळत नसे; कारण मला गप्पा मारण्यास फुरसत च मिळत नसे. रात्रीं जेवण झाल्यावर पधरा वीस मिनिटें मी वाचनालयांत त्याच्याशीं बोलत असे व संध्याकाळीं अरण्यात भटकत असताना मिसेस सेव्हिअर भेटली तर तिच्या बरोबर कांहीं वेळ गोष्टी बोलत बोलत फिरत असे. मला एकांत फार च आवडत असे, त्यामुळें आश्रमांतील सन्यासी माझा वेळ घेत असत असें कधीं च झालें नाहीं एकांतवासासाठीं च मीं मायावतीस मुद्दाम मुक्काम केला होता.

मुंबईपासून मायावतीपर्यंतचे प्रवासांत माझे फारसे हाल झाले नाहींत. काथगोदामपासून मायावतीपर्यंत पहाड आहेत व अरण्यें आहेत, तरी मार्ग चागल्या रहदारीचा व सडकेप्रमाणें असल्यामुळें व प्रत्येक पडावावर डाक बंगला व वाण्याचें दुकान असल्यामुळें, जरी मी सात दिवस एकसारखा प्रवास केला तरी मला ह्मणण्यासारखा विशेष त्रास न होता मायावतीपर्यंत सुखरूप येऊन पोहोंचलों. अद्वैताश्रमात मी एक महिनाभर राहिलों

होतों. तेवढ्या अवधींत मानस सरोवर व कैलास येथें जावयास जी जी सामुग्री लागते तिचा संग्रह करूं लागलों, व सर्व काहीं हळु हळु जुळून आलें.

येथें एक गोष्ट सांगावयाची, ती ही कीं, पश्चिम तिबे-टांत जाण्याचा मला हा पहिला च प्रसंग असल्यामुळें, मला तिकडची काहींएक माहिती नव्हती व जी मिळाली ती बरोबर नव्हती, म्हणून मजकडून ब-याच चुका झाल्या व त्यामुळें खर्च हि जास्त झाला. मी दोन कुली नोकर ठेविले होते, ते कुमाऊन परगण्यातले होते. एकाला अकरा रुपये व दुस-याला साडे आठ रुपये दरमहा देत होतों, ही माझी पहिली चूक. "गर्बियांग" पर्यंत च कुली करावयास पाहिजे होते. गर्बियांगचे पुढें तिबेटात सदरील कुली निरुपयोगी होतात. एक ( देशी ) मनुष्य स्वैंपाकपाणी करावयास बरोबर घ्यावा. बिस्किटें, गोठलेलें दूध, मेणबत्त्या वगैरे जिन्नस मला माझ्या एका प्रिय मित्रानें (राम एजन्सीचे मालक) मुंबईहून पोष्टानें पाठविले, ते मला मायावतीस मिळाले. हिमालयात प्रवास करावयाचा असला म्हणजे ब-याचसे गरम कपडे जरूर जवळ पाहिजेत, त्याप्रमाणें मीं घेतले होते. मी अंगांत एकदर पांच कपडे एकावर एक घालीत असे व सर्वांचे वर कफनी घालीत असे. पायात गरम विजार घालून गुडघ्यापासून खालीं गरम कापडाचा पट्टा पलटणींतील शिपायाप्रमाणें बांधीत असे. पायात काहीं दिवस बूट असे. माझे कपडे पुष्कळ जाड व गरम होते.मी डोक्याला कांहीं घालीत नसे, परंतु कपाळ-

पट्टीची गरम टोपी घालून त्यावर कोशा किंवा रुमाल बांधला ह्मणजे थंडीपासून पुष्कळसें रक्षण होतें. पायास पट्टा बांधीत होतों ह्मणून मोठमोठाले पहाड चढतांना व उतरतांना मला फारसा त्रास झाला नाहीं. बर्फावर सूर्यकिरणें पडलीं कीं, जिकडे तिकडे नेत्रास असह्य असा प्रकाश पडतो; त्यापासून डोळ्यांस त्रास होऊन डोळे बिघडतात, ह्मणून मी गारेचा अस्मानी रंगाचा चष्मा बरोबर घेतला होता. परंतु मला त्याचा उपयोग एकदा च झाला. याखेरीज मजबरोबर एक लहानशी दुर्बीण ( बायनाक्युलर ) व एक घड्याळ होतें. या दोन्ही वस्तूंचा मला पुढे फार उपयोग झाला.

मायावतीचे सन्यासी व इतर मंडळी मला ह्मणूं लागली कीं, तुह्मी हा जो प्रवास करणार तो फार च कठीण आहे, तुमची शरीरयष्टि तर अगदीं कृश दिसते; तुह्मी सबंध हिमालय कसा ओलांडाल, याची आह्माला मोठी काळजी वाटते, वगैरे वगैरे. मी त्यांना एक च उत्तर दिलें, " मैं सद्गुरुका बच्चा कभी नहि हुगा दिलका कच्चा. " असो.

ज्या दिवशीं निघावयाचें त्याचे आदले रात्रीं मी ध्यानाला बसलों. ध्यान संपल्यावर फार हुषारी वाटली. हा एक हिमाचल च काय, परंतु असे लाखो हिमाचल असले तरी ते माझें ध्येय साधण्यासाठीं ओलांडून जाण्याचें मला सामर्थ्य आहे, असें मला वाटलें. आत्मनिष्ठा, उत्कट इच्छा, ब्रह्मचर्य, श्री सद्गुरु-चरणीं निस्सीम प्रेम व त्यामुळें लागलेलें वेड, ह्या गोष्टींमुळें मला देहाची कांहीं च पर्वा वाटली नाहीं. माझा देह अशक्त असेल, परंतु मन अशक्त नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री होती.

ध्येय साध्य झाल्याशिवाय परत फिरावयाचें नाहीं, अशी मीं पक्की खूणगाठ बांधून ठेविली होती नंतर ज्याना ज्याना पत्रें लिहावयाचीं होतीं, त्याना त्याना पत्रें लिहिलीं व जी लेखणी खालीं ठेविली, ती पुन्हां चार पाच महि-न्यानीं हातात घेण्याचा प्रसंग श्री नारायणकृपेनें आला.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं दोन कुली व मी मायावतीहून श्री कैलास व मानस सरोवर येथें जाण्यासाठीं निघालों. माझे कुली तद्देशीय ब्राह्मण होते. त्यापैकीं एकाला तिबेटी भाषा ( हूण भाषा ) थोडी थोडी येत होती. मायावती-हून गर्बियांग सुमारें सवाशें मैल आहे. अजमासें दहा दहा मैलावर पडाव ( मुक्कामाच्या जागा ) आहेत. गर्बियांगला पोहोंचावयास मला पंधरा दिवस लागले ! कैलास व मानस सरोवरापर्यंत इच्छा असल्यास घोड्यावरून देखील प्रवास करता येतो, पैसे मात्र पाहिजेत. मीं सर्व प्रवास पायीं च केला. श्रीसमर्थ सद्गुरुमहाराजाचें चिंतन करून प्रवासास प्रारंभ केला. दुपारीं एक वाजण्याचे सुमारास मी "छीडा' येथें पोहोंचलों. मी त्या दिवशीं तेरा मैल चाललों. छीडा हें ठिकाण फार उष्ण आहे. तेथील पाणी हि चांगलें नाहीं. तेथें डाक बंगला व वाण्याचें दुकान आहे. माझ्या कुलींचे मनात मायावतीपासून सात मैलावर च मुक्काम करावयाचा होता. पण मीं मायावतीहून जो निघालों तो छीडा येथें च थांबलों. वाटेंत 'लोहाघाट ला मात्र पोष्टांत पत्रें टाकण्यासाठीं व पोष्टमास्तरला माझा पत्ता वगैरे सांगण्यासाठीं पंधरा वीस मिनिटें थांबलों होतों माझे कुली छीड्याला दुपारीं

तीन वाजतां कसे बसे येऊन पोहोंचले. ह्या खेपेचे कुली हुषार, चलाख, व धीट नव्हते. ते आपले कुली च, ह्मणजे खरोखर बोजा उचलणार मजूर होते: गोबियागपर्यंत ते माझ्या बरोबर एक दिवस सुद्धां चालले नाहींत. मी पुढें एकटा च आपले नादात चालत असे. श्वासनिरोध करता येत असल्यामुळें पहाड चढतांना अथवा उतरतांना मला कधीं च दम लागला नाहीं. मी फार जलद हि चालत नसे व अति सावकाश हि चालत नसे. श्वासाचे प्रमाणावर माझीं पावलें नेहमीं पडत असत. माझे कुली एक चढण चढून आले कीं, अर्धा तास विश्रांति घेत असत. चालतांना वाटेंत मी कधीं हि पाणी पीत नसे व कांहीं खात हि नसे; त्यामुळें माझे नळ फुगून पोट वगैरे कधीं हि दुखलें नाहीं व मला कसला हि त्रास झाला नाहीं.

प्रवासांत मला त्रास झाला नाहीं किंवा माझे हाल झाले नाहींत, असें मी ह्मणतों, याचा अर्थ इतका च कीं, माझ्या मनाला कांहीं च दुःखदायक असें वाटलें नाहीं; माझें लक्ष ध्येयाकडे सर्वस्वीं वेधलेलें होतें; मी माझ्या ध्येयासाठीं वेडा झालों होतों.

छीड्याला डाक बंगल्याचे पडवींत आह्मीं मुक्काम केला. जवळ च एका पाईन वृक्षाखालीं स्वैंपाकाची व्यवस्था माणसांनीं केली. येथ माशा फार च होत्या. जेवावयाचे वेळीं अशी भीति वाटे कीं, जेवतांना पोटांत माशी जाते कीं काय! आमच्या आंगावर व इतर सर्व पदार्थांवर इतक्या माशा होत्या कीं आह्मी सर्व अगदीं काळे दिसूं लागलों. हिमालयांत येथें च पहिल्य ने आक्रोडाचीं झाडें माझे दृष्टीस पडलीं. भावी सुखाच्या विचारतरंगांत एका

वृक्षाखालीं व्याघ्राजिनावर दिवसभर मी स्वस्थ पडलों होतों. मधूनमधून नोकराशीं पुढच्या प्रवासासंबंधीं गोष्टी बोलत असे.

रात्रीं पडवींत आह्मी निजलों. दिवसभर श्रम होत असल्यामुळें रात्रीं निद्रा मात्र अगदीं गाढ व सुखाची लागत असे. मध्यरात्रीचे सुमारास मला कांहीं जनावर ओरडलेंसें वाटलें; परंतु मी अर्धवट झोपेंत असल्यामुळें माझें तिकडे लक्ष च गेलें नाहीं. मी स्वस्थ निजलों. कांहीं वेळानें माझ्या एका कुलीनें वाघाची डुरकणी ऐकली व तो खडबडून जागा झाला; त्यामुळें मी व दुसरा मनुष्य हि उठून बसलों. 'शेरका बोल मैंने सूना' असें तो कुली ह्मणाला. आह्मी वाघाच्या गोष्टी बोलत बिछान्यावर च (घोंगडीवर) लोळत होतों, इतक्यात पुन्हा डुरकणें ऐकु आलें. सबंध रात्रींत तीन चारदा वाघाचें डुरकणें ऐकू आलें! तिकडे लक्ष लागल्यामुळें आह्माला मग झोंप लागली नाहीं. तेथील सरकारी वाणी सांगत होता कीं कधीं कधीं वाघ बंगल्याचे पडवींत येऊन निजतो. असो.

सकाळीं तीन वाजतां मीं कुलींना निघण्याची तयारी करण्यास सांगितलें व चाराचे सुमारास आह्मी चालू लागलों. छीड्यापासून तीन चार मैल एकसारखा उतार लागतो. चढणीपेक्षां उतरणीवरून चालण्याचा फार त्रास होतो. उतार उतरून "शरयुगंगा" नदीचे कांठीं प्रातःकालीं सहा वाजतां येऊन पोहोंचलों. पुलाजवळ एक तास मुक्काम केला. शौच, मुखमार्जन, स्नान संध्यादि विधि आटोपून चहा घेतला व पुढें चालू लागलों. येथें माझ्या जिवावरचा एक प्रसंग टळला. ज्या दगडावर मी स्नान करीत होतों, त्या दगडाखालची

वाळू पाण्याच्या जोराच्या प्रवाहामुळें वाहून गेली व तो दगड उलटला, त्यासरशीं मी पाण्यांत पडलों. पायाखालची वाळू निसटू लागली व मी खोल खोल जाऊं लागलों. मला पोहतां येत नसल्यामुळें मधल्या धारेकडे मी वहात चाललों, इतक्यात, पाण्यांत एक मोठा खडक होता, तो माझ्या हातीं लागला. खडकावर उभा राहून कुलींना हांक मारली व कुलींनीं मला किनाऱ्यावर आणलें. यावरून श्री कैलासाचें व मानस सरोवराचें दर्शन होऊन आपला हेतु पूर्ण होणार हें खास, असें वाटून मला जास्त धैर्य व समाधान वाटू लागलें. शरयूगंगा ओलांडण्यास लोंबता पूल आहे. हिमालयांत मोठमोठ्या नद्यांवर असे च लोंबते पूल ( hanging bridges ) बांधलेले आहेत. जितका उतार उतरून आलों तितकी च मोठी परंतु खडी नव्हे अशी चढण लागली; ती थेट " गोरन्या " पर्यंत होती. सुमारें साडे नऊ वाजतां मी "गोरन्याला" पोहोंचलों. तेथें डाक बंगला व वाण्याचें सरकारी दुकान आहे. हा पडाव छीड्यापासून सुमारें दहा मैल आहे. गोरन्याची हवा थंड व पाणी हि बरें आहे. येथें पहिल्यानें च मीं केळीं पाहिलीं केळीचीं व आंब्याचीं झाडें हिमालयात असतील अशी माझी कल्पना नव्हती, कारण हीं झाडें आजपर्यंत मीं हिमालयात कोठें हि पाहिलीं नव्हतीं.

मी गोरन्याला आलों त्या समयीं तेथील पटवारी ( कुळ-कर्णी ) पंडित केदारनाथ याची व माझी भेट झाली. ह्या च दिवशीं येथें डेप्युटी कलेक्टरची स्वारी आलेली असल्यामुळें त्याच्या सरबराईसाठीं पटवारी गोरन्याला आलेला होता. पटवाऱ्यानें

माझी व्यवस्था चांगली ठेविली होती. दूध, तूप, दही, वगैरे जिन्नस मला येथें मिळाले. त्या पटवाऱ्यानें काशीस जाऊन शास्त्राची पहिली परीक्षा दिलेली असल्यामळें त्याला संस्कृत येत होतें. बंगल्यांत जागा नसल्यामुळें दोन भव्य वृक्षाचे मधील दाट व थंड छायेंत त्यानें माझ्यासाठीं एक पर्णकुटी तयार करविली होती. त्या दिवशीं सर्व दिवसभर त्या पटवाऱ्याशीं धार्मिक विषयांवर भाषण करण्यांत वेळ गेला. हा दिवस फार आनंदांत गेला. कोणत्या हि विषयावर मी चर्चात्मक संभाषण फारसा करीत नसे. ह्याला कारणें वरीं च जरी नव्हतीं, तरी जीं काय होतीं, तीं निदान मला तरी महत्वाचीं वाटत होतीं. रात्रीं अलमोरा येथील एक तरुण वकील मला भेटले, त्यांचें व माझें रात्रीं बारा वाजेपर्यंत संभाषण झालें. तें भाषण धार्मिक, सामाजिक, वगैरे विषयांवर होतें. "भोट"ला जाणारा एक शाळामास्तर मला येथें भेटला. असें सांगतात कीं सुमारें पांच सहाशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतून ब्राह्मणाचें एक कुटुंब एका क्षत्रिय राजाबरोबर ह्या प्रांतांत आलें होतें. पटवारी पंडित केदारनाथ हा ह्या च कुटुंबापैकीं आहे. "गगोली हाटात" महाराष्ट्रीय ब्राह्मण राहतात. आतां ते नांवाचे ब्राह्मण आहेत. फार वर्षांचे वस्तीमुळें ह्या महाराष्ट्रीय कुटुंबाचे वंशज पहाडी च बनले आहेत, व असें होणें साहजिक आहे.

हिमालयाला "उत्तरखंड" ह्मणतात. तिकडील ब्राह्मण मांस भक्षण करतात. फक्त पंडित कुटुंबांतील माणसें व त्यांचे वंशज मांसाहार करीत नाहींत. तथापि त्याचा इतर सर्व व्यवहार साहजिक च पहाडी लोकांसारखा आहे. हे कुलीचा देखील धंदा करितात !

गोरन्याला मी असताना एके दिवशीं सायंकाळीं नेहमींप्रमाणें अरण्यांत एकटा च फिरावयास गेलों होतों. फिरतां फिरतां शेजारच्या एका टेकडीकडे माझें लक्ष गेलें. त्या टेकडीचा पश्चिमेकडील भाग तुटलेल्या कड्याप्रमाणें असून त्या कड्याचे माथ्यावरील खडक बराचसा पुढें आलेला होता; त्या खडकावर जाऊन मी उभा राहिलों. तो सूर्यास्ताचा समय होता. मी तेथें ध्यानासाठीं बसलों. ती शांततेची वेळ होती; दिवाकर क्षितिजाचे खालीं हळु हळु जाऊं लागला होता; मी ज्या टेकडीवरील कड्याचे खडकावर बसलों होतों, तिच्यावर श्रीनारायणानें आपले कोमल किरण अजून कायम ठेवलेले असून, माझे डाव्या बाजूचे सखोल दरींत समोरच्या पर्वताची छाया पडली होती, व उजवे बाजूचे पहाडावर व पहाडाचे पलीकडे सूर्यरश्मि प्रकाशमान होते. शीत वायु वहात होता. या एकदर परिस्थितीमुळें मला फार आनद झाला व मीं श्री सूर्यनारायणरूपी सद्गुरूचें स्तवन केलें! आठ वाजण्याचे सुमारास मी कुटींत परत आलों, भोजन केलें व विश्रांतीसाठीं नामस्मरण करीत एकटा च पडून राहिलों व सुमारें बारा वाजतां निजलों.

सकाळीं पाच वाजतां, आम्ही चौघेजण पुढें जाण्यासाठीं गोरन्याहून निघालों. जातांना पटवारी हि भेटला. साडे आठ वाजता "पिठोरागड" ला आलों. पिठोरागड तहशील असून व्यापाराचें ठिकाण आहे. पिठोरागड एका खोन्यांत अर्ध-चंद्राकार वसलेलें आहे. येथें एक जुना लहानसा किल्ला आहे. पूर्वीं येथें नेपाळ सरकारचें राज्य असतांना लहानशी शिबदी

असे. येथें पोष्ट ऑफिस व डाक बंगला आहे. येथें बाजार मोठा आहे. हा परगणा सुपीक आहे. येथें तांदूळ, गहू, नाचणी वगैरे धान्य पिकतें. ह्या परगण्याला 'सोर' परगणा असें हि दुसरें नांव आहे येथें मिशनरी लोकांची संस्था आहे. तीन चार हजार हलक्या जातीचे लोक केवळ पोटासाठीं ख्रिस्ती झालेले आहेत, असें मला समजलें. पिठोरागडचे पुढें जे जिन्नस मिळण्यासारखे नव्हते, ते मीं येथें खरेदी केले. पिठोरागड तालुका असल्यामुळें येथें तहशीलदार आहे. पिठोरागडाला माझा मुक्काम सुमारें पांच सहा तास होता. जेवण वगैरे आटोपून दुपारीं दोन वाजतां आम्ही पुढें चालू लागलों. गोरन्याहून "सोर" सुमारें सात आठ मैल आहे. गोरन्यापासून सोरपर्यंत उतार आहे. अलमोरा जिल्ह्यात सोर परगणा मोडतो. एका टेकडीवर उभें राहून मीं पिठोरागडाकडे पाहिलें. मोठी मौज दिसली. सोर परगण्यांत पाण्याची विपुलता असल्यामुळें शेती चांगली असते. मुंढवा धान्याचीं तीं हिरवींगार शेतें समोरच्या पहाडावर जिन्याचे पायऱ्याप्रमाणें शोभा देत होतीं. पायथ्याशीं पिठोरागड गांव वसलेलें दिसत होतें. पहाडावरून निरनिराळ्या शेतातून बांधून आणलेलें पाणी, त्यावर सूर्यकिरणें पडल्यामुळें चमकत होतें. येथून पुढें मी रोज दीड पडाव म्हणजे पंधरा मैल पायीं प्रवास करूं लागलों. संध्याकाळीं आम्ही "नावर" नावाचें खेड्यांत आलों व तेथून सुमारें एक मैलावर असलेल्या एका पाठशाळेंत मुक्काम केला.

ही पाठशाळा टेकडीचे माथ्यावर होती. पाणी टेकडीचे पायथ्याशीं म्हणजे चार पाचशें फूट खोल दरींत होतें. पहाडी

भाषेंत दरीला 'खड' ह्मणतात. आमचे जवळ घागर वगैरें मोठें भांडें नव्हतें. रात्र अंधारी होती. पधरा मैल चालून आल्या-मुळें कुली नाखुष झालेले होते. मी व शाळामास्तर मुक्कामाला संध्याकाळीं सात वाजतां आलों. कुली दीड तासानें येऊन पोहोंचले. ह्या समयीं मला माझ्या जुन्या वृद्ध नेपाळी वाटाड्याची फार आठवण झाली. अंधारांत मी एकटा च पाण्याचे झऱ्याजवळ गेलों. जाताना वाटेंत माझ्या दोन पायामधून एक जनावर गेलें. तें चार पायाचें असावें, असें मला वाटलें. सर्प वगैरे कांहीं दिसला नाहीं. अंधारात जाऊन कमंडलू भरून पाणी आणलें. रानशेण्या व थोडेसे कांटे तेथें होते, ते पेटवून विस्तव केला व कमंडलूंत खिचडी शिजत ठेवली. पुरेसा अग्नि नसल्यामुळें खिचडी कच्ची राहिली. जेवावयास मजजवळ ताट नव्हतें, तेव्हां शाळेच्या पुढच्या पडवींत एक शिळा पडली होती, ती पाण्यानें धुऊन, तीवर खिचडी उकरून घेतली व जेवावयास बसलों. हात धुण्यासाठीं व पिण्यास पाणी आणण्यासाठीं मी झऱ्याकडे जावयास काळोखात निघालों, तेव्हां त्या दोन कुलींपैकीं जो तरुण कुली होता तो ह्मणाला, आपण बसा, मी कमंडलु घालून पाणी घेऊन येतों; कारण तो कुली माझी विशेष काळजी घेत असे. पाणी घेऊन परत यावयास त्याला पाऊण तास लागला, अंधारांत दोन चार ठिकाणीं तो पडला व त्यामुळें त्याला दोन ठेंचा लागल्या होत्या! शाळेच्या पडवींत आह्मी निजलों; परंतु जमीन सारखी नव्हती त्यामुळें निजता येईना. प्रवासांत माझी निद्रा कमी च झालेली होती. पुढें पुढें तर दोन अडीच तास झोंप मला पुरेशी होई. नावरचे पाठशाळेंत

निजलों असतां, पहाटे तीन साडेतीनचे सुमारास मला एक स्वप्न पडलें, त्या स्वप्नांत मला उपासनेचें दर्शन झालें व मागाहून माझ्या एका जिवलग व मजवर निस्सीम प्रेम करीत असलेल्या एका मित्राची भेट झाली. ह्या मित्राविषयीं मुंबईहून निघाल्यापासून ह्या स्वप्नाचे दिवसापर्यंत एकदा देखील स्मरण झालें नव्हतें. असो.

आह्मीं पहाटे तीन वाजतां पुढें प्रवास करण्यास प्रारंभ केला. सूर्योदयाला "कनालीछीना" येथें पोहोंचलों. नावरपासून कनालीछीना चार मैल आहे. येथें वाण्याचें एक दुकान आहे. तेथें शौच मुखमार्जन करून शिधा विकत घेतला व पुढें चालूं लागलों. सुमारें साडे नऊ वाजतां "मितोडा" नावाच्या एका लहान खेड्याजवळ शेतांतील एका आम्रवृक्षाखालीं जेवणखाण करण्यासाठीं मुक्काम केला. येथील पाणी थंड व गोड होतें. सुमारें दोन तीन तास आंब्याच्या झाडाखालीं आराम करून रात्रीच्या मुक्कामासाठीं, आह्मीं "अस्कोट"ला जाण्याचें ठरविलें होतें. "मितोडा" गांवापासून तीन मैलाची खडी चढण लागते. दुपारीं तीन वाजतां चढण्यास प्रारंभ केला. श्री वासुदेवाचे कृपेनें आकाश मेघाच्छादित होतें व वारा वहात होता. संध्याकाळपर्यंत ह्मणजे सहा, साडे सहापर्यंत आह्मी एकसारखे चढत होतों. आह्मांला जरी सर्व प्रकारें अनुकूल स्थिति होती, तरी पर्वतशिखरावर येईपर्यंत आमची फार त्रेधा झाली. उष्णतेमुळें सर्व आंगाची लाही होत होती; घामाच्या धारा पर्जन्याप्रमाणें डोक्यापासून खालपर्यंत सारख्या वहात होत्या. पायाचे तुकडे पडले कीं काय, असें

चाढूं लागलें. मी व शाळामास्तर सहा वाजता पर्वतशिखरावर येऊन पोहोंचलों. तेथें एक नैसर्गिक मोठी शिळा होती, तीवर आह्मी जाऊन बसलों. त्या वेळीं थंड हवा वहात होती. यामुळें काही वेळानें आमचे श्रम परिहार झाले. त्या शिळेवर, बसून मी त्या पर्वताचे दोन्ही बाजूस नजर फेंकली, तेव्हां तेथून "अस्कोट" गावाची शोभा फार च चांगली दिसत होती. येथून दुर्बिणींतून मी समोरच्या पहाडाचे शिखराकडे पाहिलें, तेव्हां त्या शिखरावर एक मोठा चार मजली वाडा दिसला. त्याचे खालचे बाजूला आसपास दोन तीनशें घराची वस्ति दिसत होती. केळीं, आंबे, सत्रीं, वगैरे फळझाडांची एक मोठी बाग पाहून मला फार च आनंद झाला व अस्कोटला गेल्यावर त्या बागेंत च उतरावें असें मनात आलें. जिकडे तिकडे हिरवेंगार रान दिसत होतें. कुलींचा अजून पत्ता नव्हता, ह्मणून मीं दुर्बिणींतून दुसरे बाजूस पाहिलें, तों कुली निमे चढण चढून वर आले होते व एका सागाचे झाडाखालीं बाजूला ओझें ठेवून ते चिलिम पीत बसलेले माझ्या नजरेस पडले. आह्मी किती उंच चढून आलों हें पाहण्यासाठीं, मीं त्या शिळेवरून पुढें होऊन पाहिलें, तों त्या टेकडीच्या पायथ्याशीं च असलेलें खेडें अगदीं च लहान दिसत होतें. सर्पाप्रमाणें तो नागमोडीचा रस्ता लांबवर दिसत होता. माझे कुली निमे मार्गावर होते, तरी ते अगदीं एखाद्या लहानशा प्राण्याप्रमाणें दिसत होते. मीं मोठ्यानें एक शीळ घातली व लवकर वर या असें त्यांना खुणावलें, परंतु त्यांच्याकडून प्रत्युत्तर

आलें नाहीं. तेव्हां शाळामास्तर ह्मणाला कीं, ते अगदीं थकून गेले असतील. याप्रमाणें आह्मी त्याची मार्गप्रतीक्षा करीत असता सुमारें सात वाजता ते शिखरावर येऊन पोहोंचले. ते अगदीं थकून गेलेले दिसले. त्याना सारखी धाप लागली होती, ती सुमारें पंधरा मिनिटांनीं कमी झाली. माझें ओझें एकंदर तीस शेर तर होतें. एक एक कुलीला पंधरा पंधरा शेर ओझें होतें, माझ्या जवळ देखील अंगावरील कपड्याचें जवळ जवळ दहा शेरांचें ओझें होतें.

आह्मी बसलों होतों, त्या जागेपासून अस्कोट सुमारें चार मैल होतें. संध्याकाळ झाली होती व कुली हि ह्मणाले अस्कोटपर्यंत आतां आमचेकडून चालवणार नाहीं. तेव्हां शेवटीं एक दीड मैलाचा उतार उतरून, एका खेड्यात आह्मीं रात्रीचा मुक्काम केला. ह्या खेड्यात तीन च घरें होतीं. येथें उपाशी निजण्याची पाळी येते कीं काय असें वाटलें परतु तेथील एका मवाशानें ( शेतकऱ्यानें ) आह्मांला एक रुपयाची चार शेर कणीक दिली; शाळामास्तरानें दुसरे शेतकऱ्याकडून चार बटाटे आणले, रात्रीं दहा वाजतां कसेतरी रोट बनवून आह्मी जेवलों व शेतांत उघड्यावर च निजलों. पावसाचा रंग दिसूं लागला व तो शेतकरी हि ह्मणाला कीं, येथें वाघांची भीति फार आहे, उघड्यावर निजूं नका, असें ह्मणून शेतांत तांदूळ कांडण्याची एक झोंपडी होती, तिच्यांत आह्मांला त्यानें जागा करून दिली; परंतु तेथें आह्मांस झोंप लागली नाहीं, कारण तांदुळांतील किड्यांनीं अतिशय त्रास दिला. ह्या खेड्यापासून अस्कोट दोन अडीच मैल लांब असल्यामुळें आह्मी सकाळीं पांच

बाजारांत उठून पुढचा मार्ग धरिला. सुमारें पाऊण मैल गेल्यावर अस्कोटला जाणारा एक दूधवाला आह्माला भेटला. त्याचे बरोबर मधल्या वाटेनें आह्मी गेलों व अस्कोटला सकाळीं आठचे सुमारास पोहोंचलों. कनालीछीना व अस्कोट ह्याचेमध्यें दहा मैलाचें अंतर आहे. प्रत्येक पडावांत सुमारें दहा दहा मैलाचें अंतर असतें. अस्कोटला पोष्ट व लहानसा बाजार आहे.

अस्कोट हें जहागिरीचें गांव आहे. येथें सूर्यवंशी क्षत्रिय राजा आहे. ह्या जहागिरीचे सालिना उत्पन्न सुमारें वीस हजाराचें आहे. येथील राजाला 'रजवाड' असें ह्मणतात. इंग्रज सरकारला सालिना बाराशें रुपये खंडणी द्यावी लागते. जमीन सुपीक आहे. प्रदेश समशीतोष्ण असून, गहूं, तांदूळ, मकई, ऊंस, ह्याचें पीक होतें. येथून नेपाळची पश्चिम सरहद्द सुमारें चार पांच मैलां-वर आहे. हिमालयात मोठी आंबराई अशी मी येथें च पाहिली. येथें हापूस, पायरी, वगैरे जाती देखील आहेत. ' अस्कोट ' ह्मणजे ' ऐंशी कोट '. असें ह्मणतात कीं, येथें पूर्वी ऐंशी रजवाड होते, त्यापैकीं " पाल " घराणें सर्वांत बलिष्ठ झालें; त्यानें सर्व राजांचा नाश करून अस्कोट परगणा आपल्या कबज्यात घेतला. भूपेन्द्रसिंग पाल हा या घराण्यांतील प्रथम पुरुष झाला.

अस्कोटला आल्यावर मीं असा विचार केला कीं, येथें शिधा सामुग्री खरेदी करून, तीन मैलाचा उतार उतरून 'गोरीगंगा' नदीचे कांठीं जेवण करावें व संध्याकाळचे मुक्कामाला ' बलवा-कोट' ला जावें; परंतु अस्कोटला आलों तेव्हां तेथील युवराजाची

( जेठालालाची ) व माझी भेट झाली. एक दिवस तरी रहावें असा त्यानें फार च आग्रह केल्यामुळें माझा मुक्काम तेथें च झाला. राजाकडून शिधा आला, तो आह्मां सर्वांस पुरेल इतका होता. त्या वेळेस तेथें उष्णता फार च होती. पोष्टाची एक जुनी जागा होती ती आह्मांला उतरण्यासाठीं दिली होती. तें घर पश्चिमाभिमुख असल्यामुळें उन्हाचा ताप फार होत होता. स्नानसंध्यादि आटोपून भोजनाची वेळ होईतों मी आंबराईत एका वृक्षाखालीं बसलों; तेथें मला बरें वाटलें. सुमारें एक वाजतां भोजन झालें. तो सबंध दिवस मीं आंबराईत च घालविला.

सायंकाळीं एका आंब्याचे वृक्षाखालीं एक कांबळें पसरून त्यावर व्याघ्रचर्म अंथरून मी आकाशाकडे पहात ईश्वरचिंतन करीत स्वस्थ पडलों असतां, तेथील पोलिटिकल पेष्कार कुमार जगतसिंग पाल हे मला भेटावयास आले. त्यांचे ते सतेज नेत्र व उमदा चेहरा पाहून मला आनंद झाला. हा गृहस्थ प्रेमळ, उदार, व सात्त्विक वृत्तीचा असावा असें मला वाटलें. ह्या गृहस्थाला इंग्रजी हि येत होतें. प्रथम मी त्यांच्याशीं हिंदींत च बोलण्यास प्रारंभ केला. नंतर मधून मधून इंग्रजींत बोलत होतों. कुशल प्रश्न झाल्यावर माझें कुल, शील, वसतिस्थान, वगैरे संबंधानें त्यांनीं मला माहिती विचारली व जें योग्य वाटलें तेवढें सांगून मी स्वस्थ बसलों. माझ्या चेहऱ्याकडे त्यांनीं कांहीं वेळ एकसारखी दृष्टि लावली. नंतर मला नमस्कार करून आणखी चार पांच दिवस मी येथें मुक्काम करावा, अशी त्यांनीं इच्छा प्रगट केली. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, एक दोन महिने मी अस्कोटला च रहावें; कारण तिबेटांत जाण्यास जुलई व आगष्ट

हे महिने चांगले; परंतु हिमालयांत ह्या महिन्यांत भयंकर पर्जन्य, शिवाय मला अस्कोटला फार उष्णता वाटूं लागली, त्यामुळें मला त्यांचें ह्मणणें पटेना. गर्बियांगला जास्त दिवस रहावें, कारण तो प्रदेश थंड असून जास्त रमणीय आहे, असें शाळामास्तरानें मला सांगितलें व ती सूचना मला हि पसंत पडली. पेष्कार साहेबांना हि तो विचार पसंत पडला. त्यांनीं आपण होऊन मला सांगितलें कीं, गर्बियांगचे पटवाऱ्यास व आमचे शिपायास पत्र पाठवून तेथें आपली राहण्याची वगैरे सर्व व्यवस्था करवितों; माझा सरकारी बंगला तेथें आहे, आपण तेथें खुशाल महिनाभर रहावें. भोटमध्यें गर्बियांग हें त्याचें मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें सरकारी बंगला आहे. ह्मटल्याप्रमाणें त्यांनीं पत्र पाठवून हि दिलें. पोलिटिकल पेष्कारचें काम ह्मटलें ह्मणजे "भोट" ची व्यवस्था पाहणें व तिबेटाशीं व्यापारासंबंधानें व्यवहार करणें, हें होय. हा इंग्रज सरकारचा कामगार आहे. पगार अवघा महिना रु. ५० आहे, परंतु अधिकार मात्र मोठा असतो. "भोट" मध्यें राजा ह्मणजे पोलिटिकल पेष्कार हा च. कुमार जगतसिंग हे अस्कोटच्या [illegible] आहेत. अस्कोटला मी एक दिवस होतों. मायावती सोडल्यापासून रात्रीं स्वस्थ झोंप अशी येथें व गोरन्याला लागली होती.

ठरल्याप्रमाणें मी अस्कोटहून दुसरे दिवशीं पहाटे तीन वाजता निघालों. तीन मैलाचा उतार उतरून गोरीगंगा नदीचे कांठीं प्रातर्विधि आटोपून कांहीं वेळ लोंबत्या पुलावरून नदीची मजा पहात इकडे तिकडे फिरलों. चहा तयार झाल्यावर चहा घेतला व पुढें चालूं लागलों. लोंबत्या पुलावरून गंगापार झालें

( जेठालालाची ) व माझी भेट झाली. एक दिवस तरी रहावें असा त्यानें फार च आग्रह केल्यामुळें माझा मुक्काम तेथें च झाला. राजा-कडून शिधा आला, तो आह्मां सर्वांस पुरेल इतका होता. त्या वेळेस तेथें उष्णता फार च होती. पोष्टाची एक जुनी जागा होती ती आह्मांला उतरण्यासाठीं दिली होती. तें घर पश्चिमाभि-मुख असल्यामुळें उन्हाचा ताप फार होत होता. स्नानसंध्यादि आटापून भोजनाची वेळ होईतों मी आंबराईंत एका वृक्षा-खालीं बसलों; तेथें मला बरें वाटलें. सुमारें एक वाजतां भोजन झालें. तो सबंध दिवस मीं आंबराईंत च घालविला.

सायंकाळीं एका आंब्याचे वृक्षाखालीं एक कांबळें पस-रून त्यावर व्याघ्रचर्म अंथरून मी आकाशाकडे पहात ईश्वर-चिंतन करीत स्वस्थ पडलों असतां, तेथील पोलिटिकल पेष्कार कुमार जगतसिंग पाल हे मला भेटावयास आले. त्याचे ते सतेज नेत्र व उमदा चेहरा पाहून मला आनंद झाला. हा गृहस्थ प्रेमळ, उदार, व सात्विक वृत्तीचा असावा असें मला वाटलें. ह्या गृह-स्थाला इंग्रजी हि येत होतें. प्रथम मी त्याच्याशीं हिंदींत च बोलावयास प्रारंभ केला. नंतर मधून मधून इंग्रजींत बोलत होतों. कुशल प्रश्न झाल्यावर माझें कुल, शील, वसतिस्थान, वगैरे संबधानें त्यांनीं मला माहिती विचारली व जें योग्य वाटलें तेवढें सांगून मी स्वस्थ बसलों. माझ्या चेहऱ्याकडे त्यांनीं कांहीं वेळ एकसारखी दृष्टि लावली. नंतर मला नमस्कार करून आणखी चार पांच दिवस मी येथें मुक्काम करावा, अशी त्यांनीं इच्छा प्रगट केली. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, एक दोन महिने मी अस्कोटला च रहावें; कारण तिबेटांत जाण्यास जुलई व आगष्ट

हे महिने चांगले; परंतु हिमालयांत ह्या महिन्यांत भयंकर पर्जन्य, शिवाय मला अस्कोटला फार उष्णता वाटूं लागली, त्यामुळें मला त्यांचें ह्मणणें पटेना. गर्बियांगला जास्त दिवस रहावें, कारण तो प्रदेश थंड असून जास्त रमणीय आहे, असें शाळामास्तरानें मला सांगितलें व ती सूचना मला हि पसंत पडली. पेष्कार साहेबांना हि तो विचार पसंत पडला. त्यांनीं आपण होऊन मला सांगितलें कीं, गर्बियांगचे पटवाऱ्यास व आमचे शिपायास पत्र पाठवून तेथें आपली राहण्याची वगैरे सर्व व्यवस्था करवितों; माझा सरकारी बंगला तेथें आहे, आपण तेथें खुशाल महिनाभर रहावें. भोटमध्यें गर्बियांग हें त्याचें मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें सरकारी बंगला आहे. ह्मटल्याप्रमाणें त्यांनीं पत्र पाठवून हि दिलें. पोलिटिकल पेष्कारचें काम ह्मटलें ह्मणजे " भोट " ची व्यवस्था पाहणें व तिबेटाशीं व्यापारासंबधानें व्यवहार करणें, हें होय. हा इंग्रज सरकारचा कामगार आहे. पगार अवघा महिना रु. ५० आहे, परंतु अधिकार मात्र मोठा असतो. " भोट " मध्यें राजा ह्मणजे पोलिटिकल पेष्कार हा च. कुमार जगतसिंग हे अस्कोटच्या राजघराण्यापैकीं च आहेत. अस्कोटला मी एक दिवस होतों. मायावती सोडल्यापासून रात्रीं स्वस्थ झोंप अशी येथें व गोरन्याला लागली होती.

ठरल्याप्रमाणें मी अस्कोटहून दुसरे दिवशीं पहाटे तीन वाजता निघालों. तीन मैलाचा उतार उतरून गोरीगंगा नदीचे काठीं प्रातर्विधि आटोपून काहीं वेळ लोंबत्या पुलावरून नदीची मजा पहात इकडे तिकडे फिरलों. चहा तयार झाल्यावर चहा घेतला व पुढें चालू लागलों. लोंबत्या पुलावरून गंगापार झालें

कीं दोन रस्ते फुटतात. एक डाव्या हाताचा " पिंडरीग्लेशर्स " कडे जातो व दुसरा " गर्बियांग "कडे जातो. गोरीगंगा नदीचा उगम पिंडरीहिम प्रवाहापासून आहे. गोरीगंगा नदीचे कांठाकांठानें च आमचा रस्ता होता. तीन मैल गेल्यावर 'गोरी-गंगा' व 'कालीगंगा' या दोन नद्यांचा संगम झालेला आहे तो दृष्टीस पडला. कुटीचा शाळामास्तर व मी बरोबर चालत होतों. कुली मागाहून हळु हळु येत असत. संगमाचे पुढें आल्यावर आमचा रस्ता कालीगंगा नदीचे कांठानें सुरू झाला. दोन्ही बाजूंनीं मधून मधून दाट झाडी लागत असे, यामुळें मनाला चालण्याचे श्रम मुळीं च वाटले नाहींत व शरीराला थकवा हि आला नाहीं. सुमारें साडे नऊ वाजतां मला वाटलें कीं, मधल्या एका खेड्यात जेवण करावें. त्याप्रमाणें माझा व शाळा-मास्तराचा विचार ठरून, एका लहानशा खेड्याजवळ रस्त्यापासून जरा बाजूला असलेल्या एका मोठ्या वृक्षाखालीं आम्ही कुलींची वाट पहात बसलों. अकरा वाजले, बारा वाजले, कुली अजून कसे येत नाहींत, ह्या विवचनेंत आम्ही पडलों. रस्त्याकडे आम्ही एकसारखे डोळे लावून बसलों होतों. सुमारें साडे बारा वाजतां आह्माला एक मवाशी भेटला; त्याला आम्हीं विचारलें, त्यावरून असें कळलें कीं, दोन कुली आमचा तपास करीत पुढें निघून गेल्याला दोन तास झाले. ऊन फार कडक पडलें होतें. आम्ही कुलींचा शोध काढीत रस्त्यानें चाललों. वाटेंत जो भेटेल त्याला विचारावें. कोणी पाहिले ह्मणून सांगे, कोणी नाहीं ह्मणून सांगे. असें होतां होतां आम्ही " बलवा-कोट"ला आलों. नदीकांठीं एक धर्मशाळा होती, तिच्यात कोणी

नव्हते. बलवाकोटला धर्मशाळेखेरीज कांहीं नाहीं. गांव रस्त्या-पासून बाजूला दीड मैलावर होता. आम्ही पुढें चाललों, उन्हानें डोकें दुखूं लागलें. डोळे लाल झाले, व अगदीं थकून गेलों. [illegible] तीन मैलावर नदीकाठीं आम्हांला आमचे कुली दिसले. ते हि थकून गेले होते. आम्ही येऊन तेथ उतरलों. तेथें च कुटीच्या शाळामास्तरास गर्बियांगचा शाळा-मास्तर भेटला. कांहीं वेळानें मी स्नान करण्यासाठीं नदींत उतरलों. कालिगंगा नदीचें पाणी बर्फाप्रमाणें थंड होतें व तें थोडथोडें वाढत होतें. एका खडकावर बसून डोक्यावर थंड पाणी मनसोक्त घेतलें. बरा च वेळ स्नान केल्यावर बरें वाटलें. नंतर भोजन वगैरे झाल्यावर तीन वाजेपर्यंत विश्रांति घ्यावी, असें वाटलें. येथें आम्ही पांच असामी झालों. कुटीचे शाळा-मास्तरापेक्षां गर्बियांगचा शाळामास्तर भोटमध्यें जास्त दिवस असल्यामुळें, त्याला त्या लोकांची व त्या प्रांताची माहिती जास्त होती.

संध्याकाळीं सात वाजण्याचे सुमारास आम्ही "कालका" नावाचे खेड्याजवळ एका शेतांत रात्रीचा मुक्काम केला. कोंदट, घाण, अशा एखाद्या लहानशा धर्मशाळेत अथवा एखाद्या शेत-कऱ्याचे घरात राहण्यापेक्षा उघड्यात एखाद्या वृक्षाखालीं मुक्काम करणें मला जास्त पसंत असल्यामुळें, आम्हीं शेतांत च मुक्काम केला.

त्या च शेतांत आमचे पासून कांहीं अंतरावर "दामी"चा एक खपा उतरला होता. रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास आम्ही जेवणखाण करण्याचे गडबडींत होतों. ती अंधारी रात्र होती. आमच्यापासून कांहीं अंतरावर त्या खपाच्या बकऱ्यांचा कळप

कीं दोन रस्ते फुटतात. एक डाव्या हाताचा " पिंडरीग्लेशर्स " कडे जातो व दुसरा " गर्बियांग "कडे जातो. गोरीगंगा नदीचा उगम पिंडरीहिम प्रवाहापासून आहे. गोरीगंगा नदीचे कांठाकांठानें च आमचा रस्ता होता. तीन मैल गेल्यावर 'गोरी-गंगा' व 'कालीगंगा' या दोन नद्यांचा संगम झालेला आहे तो दृष्टीस पडला. कुटीचा शाळामास्तर व मी बरोबर चालत होतों. कुली मागाहून हळु हळु येत असत. संगमाचे पुढें आल्यावर आमचा रस्ता कालीगंगा नदीचे कांठानें सुरू झाला. दोन्ही बाजूंनीं मधून मधून दाट झाडी लागत असे, यामुळें मनाला चालण्याचे श्रम मुळीं च वाटले नाहींत व शरीराला थकवा हि आला नाहीं. सुमारें साडे नऊ वाजता मला वाटलें कीं, मधल्या एका खेड्यांत जेवण करावें. त्याप्रमाणें माझा व शाळा मास्तराचा विचार ठरून, एका लहानशा खेड्याजवळ रस्त्यापासून जरा बाजूला असलेल्या एका मोठ्या वृक्षाखालीं आम्ही कुलींची वाट पहात बसलों. अकरा वाजले, बारा वाजले, कुली अजून कसे येत नाहींत, ह्या विवचनेंत आम्ही पडलों. रस्त्याकडे आम्ही एकसारखे डोळे लावून बसलों होतों. सुमारें साडे बारा वाजतां आम्हाला एक मवाशी भेटला; त्याला आम्हीं विचारलें, त्यावरून असें कळलें कीं, दोन कुली आमचा तपास करीत पुढें निघून गेल्याला दोन तास झाले. ऊन फार कडक पडलें होतें. आम्ही कुलींचा शोध काढीत रस्त्यानें चाललों. वाटेंत जो भेटेल त्याला विचारावें. कोणी पाहिले म्हणून सांगे, कोणी नाहीं म्हणून सांगे. असें होतां होता आम्ही " बलवा-कोट"ला आलों. नदीकाठीं एक धर्मशाळा होती, तिच्यांत कोणी

नव्हतें. बलवाकोटला धर्मशाळेखेरीज कांहीं नाहीं. गांव रस्त्यापासून बाजूला दीड मैलांवर होता. आम्ही पुढें चाललों; उन्हानें डोकें दुखूं लागलें, डोळे लाल झाले, व अगदीं थकून गेलों. इतक्यात बलवाकोटपासून [illegible]

आमचे कुली दिसले. ते हि थकून गेले होते. आम्ही येऊन तेथें बसलों. तेथें च कुटीच्या शाळामास्तरास गर्बियांगचा शाळामास्तर भेटला. काहीं वेळानें मी स्नान करण्यासाठीं नदींत उतरलों. कालीगंगा नदीचें पाणी बर्फाप्रमाणें थंड होतें व तें थोडथोडें वाढत होतें. एका खडकावर बसून डोक्यावर थंड पाणी मनसोक्त घेतलें. बरा च वेळ स्नान केल्यावर बरें वाटलें. नंतर भोजन वगैरे झाल्यावर तीन वाजेपर्यंत विश्रांति घ्यावी, असें वाटलें. येथें आम्ही पाच असामी झालों. कुटीचे शाळामास्तरापेक्षां गर्बियांगचा शाळामास्तर भोटमध्यें जास्त दिवस असल्यामुळें, त्याला त्या लोकांची व त्या प्रांताची माहिती जास्त होती.

संध्याकाळीं सात वाजण्याचे सुमारास आम्ही "कालका" नांवाचे खेड्याजवळ एका शेतात रात्रीचा मुक्काम केला. कोंदट, घाण, अशा एखाद्या लहानशा धर्मशाळेत अथवा एखाद्या शेतकऱ्याचे घरात राहण्यापेक्षा उघड्यात एखाद्या वृक्षाखालीं मुक्काम करणें मला जास्त पसंत असल्यामुळें, आम्ही शेतात च मुक्काम केला.

त्या च शेतात आमचे पासून काहीं अंतरावर "दामी"चा एक खंपा उतरला होता. रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास आम्ही जेवणखाण करण्याचे गडबडींत होतों. ती अंधेरी रात्र होती. आमच्यापासून काहीं अंतरावर त्या खंपाच्या बकऱ्याचा कळप

उभा होता, त्या कळपावर एका वाघानें झडप घातली ! त्यामुळें सर्व बकऱ्या आह्मी जेवावयास बसलों होतों, तेथें एकदम पळत आल्या. तेव्हा आह्मीं सर्वांनीं मोठ्यानें आरडाओरड केली, त्यासरसा वाघ माझ्या डाव्या बाजूनें सुमारें पांच सहा हाताच्या अंतरावरून एक उडी मारून अंधारांत एकदम नाहींसा झाला. एक हि बकरी त्याला सांपडली नाहीं. त्या रात्रीं हि आह्मांला झोंप चांगली लागली; असो.

कालकाहून "दारचूला" येथें आह्मीं सकाळीं साडे नऊ वाजतां पोहोंचलों. तेथें चौकींत एक दिवस मुक्काम केला. तेथील तोलामुन्शी पं. लोकमणी हा फार भला मनुष्य होता. त्यानें माझी व्यवस्था फार च चांगली ठेवली होती. त्याला साधु, संत, अतिथी ह्यांचा आदरसत्कार करणें मनापासून आवडत असे. दारचूला हा गांव मोठा आहे. हिवाळ्यांत " भोट " मधील सर्व भुटिया लोक येथें चार पांच महिने राहतात. हा गांव कालीगंगा नदीचे कांठीं आहे. ह्या नदीचा उजवा किनारा इंग्रज सरकारची व डावा किनारा नेपाळ सरकारची सरहद्द आहे. या ठिकाणीं कालीगंगापार नेपाळ सरकारचा अधिकारी राहतो; त्याला " लेफ्टेनंट " ह्मणतात. इंग्रज सरकारचा अधिकारी ( पोलिटिकल पेष्कार ) हि येथें आठ महिने असतो. अस्कोट व बलवाकोट यापेक्षां दारचूला येथें उन्हाळा फार असतो. तस च येथें माशांनीं हि फार त्रास दिला. अस्कोटहून दारचूला येथें जातांना ह्मणण्यासारखी चढण लागत नाहीं. मात्र अस्कोटजवळ तीन साडे तीन मैलांचा उतार लागतो दारचूलाहून अस्कोटला जातांना मात्र कंठा प्राण येतात, कारण त्यावेळीं हा उतार चढून

जावा लागतो. कालीपार जाण्यासाठीं लोंबता अगर दुसऱ्या कोणत्या हि प्रकारचा पूल नाहीं. लोक दोरखंडावरून पार जातात, तो प्रकार असा; दोन्ही काठांवर एक मोठा जाड दोरखंड खूप मजबूत असा बांधलेला असतो, त्याला लहानसा पाळणा असतो, त्यांत मनुष्याला बसवून पांच चार मनुष्यें तो पाळणा दोरानें ओढून घेतात. कांहीं लोक कोणाची मदत न घेतां एकटे च त्या दोरखंडावरून परतीरास जातात. लोकांचें हें अशा प्रकारचें जाणें येणें नवख्या मनुष्याला करमणुकीचें एक साधन च असतें.

गंगेवर स्नान वगैरे विधि आटोपून पं. लोकमणीचे येथें भोजन केलें एक तास वामकुक्षी केली व नंतर पंडितजीबरोबर तिबेट, मानस सरोवर, कैलास वगैरे स्थलाविषयीं हिंदींत संभाषण करीत बसलों. पंडित लोकमणी हा कैलासला एकदा जाऊन आलेला होता. त्यानें स्वतःचे हालाचें वर्णन केलें व माझ्या एकंदर भावी प्रवासाविषयीं मला थोडक्यांत माहिती करून दिली. त्या रात्रीं देखील भोजन वगैरे चांगलें झालें. बीना सोडल्यापासून असें चांगलें भोजन मला दारचूला येथें च मिळालें. पं. लोकमणीप्रमाणें च त्याची भार्या हि मोठी सात्विक वृत्तीची स्त्री होती; असो. पं. लोकमणीनें आणखी दोन तीन दिवस राहण्याविषयीं मला फार च आग्रह केला. परंतु परत जातांना मी येथें दोन रात्र राहीन, असें त्याला वचन देऊन, दुसरे दिवशीं पहाटे तीन वाजतां च आम्ही पांच जण "खेल्यास" जाण्यासाठीं निघालों. येथून "खेला" सुमारें दहा मैल आहे. वाटेंत एक तीन मैलांची चढण लागते, ती चढून आम्ही सकाळीं साडे दहा

वाजतां खेल्याला पोहोंचलों. अस्कोटपासून दारचूलापर्यंत उष्ण प्रदेश आहे.

खेल्याला फारेष्ट चौकीदाराचे झोंपडींत आह्मीं मुक्काम केला. येथें पोष्ट ऑफिस, वाण्याचें दुकान, व सरकारी धर्मशाळा आहे. खेला हें गाव सुमारें दीड दोनशें घरांच्या वस्तीचें आहे. येथें तूप फार चांगलें मिळतें असें समजलें. दुपारीं एक वाजण्याच सुमारास आमचें भोजन वगैरे आटोपलें. प. व. खात्यातील सडकेवर काम पहात असलेल्या एका कामदारानें त्या दिवशीं मला जेवावयास बोलावलें होतें. माझें अगदीं थोडेंसें जेवण पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. खेल्याची हवा थंड आहे व येथून पुढें जास्त थंडी लागेल असें मला दोघा शाळामास्तरांनीं सांगितलें. दुपारीं तीन वाजता आह्मी निजून उठलों. आमचा असा विचार ठरला कीं, ऊन कमी झालें कीं येथून निघावें व रात्रीं आठ वाजेपर्यंत "चौदास"ची चढण जेवढी चढून जाववेल तेवढी जावें. खेल्याहून दोन रस्ते फुटतात. एक "दार्मा" परगण्याकडे जातो व दुसरा "चौदास" कडे जातो. खेल्याहून संध्याकाळीं पांच वाजतां आह्मी निघालों. सुमारें अर्ध्या मैलाचा उतार उतरल्यावर आह्मी "धवलीगंगा" नदीचे काठीं आलों. ह्या नदीवर झोंपता पूल नाहीं, परंतु एक मजबूत लाकडी पूल आहे. आह्मी नदीजवळ येऊन पोहोंचलों तेव्हा नदीला पूर आला होता. हिमालय पर्वतांतील सर्व नद्याना उन्हाळ्यात पूर येतात, याचें कारण उष्णतेनें मोठमोठे बर्फांचे डोंगर वितळून त्याचें पाणी होतें व तें नद्याना मिळतें. असो. मला तहान लागली होती

ह्मणून कमंडलू भरून पाणी आणलें व प्राशन केलें. पाणी थंड, गोड व पाचक होतें. तृषा शांत झाल्यामुळें हुषारी वाटली. नदीपार झालें कीं लागलें च च्चैंदासचे चढणीस प्रारंभ होतो. ही चढण फार मोठी व कठीण आहे. आह्मीं चढण्यास आरंभ केला व रात्रीं साडे सातचे सुमारास दीड मैल चढून गेलों. तेथें एका मवाशाची ( शेतकऱ्याची ) झोंपडी होती. तिच्या जवळ पाण्याचे आश्रयानें आह्मीं मैदानात च मुक्काम केला. तेथें खालीं गवत पसरलें व त्यावर च निजलों! थंडी अतिशय होती. तेथून पहाटे तीन वाजतां उठून पुढें चालू लागलों.

तेथून जाण्यापूर्वीं आह्मीं ज्या शेतकऱ्याचे झोंपडीजवळ रात्रीं मुक्काम केला होता, त्याजला शाळामास्तरांनीं ह्मटलें कीं, आह्मी तुला पैसे देतों त्याबद्दल तूं आह्मांला सरपण, दूध, दूध, कणीक वगैरे जिन्नस दे. त्यानें साफ नाहीं ह्मणून सांगितलें. नंतर एका शाळामास्तरानें त्या शेतकऱ्याला सांगितलें कीं, हा ( माझ्याकडे बोट करून ) मोठा साधु आलेला आहे व त्याला फार भूक लागली आहे, तेव्हां त्याला तरी कांहीं दे; हें ऐकून शेतकरी व त्याची बायको अगदीं गयावया करून व मला नमस्कार करून ह्मणालीं कीं, आह्मी अगदीं गरीब आहोंत, आमच्या जवळ द्यावयास कांहीं नाहीं. तेव्हां मी ह्मणालों मला तुमचेपासून कांहीं हि नको. नंतर कांहीं वेळानें ते दोघे हि शाळामास्तर पुन्हां त्या शेतकऱ्याकडे गेले व आह्मी सरकारी कामगार आहोंत, आमची सरबराई तुला केली च पाहिजे असें ठासून सांगितलें. हे सरकारी

कामगार आहेत असें समजल्यावरोवर त्या शेतकऱ्यानें कांहींएक कुरकुर न करिता सर्व जिन्नस मुकाट्यानें आणून दिले व जातांना आम्हीं त्याला त्या जिन्नसाबद्दल पैसे हि दिले. ह्या गोष्टीपासून वाचकांनीं काय बोध घ्यावयाचा बरें ? " बळी तो कान पिळी " हा च कीं नाहीं !

चौदासची चढण साडे तीन, चार मैलांची आहे व ती हि खडी आहे; त्यामुळें मनुष्य फार लवकर थकतो. ही चढण चढून पहाडाचे माथ्यावर आलें कीं, " भोट " नावाचा प्रदेश लागतो. हा प्रदेश इंग्रज सरकारचे हद्दींत असून अल-मोरा जिल्ह्यांत मोडतो. भोटचे तीन भाग करून त्याना "दार्मापट्टी", "चौदासपट्टी" व "व्यासपट्टी" अशीं नावें आहेत. प्रत्येक पट्टीला एक एक पटवारी नेमलेला आहे. वरील चढण चढून आह्मी 'चौदासपट्टी'चे हद्दींत आलों. सुमारें दोन मैलांवर "पांगु" नावाचें एक खेडें आह्माला प्रथम लागलें. येथें च पहि-ल्यानें भुटिया लोक माझे दृष्टीस पडले. आह्मी जेव्हां 'पांगु' गांवांत आलों तेव्हां गावांतील मुलें, स्त्रिया व कांहीं पुरुष मजकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहू लागले. गर्ब्यांगचे शाळामास्तराचे ओळखीची ही मंडळी असल्यामुळें, माझ्या-संबंधानें प्रत्येकानें त्या मास्तराजवळ आपल्या भाषेंत चौकशी करावी. तो मास्तर भोटमध्यें दहा वर्षे असल्यामुळें, त्याला भुटिया लोकांची भाषा, चाल, रीति वगैरे सर्व गोष्टींची माहिती होती. तो माझ्याविषयीं त्याना सांगत असे कीं, मुंबईकडून हा एक साधु पुरुष आलेला आहे व कैलास, मानस सरोवराचे दर्शनास जात आहे; वाटेंत याची व आमची गांठ पडली

व सोबतीनें आह्मी प्रवास करीत आलों; दारचूलाचे जवळ आह्मांला हा भेटला, ह्याचे जवळ दोन कुली आहेत, वगैरे वगैरे. गावाचे बाहेर एका मोठ्या दाट छायेच्या हिरव्यागार वृक्षाखालीं आह्मीं एक तासभर विश्रांति घेतली. हा वृक्ष अक्रोडाचा होता. अक्रोडाचें झाड दिसण्यांत सुंदर असून वडाप्रमाणें विस्तीर्ण असतें; मात्र ह्या वृक्षाला वडाप्रमाणें पारब्या नसतात. अक्रोडाचें झाड पाहून मला फार आनंद झाला. ह्या वेळेस साडे आठ वाजले होते. आह्मी बसलों होतों तेथें गावातील एक वृद्ध व श्रीमंत असा भुटिया मनुष्य आला व मला ह्मणाला कीं, आपण साधु आहांत, तेव्हां येथें एक दिवस मुक्काम करा, जेवणखाणाची वगैरे सर्व व्यवस्था मी आपलेकडे करतों. परंतु मी ह्मणालों, परत येताना मी येथें मुक्काम करीन. नंतर आह्मी पुढें चालूं लागलों. एक मैलावर " जीवती " ( जयती ) नावाची नदी लागली. येथें आह्मीं शौच, मुखमार्जन, स्नानादि विधि आटोपून चहा घेतला व निघालों. एक दोन मैलांची चढण चढून आल्यावर ' सोंसा ' नांवाचें एक लहान गांव लागलें. सुमारें अकरा वाजतां आह्मी येथें येऊन पोहोंचलों. चौदासपट्टीचा पटवारी सोंसा येथें राहतो. आह्मी त्याचे च घरीं गेलों, त्यानें शिधा वगैरे दिला व नंतर अक्रोडाचे वृक्षांच्या राईंत आह्मीं मुक्काम केला.

माझे कुली जेवण करण्याचे तयारीस लागले. शाळामास्तर हि त्या च कामांत गुंतले व मी पटवाऱ्याशीं गोष्टी बोलत बसलों. त्याला हिंदी चांगलें बोलता येत होतें, शिवाय अल-

मोऱ्यास दोन तीन यत्तेपर्यंत तो इंग्रजी हि शिकला होता. पटवारा तरुण असून स्वभावानें बरा होता. कामात हि हुषार आहे असें लोक ह्मणत होते. चौदासपर्यंत तो "लोकप्रिय होता. चाल रीत सभ्यपणाची होती. मी तेथें आल्यामुळें त्याला फार आनद झाला होता. त्या राईत दुपारीं तीन वाजेपर्यंत विश्रांति घेऊन रात्रीच्या मुक्कामासाठीं आह्मी तेथून तीन मैलावर " तीज्या " नांवाच्या खेड्याला सध्याकाळीं आलों. त्या वेळेस पर्जन्य पडत होता. ह्या खेड्यां-तील एक व्यापारी गर्वियागचे शाळामास्तराचे परिचयाचा असल्यामुळें त्यानें आह्मांला एका झोंपडींत रहावयास जागा दिली. ह्या झोंपडींत धान्य हि ठेविलेलें असल्यामुळें, किड्यांचा फार त्रास झाला; परंतु पाऊस व हवा यांचेपासून बरा च बचाव झाला. ह्या च झोंपडीजवळ डोंगरांतून पाणी बांधून आण-लेलें होतें. तीज्या गांव रस्त्यापासून बाजूला असून, डोंगराचे पायथ्याशीं आहे; त्यामुळें आह्माला दोन मैल उतार उतरावा लागला. ह्या च गांवाजवळ " दंग " ह्मणून एक गांव आहे. त्या गांवांत त्या च दिवशीं एक भुटिया मेला. भुटिया लोकांत प्रेतविधि कसा होतो, हें मला येथें पहावयास सांपडलें. भुटिया लोक प्रेताचें दहन करतात. स्मशानांत प्रेत न्यावयाचे आधीं घरीं प्रेताचे तुकडे करून, त्यांची मोट तिरडीवर बांधून, वाजत गाजत तें प्रेत स्मशानात नेतात. तेथें प्रत्येक घरांतून आलेल्या सर्पणानें दहनविधि करतात. प्रेताबरोबर बायका हि स्मशानांत जातात.

त्या दिवशीं रात्रीं जेवण झाल्यावर, झोंपडीचे बाहेर आकाशाकडे पहात मी बसलों होतों; समोर हिमाच्छादित पर्वत-शिखर दिसत होतें; मनाशीं च माझा कांहीं विचार चालला होता, इतक्यांत, चार पांच तरुण मुली माझ्या समोर येऊन बसल्या व मजकडे पाहून त्या आपसांत त्यांच्या भाषेंत बोलूं लागल्या. माझें लक्ष त्या मुलींकडे मुळीं च नव्हतें. आंतून शाळामास्तर त्याचें भाषण ऐकत होता. त्या मुली मोठ्यानें हंसल्या व मास्तर हि हंसत बाहेर आला व मला ह्मणाला, स्वामीजी, ह्या मुलींचें तुमच्यावर प्रेम बसलें आहे. तुह्मीं येथें च रहावें, अशी त्यांची इच्छा आहे. मास्तरला मीं कांहीं च उत्तर दिलें नाहीं. इतक्यांत, एक तरुण भुटिया मजजवळ आला व त्यानें नेटकपणें इंग्रजींत मला प्रश्न केला कीं तुह्मी कोठून आलांत. त्या मनुष्याकडे मीं साश्चर्यमुद्रेनें एकदां पाहिलें व त्याला इंग्रजींत च उत्तर दिलें कीं, मी मुंबईकडून आलों. त्याचा अर्थ अनुमानानें त्याला कांहीं समजला. बाजीला ( बैराग्यास ) इंग्रजी हि येतें, हें पाहून तो आश्चर्यचकित व खजील झाला. त्यानें नंतर हिंदींत च बोलण्यास प्रारंभ केला. त्याला दोन तीन यत्तेपर्यंतचें इंग्रजी येत होतें. त्याचा चेहरा तरतरीत दिसत होता. त्यानें मग स्वतःची सगळी हकीकत मला सांगितली. त्या तरुण मुली माझ्या अगदीं जवळ येऊन बसल्या व त्यांपैकीं एकीनें त्या तरुणाचे गळ्यांत हात घालून ती त्याचे जवळ येऊन बसली. मी आंत उठून गेलों. शाळामास्तरानें मला सांगितलें कीं, तरुण मुली व स्त्रिया देखील पुरुषांत मिसळतात. त्यांचे मनांत वाईट

कल्पना एकदम येत नाहींत. शाळामास्तराचे मनांत त्या मुलींना नाचावयास व गावयास सांगावयाचें होतें; परंतु मीं तशी इच्छा प्रगट न केल्यामुळें तो बेत तसा च राहिला; असो.

दुसरे दिवशीं दुपारीं अकरा वाजतां जेवण करून, पुढच्या मुक्कामास जाण्यासाठीं आह्मी तीज्याहून निघालों. शिधा बरोबर घेतला होता, कारण पुढच्या मुक्कामावर वाण्याचें दुकान वगैरे कांहीं नव्हतें. "गल्लागड" ला संध्याकाळीं सहा वाजतां पोहोंचलों. तीज्याहून गल्लागड सहा मैल आहे. वाटेंत एक नदी लागते, तिला पूल वगैरे कांहीं नसल्यामुळें, वाटसरूस व पाऊसकाळांत डांक हलकाऱ्यास(रनरास) फार त्रास पडतो. येथें सरकारी धर्मशाळा आहे; परंतु तिच्यात फार घाण होती व पिसा अतिशय होत्या, ह्मणून मी बाहेर च एका झाडाखालीं निजलों. पहाटे तीन वाजतां गल्लागडाहून निघालों. पुढचा मुक्काम 'मालपा' गल्लागडापासून दहा मैल लांब आहे. रस्ता बिकट आहे. एका बाजूला उंच पहाड व दुसरे बाजूला सुमारें चार पांच हजार फूट खोल दरी, नीट कडा तुटलेला, खालीं कालीगंगेकडे पाहिलें कीं डोळे फिरतात ! रस्ता अरुंद व फार खडकाळ आहे. हा दहा मैलांचा प्रवास जिवावरचा असून आह्मांला हा प्रवास करण्यास आठ, नऊ तास लागले ! कठीण रस्ता, खडी चढण व घसरता उतार ह्यामुळें फार कष्ट झाले; परंतु श्री नारायणाचे कृपेनें कांहीं एक विघ्न उत्पन्न न होतां आह्मी दुपारीं बारा वाजता 'मालपा' ला येऊन पोहोंचलों. ह्या दहा मैलाचे प्रवासात भुटिया व्यापाऱ्यांचीं खेचरें, घोडीं, बकऱ्या, व माल ह्यांचें फार नुकसान होतें. जनावरें मानासह उतारावरून पाय घसरून कड्यावरून खालीं दरींत

पडतात. एकदां घसरलें कीं पत्ता लागणें सुद्धां मुष्कील ! अशा ह्या विकट मार्गाचें मी आक्रमण करीत असतां, माझ्याविषयीं त्या दोघा शाळामास्तराना व माझे कुलींना फार काळजी वाटत होती. सावकाश व सांभाळून चाला, असे मला ते वारवार सांगत असत व मी परमेश्वराचें चिंतन करीत, निर्भय अंत:करणाने परंतु सावकाश-सर्वांचे पुढें चालत होतों. माझें मन कैलास व मानस सरोवर ह्या च एका विचारानें नेहमीं व्यग्र असे.

"मालपा" ला आलों तेव्हा दुपारचे बारा वाजले होते. ऊन कडक पडलें होतें, शिवाय, मालपा हें उष्ण ठिकाण असल्यामुळें फार उकडत होतें. कालीगंगा नदीचे काठीं एक धर्मशाळा होती. तेथें उतरण्याचे विचारानें गेलों, परंतु तेथें बाहेर रहावें तर कडक ऊन व आत बसावें तर अतिशय घाण व पिसा. तेव्हां काय करावें ह्या विचारात मी पडलों. माझ्या एका कुलीने थोडीशी जागा साफ केली व मी तेथें बसलों. परतु उन्हाच्या तापामुळें मला अतिशय त्रास झाला. सुमारें पधरा मिनिटानीं, गोठलेलें दूध बरोबर होतें, तें कालीगंगेच्या थंड पाण्यात तयार करून मीं घेतलें, तेव्हा मला बरें वाटलें मग शौच, मुखमार्जन, स्नानादि नित्यकर्म केलें व जेवण्याचें तयार होईतों स्वस्थ पडलों. पहाटे तीन वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत एकसारखें चालल्यामुळें मला थोडासा थकवा वाटला. दोन वाजता भोजन केलें. काहीं वेळ आराम करून सध्याकाळीं पाच वाजता गंगेच्या काठाकाठानें रानात फिरण्याचे उद्देशानें मी एकटा च धर्मशाळेतून निघालों. जाताना मी बाहेर जातों, ह्मणून कुलींना सांगून गेलों. दोघे मास्तर त्याच्या ओळखीचा एक भुटिया सावकार धर्मशाळेंत उत-

रला होता, त्याच्याशीं गप्पा मारीत बसले. सुमारें दोन तासांनीं मी परत आलों. मला फार भूक लागली होती. माझें जेवणाचें तयार होतें च. भोजन करून कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर आह्मी निजलों; परतु धर्मशाळेंत मला झोंप लागेना. पिसा फार चावल्या. कशी तरी रात्र काढली व पहाटे चार वाजता पुढील मार्ग क्रमण्यास सुरवात केली. साडे नऊ वाजता आह्मी " बुधी " ला येऊन पोहोंचलों. बुधी व मालपा ह्याचेमध्यें दोन वेळ चढण लागते. प्रत्येक चढण दीड दीड मैलाची आहे. त्या दिवशीं आह्मीं बुधीला च मुक्काम केला. बुधीपासून " गार्बियाग "चार मैल आहे. वाटेंत एक अडीच मैलाचा चढण लागते. ही चढण अगदीं खडी आहे; त्यामुळें ती चढून जाताना मनुष्याला फार लवकर थकवा वाटतो व श्वास हि लवकर लागतो. मालपा व बुधी ह्या दोन ठिकाणच्या हवेंत फार फरक आहे. जितकी मालपाला उष्णता तितकी च बुधीला थंडी. आह्मी बुधीला सकाळीं पोहोंचलों. तेथील एका भुटिया व्यापाऱ्यानें त्याच्या अंगण जागेत आमच्यासाठीं एक साधारण पाल मारून दिलें. वारा फार वहात होता, त्यामुळें कुलीला स्वैंपाक करण्याला फार त्रास पडला. रात्रीं तेथें च निजण्याचा आमचा विचार होता, पण संध्याकाळीं पाऊस पडण्यास सुरवात झाल्यामुळें, त्यानें आह्माला गुराच्या गोठ्यात जागा- दिली. साहजिकपणें च तेथें हवा स्वच्छ नव्हती, पिसा फार होत्या व गुराच्या मलमूत्राची घाण येत होती. कशीबशी रात्र काढली व पहाटे तीन वाजतां बुधीची चढण चढण्यास प्रारभ केला व सुमारें सहा वाजतां

चढण संपवून आह्मी पर्वतशिखरावर आलों. या चढणीवर दोघां मास्तराची देखील त्रेधा झाली, मग कुलींच्या हालांची तर कल्पना च नको. श्वास लागून त्यांची अगदीं दैना झाली; पाऊल उचलून टाकवेना, पोटऱ्यांना वांक येऊ लागले, दहा दहा हातावर खालीं बसत; अशी स्थिति झाली तरी, आह्मी सूर्योदयाचे पूर्वीं चढण चढून आलों. मीं एकदां चढण्यास जो प्रारंभ केला, तो मध्यावर येऊन पंधरा वीस मिनिटें विश्रांति घेतली व पुन्हा निघालों तो पर्वतशिखरावर च आऊन उभा राहिलों. मला हि थोडासा श्वास लागला होता व किंचित थकवा हि वाटला.

हा पहाड चढून आलें कीं, ग्यारपट्टी लागते. मी पहाड चढून वर आल्यावर सभोंवतालचा प्रदेश पाहून माझें मन फार च प्रसन्न झालें. पर्वतशिखरावर आलें कीं, एक मोठी डोंगरसपाटी लागते; जिकडे पहावें तिकडे हिरवेंगार दिसतें, हवा थंड व निरोगी भासू लागते, सभोंवार हिमाच्छादित पर्वत दिसू लागतात; त्या शिखरापासून स्वच्छ, मधुर व पाचक पाण्याचे प्रवाह निघून डोंगरसपाटीवर व कांहीं खालीं दरींतून वहात आहेत ते दिसतात, भूर्जपत्र वृक्षाचे सुंदर व दाट वन पलिकडचे बाजूस दिसतें; सर्व डोंगरसपाटी हिरव्या कोमल तृणांकुरानीं आच्छादित झाल्यामुळें फार च मजेदार दिसते. आह्मी जेव्हा डोंगरसपाटीवरून मार्ग आक्रमूं लागलों, तेव्हांचा समय पच पच उष:कालाचा होता. अहाहा ! त्या वेळचें सृष्टिसौंदर्य काय विचारावयाचें ! ! उष:कालाचें वर्णन कादंबऱ्यातून असतें, तें वाचून च मनाला

किती आल्हाद होतो; मग मी तर प्रत्यक्ष ती स्थिति आपल्या नेत्रांनीं पहात होतों ! तेव्हां माझ्या त्या आनंदाची वाचकांनीं कल्पना च करावी. मी तर अगदीं वेडा झालों होतों; असो.

मध्यें एक जलप्रवाह लागला, तेथें प्रातर्विधि स्नान-संध्यादि उरकून घेण्याचा मीं बेत केला. प्रातर्विधि आटोपून मीं त्या जलप्रवाहांत स्नान केलें. पाणी इतकें गार होतें कीं, माझें अंग अगदीं बधिर झालें. स्नान करून कपडे घातले व एका खडकावर व्याघ्राजिन पसरून, पूर्वेस मुख करून ईश्वरचिंतनासाठीं आसनस्थ बसलों. त्या समयीं सूर्यबिंब क्षितिजावर येत चाललें होतें; पूर्व दिशा ताम्र शालु नेसून व नील कञ्चुकी परिधान करून आपल्या प्रिय पतीचे आगमनानें प्रफुल्लित अंतःकरणयुक्त होऊन त्याला सामोरी जात होती, भूमीवरील मृदु व हिरव्यागार तृणांकुरावर दवबिंदु मौक्तिकाप्रमाणें चमकत होते, सभोवार, हिमाच्छादित ज्यांचीं शिखरें आहेत, असे मोठमोठे पर्वत श्री सूर्यनारायणाचे दर्शनासाठीं जणू उत्सुक च झालेले आहेत कीं काय, असें दिसत होतें, अशा समयीं व अशा स्थितींत साधी लहानशी टेंकडी असली तरी लाघून किती तरी सुंदर दिसते ! मग ज्या पर्वताचीं उच्च उच्च शिखरें गगनापर्यंत जाऊन भिडलीं आहेत व बर्फानें आच्छादित झालेलीं असून, त्यावर सूर्याचीं कोमल किरणें पडल्यामुळें तांबडी झांक मारते आहे, खालीं ह्मणजे मध्यापासून पायथ्यापर्यंत भूर्जपत्र, चीड इत्यादि वृक्षाचीं दाट अरण्यें असल्यामुळें जे हिरवेगार दिसत आहेत, अशा त्या हिमालयांतील पर्वताचीं

६५७ (५८)

शोभा किती अनुपम असेल नाहीं? मधुन मधुन मंजुळ शब्द कानीं पडत होता; हा शब्द त्या अरण्यातील पक्ष्याचा होता हें सांगणें नको च. आधी च ब्राह्म मुहूर्त, तशात एकान्त स्थान व अनुपम सृष्टिसौंदर्य, मग काय विचारता ! पूर्वेस मुख करून आसनस्थ बसलों व एकदा सभोंवार पाहिलें. चित्त शांत व गंभीर झालें, भ्रूमध्यांत दृष्टि पोहोंचली व मन एकाग्र होऊन सद्गुरुचरणीं संलग्न झालें. इतकी स्थिति झाल्यावर देहभान कसें राहणार ? त्या वेळच्या माझ्या स्थितीचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं! खरोखर त्या ठिकाणीं प्रेम व आनंद यांचें साम्राज्य होतें ! तपोभूमि च ती. दोन तासानीं मीं ध्यान विसर्जन केलें. पुढें आह्मी चालू लागलों व "गर्ब्यांग" ला सकाळीं साडे आठ वाजता पोहोंचलों.

पहिल्यानें पोष्ट ऑफिसात गेलों व माझ्या पत्राबद्दल चौकशी केली. तेथील पटवारी व पेष्कार साहेबांचा शिपाई "कुटी"ला गेले आहेत, असें समजलें. पोष्टांत उतरा-वयास जागा नव्हती, तेव्हा शाळामास्तरचे घरात मुक्काम करावयाचें ठरविलें. पोष्टांत मला एक द्राविडी गोसावी भेटला. तो मला पहिल्यानें एकदां मायावतीस भेटला होता व माझे सांगण्यावरून तो मानस सरोवराला जावयास निघाला होता. पहिल्या प्रथम त्यानें मजजवळ आपलें रडगाणें गाण्यास च सुरवात केली. तो माझेपूर्वी तीन चार दिवस आलेला होता. मीं त्याचे बोलण्याकडे प्रथम दुर्लक्ष केलें. तो जें सांगत होता तें खोटें नव्हतें, हें खरें, परंतु त्याच्या वेषाला तें अगदीं च विरुद्ध दिसत होतें. शिवाय मला येऊन पांच

सात मिनिटें देखील झालेलीं नव्हतीं. मी आपल्या आनंदस्थितींत निमग्न असल्यामुळें, मला त्याच्या रडगाण्याचा कटाळा येऊन, मीं त्याला जरा स्वस्थ बसण्यास सांगितलें; असो.

गर्बियाग हें इंग्रज सरकारच्या सरहद्दीवरचें शेंवटचें गांव आहे. सुमारें दीडशें घरांची वस्ति असून लोक श्रीमंत आहेत. गर्बियागची उंची अकरा हजार फूट आहे. "बदरीकेदार" व 'गर्बियांग' सारख्याच उंचीवर आहेत. येथें पर्जन्य फारसा पडत नाहीं, बर्फ मात्र अतिशय पडतें. जूनपासून सप्टेंबरअखेर पर्यंतचे दिवस येथें राहण्यास फार चागले; त्यानंतर थंडी व बर्फ फार च पडतें. येथें आल्यावर मला असें समजलें कीं, तिबेटात जाण्याचा रस्ता अजून मोकळा झाला नाहीं, बर्फ पडत असून "लिपू पास" (एक मार्ग) अगदीं बुजून गेलेला आहे; थंडी हि फार आहे; त्यामुळें गर्बियागला च कांहीं दिवस मुक्काम करणें मला भाग पडलें. येथें मी वीस दिवस राहिलों. पेष्कार साहेबाचा बंगला जर मला रहावयास मिळाला नसता तर, माझी राहण्याची फार च गैरसोय झाली असती; कारण डाक बंगला वगैरे येथें कांहीं नाहीं; व भुटिया लोकाचे घरात राहणें अशक्य होतें. गर्बियागला बनियाचें सरकारी दुकान नसल्यामुळें, सरकारी अमलदार खेरीज करून इतर प्रवाशाचे फार हाल होतात. दुप्पट पैसे देऊन देखील कणीक, तूप, तादूळ वगैरे जिन्नस साधारण चांगले हि मिळत नाहींत; ह्या अडचणीचा पूर्ण अनुभव मला

या वीस दिवसात आला, गर्बियागचा शाळामास्तर माझ्यासाठीं गावात फिरून, मोठ्या शिकस्तीनें शिधा विकत आणून देत असे. मधून मधून गावच्या एक दोन पधानांनीं ( जातीचे पंच, यानीं ) व इतर काहीं व्यापाऱ्यानीं मला जाफत (मेजवानी) दिली. जाफत देणें ह्मणजे, तीन असामींना दोन वेळ पुरेल इतका शिधा नोकराबरोबर पाठविणें.

गर्बियागला तांदूळ शिजत च नाहींत. मी दोन्ही वेळ गव्हाची पोळी, मसुरीच्या डाळीचें वरण व एखाद्या वेळेस रानवट भाजी मिळाल्यास ती, हे जिन्नस खात असे. सकाळीं एकदां व पुन्हा दुपारीं चहा घेत असे. दुधाचें तर नांव हि नको, एकदरींत खाण्याचे फार हाल होतात. हवा व पाणी मात्र फार च उत्तम व आरोग्यदायक आहे. भूक तर अशी लागते कीं, नेहमींपेक्षां चौपट आहार वाढतो.

भुटिया लोकाचा धंदा शेती व विशेषतः व्यापार. हे लोक वर्षातून दोन तीन महिने कायते घरीं राहतात. तिबेट, नेपाळ व हिंदुस्थान ह्या देशात व्यापारानिमित्त हे लोक फार दूर दूर जाऊं लागले आहेत. पूर्वीं ह्या लोकाना "गला-गड" चे पुढें जाणें ह्मणजे मरणप्राय वाटत असे. ह्या लोकांना उन्हाळा बिलकुल सोसत नाहीं. अलीकडे पन्नास वर्षांत हे लोक थोडेसे सुधारले आहेत. पूर्वीं अर्धवट रानटी स्थितींत होते. स्वभावानें हे लोक दयाळु नसतात. ह्याना गाणें, नाचणें, फार प्रिय असतें. तरुण पुरुष व तरुण स्त्रिया, विवाहित अथवा अविवाहित असल्या तरी, समाजात एकत्र मिसळून नाचतात, खेळतात, गीत गातात, एकमेकांशीं विनोद करतात

व गळ्यात हात घालून हितगुजाच्या गोष्टी बोलतात. घरांतील व शेतातील कामें बायका करतात व पुरुष व्यापारासाठीं बाहेर जातात. भुटिया लोकाचीं घरें कोंदट असून अतिशय गलिच्छ असतात. घरातून केर खूप साचलेला असतो; मास व मद्य याची दुर्गंधी सारखी येत असते; कपड्यात अतिशय पिसा असून त्याना घाण येत असते. मी सुमारें वीस पंचवीस श्रीमंत लोकांचे घरातून मुद्दाम फिरून आलों, पण सर्वत्र एक मासला! भुटिया लोकाच्या बायका कुरूप नसतात, गौरवर्णी असून सशक्त असतात. भुटिया लोक नेपाळी लोकांप्रमाणें फार ठेंगू हि नाहींत व फार उच्च हि नाहीत. बायका अंगावर चांदीचे दागिने [illegible] पुरुषांप्रमाणें स्त्रिया हि मद्यपान व धूम्रपान करतात. मुली वीस पचवीस वर्षांच्या होईपर्यंत अविवाहित राहतात. भुतें, पिशाच्चें वगैरेंची हे लोक पुजा करतात. ह्याच्या चालीरीतींत नेपाळ, तिबेट व हिंदुस्थान, ह्या देशांतील चालीरीतींचें मिश्रण असतें. ह्यांचा धर्म कोणता हें ओळखणें फार मुष्किलीचें काम आहे. मागें सागून झालें च आहे कीं, भुटिया स्त्रीपुरुषाना गाण्याचा व नाचण्याचा फार शोक असतो; त्यांतल्या-त्यात स्त्रियाना विशेष असतो. त्याचीं गाणीं सारीं शृंगारिक असतात. भुटिया भाषेंतील एक हि गाणें नसतें, तर ते 'गुरखाली भाषेंतील गाणीं गातात. पाश्चिमात्य लोकांप्रमाणें भुटिया लोकात सार्वजनिक नाच होतात. ह्या नाचाला त्याच्या भाषेंत "रगबग" ह्मणतात. रगबग नेहमीं रात्रीं होतो. मद्यपान, धूम्रपान, मांसभक्षण, नृत्य, व गीत या सर्व गोष्टी

रंगबंगमध्यें मोडल्या जातात. तरुण मुलें व मुली आपणास योग्य अशी वधू व वर या रंगबंगच्या प्रसंगीं शोधून काढतात. त्यांच्यांत पाश्चिमात्य लोकांप्रमाणें प्रीतिविवाह च रूढ आहे. अर्थात्, काडी मोडून देणें हि प्रचलित आहे. भुटिया लोकांवर नेपाळ, तिबेट व इंग्रज, अशा तीन सरकारांचे कर आहेत. ह्यांच्यांत जाती पुष्कळ असून, आपआपसांत भांडणें फार होतात. भोटमध्यें जव व मुडवा हीं धान्यें पिकतात.

गार्बियांगला माझा मुक्काम वीस दिवस होता, हें मागें सांगितलें च आहे; हे वीस दिवस फार च आनंदांत गेले. 'कालीगंगा व तिंकर' या दोन नद्यांचा संगम गार्बियांग-पासून पूर्वेस सुमारें पाऊण मैलावर झालेला आहे. एकांत, वनश्रीसौंदर्य व हिमाच्छादित पर्वतांच्या ओळी, ह्यांच्या योगानें हें संगमस्थान फार रम्य दिसतें. गार्बियांगहून रोज प्रातःकाळीं स्नानादि नित्यनैमित्तिक विधि आचरण्यासाठीं मी संगमस्थानीं येत असे, व चार पांच तास आनंदांत येथें च घालवीत असे. अशा एकांत व रम्य स्थळीं श्री नारायणाचें चिंतन करण्यास मला संधि मिळाली, हें माझें महद्भाग्य होय असें मी समजतों! तपश्चर्या करण्यास योग्य स्थान जर कोणतें असेल, तर तें हिमालय हें च होय. आमच्या प्राचीन ऋषिवर्यांनीं या च ठिकाणीं तपश्चर्या करून, त्रिकालज्ञान प्राप्त करून घेतलें; व सर्व प्रकारचे धर्मशास्त्रादि ग्रंथ निर्माण करून अध्यात्मज्ञानांत तरी आपल्या या आर्यावर्त देशाला, सर्व जगाच्या गुरुस्थानीं नेऊन बसविलें आहे. असो

व गळ्यात हात घालून हितगुजाच्या गोष्टी बोलतात. घरातील व शेतातील कामें बायका करतात व पुरुष व्यापारासाठीं बाहेर जातात. भुटिया लोकाचीं घरें कोंदट असून अतिशय गलिच्छ असतात. घरातून केर खूप साचलेला असतो; मास व मद्य याची दुर्गंधी सारखी येत असते; कपड्यांत अतिशय पिसा असून त्याना घाण येत असते. मी सुमारें वीस पंचवीस श्रीमत लोकाचे घरातून मुद्दाम फिरून आलों, पण सर्वत्र एक मासला ! भुटिया लोकाच्या बायका कुरुप नसतात. गौरवर्ण असून सशक्त असतात. भुटिया लोक नेपाळी लोकाप्रमाणें फार ठेंगू हि नाहींत व फार उच हि नाहींत. बायका अगावर चादीचे दागिने घालतात. पुरुषाप्रमाणें स्त्रिया हि मद्यपान व धूम्रपान करतात. मुली वीस पंचवीस वर्षांच्या होईपर्यंत अविवाहित राहतात. भुतें, पिशाच्चें वगैरेची हे लोक पुजा करतात. ह्याच्या चालीरीतींत नेपाळ, तिबेट व हिंदुस्थान, ह्या देशातील चालीरीतींचें मिश्रण असतें. ह्याचा धर्म कोणता हें ओळखणें फार मुष्किलीचें काम आहे. मागें सागून झालें च आहे कीं, भुटिया स्त्रीपुरुषाना गाण्याचा व नाचण्याचा फार शोक असतो; त्यातल्या-त्यात स्त्रियाना विशेष असतो. त्याचीं गाणीं सारीं शृंगारिक असतात. भुटिया भाषेंतील एक हि गाणें नसतें, तर ते ‘गुरखाली भाषेंतील गाणीं गातात. पाश्चिमात्य लोकाप्रमाणें भुटिया लोकांत सार्वजनिक नाच होतात. ह्या नाचाला त्याच्या भाषेंत “रगबग” ह्मणतात. रगबंग नेहमीं रात्रीं होतो. मद्यपान, धूम्रपान, मांसभक्षण, नृत्य, व गीत या सर्व गोष्टी

रंगबंगमध्यें मोडल्या जातात. तरुण मुलें व मुली आपणास योग्य अशी वधू व वर या रंगबंगाच्या प्रसंगीं शोधून काढतात. त्यांच्यात पाश्चिमात्य लोकाप्रमाणें प्रीतिविवाह च रूढ आहे. अर्थात, काडी मोडून देणें हि प्रचलित आहे. भुटिया लोकांवर नेपाळ, तिबेट व इंग्रज, अशा तीन सरकाराचे कर आहेत. त्यांच्यात जाती पुष्कळ असून, आपआपसात भांडणें फार होतात. भोटमध्यें जव व मुढवा हीं धान्यें पिकतात.

गर्बियांगला माझा मुक्काम वीस दिवस होता. हे सारे [illegible] जाए; हे वीस दिवस फार च आनंदात गेले. ' कालीगंगा ' व ' तिंकर ' या दोन नद्यांचा संगम गर्बियांग-पासून पूर्वेस सुमारें पाऊण मैलावर झालेला आहे. एकांत, वनश्रीसौंदर्य व हिमाच्छादित पर्वताच्या ओळी, ह्यांच्या योगानें हें संगमस्थान फार रम्य दिसतें. गर्बियांगहून रोज प्रातःकाळीं स्नानादि नित्यनैमित्तिक विधि आचरण्यासाठीं मी संगमस्थानीं येत असे, व चार पाच तास आनंदांत येथें च घालवीत असे. अशा एकांत व रम्य स्थळीं श्री नारायणाचें चिंतन करण्यास मला संधि मिळाली, हें माझें महद्भाग्य होय असे मी समजतों ! तपश्चर्या करण्यास योग्य स्थान जर कोणतें असेल, तर तें हिमालय हें च होय. आमच्या प्राचीन ऋषिवर्यांनीं या च ठिकाणीं तपश्चर्या करून, त्रिकालज्ञान प्राप्त करून घेतलें; व सर्व प्रकारचे धर्मशास्त्रादि ग्रंथ निर्माण करून अध्यात्मज्ञानांत तरी आपल्या या आर्यावर्त देशाला, सर्व जगाच्या गुरुस्थानीं नेऊन बसविलें आहे. असो

रोज निरनिराळ्या प्रकारचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्यात व श्री नारायणाचें चिंतन करण्यात मला तेथें कालाचें भान देखील रहात नसे.

खरा हिमाचल ह्मटला ह्मणजे, हिमालयाची अखंड बर्फाची जी रांग (Perpetual snow range) हा च होय. 'गंगोत्री', 'केदार', 'बदरीनारायण', 'अमरनाथ' (काश्मीर), 'मुक्तिनाथ' (नेपाळ), वगैरे पवित्र स्थानें ह्या च प्रदेशात आहेत. 'काथगोदाम' रेल्वे स्टेशन सोडल्यापासून अनेक पहाड, पर्वत, नद्या, नाले, व अरण्यें ओलांडून, सुमारें दोन महिन्यांनीं मी गर्बियांगला येऊन पोहोंचलों. ह्या दोन महिन्याचे प्रवासात मला शारीरिक कष्ट पुष्कळ सोसावे लागले; परंतु श्री सद्गुरुकृपाप्रसादानें मला त्याचें कांहीं च वाटलें नाहीं. कारण, सृष्टिसौंदर्य, अमृताप्रमाणें मधुर, थंड असें जलपान, व ईश्वरचिंतन ह्या त्रयींच्या सहवासामुळें मी देहाला जवळ जवळ विसरलों च होतों. ध्येयाकडे मन इतकें वाणलेलें होतें कीं, दोन महिन्यांत माझ्या मनाची स्थिति कशी होती, हें माझें मला च कळेना. कैलास व मानस सरोवर ह्यांचें दर्शन मला केव्हां घडेल असा सारखा ध्यास लागला होता. असो.

गर्बियांगला थंडी अतिशय असते व अंगाला झोंबणारा तीक्ष्ण वारा नेहमीं वहात असतो. गर्बियांगला आल्यावर, प्रथम दोन तीन दिवस थंडीमुळें व त्या तीक्ष्ण हवेमुळें मला फार त्रास झाला व ह्मणून मीं ऊन पाण्यानें स्नान

केलें; परंतु नंतर पुन्हां मी थंड पाण्यानें स्नान करूं लागलों. शीतनिवारणार्थ तेथें मीं एक भुटिया कांबळें विकत घेतलें. त्याला सात रुपये पडले. त्या कांबळ्याचें वजन, मला वाटतें, जवळ जवळ पंधरा शेर असेल. खूप उबदार होतें. पूर्वीं हीं कांबळीं दोन अडीच रुपयास मिळत असत असें सांगतात; कारण त्या वेळेस लोंकर स्वस्त असे. आतां तिबेटांतील लोंकर कानपूरला जाते म्हणून महाग झालीं आहेत.

येथें असतांना रोजचें निरनिराळ्या प्रकारचें सृष्टि-सौंदर्य माझे नेत्रांस आल्हाद देत असे. एखादे दिवशीं मी मेघमंडळात फिरत असे; तर एखादे दिवशीं मेघाहून हि उच्च स्थानीं उभा राहून रूपाप्रमाणें शुभ्र अशा मेघपंक्ति दक्षिणेकडून उत्तरेकडे धांवत आहेत, असें तेथून मी अवलोकन करीत असे; एखादे समयीं काळेभोर मेघ माझे मस्तकावर छत्रीप्रमाणें लोंबत असून माझ्या अगदीं जवळून जात आहेत, असें दृष्टीस पडे. एकीकडे हिमाच्छादित पर्वत सभोंवार दृष्टीला आनंदवीत होते; दुसरीकडे पहाडाचे माथ्यावरील व उतारावरील हिरवींगार जव धान्याचीं शेतें पाहून चित्त प्रसन्न होत असे. जिकडे पहावें तिकडे पर्वत च पर्वत! जणूं काय, परस्परांमध्यें उंचीबद्दल स्पर्धा उत्पन्न होऊन ते एकमेकांकडे अभिमानानें अवलोकन करीत आहेत, असा पहाणारास भास होई; कारण, एका पर्वताकडे पहावें तों, त्याचे पलीकडे दुसरा त्यापेक्षा उच्च; बरें, त्याचेकडे अवलोकन करावें, तर त्याचे हि मागें तिसरा त्याहून उंच पहाड आहे च! माझा मुक्काम गर्बियागला

असतांना, रोज प्रातःकाळीं ज्या एकांत स्थळीं मी च्यार पाच तास बसावयास जात असे, तें ठिकाण तर अप्रतिम आहे. त्या स्थलाचें थोडक्यात वर्णन केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

कालीगंगा नदीचे पलीकडे, नेपाळ सरकारचे हद्दींत, एक लहान टेंकडी आहे. ही गर्बियागचे पूर्वेस पाऊण मैलावर आहे. ह्या टेंकडीचे एका बाजूनें तिंकर नदी येते, व दुसरे बाजूनें कालीगंगा नदी वाहते. पश्चिमेकडे खालच्या अंगास सुमारें शें दीडशें कदमावर, ह्या दोन नद्यांचा संगम झाला आहे. ही टेंकडी सुमारें एक हजार फूट उंचीवर असावी. नदीचे पाण्याचे सपाटीपासून सुमारें चारशें फूट उंचीवर मध्यंतरीं एक लहानसें मैदान आहे व तेथून सुमारें पांचशें फूट उंचीवर ह्मणजे टेंकडीचे माथ्यावर "छांगरू" ह्मणून एक खेडें आहे. त्यांत वस्ति पन्नास एक घरांची आहे. ह्या टेंकडीचे उत्तरेस कालीगंगा नदी असल्यामुळें, पलिकडे खुला प्रदेश बरा च आहे. ह्यामुळें त्या बाजूस पाहिलें ह्मणजे दृष्टि बरी च लांबवर पोहोंचते. अशी च दरी आग्नेयी दिशेस आहे. सभोंवार, हिरवींगार शेतें आणि भूर्जपत्र व चीड वृक्षांचें सुंदर अरण्य आहे. भव्य, गंभीर व उंच अशा पर्वतांचा सभोंवार जणू काय सृष्टिनिर्मित तट च उभा आहे. ह्या पर्वतांचीं शिखरें हिमाच्छादित असल्यामुळें व पायथ्याशीं हिरवेंगार आणि दाट असें अरण्य असल्यामुळें, हे पर्वत ह्या लहानशा टेंकडीवरून किती तरी सुंदर दिसतात ह्मणून सांगूं! ह्याप्रमाणें वनश्रीचें सौंदर्य एक निमिषमात्र हि विश्रांति न

घेतां नेत्र अवलोकन करीत आहेत, तर इकडे, दोन्ही नद्यांचे प्रवाहापासून उत्पन्न होणारा सतत ध्वनि व निरनिराळ्या पक्ष्यांचे मंजुळ शब्द यांचे संमिश्रण होऊन जो एक गोड, मनोहर व अखंड (अनाहत) नाद होत असतो, तो ऐकण्यात कर्ण गुंग झालेले आहेत! वर आकाशात मधून मधून मेघ सूर्यबिंबाचे आड येत; त्यामुळे त्या टेंकडीवर जी छाया पडे ती पाहून मोठी मजा वाटे. अशा रमणीय, एकांत व पवित्र स्थळीं, प्रातःकाळीं, श्री सद्गुरुचरणाचें प्रशान्त मनानें चिंतन करीत बसण्याइतकें ह्या नम्र लेखकाचें भाग्य होतें. एखादे विशेष प्रसंगीं, माझ्या भाग्याचें मला स्मरण झाले कीं, माझ्या अंतःकरणाची स्थिति जी कांहीं होते ती सांगता येत नाहीं. ती सांगूं लागलों तर कदाचित् आत्मश्लाघेचा दोष मजकडे येईल. एके प्रसंगीं नित्यनियमाप्रमाणें ध्यान वगैरे आटोपल्यानंतर सुमारें अर्धा तास समोरच्या वृक्षावरील एका सुंदर लहानशा पक्ष्याकडे सहज पहात बसलों होतों. तो पक्षी आनंदाने इकडे तिकडे त्या वृक्षावर बागडत होता व तोंडानें मधुर शीळ घालीत होता. तो देखावा पाहून माझ्या अंतःकरणात पुन्हा एकदम सात्विक वृत्ति उद्भूत झाली; प्रेमातिशयामुळें माझें चित्त एकाग्र झालें व मी आनंदात निमग्न झालों! अशा समयीं मला प्रेम व आनंद कशा प्रकारचा व किती होत असेल, ह्याची बरोबर कल्पना प्रिय वाचकांना केवळ अनुभवानें च होईल.

अशा स्थितीत वीस दिवस वीस क्षणाप्रमाणें तेव्हा च निघून गेले. पेष्कार साहेबांचा बंगला गावापासून सुमारें पाव मैल होता. बंगला लहानसा टुमदार असून, सभोवती मोठें

आवार होतें. ज्या दिवशीं, आकाश निरभ्र असून चंद्रमा आपल्या शीतल किरणांनीं जगाला आनंदवीत असे, त्या दिवशीं, मी एकटा च त्या आवारांत, रात्रीचा फिरत असें; व त्या शांत समयीं इकडून तिकडे फिरत असतांना मला फार आनंद होत असे. मला जो द्राविडी गोसावी भेटला होता, त्याला गुरूनादा ह्मणत असत. तो गांवांत रहात असे. त्याला मीं बंगल्यांत रहावयास बोलावलें; त्यावरून एक दोन दिवस तो तेथें राहिला, परंतु त्याला बंगल्यांत बरें वाटेना, ह्मणून तो पुन्हा गांवात गेला. त्याच्याजवळ गरम कपडा कांहीं एक नव्हता, त्यामुळे त्याला थंडीपासून फार त्रास होत असे, ह्मणून मीं त्याला गरम घोंगडीची एक कफनी करून देवविली. इतर गोसावी लोकांप्रमाणें अंमल करण्याची त्याला सवय असल्यामुळें, अतर ( अफुचा अर्क ) त्याला फार लागत असे. त्याच्या जवळचा अमली पदार्थ जेव्हा सर्व संपला, तेव्हा त्याचे फार हाल झाले. त्याचे जेवणाचे हि मधून मधून हाल होत असत. कधीं कधीं त्याला मी आपलेबरोबर जेवावयास बोलावीत असे. शारीरिक कष्ट आनंदानें सोसण्यास तो तयार नसे. गोसावी-पणाची दीक्षा घेऊन त्याला पधरा वर्षे झालेलीं होतीं. त्याची एकदर अंतर्बाह्य स्थिति पाहून मला त्याची फार कींव येत असे. ह्या गुरूनादाबावासंबंधाने जास्त सविस्तर लिहिणें या ठिकाणीं अप्रशस्त होय. असो.

गर्बियांगला येऊन सुमारें पधरा दिवस झाल्यावर एके दिवशीं मी बंगल्याच्या आवारांत भोजनोत्तर शतपावली करीत व श्रीसद्गुरुमहाराजांच्या नामस्मरणानें मनाशीं करम-

शूक करीत फिरत होतों; त्या वेळेस रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार होता. त्या वेळीं एकाएकीं माझ्या मनांत आलें कीं, आजपासून बरोबर आठव्या दिवशीं तिबेटांत जावयास निघावयाचें. हा विचार मनांत आल्याबरोबर चित्तास समाधान वाटलें. वर सांगितल्याप्रमाणें विचार ठरला त्या च रात्रीं मला एक शुभ स्वप्न पडलें. दुसरे दिवशीं शाळामास्तरला मीं माझा बेत सांगितला. तेव्हां तो ह्मणाला कीं, आज सकाळीं च तिबेटातून खंपाच्या बकऱ्यांचा तांडा आला आहे. रस्ता अजून चांगलासा खुला झालेला नाहीं,-परंतु तुमची जाण्याची वेळ येईतों रस्ता खुला होईल व परमेश्वरकृपेनें तुह्माला सोबत हि मिळेल. तुह्माला तिबेटांत काहींएक त्रास होणार नाहीं, असें मला वाटतें. सुमारें तीन चार [illegible]

[illegible] वर जाऊं येऊं लागल्या. घाटांतील बर्फ कमी होऊं लागलें व चौदास परगण्यातील कांहीं भुटिया लोक तिबेटांत जाण्यासाठीं गर्बियागला येऊन पोहोंचले. मी हि माझ्या तयारीला लागलों. ठरल्याप्रमाणें बरोबर आठ दिवसानीं, पागु येथील एका श्रीमान भुटिया व्यापाऱ्याची सोबत पाहून मी तिबेटांतील "ताकलाकोट" ला जावयास गर्बियागहून निघालों. सकाळीं आठ वाजतां "छांगरू" येथें मुक्काम केला. येथें मुक्काम करण्याचें कारण असें झालें कीं, मी गर्बियागला असतांना छांगरूच्या प्रधानानें मला आग्रह केला कीं, आपण आमच्या गावांत येऊन रहा, मी आपली सर्व व्यवस्था ठेवीन. परंतु मीं त्याला सांगितलें कीं, ताकलाकोटला जातांना एक दिवस मी तुमच्या

आवार होतें. ज्या दिवशीं, आकाश निरभ्र असून चंद्रमा आपल्या शीतल किरणांनीं जगाला आनंदवीत असे, त्या दिवशीं, मी एकटा च त्या आवारांत, रात्रीचा फिरत असें; व त्या शांत समयीं इकडून तिकडे फिरत असतांना मला फार आनंद होत असे. मला जो द्राविडी गोसावी भेटला होता, त्याला गुरूनादा ह्मणत असत. तो गांवांत रहात असे. त्याला मीं बंगल्यांत रहावयास बोलावलें; त्यावरून एक दोन दिवस तो तेथें राहिला, परंतु त्याला बंगल्यांत बरें वाटेना, ह्मणून तो पुन्हा गांवांत गेला. त्याच्याजवळ गरम कपडा काहीं एक नव्हता, त्यामुळे त्याला थंडीपासून फार त्रास होत असे; ह्मणून मीं त्याला गरम घोंगडीची एक कफनी करून देवविली. इतर गोसावी लोकांप्रमाणें अंमल करण्याची त्याला सवय असल्यामुळें, अतर (अफुचा अर्क) त्याला फार लागत असे. त्याच्या जवळचा अमली पदार्थ जेव्हा सर्व सपला, तेव्हा त्याचे फार हाल झाले. त्याचे जेवणाचे हि मधून मधून हाल होत असत. कधीं कधीं त्याला मी आपलेबरोबर जेवावयास बोलावीत असें. शारीरिक कष्ट आनंदानें सोसण्यास तो तयार असे. गोसावीपणाची दीक्षा घेऊन त्याला पंधरा वर्षें झालेलीं होतीं. त्याची एकदर अतर्बाह्य स्थिति पाहून मला त्याची फार कींव येत असे. ह्या गुरूनादाबाबासबंधानें जास्त सविस्तर लिहिणें या ठिकाणीं अप्रशस्त होय. असो.

गर्बियागला येऊन सुमारें पंधरा दिवस झाल्यावर एके दिवशीं मी बंगल्याच्या आवारात भोजनोत्तर शतपावली करीत व श्रीसद्गुरुमहाराजाच्या नामस्मरणानें मनाशीं करम-

शूक करीत फिरत होतों; त्या वेळेस रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार होता. त्या वेळीं एकाएकीं माझ्या मनांत आलें कीं, आजपासून बरोबर आठव्या दिवशीं तिबेटांत जावयास निघावयाचें. हा विचार मनांत आल्याबरोबर चित्तास समाधान वाटलें. वर सांगितल्याप्रमाणें विचार ठरला त्या च रात्रीं मला एक शुभ स्वप्न पडलें. दुसरे दिवशीं शाळामास्तरला मीं माझा बेत सांगितला. तेव्हां तो म्हणाला कीं, आज सकाळीं च तिबेटांतून खंपाच्या बकऱ्यांचा तांडा आला आहे. रस्ता अजून चांगलासा खुला झालेला नाहीं, परंतु तुमची जाण्याची वेळ येईतों रस्ता खुला होईल व परमेश्वरकृपेनें तुम्हाला सोबत हि मिळेल. तुम्हाला तिबेटांत कांहींएक त्रास होणार नाहीं, असें मला वाटतें. सुमारें तीन चार दिवसांमध्यें भुटिया लोकांच्या बकऱ्या वर जाऊं येऊं लागल्या. घाटांतील बर्फ कमी होऊं लागलें व चौदास परगण्यांतील कांहीं भुटिया लोक तिबेटांत जाण्यासाठीं गर्ब्यांगला येऊन पोहोंचले. मी हि माझ्या तयारीला लागलों. ठरल्याप्रमाणें बरोबर आठ दिवसांनीं, पागु येथील एका श्रीमान भुटिया व्यापाऱ्याची सोबत पाहून मी तिबेटांतील "ताकलाकोट" ला जावयास गार्ब्यांगाहून निघालों. सकाळीं आठ वाजता "छांगरू" येथें मुक्काम केला. येथें मुक्काम करण्याचें कारण असें झालें कीं, मी गर्ब्यांगला असतांना छांगरूच्या प्रधानानें मला आग्रह केला कीं, आपण आमच्या गांवांत येऊन रहा, मी आपली सर्व व्यवस्था ठेवीन. परंतु मीं त्याला सांगितलें कीं, ताकलाकोटला जातांना एक दिवस मी तुमच्या

गांवाला मुकाम करीन. असो. दुसरे दिवशीं मी, माझे दोन कुली, गुरुनादा बावा, एक नेपाळी हवलदार व एक पोलीस शिपाई असे छांगरूहून जेवून निघालों. आह्मांला "तिंकर"ला जावयाचें होतें. छांगरूपासून तिंकर सात मैल आहे. रस्ता नेपाळ हद्दींतून तिंकर नदीचे काटाकांठानें च आहे. रस्ता चांगला नाहीं. वाटेंत एक मोठी चढण लागते.

छांगरूहून निघताना एक मोठी गम्मत झाली. आदले दिवशीं रात्रीं गुरुनादा बावाचें व माझ्या कुलींचे थोडेसें भांडण झालें पुढें मीं गुरुनादा बावाला समजुतीच्या गोष्टी सांगून पाहिल्या, परंतु त्याचा राग कांहीं केल्या जाईना रात्रीं बावाजी उपाशी च निजले. सकाळीं मीं त्याना जेवावयास बोलावलें, तेव्हां बावाजी रागानें ह्मणाले कीं, मी तुमचे बरोबर कैलासला येत नाहीं, तुह्मी आपले जा. सुमारें अर्धा तास ते संतापामुळे कांहीं तरी बडबडत बसले होते. मी पुन्हा कांहींएक बोललों नाहीं, त्यांचें पान वाढून ठेवून मी भोजनास बसलों. नंतर कांहीं वेळानें बावाजी जेवावयास आले. निघताना मीं बावाजीला मजबरोबर चलावें ह्मणून विनंति केली व पुष्कळ प्रकारें त्याची विनवणी हि केली, सर्वांनीं त्यांना सांगितलें कीं, स्वामीजीबरोबर जाल तर फार त्रास न होता कैलास व मानस सरोवराचें दर्शन होईल. अशी संधि पुन्हां येणार नाहीं; परंतु बावाजीला तें कांहीं पटेना. आह्मी छांगरूहून निघालों, बावाजी तेथें मुक्कामाचे जागीं च निजून राहिले. आह्मी तिंकरला दुपारीं बारा वाजता येऊन पोहोंचलों. रस्ता वाईट व चढण फार, त्यामुळें जीव अगदीं थकून गेला. तिंकरला जाऊन आह्मी गुळ खाऊन, पाणी पिऊन, विश्रांति घेत बसलों होतों;

तों सुमारें अर्ध्या तासानें गुरुनादा बावा काठी टेंकीत, कण्हत व थकलेले असल्यामुळें हळु हळु चालत येतांना आह्मीं पाहिले. आमच्या जवळ बावा येऊन बसले. बरें झालें, तुह्मी आलात, असें मीं ह्मटलें व त्याना गुळ व पाणी दिलें. मी अथवा इतर कोणी हि त्याला जास्त बोललें नाहीं. ह्या बावाचा, पुढें तिबेटांत जितके दिवस तो मजबरोबर होता तितके दिवस, मधून मधून मजवर अथवा माझ्या कुलींवर उगी च राग होत असे व त्यामुळें तो स्वतःस विनाकारण त्रास करून घेत असे. तिंकरला आमचा दीड दिवस मुक्काम होता. नेंपाळी हवलदारानें आमची राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था गावच्या पधानाकडून चांगली ठेवविली होती. तिंकरहून नेपाळी हवलदार व पोलीस शिपाई छांगरूला परत गेले व मी, माझे दोन कुली, गुरुनादा व तो सुटिया व्यापारी, असे पुढें जावयास निघालों. त्या व्यापाऱ्या-बरोबर दोन हुणिया ( तिबेटी ) जातीचे नोकर असून सामानानें लादलेले सात झुबु व चार घोडे होते. ह्या जनावरां-वर विशेषतः कापडाचे गठ्ठे लादलेले होते. तिंकरपासून सुमारें अडीच मैलांवर एका धर्मशाळेंत संध्याकाळीं पांच वाजतां आह्मी येऊन उतरलों.

आह्मीं ज्या धर्मशाळेंत मुक्काम केला होता, त्या ठिकाणापासून च तिंकरचे धुऱ्याचा प्रारंभ होतो. धुरा पहाटें चढून जाणें सोईचें असतें, ह्मणून त्या रात्रीं आह्माला वरील धर्मशाळेंत मुक्काम करणें भाग पडलें. भोटमधील धर्मशाळा गलिच्छ असून लहान असतात, तशी च ही धर्मशाळा होती. त्या व्यापाऱ्यानें धर्मशाळेच्या बाहेर मालाच्या गठ्यांचा ढीग

रचून त्यावर एक पाल लावलें. धर्मशाळेंतील एका खोलींत मी, दुसऱ्या खोलींत गुरुनादा, तिसरे खोलींत माझे कुली व बाकीच्या चार खोल्यांतून तो व्यापारी व त्याचे नोकर असे राहिलों. जवळ च एका टेंकडीचे आश्रयानें असलेलें एक पाल मीं पाहिलें. त्या पालाजवळ सभोंवार, कातड्याच्या लहान लहान पिशव्याचा, दोन तीन पुरुष उंचीचा ढीग पाहिला. त्या पिशव्या किराणा मालानें भरलेल्या होत्या. त्याचा आकार गोण्याप्रमाणें होता. चौकशीअतीं असें कळलें कीं, माझ्या बरोबरच्या भुटिया व्यापाऱ्याच्या बकऱ्याचा तांडा तेथें उतरलेला होता. तांडा सुमारें दोन हजार बकऱ्यांचा होता.

"तिंकर धुरा" हा, पश्चिम तिबेटांत जावयास जे एकदर सात आठ मार्ग आहेत, त्यापैकीं एक आहे. चौदास परगण्यातील भुटिया व्यापारी बहुतकरून ह्या च मार्गानें जातात; असो. ज्या रात्रीं आह्मीं धर्मशाळेंत मुक्काम केला होता, त्या रात्रीं पर्जन्य इतका पडला कीं, रात्रभर मी आंत छत्री उघडून बसून राहिलों होतों! वरून गळत होतें, बाहेरील पाणी आंत येत होतें; थंडी तर अतिशय होती. माझे कपडे भिजून चिंब झाले होते. रात्रभर झोंप नाहीं. स्वैंपाक करता येईना, त्यामुळें उपास करावा लागला, हें सांगणें नको च. ह्याप्रमाणें माझे हाल झाले, परंतु गुरुनादा बावाचे माझ्यापेक्षां जास्त हाल झाले! त्याला थंडी बिलकुल सहन करवेना. परंतु तेथें दुसरा उपाय च नव्हता.

"लिपुपास" पेक्षां तिंकरचे धुऱ्याची चढण जास्त खडी आहे. आह्मीं पहाटें तीन वाजतां निघण्याचा बेत

केला. पहाटें चहा घेतला व थोडीशीं बिस्किटें खाल्लीं. माझ्या कुलींनीं स्वैंपाक केला व आह्मीं भोजन करून घेतलें. रिकाम्या पोटीं बर्फावरून चालणें व चढण चढणें अशक्य असतें, त्यामुळें एवढ्या पहाटें जेवण करणें भाग पडलें, शिवाय त्या दिवशीं सकाळीं तीन वाजेपासून संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत आह्मांला प्रवास करावयाचा होता.

भुटिया व्यापाऱ्यानें मजसाठीं तिंकरहून एक घोडा भाड्यानें आणविला. सहा तासाचें एक रुपया भाडें दिलें. धुरा सतरा साडे सतरा हजार फूट उंचीचा आहे. पाच मैलांची चढण आहे. रस्ता अतिशय कठीण आहे. आह्मीं सकाळीं चार वाजता धर्मशाळा सोडली. त्या वेळेस आकाश मेघाच्छादित होतें; पर्जन्य पडण्याची भीति होती. धुक्यामुळें दिशा धुंद झालेल्या होत्या. मी व तो भुटिया व्यापारी घोड्यावर बसून हळु हळु चाललों होतों. बाकीची मंडळी पायीं चालत होती. त्या व्यापाऱ्याचीं जनावरें सर्वांच्या पुढें चाललीं होतीं. झुबु हें जनावर मी प्रथम स्वेल्याला पाहिलें. तें साधारणपणें वनगाई (याक) सारखें असतें; त्याच्या संबधानें बरोबर रीतीनें कल्पना करावयाची तर ही जात वनगाय व गावठी गाय याचे मधील मेसळ आहे. असो. अशा रीतीनें हळु हळु मार्ग क्रमीत आह्मी दुपारीं बारा वाजता तिंकर धुऱ्याचे शिखरावर येऊन पोहोंचलों. गुरुनादा व माझे दोन्ही कुली मागें राहिले असें दिसलें त्या समयीं मी अठरा हजार फूट उंचीवर उभा होतों! पायाखालीं, घोट्याचे वर चार चार बोटें इतकें

बर्फ होतें. जिकडे पहावें तिकडे पांढरें च पांढरें. मीं निळ्या रंगाच्या कांचेचा चष्मा डोळयास लावला होता. कारण, मागें पान २१ येथें सांगितल्याप्रमाणें बर्फावर ऊन पडून त्यापासून जिकडे तिकडे प्रखर प्रकाश पडतो व तो नेत्रांस असह्य होऊन त्यामुळें दृष्टीस अपाय होतो. चढण चढून शिखरावर आलों व तेथून मीं घोडा परत केला. घोड्यावरून खालीं उतरलों त्या वेळेस माझे पाय बर्फांत घोट्यापर्यंत रुतले होते. वरून हि बर्फ पडत होतें, व सभोंवार देखील जिकडे तिकडे बर्फ च पसरलें होतें. मीं एकदा चष्मा बाजूला करून सभोंवतीं पाहिलें, त्यावेळी श्रीभगवतानीं अर्जुनाला आपलें विश्वरूप दाखवितांना त्याजला दिलेल्या दिव्य दृष्टीचें मला स्मरण झालें, त्या वेळेचा तो देखावा मी आमरणांत विसरणार नाहीं! थंडी-मुळें शरीरयष्टि जरी कांपत होती, तरी तो गंभीर देखावा पाहून मन प्रसन्न झालें. त्या वेळेस मधून मधून ऊन पडत असल्या-मुळें फार च मौज दिसत होती. वारा बिलकुल वहात नव्हता. बर्फाच्या वादळामुळें दिशा अगदीं धुंद झाल्या होत्या. उत्तरेच्या व दक्षिणेच्या बाजूस कडे तुटलेले असून मध्यभागीं उंच सुळ-क्यावर आम्ही उभे होतों. एकीकडे हिंदुस्थान व एकीकडे तिबेट असे दोन प्रदेश अगदीं निरनिराळे दिसत होते. चढण चढतांना वादळ वगैरे कांहींएक नव्हतें. माथ्यावर आल्यानंतर एक दोन मिनिटें थोडेंसें बर्फ पडलें. ही अखंड बर्फाची रांग ओलांड-तांना कठीं प्राण येतात, येवढें च नव्हे तर, ह्या ठिकाणीं मनुष्यें व जनावरें प्राण सोडतात देखील. आम्ही चढण चढत असतांना, सामान लादलेल्या घोड्यापैकीं एका घोड्याचा

पाय बर्फावरून घसरला व घोडा खालीं पडला; पडल्याबरोबर त्यानें डोळे फिरवले, जीभ बाहेर काढली व पाय ताठ केले; तेव्हां दोर कापून त्याच्या पाठीवरचें सामान बाजूला केलें व मोठ्या प्रयासानें त्याला उभें केलें. नंतर कांहीं वेळानें घोडा सावध झाला. थोडक्यांत बचावला, नाहींतर त्या दिवशीं त्या घोड्याची मरणाची च पाळी होती. श्री नारायणाचे कृपेनें त्या दिवशीं कडक ऊन हि पडलें नव्हतें, वारा हि सुटला नव्हता व वादळ हि नव्हतें, त्यामुळें आम्हांला विशेषसा त्रास न होतां आम्ही तिंकर धुऱ्याचे शिखरावर सुखरूप येऊन पोहोंचलों. सुमारें पधरा मिनिटें तेथील देखावा पहात उभा होतों. या मृत्युलोकातील मनुष्याला स्वर्गांत नेल्यावर त्याच्या मनाची जी स्थिति होत असेल, त्या स्थितीची कांहीं कल्पना तो बर्फमय प्रदेश पाहून माझ्या मनावर झाली. त्या वेळेच्या माझ्या मानसिक स्थितीचें वर्णन याहून जास्त स्पष्टपणानें मला करतां येणें शक्य नाहीं, ह्याबद्दल माझे प्रिय वाचक मला क्षमा करितील अशी आशा आहे.

आम्ही शिखरावर माझे कुली व गुरुनादा यांची वाट पहात सुमारें पधरा मिनिटें उभे होतों. तेथें जास्त वेळ उभे राहण्याची आमची प्राज्ञा नव्हती. कारण, बर्फाचें वादळ केव्हां उत्पन्न होईल व कडक ऊन केव्हा पडेल, ह्याचा कांहीं नियम नव्हता; आणि तसें झालें असतें तर मग कैलास व मानस सरोवर तेथल्या तेथें च राहिले असते व हें प्रवासवर्णन लिहिण्याचा प्रसंग हि पण आला नसता. असो. पुढें आम्ही उतार उतरू लागलों, बर्फांत पाय

करूं लागले; थंडीमुळें शरीर बधिर होऊन वाटूं लागलें, ठिकठिकाणीं पाय घसरून पडलों देखील. उजव्या हातांतील उंच काठी टेंकीत व डाव्या हातानें एका घोड्याची शेंप धरून मी त्या घोड्याचे मागोमाग सुमारें एक दोड तास सारखा बर्फांतून चालतों होतों. नंतर बर्फाचा प्रदेश संपून खडकाळ रस्ता लागला; मी व भुटिया व्यापारी सर्वांचे पुढें चालत होतों. दुपारीं साडे तीन वाजता सर्व उतार उतरून, एका झऱ्याचे काठीं आह्मी येऊन बसलों. श्रम किती झाले होते ह्मणून सांगू? बसल्याबरोबर जमिनीवर अंग टाकलें व डोळे झाकून पांच सहा मिनिटें स्वस्थ पडलों. भुकेनें पोटांत काहूर उसळून दिलें होतें व माझें खाण्याचें सामान तर कुलींबरोबर मागें राहिलें होतें. थोडींशीं बिस्किटें व गोंठलेल्या दुधाचा डबा मीं मजबरोबर घेतला असता तर बरें झालें असतें, असें मला वाटूं लागलें. तेव्हां त्या भुटिया व्यापाऱ्यानें मला एक दोन मुठी मोठ्या मनुका व दोन गव्हाचे रोट दिले. याप्रमाणें मनुका व रोट आह्मी खात बसलों असतां, सुमारें एक तासानें माझे कुली व गुरुनादा हे तेथें आले. वाटेंत कुलींचे व बावाचे साहजिकपणें आमचेपेक्षा जास्त हाल झाले. बावाजीला वाटेंत दोन मोठे जुलाब झाले. कपाळ दुखूं लागलें व शक्ति नाहींशी झाली. तशी च स्थिति माझ्या तरुण कुलीची झाली. ज्या वेळेस हे तिघेजण आह्मी बसलों होतों त्या झऱ्याजवळ आले, तेव्हा तो तरुण कुली व बावाजी प्रेतवत दिसत होते. झऱ्याजवळ आल्याबरोबर ते दोघे मला ह्मणूं लागले कीं, स्वामीजी, आह्मी आतां येथें च मरणार, आम-

च्यानें चालवत नाहीं, असें ह्मणून त्यांनीं धाडदिशी जमि-नीवर आग टाकलें. त्यांची ती स्थिति पाहून मला फार काळजी वाटूं लागली. नंतर कुलींनीं गुळ, तूप व सत्तू एकत्र करून खाल्ला. गुरुनादा यांस हि खावयास दिलें. खाल्यावर त्यांना जरा बरें वाटलें व हुषारी आली. ऊर्ध्व लागल्यामुळें त्यांची छाती भरून येऊन दुखत होती. पुढें ऊर्ध्व कमी झाला व छाती दुखणें हि बंद झालें. आठ नऊ हजार फूट उंचीपर्यंत मनुष्याला श्वासोच्छ्वास करण्यास अडचण पडत नाहीं; परंतु त्याच्यावर हवा पातळ असल्यामुळें श्वासोच्छ्वासाचें क्रियेस अडथळा येऊन ऊर्ध्व लागतो. चालतांना आह्मी तोंडांत काळे मिरे ठेवीत होतों. त्यामुळें तोंडाला कोरड पडत नसे. झऱ्याजवळ आह्मी सुमारें दोन तास बसल्यावर पुढें प्रवास करूं लागलों. आतां आह्मी परदेशांत आलों होतों ते इंग्लंड, अमेरिका अगर जपान यासारख्या सुधारलेल्या परदेशांत नव्हे, तर अगदीं रानटी देशांत आलों होतों कीं ज्या ठिकाणीं आह्मी जिवंत कसे राहूं, ह्याची क्षणोक्षणीं चिंता वाटत असे. माझा तरुण कुली व गुरुनादा हे अगदीं काळे ठिक्कर पडल्यामुळें चमत्कारिक दिसत होते, त्याच्या मुखावर आतां थोडीशी टवटवी आली होती. आह्मी सर्व मिळून हळु हळु चालूं लागलों. डोंगरसपाटीवरून चाललों होतों. जिकडे पहावें तिकडे मैदान. वृक्ष नाहीं, वेली नाहीं, झुडुप नाहीं, काहीं नाहीं! त्या अफाट मैदानावरून आह्मी सहा माणसें व सात जनावरें, इतके च कायते प्राणी एकसारखे चालत होतों. वाटेनें आह्माला चिटपाखरू देखील

दिसलें नाहीं. सुमारें साडे पांच वाजतां आह्माला एका डोंगराचे शिखरावर " ताकलाकोट " दिसूं लागलें. त्या च सुमारास अगाला झोंबणारा असा तीक्ष्ण वारा जोरानें वाहण्यास सुरवात झाली. वारा आमचे उलट दिशेनें वहात होता. " ताकलाकोट, " लांबून दृष्टीस, जवळ आहे असें दिसत होतें खरें, परंतु तेथें जाऊन पोंचण्यास आह्मास संध्याकाळचे साडे सात वाजले. त्या दिवशीं आह्मीं, पहाटे चार वाजल्यापासून तों संध्याकाळचे साडे सात वाजेपर्यंत, ह्मणजे सुमारें पंधरा तास एकसारखा प्रवास केला; वाटेंत फक्त दोन तास विश्रांति घेतली होती. " ताकलाकोट " ला संध्याकाळीं आलों, तेव्हां तेथल्या नदीला पूर आला होता. नदीवर पूल वगैरे कांहींएक नव्हता व आह्माला तर पलीकडे जावयाचें होतें; तेव्हा आह्मी जनावराचे पाठीवर बसून पार गेलों. ह्या प्रसंगीं घोडा अथवा खेचर यापेक्षां झुबु जनावर फार उपयोगी पडतें, असें माझ्या नजरेस आलें. नदीचे पैलतीरीं एक मोठी दरड आहे व त्या दरडींत पुष्कळ मोठाल्या गुंफा पोंखरलेल्या आहेत. ह्या गुंफापैकीं एका गुफेंत त्या दिवशीं आह्मीं मुक्काम केला. भुटिया व्यापारी आपले सामानाचे गठ्ठे जनावरावरून काढून घेण्याचे खटपटीस लागला; कारण, जनावरें त्या च रात्रीं तिंकर गावाला परत जावयाचीं होतीं; याचें कारण ताकलाकोटला जनावरांना खावयास चारा मुळीं च मिळत नाहीं. आह्मी आलों त्या दिवशीं, सबंध दिवसभर सर्व जनावरें अगदीं उपाशी होतीं. त्या दिवसाच्या अजमासें तीस मैल प्रवासानें

माणसें व जनावरें अगदीं थकून गेलीं होतीं हें सांगणें नको च. सामान वगैरे लावून ठेवल्याबरोबर तो व्यापारी व त्याचे दोन हुणिया नोकर सत्तु व जाण खावयास बसले. मी व कुली कांहीं न खातां तसे च बसलों होतों. गुरुनादा हि त्यांचे बरोबर जाण खावयास बसला. जाण हें एक प्रकारचें मद्य आहे. तें जव कुजवून त्यापासून तयार करतात.

त्या च वेळेस आमच्या मागें एक ससेमिरा लागला. जाण पिऊन धुंद झालेले आसुरी मुद्रेचीं चार पांच तिबेटी माणसें आमचे भोंवतीं जमून आह्माला त्रास देऊं लागलीं. तुह्मी परके लोक येथें कोणाच्या परवानगीनें आलात? आताच्या आता आमच्या राज्याचे हद्दीचे बाहेर चालते व्हा, नाहींतर तुमचे प्राण जातील; याप्रमाणें ते लोक वडबडूं लागले. आह्माला त्यांची ती भाषा कांहीं च समजत नव्हती, ह्मणून आह्मी स्वस्थ बसलों होतों. हे लोक सरकारी कामगार जरी नव्हते; तरी त्याप्रमाणें च आमच्याशीं वागत होते. आता काय करावें अशा विवंचनेंत मी पडलों. रात्रीचे आठ साडे आठ झालेले होते. शेवटीं, त्या भुटिया व्यापाऱ्यानें त्याना समजावून सांगितलें व तो ससेमिरा त्या वेळेपुरता तरी बंद झाला. मी, कुली, बावाजी सर्व अगदीं थकून गेलों असल्यामुळें चहा वगैरे कांहींएक न करतां, आह्मी तसे च निजलों. त्या रात्रीं मला झोंप लागली नाहीं. श्रमामुळें सर्व आंग ठणकत होतें.

ज्या गुहेंत आम्ही उतरलों होतों, ती गुफा प्रथम अगदीं गलिच्छ होती. ती माझ्या मनुष्यांकडून साफ करविली, तेव्हां मला तींत रहावेंसें वाटलें. दुसरे दिवशीं पहाटे पांच वाजता मी उठून गुफेचे बाहेर उभा होतों, कांहीं वेळानें शौच मुखमार्जन करून नदीवर स्नानाला जावें अशा विचारांत मी असतां, एक तिबेटी मनुष्य मजकडे आला व स्वभाषेंत सांगू लागला कीं, कोटांत झुपन साहेब तुम्हांला बोलावीत आहेत, चला. मला ती भाषा समजत नसल्यामुळें मी त्याला भुटिया व्यापाऱ्याकडे घेऊन गेलों. त्यानें त्याला सांगितलें कीं जेवण करून दुपारीं येतील. नंतर नदीवर स्नानास जाणार होतों, परंतु त्या दिवशीं थंडी फार पडली होती व वारा हि अतिशय होता, शिवाय त्या नदीचें पाणी चांगलें नाहीं, असें कळल्यावरून मीं स्नानाचा बेत रहित केला.

कांहीं वेळानें तो भुटिया व्यापारी मी ज्या गुहेंत रहात होतों तेथें आला. त्या समयीं मी अवधूत गीतेचा पाठ करीत बसलों होतों. माझे समोर सुमारें पधरा वीस तिबेटी पुरुष, स्त्रिया व मुलें हीं उभीं होतीं. माझ्या एका कुलीला तिबेटी भाषा साधारण येत होती. त्याला त्या लोकांनीं प्रश्न विचारून विचारून फार त्रास दिला. एकदां माझ्याकडे पहात, एकदां गुरुनादा दुसऱ्या कोंपऱ्यात आसन घालून बसला होता, त्याच्याकडे बघत, आपआपसांत बोलत, व मधून च मोठ्यानें हंसत. त्यांच्यांत दोन तीन वृद्ध पुरुष होते, ते त्या बाकीच्या स्त्रीपुरुषांना दटावीत. त्यांच्या एकदर हावभावावरून मला असें वाटलें कीं, ते माझ्या कुलीची थट्टा करीत होते; कारण तो

तोतरा होता. ते माझ्याशीं साधारण मर्यादेनें वागत. गुरुनादाला त्याच्या वेषावरून ते लोक खरा साधु ( लामा ) समजत असत. कारण त्याच्या जटा मोठाल्या होत्या; अंगावर रुद्राक्ष असत; त्याचप्रमाणे तोंडाला व हातापायाला तो विभूति लावीत असे व त्याच्या जवळ भोपळा होता. माझा वेष गुरुनादाचे वेषापेक्षा अगदीं च विरुद्ध दिसे. माझ्या जटा फारशा वाढलेल्या नव्हत्या; मी अंगाला विभूति लावीत नव्हतों; अंगावर रुद्राक्ष धारण करीत नव्हतों व माझा कमंडलु पितळेचा होता; यांवरून त्यांचा असा समज झाला व ते असें ह्मणत कीं, हा हिंदुस्थानातला कोणीतरी राजा असून इकडे (तिबेटात) साधूचा वेष घेऊन आलेला आहे; त्याचा चेहरा हि साधूप्रमाणें दिसत नाहीं. शिवाय, माझ्या जवळ दोन कुली होते, माझें सामान, कपडे व वरील भगवी कफनी हीं व्यवस्थेशीर व स्वच्छ दिसत होतीं; इत्यादि कारणानीं ते आपल्या समजास बळकटी आणीत. तो भुटिया व्यापारी आला तेव्हा सर्व मंडळी त्याला माझ्या संबधानें विचारू लागली. तेव्हा त्यानें त्याना असें सांगितलें कीं हे आमचे मोठे गुरू आहेत, विद्वान आहेत, फार चांगले आहेत, वगैरे वगैरे. नंतर त्या लोकाना जावयास सांगून तो मला ह्मणाला कीं, मी आता वर कोटात झुपन साहेबां कडे नजराणा (फळें) घेऊन जात आहे, आपण आणखी एक दोन तासांनीं यावें; परवान्यासंबधानें मी झुपन साहेबाजवळ गोष्ट काढीन, असें ह्मणून तो गेला. त्या वेळेस नऊ वाजले होते. त्या दिवसाच्या थंडीमुळें व तीक्ष्ण वाऱ्यामुळे माझ्या कुलींचे व गुरुनादा बावाचे ओंठ फुटले होते व तोंडावर भेगा

( मी त्या व्यापाऱ्याबरोबर तिबेटात गेलों तो ) आह्मी बसलों होतों तेथें आला. मला त्यानें सांगितलें, झुपन साहेब खुशाल आहेत. तुमच्या संबधानें जी हकीकत मला सांगावीशी वाटली ती मीं त्याना सांगितली. तुह्माला भेटण्याची त्याची इच्छा आहे. त्या वेळस झुपनकडे दोन लामा ( बौद्ध भिक्षु ) आले होते व त्याच्याशीं झुपन बोलत बसला होता. कांहीं वेळानें ते लामा गेले व आह्मांला झुपननें वर बोलावलें. तिसरे मजल्यावर गच्ची होती. गच्चीवर नदीकडे तोंड करून झुपन उभा होता. त्यावेळीं गच्चीवर तीघे जण होते. त्यांपैकीं एक परमा भुटिया माझे ओळखीचा च होता, दुसरा मनुष्य झुपनचा हुजऱ्या असावा असें त्याच्या पोषाखावरून व त्याच्या उभें राहण्याच्या रीतीवरून मीं ताडलें व तिसरा स्वतः झुपन होता.

मी वर आल्याबरोबर परमा भुटियानें झुपनला माझी ओळख करून दिली झुपननें मला नमस्कार केला व मीं त्याला माझ्या वेषानुरूप हात वर करून आशिर्वाद दिला. झुपननें पायांत तांबड्या मखमालीचा " दोकच्या " ( गुडघ्यापर्यंत बूट ) घातला होता, अंगांत किनखापी 'बखू' (मोठा झगा) होता व डोक्याला जरीची थोडीशी उभट अशी गोल टोपी घातलेली होती; आणि हातात स्मरणी होती.

झुंपन अंगानें फार लठ्ठ हि नव्हता व अगदीं सडपातळ हि नव्हता. चेहरा खानदानीचा दिसत होता. मला त्यान माझ्या मागें या अशी हातानें खूण केली व आह्मी एका लहानशा दालनांत गेलों. हें दालन ह्मणजे

झुंपनची कचेरी, पूजागृह व दिवसभर बसण्याची जागा होती. त्या दालनांत साधारण स्वच्छता दिसत होती. बसावयास "दन" (तिबेटी गालिचा) घातलेलें होतें व त्यावर गाद्या होत्या. टेंकावयास लोड होते. गाद्यापुढें नकशीचीं लांकडी लहान मेजें होतीं. गादीवर बसून ह्या मेजांवरून जेवतां येतें. झुंपननें मजबरोबर असलेल्या दोन माणसांची चौकशी केली. परमा भुटिया दुभाष्याचें काम करीत होता. झुंपनचें व माझें अर्धा तास बोलणें चाललें होतें. मला पाहून त्याला आनंद झालेला असावा असें त्याचे चेहऱ्यावरून मीं ओळखलें. त्यानें आपलें जप करण्याचें चांदीचें यंत्र, नीरांजनें वगैरे चांदीचें व सोन्याचें पुजेचें साहित्य मला दाखविलें. "ॐ मामी पामी हु" अशीं त्या जपाचीं अक्षरें आहेत. धार्मिक विषयासंबधानें आमचें बोलणें होत होतें, परंतु दुभाष्याला आपलें काम नीट करतां येईना. नंतर इकडचें तिकडचें भाषण झाल्या-वर परवान्याची गोष्ट काढली. झुंपननें लागलीं च आपल्या सहीशिक्याचा चार माणसांचा परवाना लिहून दिला. नंतर एक रुपया (सुरती) मला दक्षणा दिली व आपला कैलासचा प्रवास आपणास सुखकारक होवो, अशी शेवटीं झुंपननें आशा प्रदर्शित केली. त्यावर आपलें कल्याण असो, ह्या शब्दांनीं मीं हि माझी सदिच्छा दर्शविली. शिडीपर्यंत झुंपन मला पोहोंचवावयास आला होता. कोटांत मी एकंदर तासभर होतों.

मी हेर वगैरे नाहीं याबद्दल परमा भुटियानें हमी दिली

होती. कैलास, खोचरनाथ, तीर्थापुरी, मानस सरोवर वगैरे ठिकाणीं जाण्याचा परवाना मला मिळाला होता. परवाना मिळविण्यास इतरांना फार त्रास पडतो व वेळ लागतो ह्मणतात; परंतु परमेश्वरकृपेनें मला तीस मिनिटांत परवाना मिळाला; परमा भुटिया सांगत होता कीं तुह्मांला पाहिल्याबरोबर झुपन साहेबांना अतिशय आनंद झाला. त्याच्या मनावर तुमच्या संबधानें उत्तम ग्रह झाला आहे. मीं ह्मटलें श्री सद्गुरूची इच्छा; असो.

ज्या टेंकडीवर झुपनचा कोट आहे, त्या च टेंकटीवर बुद्धाचा एक मोठा मठ आहे. त्यांत सुमारें दोन तीनशें लामा राहतात. मठांत बुद्धाची मूर्ति असून पूजा थाटाची होते. त्या च मठांत एक मोठें पुस्तकसंग्रहालय आहे. शिवाय जवळ च तुरुंग आहे. तिबेटी लोकांत शिक्षा कडक असून कैद्यांना निर्दय-पणानें वागवितात.

तिबेटांतील राज्यव्यवस्था कशी काय असते, हें बरोबर समजणें मला शक्य नव्हतें. ह्याला कारणें दोन. एक तर भाषेचें अज्ञान व दुसरें मी कैलास दर्शनाच्या केवळ धार्मिक इच्छेनें गेलों असल्यामुळें, मला राजकीय विषयासंबंधानें जास्त चौकशी करावीशी वाटेना. तथापि, सहजरीतीनें मला जी ढोबळ माहिती कळली ती अशी. 'झुपन' हा तिबेट सरकारचा एक अमलदार आहे. त्याचे ताब्यांत आपल्या इकडील प्रांतायेवढा च एक प्रांत असतो. त्या प्रांताचा तो राजा ह्मटलें तरी चालेल. त्याला सर्व अधिकार असतात. मला वाटतें आपल्याकडे जसा 'कमिशनर' तसा तिकडे 'झुपन'. झुपनचे

वर ' गर्पन ' ह्मणून एक अधिकारी असतो. त्याचा अमल तीन चार झुपनवर असतो. ' गर्पन 'ला आपल्या इकडील ' गव्हरनरचे ' अधिकाराप्रमाणें अधिकार असतो. प्रत्येक गर्पनजवळ एक ' शेपचित ' ह्मणून अधिकारी असतो. त्याचे मदतीस एक लामा असतो. लामा व शेपचित न्याय देतात. पश्चिम तिबेटचा गर्पन ' गारटोक ' येथें राहतो. गारटोक हें राजधानीचें ठिकाण आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

मी ज्या वेळेस तुरुंग पहावयास गेलों, त्या वेळेस मला असें झालें कीं, मी केव्हा एकदा उघड्या हवेंत येतों. एका तरुण हुणिया दरवडेखोरास ठार मारण्याची शिक्षा झाली होती, ती अशी. त्याला थाकचे कातड्याचे पिशवींत घालून तिचें तोंड शिवून टाकलें होतें. व ती पिशवी कैदी मरेपर्यंत कडक उन्हात तापत ठेवली होती, तिबेटात जशी थंडी कडक तसें ऊन हि कडक असतें. हात तोडणें, पाय मोडणें, वगैरे शिक्षा तिकडे प्रचारांत आहेत.

ताकलाकोटला माझा मुक्काम चार दिवस होता. कारण, पुढची तयारी करावयास मला चार दिवस तेथें राहणें भाग च होतें. ह्या गावाला एक नदी आहे. ह्या नदीचें पाणी काळेंभोर दिसत होतें. ह्या नदीचे काठीं काहीं शेती आहे. त्यांत जव पिकतात. हीं शेतें कायतीं हिरवीं दिसत होतीं, बाकी सर्व प्रदेश अगदीं रुक्ष ! खडकाळ जमीन व कांटेरी झुडुपें ह्यांशिवाय काहींएक नाहीं. गर्बियागपेक्षां ताकलाकोटला उष्णता जास्त आहे, तरी रात्रीं व सकाळीं थंडी फार असते. येथें जनावरांस चारा बिलकुल मिळत नाहीं, हें मागें सांगितलें च आहे. तिबेटी लोक खाण्याच्या वस्तु जशा वर्षांच्या

बांधून ठेवतात, तसा च त्याना चाऱ्याचा हि साठोपा करून ठेवावा लागतो. सर्पणाचें तर फार च दुर्भिक्ष. याक, घोडे, खेंचरें, बकऱ्या, गाढवें वगैरे जनावराची लीद वाळवून तिचा सर्पणाप्रमाणें उपयोग करतात. येथें जिन्नस फार च महाग मिळतात. कसे हि असोत, येथें जिन्नस मिळतात तरी, यापुढें वर तर कांहीं च मिळत नाहीं. यामुळें पचवीस दिवसांची सामुग्री मी ताकलाकोटला तयार करवून घेतली होती. मजजवळ सात. थोडीशी कणीक, वनगाईचें दोन शेर तूप, चौदा पौंड बिस्किटें, सहा गोठलेल्या दुधाचे डबे व सुमारें तीन पौंड तिबेटी चहाच्या वड्या, ही खाण्याची सामुग्री तयार होती; पैकीं कणीक कायती एकदां च उपयोगी पडली. वरील सर्व सामुग्रीला मला सुमारें तीस रुपये पडले. ही सामुग्री वाहून नेण्यास याक किंवा घोडा भाड्यानें करावा व त्याच्या मालकाला वाटाड्याचें हि काम करावयास सांगावें, असें मनात आणून, मीं एखादें जनावर भाड्यानें मिळेल का ? ह्मणून परमा भुटियास विचारलें. याक, घोडा, खेंचर, ह्यापैकीं काहीं च मिळेना. ह्याला कारणें तीन होतीं. पहिलें कारण असें कीं, त्या ऋतूत पहाडावर जनावरास चारा वगैरे काहीं मिळत नाहीं; दुसरें कारण, कैलास व मानस सरोवराचे आसपास त्या समयीं डाकेखोर लोकांची फार भीति होती; व तिसरें कारण असें कीं, तिबेटात अशी एक चाल आहे कीं, ज्यानें जनावर भाड्यानें घेतलें असेल, त्यानें तें जनावर जर वाटेंत मेलं तर त्याची किंमत मालकास द्यावी; परंतु मी पडलों सन्यासी, तेव्हा जनावर मेलें अथवा हरवलें तर माझ्या कडून मालकाला काय मिळणार !

असें वाटलें असावें. ( याक, घोडा, अथवा खेंचर ह्याना शभराचे वर किंमत पडते ). दोन दिवस चौकशी केली, तरी कांहीं च मिळेना. आतां काय करावें, अशा विवचनेंत मी पडलों. तिसरे दिवशीं रात्रीं मीं ठरविलें कीं, उद्या कैलासला जावयास निघावयाचें च, कांहीं हि होवो. दुसरे दिवशीं सकाळीं मीं गुफेच्या बाहेर सभोंवतालची व नदीची शोभा पहात व आज दुपारीं कोणी हि न आलें तर आपण एकटें च पुढें जाणार, असा आपल्या मनाशीं निश्चय ठरवीत, उभा होतों. इतक्यांत, परमा भुटिया एका मध्यम वयाचे डुणियाला घेऊन मजकडे आला व मला ह्मणाला कीं, हा मनुष्य तुमचे बरोबर वर येण्यास तयार आहे. ह्याला सर्व रस्ते माहित आहेत. सामान लादण्यासाठीं याचे जवळ गाढव आहे. तें जर वाटेंत मेलें अगर कोणीं चोरून नेलें, तर त्याची जबाबदारी मालक घेण्यास तयार आहे. हें वर्तमान ऐकून, मी श्रीसद्गुरुमहाराजांना प्रेमानें नमस्कार केला. परमा भुटियाला त्याची मजुरी ठरविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पधरा रुपये दरमहा ठरला व मीं लागलीं च तो कबूल हि केला. नंतर त्यानें एक महिन्याचा पगार आगाऊ मागितला. वाटेंत मधें च सोडून जाणार नाहीं अशी त्यानें शपथ घेतली. त्यावरून त्याला पंधरा रुपये लागलीं च दिले. तो मनुष्य अडचणींत सांपडल्यामुळें, इतक्या थोड्या पगारावर मजबरोबर येण्याचें त्यानें कबूल केलें, असें मला मागाहून समजलें. तो डुणिया मला ह्मणाला कीं, आज दुपारीं दोन वाजतां निघू. हें ऐकून मला अतिशय आनंद झाला. या वेळीं मला श्रीसमर्थांच्या, मनीं

धरावें तें होतें । विघ्न अवघें चि नासोनि जातें । कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते ॥ या ओंवीची शाक्ष पटून प्रेमाश्रूंनीं माझे नेत्र भरून आले व गहिंवरून मीं सद्गुरुचरणांचें स्मरण करून, पुन्हां एकदां त्याना मनोमय नमस्कार केला.

दुपारीं बारा वाजतां जेवण आटोपून, सर्व सामान बांधून, पोषाख करून, आह्मी आमचे तिबेटी वाटाड्याची वाट पहात गुंफेंत बसलों. तो दोन वाजता येणार होता; पण तीन वाजले, चार वाजले, पाच वाजले, तरी त्याचा अजून पत्ता नव्हता; तेव्हा त्याला पहावयास मनुष्य पाठविला. शेवटीं सहा वाजतां गाढव घेऊन तो आला. त्याला उशीर होण्याचें कारण विचारलें, तेव्हा तो ह्मणाला कीं, कोटांत झुंपन साहेबाकडे कर्जाचा हप्ता भरावयास गेलों होतों, तेथें मला उशीर लागला. पुढे दिवस पाऊण तास च राहिला होता, तेव्हां तो ह्मणाला, आतां आपण येथून निघू, व येथून दीड मैलावर नदीपार माझें घर आहे, तेथें रात्रभर राहून पहाटें उठून पुढें चालू लागूं; मी हि माझी तयारी करून घेईन. त्याचें तें ह्मणणें मला पसंत पडलें. नंतर गाढवावर सामान लादलें व आह्मी चालू लागलों. ताकलाकोट मीं साडे सहाला सोडलें. मी, गुरुनादा, माझे दोन कुली व तिबेटी वाटाड्या असे मिळून निघालों. गर्बियांग-पर्यंत दोघा शाळामास्तरांची मला चांगली मदत झाली व पुढें परमा भुटियानें मला पुष्कळ सहाय दिलें. ठरल्याप्रमाणें दीड मैलावर नदीपार दिवस मावळण्याच्या सुमारास जाऊन पोहोंचलों व एका वडारात (डोंगराचे कपारींत) आह्मीं रात्रीचा मुकाम केला. आमचा हुणिया वाटाड्या आपले घरीं स्वतःच्या

६५१

प्रवासाची तयारी करण्यासाठीं गेला. चहा वगैरे करण्यास त्यानें आम्हाला काटेरी झुडपें तोडून दिलीं होतीं. कुलींनीं चहा तयार केला. चहा पिऊन मी व गुरुनादा बाबा गोष्टी बोलत बसलों होतों. इतक्यात परमा भुटिया व एक वृद्ध बैरागी असे दोघे-जण आम्ही बसलों होतों तेथें आले. त्या वृद्ध गोसाव्यास पाहि-ल्याबरोबर मीं त्याला बसावयास आसन दिलें व कुलीला चहा करावयास सांगितला. परमा भुटियानें माझी व त्या वृद्ध गोसा-व्याची ओळख करून दिली; त्यावरून मला असें समजलें कीं, मोरपखी बाबा म्हणून एक साधु मथुरेहून कैलासचे दर्शनास आज बारा वर्षें सारखा जात आहे, तो च हा वृद्ध बैरागी. अशा त्या मोरपखी बाबाला पाहून मला फार आनंद झाला.

एक तपपर्यंत दरवर्षी, कैलास व मानस सरोवराचें दर्शन घेऊन, कैलासपर्वतीं एक दीड महिना श्री कैलासनाथाचें ध्यान करीत बसावयाचें, असा त्याचा संकल्प होता. त्याप्रमाणें बारा वर्षें पुरीं करून श्री कैलास व मानस सरोवराचें शेवटचें दर्शन घेऊन मोरपंखी बाबा परत चालले होते. ताकलाकोटला गेले असताना परमा भुटियाला ते वाटेंत भेटले. तेव्हां त्यानें माझी हकीकत त्याना सांगितली; ती ऐकून मला भेटून जाण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. त्यावरून तो त्याना मजकडे घेऊन आला होता. बाबाजींनीं कृपावंत होऊन मला दर्शन दिलें, यामुळें मला फार धन्यता वाटली. चहा तयार होईतों हिंदीमध्यें आमचें इकडचें तिकडचें भाषण झालें. कैलासचा प्रसाद म्हणून त्यांनीं मला तेथील मृत्तिका दिली. तिला मीं अत्यंत आदरानें व प्रेमानें आपल्या मस्तकावर धारण

केलें. बर्फावरून चालताना अतिशय थंडीपासून त्रास झाल्यास, अंगांत उष्णता उत्पन्न होईल अशी विषपाषाण नांवाची औषधि त्यानीं मला देऊन ठेवली व आशिर्वाद दिला. मी दिलेला चहा व सत्तु त्यानीं भक्षण केला व धूम्रपान करून ते पुढें ताकलाकोटला जावयास निघाले. त्याचा सहवास मला सुमारें तास दीड तास झाला.

मोरपखी बावा वयानें सुमारें साठ वर्षांचे असून शरिराचा बांधा सडपातळ होता. मस्तकावर मोठा जटाभार असून तोंडाला व सर्वांगाला विभूति लावलेली होती. पायात पांढरा क्यान्व्हस्‌चा बूट असून अंगात बकरीच्या कातड्याचा वस्त्र होता. जवळ एक चिमटा व कमंडलु असून त्यात तूप होतें. बावाजी रोज साठ मैल चालत. 'दर्चिन'हून ताकलाकोटला ते एका दिवसात येत. मी जाण्याचे आधीं दोन महिने ते वर गेले होते. त्या वेळेस 'लिपुपास'मधून अतिशय बर्फामुळें बकऱ्या देखील जाऊं शकत नाहींत. पहिल्या पहिल्याने ते डोक्यास मोराचीं पिसें लावलेली टोपी घालीत असत, ह्मणून त्यांना मोरपखी बावा हें नांव पडलें होतें. ह्या साधूविषयी अस्कोटच्या पोलिटिकल पेष्कार साहेबानीं मला कांहीं माहिती सांगितली होती. मोरपखी बावास जडीबुटीची माहिती फार आहे, अशी त्या प्रांतांतील लोकाची समजूत आहे व ती खरी असावी असें मला देखील वाटतें. असो.

त्या रात्रीं आह्मी त्या वडारात निजलों. पहाटें पांच वाजतां प्रातर्विधि आटोपून चहा वगैरे घेऊन, आह्मी पुढें जाण्यासाठीं तयार होऊन घोड्याची वाट पहात बसलों. इतक्यात तो

आला. नंतर गाढवावर सामान बांधून मार्ग क्रमण्यास आम्हीं सुरवात केली. 'कर्नाळी' नदीचे तीरानें च गारटोकला रस्ता जातो, त्या रस्त्यानें आम्ही चालूं लागलों. तिबेटात पक्क्या सडका मुळीं च नाहींत. ताकलाकोटपासून चार एक मैलपर्यंत थोडीशी पाय-वाट आहे; पुढें ती देखील नाहीं. तेथून पुढें दिशाचे धोरणानें प्रवास करावा लागतो, ह्यामुळें तद्देशीय वाटाड्याची अत्यंत जरूरी असते. सकाळीं पांच वाजतां आम्ही निघालों तेव्हां थंडी कडक पडली होती. रस्त्याने पायाला दगडाचे बारीक बारीक कंकर बोंचूं लागले व गारठ्यामुळें सर्व शरीर कांपूं लागलें. आम्हीं हळु हळु चालण्यास प्रारंभ केला. सूर्योदय झाल्यावर अंगांत थोडी ऊब आली. सुमारें चार पाच मैल चालून गेल्यावर एके ठिकाणीं रस्ता अरुंद व ठिसूळ होता. त्या रस्त्यावरून आमचें सामानाचें वाहन चालत असतां त्याचा पाय घसरला व तें गाढव सामानासह कर्नाळी नदींत पडलें. नदीस पाणी जरी फार नव्हतें, तरी पाण्याला ओढ फार होती. त्यामुळें गाढव पाण्यांत पडल्याबरोबर खालीं वाहू लागलें. सुमारें वीस बावीस हात खालीं वहात गेलें. मी सर्वांचे पुढें होतों. मला वाटलें गाढव खास मेलें व सर्व सामान हातीं लागणें आतां अशक्य आहे. मी जागचे जागीं स्वस्थ उभा राहिलों. गाढव पाण्यांतून वहात होतें व त्याचा मालक व माझे कुली नदीचे कांठावरून त्या च दिशेनें पळत होते. नंतर गाढव एका खडकास अडकलें. त्या वेळेस तें पाण्यांत अगदीं मृतवत पडलेलें होतें. शेवटीं मालकानें अंगावरचे कपडे काढले व नदींत उडी टाकली आणि कसें तरी करून त्यानें तें गाढव पलिकडच्या तीराला

ओढून नेलें. ती सकाळची साडे नऊ वाजण्याची वेळ होती. नदीला ह्मणण्यासारखा पूर आला नव्हता; त्यामुळें गाढवाला वर काढता आलें. थंडीमुळें व बर्फाचे पाण्यामुळें त्या वाटाड्याचे सर्व शरीर हिरवें निळें होऊन त्याची अगदीं गठडी वळली होती. नंतर त्यानें अंगात थकऱ्याच्या कातड्याचा बखु घातला व सुमारें अर्धा तास तो स्वस्थ पडून राहिला; मग त्याला हुषारी आली. नंतर त्यानें व माझे कुलींनीं पलिकडचे तीरावरील सर्व सामान मोठ्या प्रयासानें अलिकडचे तीरावर आणलें. नंतर आह्मीं सर्व कपडे उन्हात वाळत घातले. आमची एक हि जिन्नस वाहून गेली नाहीं व गाढव हि वाचलें. बरोबर घेतलेला आगपेटीचा पुडा सडून गेला. सत्तु अर्धा भिजला, तो काढून फेंकून दिला, व पुन्हा ताकलाकोटला त्या वाटाड्याला पाठवून सत्तु मागविला. आमचा मुक्काम त्या ठिकाणीं सुमारें सहा सात तास झाला. अजमासें तीन वाजतां आह्मी पुढें चालू लागलों. वाटेनें आह्मांला एक देखील मनुष्यप्राणी भेटला नाहीं. सुमारें सात वाजता आह्मी "कर्दमखार" नांवाच्या एका लहानशा खेड्याला येऊन पोहोंचलों. ह्या खेड्यात दोन तीन घराची वस्ति होती. आह्मीं रात्रीचा मुक्काम उघड्या मैदानात च केला, केला ह्मणण्यापेक्षां करावा लागला हें च खरें. त्या रात्रीं मी चहा, सत्तु, गूळ व तूप असे एकत्र करून भक्षण केले, परंतु मला सत्तु सोसला नाहीं, त्यानें माझें पोट फुगलें. ह्मणून नंतर मीं सत्तु खाणें च सोडून दिलें. थंड हवेमुळें माझी भूक अगदीं कमी झाली होती, परंतु माझ्या कुलींचा आहार जास्त वाढला होता. सबब दिवसांत

मी दहा बारा बिस्किटें व चहा घेत असे. दररोज सुमारें बारा तेरा मैल चालावें लागत असे, तरी मला थकवा वाटला नाहीं व माझी शक्ति हि कमी झाली नाहीं.

कर्दमखार ताकलाकोटपासून सुमारें वीस पचवीस मैल आहे. तिबेटी बकऱ्या व याक हीं जनावरें पुष्कळशीं अशीं मीं प्रथम येथें च पाहिलीं. तिबेटी बकऱ्यात दोन चार जाती आहेत. त्यात एक जात अशी आहे कीं, त्या जातीची बकरी दिसण्यांत सुंदर व गोजिरवाणी असून तिचे केंस फार च मऊ असतात. ह्या बकरीची उंची अजमासें हातभर असते. ह्या बकऱ्यांचीं कोंकरें तर फार च मजेदार दिसतात. कर्दमखारला रात्रीं मैदानात च आह्मी निजलों होतों; वारा जोरानें वहात होता; थंडी अतिशय पडली होती, झोंप बिलकुल लागेना; शिवाय तिकडे अंगावरील कपड्यात उवाप्रमाणें किडे उत्पन्न होतात, त्याच्या त्रासानें मला फार अस्वस्थता वाटत होती. कपडे काढावे तर थंडी ह्मणते मी, बरें, न काढावे तर ते किडे डसत, त्यामुळें अंगाला कंड सुटे व फार अस्वस्थता वाटे ! शेवटीं कपडे तर काढले, अंगावर भुटिया कांबळें पांघरून घेऊन मी पडलों; परंतु थंडी फार वाजू लागल्यामुळें माझी दातखिळी वाजू लागली. ही माझी स्थिति पाहून, एका हुणिया बाईनें माझे जवळ आठ दहा लहान जातीच्या बकऱ्याचीं कोंकरें आणलीं व मला खूण केली कीं, त्याना जवळ घेऊन नीज, ह्मणजे तुला थंडी कमी लागेल. त्याप्रमाणें दोन कोंकरें पाठीशीं, दोन पोटाशीं, दोन डोक्याशीं व चार पांच पायथ्याशीं घेतलीं व भुटिया कांबळें पांघरून निजलों; त्यामुळें

मला थोडा वेळ झोंप चांगली लागली. थंडी बिलकुल वाजली नाहीं. तीं कोंकरें रात्रभर माझ्या जवळ स्वस्थ पडून राहिलीं होतीं; असो.

मी ज्या दिवसांत (जूनअखेर) तिबेटांत गेलों होतों त्या वेळेस व्यापाराचा मोसम नुकता च जरी सुरू झाला होता तरी खास पश्चिम तिबेटांत भुटिया, हुणिया, जुमली वगैरे लोकांची रहदारी अजून सुरूं झालेली नव्हती; त्यामुळें आह्मांला वाटेनें एक हि मनुष्य भेटत नसे. पहाटे पांच वाजतां चहा घेऊन आह्मी पुढें चालूं लागलों. कर्दमखारपासून सुमारें दोन फर्लांग गेल्यावर एक लहानशी चढण चढून आह्मी डोंगरसपाटीवर आलों. येथून पुढें मैदान च मैदान लागतें. ह्या मैदानांत आमचे दृष्टीचे आटोक्यांत आह्मांला एक हि झाड किंवा एखादें झुडुप अगर थोडेंसें पाणी देखील बिलकुल दिसेना. पहावें तिकडे रखरखीत मैदान व सभोंवार तसे च डोंगर! आह्मी ह्या डोंगरसपाटीवर आलों त्या समयीं सूर्यनारायण अर्धा क्षितिजावर आलेला असून जिकडे तिकडे शांतता भासत होती; आमचे पाठीमागें हिमालयाच्या अखंड बर्फाच्छादित पर्वत-शिखरांवर तीं कोमल सूर्यकिरणें पडल्यामुळें तीं शिखरें स्वच्छ तांब्याचे धातूप्रमाणें चमचम चमकत होतीं. उजवे बाजूस पूर्व दिशा सूर्यनारायणाचे आगमनानें प्रफुल्लित झाल्यामुळें अत्यंत शोभायमान दिसत होती; समोर अफाट व अमर्याद असें मैदान; त्याचे पलीकडे मेघमंडलांतून डोकावत असलेलीं पर्वतशिखरें, जणूं काय, आह्मी परकीय ह्मणून आमचेकडे [illegible] जास्त टक लावून पहात आहेत,

असें दिसत होतें; डाव्या बाजूला लांब च लांब अशी पर्वतांची रांग होती. त्या पर्वतांवर गारांचें छादळ सुरू होतें, एकदरींत ती प्रातःकाळची वेळ फार आल्हाददायक होती ह्यांत संशय नाहीं. आह्मा पांचजणांखेरीज एक हि मनुष्यप्राणी आह्मांला दिसत नव्हता; त्याचप्रमाणें पक्ष्यांचा शब्द देखील आमचे कानीं येत नव्हता. ह्याप्रमाणें सभोंवतालचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत त्या शांत व निर्जन प्रदेशांतून आह्मी हळु हळु मार्ग क्रमीत चाललों होतों. चालतांना बारीक कंकर बोंचत असल्यामुळें व लवकर थकवा येत असल्यामुळें माझे कुली वरचेवर बसत असत. दोन मैल गेल्यावर माझा (तिबेटी) वाटाड्या देखील थकला व तो तेथें च मटकन खालीं बसला, ह्मणून सुमारें अर्धा तास विश्रांति घेऊन, आह्मी पुढें चालूं लागलों.

तिबेटची डोंगरसपाटीची उंची समुद्रसपाटीपासून सुमारें सोळा हजार फूट आहे. ह्यामुळें चालतांना मनुष्यास श्वासोच्छ्वास करण्यास फार त्रास पडतो व त्यामुळें थकवा लवकर येतो व अर्धा फर्लांग चाललें कीं दम लागतो. तिबेटांत दिवसभर व कधीं कधीं रात्रीं हि एक प्रकारचे अंगाला झोंबणारे वारे वहात असतात. त्या वाऱ्यामुळें अंग फुटतें; भेगा पडून रक्त वाहूं लागतें. असो.

सहा सात मैल चालून आल्यावर नऊ वाजण्याच्या सुमारास आह्मांला एक लहानसा पाण्याचा ओढा दृष्टीस पडला. ह्या ओढ्यावर फराळ वगैरे करावा व कांहीं वेळ विश्रांति घेऊन पुढें जावें, असें मी माझ्या वाटाड्याला सांगितलें व

जवळ च एका दगडाचे भिंतीचे आश्रयाला आह्मीं मुक्काम केला. दगडावर दगड रचून ही भिंत वाऱ्याचे निवाऱ्यासाठीं तयार केलेली होती. ह्या ओढ्याचे कांठावर थोडें थोडें हिरवें गवत हि उगवलेलें दृष्टीस पडलें. आमच्या सामुग्रीचा भारवाहक देखील अगदीं थकून गेला होता व त्या ठिकाणीं ती हिरवी हरळी पाहून त्याला देखील फार आनद झाला होता, असें आपल्या सुस्वर ओरडण्यानें त्यानें दर्शित केलें ! तिबेटांत प्रवाशाचे सोयीसाठीं धर्मशाळा वगैरे काहीं नाहींत. तर वर सांगितल्याप्रमाणें दगडावर दगड भिंतीप्रमाणे रचून निवाऱ्या-च्या जागा केलेल्या मधून मधून दृष्टीस पडतात. अशा ठिकाणीं उघड्या मैदानांत मुक्काम करावा लागतो. असो. माझे कुली चहा तयार करण्याचे तयारीस लागले. आमचें जेवण काय, तर चहा प्यावयाचा व त्याबरोबर सत्तु खावयाचा ! मी सत्तु खात नव्हतों त्यामुळें माझें खाणें ह्मटलें ह्मणजे चहा व बिस्किटें ! मीं व कुलींनीं सुमारें एक तासाचे आत फराळ वगैरे आटोपला व आह्मी पुढें जाण्याचे तयारीनें बसलों. माझ्या वाटाड्यानें सुमारें साडे नऊ वाजतां जेवण्यास प्रारंभ केला. त्याचें जेवण ह्मटलें ह्मणजे चहा, सत्तु व शिकार (मांस). तो सुमारें पाच तास जेवत बसला होता ! तेवढ्या वेळांत त्यानें पाच शेर चहा, पाऊण शेर सत्तु, व थोडेंसें मांस भक्षण केलें. तिबेटी लोकांची भोजन करण्याची तऱ्हा मोठी गमतीची असते, ती अशीः— चार पांच शेर पाणी राहील असें एक भांडें चुलीवर ठेवून त्यांत चहा टाकावयाचा व त्यात च मांसाचे तुकडे टाकून उकळावयाचे; अशा रीतीनें

चहा तयार झाल्यावर एक फख्वा (लांकडाचा पेला) भर चहा व सत्तु एकत्र कालवावयाचा व तीन चार घांस घेऊन दहा बारा मिनिटें स्वस्थ पडून रहावयाचें; पुन्हां एक फख्वाभर चहा प्यावयाचा व विश्रांति घ्यावयाची; मधून मधून मिठाशीं (सैंधव) मांसाचे तुकडे खावयाचे! ते लोक आपल्या घरीं भोजन करीत असले, तर एका लहानशा लांकडी मेजावर चहापात्रें ठेवून भोजन करतात; जेथें मेज मिळण्याजोगें नसेल, तेथें एखादा सपाट दगड घेऊन, त्याचा मेजाचे ऐवजीं उपयोग करतात. जमिनीवर चहापात्र कधीं च ठेवीत नाहींत. असो.

दुपारीं दोन वाजण्याचे सुमारास माझ्या हुणिया वाटाड्याचें भोजन सपलें. नतर मीं त्याला विचारलें कीं आता पुढें प्रयाण केव्हा करावयाचें? तेव्हा त्यानें मला एक सबब सांगितली. ती सबब दिसण्याला योग्य होती, ह्यात सशय नाहीं; परंतु त्याचा हेतु मात्र आह्मांला फसवावयाचा होता, हें मागाहून माझे लक्षात आलें. तो मला ह्मणाला कीं, आतां आपण पुढें चाललों तर पुढचे खिंडींत आपणास सध्याकाळ होईल व मग आपणांस तेथें च मुक्काम करावा लागेल; आणि त्या ठिकाणीं तर डाकूची (दरवडखोराची) फार च भीति आहे; ताकलाकोटहून एक खपा आपले मागोमाग निघालेला आहे, तो येथें संध्याकाळपर्यंत खास येईल व नतर आपण सर्व मिळून उत्तर रात्रीं पुढें जाऊ; येथें डाकूची बिलकुल भीति नाहीं. हें मला प्रथम खरें वाटलें, परतु माझ्या दोन कुलींपैकीं एकजण सुमारें बारा वर्षांपूर्वीं तिबेटात आलेला होता, तो तेव्हां मला सागूं लागला कीं डाकूंचें भय तर ह्या च ठिकाणीं

आहे; त्या वेळेस डाकूंनीं आह्मांला येथें च गांठलें होतें. तेव्हां वाटाड्याला मीं पुष्कळ समजाऊन सांगितलें, परंतु त्याचें मन वळेना. खरें च आहे, जेथें मुळांत च लबाडी, तेथें त्याचें मन वळणार कसें ? माझे मनांत नसतां, प्रसंगास अनुसरून वाटाड्याचें ह्मणण्यास मला रुकार द्यावा लागला व त्या दिवशीं आमचा मुक्काम सबंध दिवस (२४ तास) त्या च ठिकाणीं झाला ! त्या दिवशीं माझे च काय, परंतु आमचे सर्वांचे फार च हाल झाले ! आह्मी सकाळीं साडे नऊपासून तों सूर्यास्तापर्यंत प्रखर उन्हांत पडून राहिलों होतों ! उन्हामुळें सर्व शरीर तापून गेलें होतें, घाम येत होता; तोंड व डोळे लाल झाले होते; ऊन ऊन झळा लागत होत्या, मधून मधून ढग येऊन दहा पांच मिनिटें गार वारा सुटे, त्यामुळें थंडी वाजे. एकंदरींत सर्व दिवसभर उन्हाचा ताप सहन करीत व तळमळत, त्या रखरखीत व निर्जन मैदानांत आह्मांला पडावें लागलें ! तीन वाजण्याचे सुमारास, दूर अंतरावर अधुक अशीं दोन माणसें याक(वनगाय) वर बसून येत आहेत असें दिसलें. वाटाड्यानें सांगितलेला खंपा येत आहे, असें वाटून आह्मांला फार आनंद झाला, परंतु त्याचे बरोबर बकऱ्यांचा व याकचा तांडा दिसेना; खंपा एकटा असा कधीं च नसावयाचा; कारण त्याचा धंदा च मुळीं बकऱ्यांवर व याकवर इकडून तिकडे मालाची ने आण करण्याचा असतो. कांहीं वेळानें तीं दोन्हीं माणसें हि दिसेनाशीं झालीं, तेव्हां खंप्याविषयीं आमची निराशा झाली ! माझा वाटाड्या प्रश्न पाहूं लागला. त्यानें दहा बारा खडे मांडले; एक दोनदां कांहीं अंक मोजले; जमिनीवर त्रिकोण, वर्तुळ वगैरे कांहीं

आकृती काढल्या व मग विचार केल्यासारखें दाखवून मला ह्मणाला कीं, खपा सध्याकाळपर्यंत खात्रीनें येईल. मला तें खरें वाटेना. मीं त्याचे ह्मणण्याकडे लक्ष च दिलें नाहीं. त्या प्रखर उन्हांत माझे कुली घोंगड्या पांघरून हताश होऊन पडले होते! गुरुनादा बावा मजकडे पाठ करून व डोक्यावरून मारवाडी घाबळी घेऊन नेत्र झांकून स्वस्थ बसला होता व मी डोक्यावर छत्री धरून श्रीगुरूचरणाचें ध्यान करीत उत्तरेस तोंड करून स्वस्थ बसलों होतों. पलीकडचे बाजूला अंगावर बखु घेऊन माझा वाटाड्या स्वस्थ घोरत पडला होता. पांच वाजले, सहा वाजले, तरी खपा येईना. येणार कसा? मुळात च जर लबाडी तर खपा सध्याकाळीं तरी कोठून येणार? वाटाड्या हि निराश झाला, असें त्यानें निदान दाखविलें. नंतर तो मला ह्मणाला कीं रात्रीं आपण येथें च निजू व उत्तर रात्रीं पुढें मार्ग चालू लागू, परतु मी त्यावर कांहीं च बोललों नाहीं.

सात वाजण्याचा सुमार झाला. माझा वाटाड्या, त्याचें गर्दभ चरत चरत बरें च लाब गेलें होतें, तें शोधून आणण्यासाठीं ह्मणून त्या ओढ्याचे किनाऱ्यानें पूर्वेस निघून गेला; दोघे कुली व गुरुनादा बावा सहज इकडे तिकडे पहात बसले होते व मी, पश्चिमेस प्रखरतर चंडांशु क्षितिजाचे खालीं जात होता, त्याचेकडे पहात व सायकालचा सृष्टिदेखावा अवलोकन करीत व सृष्टिकर्त्याचे कर्तृत्वाविषयीं साश्चर्य व सानंद अतःकरणानें चिंतन करीत बसलों होतों. तो सध्याकाळचा समय असल्यामुळें, दुपारचा प्रखर उन्हाचा ताप कमी झाला होता व अंगाला झोंबणारे वारे जोरानें वाहण्यास सुरवात झाली होती;

त्यामुळें थंडीचा हि थोडा थोडा प्रादुर्भाव होऊं लागला होता; सूर्य क्षितिजाखालीं गेल्यामुळें आकाशांत तारे किंचित दृश्य-मान होऊं लागले होते, अशा समयीं गुरुनादा बाबानें लांबून पूर्व दिशेनें कोणी येत आहे असें पाहिलें व लागलीं च मला त्यानें सांगितलें. तेव्हां आमची सर्वांची दृष्टि त्या च दिशेकडे लागली काहीं वेळानें दोन घोडेस्वार मोठ्या वेगानें आमचे-कडेस च येत आहेत असें आह्मांला दिसलें व सुमारें पधरा वीस मिनिटांचे अवकाशात ते आमचे समोर दोन चार हातांचे अंतरावर येऊन उभे राहिले. त्या दोघांपैकीं एक मनुष्य चाळीस वर्षे वयाचा व दुसरा पचवीस वर्षांचा होता. उभयतां-जवळ बंदूक, तरवार, भाला, कट्यार, खुकरी वगैरे हत्यारें होतीं. त्याचे चेहरे चपटे असून उग्र होते. डोक्यावरील केस जगली मनुष्याप्रमाणें राठ असून पिंजलेले होते. शरिराचा बांधा मजबूत होता. त्याचे घोडे देखील मजबूत व चलाख होते. तिबेटी घोडा ह्मणण्यासारखा उंच नसतो. वरील दोघां गृह-स्थाना आमचे समोर उभें राहिलेलें पाहून आमची प्रथम दर्शनीं जराशी घाबरल उडाली. माझ्या कुलींना तर फार च भय वाटलें. घोड्यावर बसल्या बसल्या च ते आमच्या सामाना-कडे पहात होते. नंतर काहीं वेळानें त्यांपैकीं एकानें आह्मांस तिबेटी भाषेंत विचारलें कीं, तुह्मी कोण आहात, कोठें जातां व तुमच्या पाशीं काय आहे ! त्यांच्या एकंदर हावभावावरून त्यांच्या प्रश्नाचा भावार्थ मी व गुरुनादा बाबा समजलों. ज्या कुलीला तिबेटी भाषा थोडीशी समजत होती, त्याची भीतीनें इतकी तारंबळ उडाली कीं, त्याच्या तोंडांतून एक अक्षर

देखील निघेना. गुरुनादा बावानें हात वर करून आशिर्वाद देण्याचा आविर्भाव आणला व मीं खालील शब्द उच्चारले, " काशी लामा मानस सरोवर कैलास "; हे माझे शब्द ऐकून त्यापैकीं जो तरुण होता, तो विनोदपर हास्य करून मजकडे टक लावून पाहूं लागला. मी आसनस्थ बसलों होतों. कांहीं एक न बोलतां दोघानीं घोड्यावरून च आह्मास डोकें लवून सलाम केला व आल्या वाटेनें उडक चालते झाले व हृ हृं ह्मणतां पलीकडचे टेंकडीवर चढून पार दिसेनासे झाले.

इतक्यांत, आमचा वाटाड्या एका हातांत कांहीं कांटेरी झुडुपें घेऊन व दुसऱ्या हातानें त्या गाढवाचा कान धरून घेऊन येतांना दिसला. झालेलें वर्तमान माझे कुलीनें त्याला सांगितलें; पण त्यानें तें ऐकल्या न ऐकल्याप्रमाणें च केलें. तेव्हां तर त्याच्या विषयींचा माझा पूर्वीचा संशय दुणावला व तेव्हांपासून मी त्यावर फार च कमी विश्वास ठेवूं लागलों.

अगास झोंबणारा वारा जास्त जास्त जोरानें वाहूं लागला. त्याचप्रमाणें थंडी हि आपलें सत्य स्वरूप आह्माला दाखवूं लागली. वाटाड्यानें आपल्या स्वतःची व कुलींनीं आह्मा चौघांसाठीं खाण्याची तयारी केली. एक तासाचे आंत आह्मी आमचा फराळ आटोपला. वाटाड्यानें हि आमच्या बरोबर च किंबहुना चार पांच मिनिटें आधीं च आपलें जेवण संपविलें व तो लागलीं च निजला. इतक्या लवकर त्याचें जेवण झालेलें पाहून मला फार च आश्चर्य वाटलें; परंतु पुढें सहवासानें असें दिसलें कीं तो आपलें

रात्रीचें जेवण लवकर आटोपतो व लवकर निजतो. आह्मी हि निजण्याची तयारी केली. तेथें थंडीमुळें आमची निजण्याची तऱ्हा जरा चमत्कारिक असे. ती अशी, पाठ वर करून पाय व हात पोटाजवळ घ्यावयाचे, व पुढें कांहीं तरी उच्च वस्तु ठेवून तिच्यावर डोकें ठेवावयाचें. जमिनीवर कातडें, त्यावर एक सतरंजी, त्यावर एक घोंगडी व त्यावर एक चादर, असा आमचा बिछाना असे. अंगांत कपडे असावयाचे च. पांघरायास एक आपल्याकडची घावळ व त्यावर भुटिया कांबळें. अशा रीतीनें आह्मी निजत होतों. निजावयाचे आधीं मी कुलींना व गुरुदादा बावाला सांगितलें कीं, ज्यानें आपल्याला येथपर्यंत सुखरूप आणलें, तो च पुढें हि आपलें सर्वस्वीं व सर्वत्र रक्षण करणारा आहे; त्याची प्रार्थना करून व त्यावर विश्वास ठेवून आपण आतां स्वस्थ निजू या. मी श्रीसद्गुरुमहाराजांच्या चरणांचें स्मरण करून, त्यांच्या चरणकमलाचें ध्यान करीत करीत झोंपीं गेलों. आह्मी चौघेजण अगदीं जवळ जवळ चिकटून निजलों. बाटाड्या जरा लांब परंतु एक च ओळींत निजला. गाढव त्याच्या डोक्याशीं च रात्रभर उभें होतें. पंधरा पंधरा मिनिटांनीं आमच्यापैकीं कोणीना कोणी जागा होत असे. त्या रात्रीं बर्फ पडत होतें त्यामुळें अंगावरचें बर्फ अर्ध्या अर्ध्या तासानें आह्माला झाडून टाकावें लागत असे. रात्रभर बर्फ पडत होतें व वारें अत्यंत जोरानें वहात असल्यामुळें थंडी फार च वाजत होती! शरिराचा एखादा भाग जर पांघरुणाचे बाहेर चुकून उघडा पडला तर तेवढा थंडीनें बधिर होऊन जात असे. इतकी कडक थंडी होती!

दिवसा दहा तास कडक उन्हांत काढले, रात्रीं दहा तास कडक थंडींत व बर्फांत काढले! शिवाय डाकूंचें भय मधून मधून मनाला अस्वस्थ करी तें निराळें च. आह्मी पहाटें चार वाजतां उठलों, तेव्हां प्रत्येकाचे सभोंवतीं अर्धा अर्धा इंच बर्फाच्या थराचें कडें पडलें होतें. वाटाड्या मात्र घोरत पडला होता. त्याच्या कातड्याचे वस्त्रावर बरें च बर्फ साचलेलें दिसलें.

अशा रीतीनें त्या दिवशीं वीस तासपर्यंत आह्मीं असह्य अशी शीतोष्णता सहन केली, सहन केली ह्मणण्यापेक्षा आह्मांला सहन करावी लागली, हें च खरें. पहाटें चार वाजतां मी एकटा च पहिल्यानें जागा झालों व तसा च पांघरूण घेऊन बसलों. त्या वेळेस ब्राह्ममुहूर्त होता, जिकडे तिकडे शांततेचें साम्राज्य होतें, आकाश मधून मधून मेघाच्छादित होत असून, मधून मधून चांदण्या प्रकाशमान दिसत होत्या; पूर्वेस दक्षिणोत्तर क्षितिजाचे जरा वर अशी अरुंद परंतु सबंध मेघपंक्ति होती, ती इतकी अरुंद होती कीं, जणूं काय, तेथें आकाशाला हात दीड हात रुंदीची एक पट्टी च मारलेली आहे. त्या मेघपंक्तीचे वरचे बाजूला चंद्रमा वर्तुळाकार अर्धा वर असा असून जवळ च एक तेजःपुंज तारा चमकत होता. मला वाटतें तो तारा शुक्राचा असावा. प्रिय वाचकहो, त्या वेळच्या त्या देखाव्याची व त्यापासून मला होत असलेल्या आनंदाची तुह्मी कल्पना करा. पहाटचा समय, चंद्रप्रकाश, चंद्रमा व एक तेजःपुंज तारा यांचा अगदीं निकट जरी नव्हे तरी बरा च जवळचा सहवास,

क्षितिजावरील ती मेघपंक्ति, तें शांततेचें साम्राज्य, तसें च क्षितिज व मेघपंक्ति ह्यांनीं मर्यादित असलेले ते हिमाद्रि, सभोंवार बर्फाच्छादित पर्वतशिखरें, आसमंत भागीं सपाट, लांबचे लांब व गंभीर भासणारें असें मैदान, त्याच प्रमाणें तारागणानीं व्यापलेलें ते आकाश, ही सर्व परिस्थिति अवलोकन करून माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल बरें? त्या समयाचें, त्या मोहक प्रसंगाचें, विराट पुरुषाच्या त्या स्वरूपाचें यथार्थ वर्णन करण्यास हा लेखक असमर्थ आहे! स्वानुभवाशिवाय जो आनंद अनुभवता येणें शक्य नाहीं, त्या आनंदाची पुसट कल्पना देखील ( यथार्थ कल्पनेचें तर नाव च नको ) लेखन अगर संभाषणद्वारें करून देण्याच्या प्रयत्नांत यश मिळणें निदान माझ्या मतें तरी अशक्य दिसतें. त्या समयीं वीस तास असह्य शीतोष्णतेचे हाल सोसल्याचें सार्थक झालें असें मला वाटलें व मी आनंदसागरांत पोहतां पोहतां देहभान विसरून गेलों, तों सहा वाजतां देहावर आलों! नंतर आह्मीं पुढें मार्ग क्रमण्यास सुरवात केली.

वरील ठिकाणीं एक दिवसभर आह्मीं मुक्काम करावा ह्मणून, माझ्या वाटाड्यानें आह्माला लबाडीनें निराळी च थाप मारली ह्मणून वर सांगितलें. ती थाप मारण्याचें व आह्माला फसविण्याचें कारण काय हे तर सांगावयाचें राहिलें च. त्याचें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून, एक तर तें गाढव अगदीं थकून गेलें असल्यामुळें त्याला विश्रांति हवी होती; व दुसरें, त्या ओढ्याचे कांठानें हिरवी हरळी उगवलेली होती, तेथें आपल्या गाढवास एक दिवस मुबलक चरावयास

सांपडावें हा हेतु. कारण ह्यापुढें कैलास पर्वताजवळ जाई-पर्यंत जनावराला खावयास मिळणें शक्य नव्हतें. वरील कारणें आमच्या हि लक्षात आलेलीं होतीं व त्याप्रमाणें आह्मीं त्यास बोलून हि दाखविलें, परंतु तो कसची दाद लागूं देतो ! त्यानें हीं कारणें मुळीं च नाकबूल केलीं. पुढें मीं हि जास्त आग्रह धरला नाहीं.

सुमारें सहा वाजतां आह्मी पुढें चालूं लागलों रस्ता अतिशय खडकाळ व वाईट होता. त्या दिवशीं सुमारें तीन तास आह्मांला दगडाचे लहान मोठे गोटे असलेल्या रस्त्यावरून चालावें लागलें. चालताना त्या गोट्यावरून तोल न सावरल्यामुळें मी दोनदा पडलों, परंतु विशेष ह्मणण्यासारखें लागलें नाहीं. ह्या रस्त्यावरून चालताना मनुष्याला खालीं पाहून व नीट लक्ष ठेवून च चाललें पाहिजे. तो बिकट रस्ता संपल्यावर आह्माला एक नदी लागली. त्या नदीचे पार आह्मांला जावयाचें होतें. ती सकाळची आठ साडे आठ वाजण्याची वेळ होती, त्यामुळे नदीला जरी पाणी फार नव्हतें तरी तें अतिशय थड असल्यामुळें त्या वेळीं पाण्यात पाय घालणें अगदीं मरणप्राय वाटलें ! थडी हि अतिशय होती. तेव्हां मला माझ्या तरुण कुलीनें व गुरूनादा मावाला त्या वाटाड्यानें पाठीवर घेतलें व आह्मी नदीपार गेलों. नदीचें पात्र मोठें होतें, परंतु पाण्याचा प्रवाह फार च लहान ह्मणजे दहा बारा हात रुंदीचा होता. जेथें जेथें एक एक हात रुंद फाटे असत तेथें तेथें त्यावरून उडी मारून जाण्यास कठीण जात नसे. कोरड्या पात्रांतून जात असताना प्रथम काहीं वेळ

आह्मांला त्रास झाला नाहीं; परंतु ११ वाजण्याचे सुमारास जेव्हां वरून ऊन व खालून तापलेल्या दगडाचे चटके लागूं लागले, तेव्हां मात्र चालतांना आमची फार च धांदल उडाली! सुमारें वीस मिनिटांनीं आह्मी नदीचें पात्र ओलांडून गेलों व विश्रांतीसाठीं एका डोंगराचे पायथ्याशीं बसलों; तो च डोंगर चढून आह्माला वर जावयाचें होतें.

डोंगर चढावयास आह्मी आतां प्रारंभ करणार, इतक्यात, शेजारच्या व मागच्या टेंकड्यांचे बाजूनें घोड्याच्या टापा आह्मांला ऐकूं आल्या. कोण येत आहे हें पाहण्यासाठीं आह्मी मागें वळतो, तों आमच्या भोंवतीं वीसपचवीस घोडेस्वारांचा गराडा पडलेला व मध्यें आह्मी सापडलेलों आहोंत असें दिसलें! तो प्रसंग निर्वाणीचा होता! आह्माला सशस्त्र डाकू लोकांनीं घेरलें आहे हें लक्षांत येऊन, आह्मां सर्वांना आतां कंठस्नान खास मिळणार, ही कल्पना मनात आली मात्र, मग काय विचारता! प्रथम दर्शनीं च मी मृत्यूचे कल्पनेनें बावरलों, अंगाला कंप सुटला व मस्तकापासून तों पायांपर्यंत सर्व अंग घामानें डबडबून गेलें; परंतु लागलीं च मी भानावर आलों. श्रीसद्गुरुमहाराजांच्या चरणकमलाचें नेत्र मिटून ध्यान केलें व मनानें च साष्टांग नमस्कार करून, महाराजांची मुर्ति हृदयात स्थिर करून, श्रीकैलास व मानस सरोवराकडे तोंड करून खालीं जमिनीवर च पद्मासन घालून स्वस्थ बसलों. माझ्या कुलींची, चाटाड्याची व गुरुनादा बावाची काय अवस्था झाली होती, ह्याविषयीं मीं तिकडे लक्ष न दिल्यामुळें मला कल्पना च नव्हती. कांहीं वेळानें त्या टोळीपैकीं एक सुमारें

(१०१) ८५७

पसतीस चालीस वर्षांच्या वयाचा, मजबूत बांध्याचा, व राक्षसी मुद्रेचा मनुष्य तरवार [illegible] मो[illegible] माझ्याजवळ आला व त्यानें खुणेनें मला [illegible] कोण ? कोठें जातां ? तुमचे जवळ काय आहे ? वगैरे. मी हि त्याला खुणेनें च सांगितलें कीं मी साधू आहे, काशीहून आलों असून कैलासला जात आहे, व आमच्या जवळ खाण्याला फक्त सत्तु आहे. पैसे वगैरे ऐवज आह्माजवळ कांहीं नाहीं. त्यानंतर तरवार पाजळून त्यानें खुणेनें मला सांगितलें कीं तुह्मा सर्वांना ठार मारून आह्मी तुमचे कपडे व खाण्याचें सर्व सामान लुटून नेणार. असें बोलतां बोलतां त्यानें आणखी चौथ्या असामीस घोड्यावरून खालीं उतरून तरवारी उपसून येण्याची खूण केली. त्या वेळीं मला वाटलें, आपला मृत्यु खास समीप आला. पुन्हां एकदा श्रीसद्गुरुनामाचा जयजयकार करून मनानें च महाराजांना, श्रीकैलासनाथाला व मानस सरोवराला साष्टांग नमस्कार केला व नेत्र झांकून डोकें थोडेंसें पुढें करून बसलों. पुढें काय झालें तें श्रीनारायणास माहित ! त्यापूर्वी तरवार वर करून मजवर वार करतां येईल अशा बेतानें त्या टोळीचा मुख्य मजजवळ उभा आहे, हें मीं पाहिलें होतें ! सुमारें वीस एक मिनिटांनीं मी शुद्धीवर आलों, माझे नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून आले, प्रेमातिशयामुळें कंठ भरून आला व अंगीं रोमांच उभे राहून शरीर हलावयास लागलें ! मीं मोठ्यानें रडण्याचा प्रयत्न केला, परंतु ओंठाचे बाहेर आवाज च फुटेना ! पुन्हा मी देहभान-रहित झालों. सुमारें पांच मिनिटांनीं मीं नेत्र उघडून समोर पाहिलें, तों मला काय दिसलें, पहा !! जो मनुष्य तरवार उपसून मला ठार मारण्यासाठीं हात

वर करून मजजवळ उभा होता, तो माझ्या समोर गुडघे टेकून व दोन्ही हाताचे दोन अंगठ्यावर भ्रुकुटी ठेवून जमिनीला मस्तक लावून बसला आहे; माझ्या डाव्या हाताला अमळ मागचे बाजूस त्याच्या हातातील तरवार पडलेली आहे, जे चार पाच लोक तरवारी उपसून घोड्याखालीं उतरताना मीं पाहिले होते, त्यानीं आपल्या तरवारी म्यानांत घातलेल्या असून माझ्या कुलींना, माझ्या वाटाड्याला, व गुरुनादा बाबाला वारा घालीत बसले आहेत, इतर डाकू साश्चर्य परंतु आदबशीर रीतीनें आपआपल्या घोड्याचा लगाम धरून जमिनीवर उभे आहेत. मीं डोळे उघडून आनंदित मुद्रेनें सर्व दिशाकडे एकवार पाहिलें व उभा राहिलों. तेव्हा सर्व डाकू आपापल्या घोड्यावर बसले व त्याचा मुख्य माझ्या समोर जमिनीवर च उभा राहिला व खुणेनें त्यानें मला सांगितलें कीं आपण आता अगदीं भिऊं नये, आमचे अपराध क्षमा करावे. असें ह्मणून त्यानें आह्माला चहाच्या वड्या, सत्तु, व मास यांचा नजराणा दिला व पुढें जाण्यासाठीं स्वत:चे घोडे दिले. परंतु, मला यात्रा पायीं च करावयाची असल्यामुळें घोड्याचा कांहीं उपयोग नाहीं, मास मी खात नाहीं ह्मणून मांसाचा मला उपयोग नाहीं, चहा मजजवळ पुष्कळ आहे ह्मणून चहा हि नको, असें त्याला मीं खुणेने दर्शविलें. सत्तु तेवढा घेतला. नंतर डाकू लोकांची टोळी कर्दमखारचे दिशेनें गेली व त्यापैकीं एक मानस सरोवराचे दिशेनें जोरानें घोडा फेंकीत गेला. नंतर मी माझ्या कुलींकडे गेलों. ती सर्व मंडळी अजून जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेंत होती.

मीं कुलींना हाक मारून त्यांना हलविलें, त्याबरोबर चौघेजण उठून बसले; व डाकू लोक गेले का ? आपलें मरण टळलें का ? वगैरे चौकशी करूं लागले. मीं त्यांना धीर दिला व ह्मटलें, परमेश्वराचे मनात च जर आपल्याला मारावयाचें नाहीं तर तेथें मनुष्याचें काय चालणार ? हें ऐकून त्यांना धीर आला. मृत्यूच्या भीतीनें ते अगदीं काळे ठिक्कर पडले होते ! काय आश्चर्य पहा ! काळ आला होता, परंतु वेळ आली नव्हती ! ते मूर्तिमंत कालदूत जेव्हा तरवारी परजत आमच्यावर धावून आले, त्या वेळेच्या आमच्या मानसिक व शारीरिक स्थितीची कल्पना वाचकांनींच करावी ! हे डाकू लोक अतिशय क्रूर व निर्दय असतात; हे रानटी लोक पूर्वी नरमांस भक्षण करीत असत, असें ह्मणतात; मनुष्यानें आपल्या सर्व वस्तु जरी त्याचे स्वाधीन केल्या तरी ते त्याला जिवंत सोडीत नाहीत; त्यांची अशी कल्पना आहे कीं, साधू, संत, व्यापारी जो कोणी सांपडेल त्याला लुटावें, मारावें व मनुष्यवधाचे पापविमोचनार्थ कैलास पर्वताला प्रदक्षणा घालावी. हे लोक पूर्व तिबेट, चीनची सरहद्द, तार्तरीची सरहद्द, व पश्चिम तिबेट, येवढ्या टापूंत संचार करीत असतात; असो.

आह्मीं तेथें मुक्काम केला नाहीं, कारण वाटाड्या ह्मणाला कीं हा डोंगर चढून वर गेलें कीं, " राकस्ताल " नांवाचें एक सरोवर आहे, त्याचे काठीं आपण जेवण करूं व मग पुढें जाऊं. आह्मी हळु हळु चढण चढूं लागलों. ती दहा वाजण्याची वेळ होती. चढण चढून जाण्यास आह्मांला

सुमारें पाऊण तास लागला. वाटेनें आह्माला ससे, कीया, मोठमोठे रानटी उदीर वगैरे जनावरें इकडून तिकडे पळतांना दृष्टीस पडत असत. कीया हें तिबेटी जनावर सशासारखें च असतें, परंतु त्याचा रंग करडा ( तपकिरी ) असतो. त्याचे केंस अतिशय मऊ असून कातडें फार नरम असतें. तिबेटी लोक त्याच्या कातड्याच्या डोक्यास घालावयाच्या टोप्या देखील करतात. सुमारें अकरा वाजतां रावणह्रद ( राकस्ताल) सरोवर डोंगरसपाटीवरून आमचे दृष्टीस पडलें व पलीकडे वायव्य दिशेस श्रीकैलास पर्वत अस्पष्टपणें दिसत होता. मानस सरोवर दिसत नव्हते. तिबेटी लोकांत अशी एक समजूत आहे कीं, ज्या ज्या ठिकाणीं अशी चढण चढून जावें लागतें व मार्ग बिकट असतो, त्या त्या ठिकाणीं देवतेचें निवास-स्थान असतें. त्या ठिकाणीं दगडाची एक मोठी उंच रास केलेली असते व त्यावर एक काठी रोंवून त्या काठीला पुष्कळ निरनिराळ्या रंगाच्या चिंध्या लोंबत असतात. ते लोक अशा ठिकाणीं गेले कीं तोंडानें कांहीं पुटपुटतात, स्वतः एक दोन दगडाची त्या पूर्वीच्या राशींत भर घालतात व तेथील देवतेस कपडा ह्मणजे एक लहानशी चिंधी अर्पण करतात. तिबेटी लोकांची ही रीति भोटमध्यें हि आहे.

त्या ठिकाणीं माझ्या तद्देशीय वाटाड्यानें कैलास पर्वता-कडे दृष्टि करून सुमारें पांच मिनिटें प्रार्थना केली; नंतर तेथल्या त्या देवतेची हि प्रार्थना केली व त्याच प्रमाणें आह्माला हि करावयास सांगितली. मी कैलास पर्वताकडे मुख करून कैलासनाथाला एकदां साष्टांग नमस्कार घातला. नंतर

पुढें चालतां चालता आह्मी राकस्तालचे दक्षिण किनाऱ्याजवळ आलों, तेथून पूर्व किनाऱ्यानें काहीं वेळ चाललों व सुमारें साडे बारा वाजता किनाऱ्याजवळ वाळूत च भोजनासाठीं मुक्काम केला. ऊन कडक पडलें होतें; वाळू हि तापलेली होती; पोटात भूक फार लागलेली होती; व सकाळपासून सहा सात तास एकसारखे चालत असल्यामुळें, थकवा आलेला होता. माझ्या तरूण कुलीचें कपाळअतिशय दुखू लागलें;. त्याच्यानें एक निमिषभर देखील वर बघवेना व बोलवेना, मग उभें राहणें लांब च राहिलें ! दुसरा कुली हि अगदीं थकून गेला होता. याप्रमाणें सर्वांना थकवा येण्याचीं कारणें हि होतीं. कडक ऊन, एकसारखें चालणें, व डाकू लोकाचा हल्ला, ह्या तीन कारणामुळें आह्माला जास्त थकवा आलेला होता विशेषत: शेवटच्या कारणामुळें च आह्मी अगदीं निर्जीव होऊन गेलों होतों. मुक्कामाचे जागीं तशा त्या कडक उन्हात व झंझावातात सुमारें पंधरा वीस मिनिटें आह्मी अगदीं प्रेतवत पडून राहिलों, नतर सरपण, रानशेणी वगैरेच्या शोधासाठीं वाटाड्या, जवळच्या टेंकड्याचे आसपास फिरू लागला. माझ्या एका कुलीनें तीन दगडाची एक चूल आपल्याकरिता व दुसरी त्या वाटाड्यासाठीं बनवून ठेवली. नतर त्यानें तलावातून पाणी आणून भांडीं चुलीवर ठेवलीं. इकडे वाटाड्यानें काहीं कांटेरी झुडुपें तोडून आणून चकमकीचे सहायानें अग्नि पेटविला व कुलींनीं चहा तयार केला. येथून पुढें आह्मांला सरपणाऐवजीं नेहमीं वरील कांटेरी झुडुपें च मिळत असत. हीं झुडुपें ओलीं असलीं तरी

चांगलीं जळतात. मी तलावाचे कांठीं हात, पाय, तोंड वगैरे धुण्यासाठीं गेलों; स्वच्छ तोंड धुवून झाल्यावर मीं कैलास पर्वताकडे दृष्टि दिली. त्या वेळेस आकाश स्वच्छ असल्या-मुळें कैलास पर्वताचें शिखर अगदीं स्पष्ट दिसत होतें. ज्या एका ध्येयाकरिता मी आज इतके दिवस निरनिराळ्या शा-रीरिक व मानसिक आपत्ती सोसल्या, तें ध्येय साध्य होण्याचा समय समीप आल्यामुळें, ह्मणजे श्रीकैलास पर्वताचें, दुरून कां होईना, दर्शन झाल्यामुळें चित्तास फार समाधान वाटलें व प्रवासाचा शीण अगदीं नाहींसा झाला ! कैलासशिखराकडे अचल दृष्टि ठेवून श्रीसद्गुरुचरणाचें भक्तिपुरःसर मानसपूजन करीत मी रावणह्रदाचे काठीं बसलों ! माझ्या त्या समयींच्या आनंदाला पारावार उरला नाहीं ! माझी मानसपूजा संपेपर्यंत कैलासशिखर स्वच्छ दिसत होतें !

कैलास पर्वताचे शिखराची आकृति घुमटाप्रमाणें दि-सत होती त्या वेळीं सूर्यकिरणें त्या शिखरावर पडलेलीं अस-ल्यामुळें तें सर्व शिखर तेजःपुंज दिसत होतें व रुप्याप्रमाणें चमकत होतें त्या वेळेस, मद्रास इलाख्यांत " श्री चिदंबर " ह्मणून एक अत्यंत रमणीय व पवित्र असे श्री शंकराचें स्थान आहे, त्या स्थानाचें मला स्मरण झालें. चिदंबर येथील शिव-मंदिराचा घुमट सुवर्णाचा आहे, त्यावर सूर्यकिरणें पडलीं कीं त्या घुमटाची शोभा जशी अवर्णनीय दिसते, त्याच प्रमाणें श्रीकैलास पर्वताच्या घुमटाकार शिखराची हि शोभा अप्रतिम भासते. फरक इतका च कीं चिदंबर येथील सुवर्णघुमट मनुष्य-

-कृतीचा व कैलासचा घुमट रुप्याप्रमाणें शुभ्र च चकचकीत परतु नैसर्गिक आहे.

नंतर मीं राकस्ताल सरोवराचे सभोवार दृष्टि फेंकली. सरोवराचे काठीं एक हि झाड नसल्यामुळें, आजूबाजूचा सर्व प्रदेश रुक्ष दिसत होता; खुद्द सरोवर मात्र गंभीर दिसत होतें. या सरोवराचें जास्त वर्णन मानस सरोवराशीं याची तुलना करण्याच्या वेळीं पुढें देईन.

मानसपूजा आटोपल्यावर मीं चहा व बिस्किटें घेतलीं. माझ्या माणसानीं हि आपला आहार संपविला व सुमारें दीड वाजता आह्मी मानस सरोवराला जावयास निघालों. निघण्याचे समयीं कैलास पर्वत मेघ व बर्फाचें वादळ ह्यात अदृश्य झालेला होता. राकस्तालचे पूर्व किनाऱ्यानें आह्मी चालत होतों. खरें च, येथें आणखी एक गोष्ट सागण्यास विसरलों. कर्दमखारपासून पाच सहा मैलावरील आमची मुक्कामाची जागा सोडल्यापासून पुढें आमच्या त्या भारवाहकास ( गर्दभास ) खावयास कांहीं च न मिळाल्यामुळें, त्याला हि आह्मी सत्तु चहात कालवून देऊ लागलों. परतु तेवढ्यानें थोडें च त्याचें पोट भरणार ! बिचारें, अर्धपोटीं राहून दिवस कठीत होतें. पुढें पुढें आह्माला देखील त्या च स्थितींत राहण्याचा प्रसग आला; असो.

आह्मीं दुपारीं साडे चार वाजता डोंगरावरून मानस सरोवर पाहिलें. मानस सरोवर दृष्टीस पडल्याबरोबर आह्मी सर्वांनीं त्या पूज्य व पवित्र स्थळाला साष्टांग नमस्कार केला. सर्वांना अतिशय आनद झाला. प्रत्येकजण आपापल्यापरी

ईश्वराचें प्रेमपूर्वक व मनःपूर्वक स्तवन करून यथाशक्ति त्याचे गुणानुवाद गाऊं लागला. सुमारें पंधरा वीस मिनिटें कोणी कोणाशीं बोललें नाहीं. जिकडे तिकडे अगदीं शुक्र होतें. जो तो कैलास व मानस सरोवर याचे दर्शनानें आपण धन्य झालों, ह्या कल्पनेंत चूर होऊन आपआपल्या ठिकाणीं च रममाण झालेला दिसू लागला. आमचे सर्वांचे नेत्र आनंदाश्रूनीं भरून येऊन आह्मा सर्वांना त्या पवित्र स्थलाच्या दर्शनानें इतका अवर्णनीय आनंद झाला कीं तो सांगतां येत नाहीं. आमच्या सर्व श्रमाचें व एकदर जीविताचें सार्थक झालें, असें आह्मास वाटू लागलें. माझी पूर्ण खात्री आहे कीं, जो कोणी मनुष्य, मग तो हिंदु असो वा परधर्मीय असो, हें स्थान अवलोकन करील, त्यास देखील असें च वाटेल व वाटणें साहजिक आहे.

राकस्ताल व मानस सरोवर याचे मध्यें पूर्वपश्चिम अशी एक डोंगराची ओळ आहे. ह्या च डोंगराचे माथ्यावरून मानस सरोवर आह्माला प्रथम दिसलें. ह्या पहाडामुळें ह्या दोन भव्य सरोवरामध्यें सुमारें एक मैलाचें अंतर आहे, ह्मणजे हें अंतर पर्वताच्या दक्षिणोत्तर रुंदीइतकें आहे. कैलास पर्वत मानस सरोवराचे देखील वायव्योत्तर च दिसतो. मानस व राकस्ताल ह्या दोन सरोवराचे मधील पहाडाचे माथ्यावर उभा राहून मीं एकदा चोहोंकडे दृष्टि फेंकली. नंतर पश्चिमेकडे मुख करून उभा राहिलों. समोर श्रीकैलास पर्वत, डावे बाजूस राकस्ताल व उजवे बाजूस मानस सरोवर, याप्रमाणें दोन्ही बाजूस दोन मोठमोठे जलसमूह व मागचे बाजूस एक मोठा ‘गेरुवा मांधाता’

-नांवाचा हिमाच्छादित पर्वत. ( हा पर्वत सबंध तांबड्या रंगाचा दिसतो, ह्याचें शिखर मात्र बर्फाच्छादित असल्यामुळें शुभ्र दिसतें) अशा परिस्थितींत उभा असतांना मीं पुन्हां एकवार सभोंवार पाहिलें. अहाहा ! काय तो रमणीय व गंभीर देखावा ! अर्धा तास मी तसा उभा होतों. कैलास, मानस सरोवर व रावणह्रद सरोवर ह्या त्रिस्थळीच्या दर्शनानें माझ्या नेत्राचें खरोखर च पारणें फिटलें ! माझ्या एकंदर प्रवासांत ज्या ज्या प्रसंगीं असा अवर्णनीय देखावा मला दिसत असे, त्या त्या समयीं माझी एकाग्रता होऊन मी देहभान विसरून जात असे; व त्याचप्रमाणें ह्या वेळेस हि झालें. श्रीनारायणाच्या विराट स्वरूपाचें वर्णन मी काय करणार ?

सुमारें साडे पांच वाजतां आम्ही मानस सरोवराचे काठा-वर गेलों व तेथें एक दोन गुहा आहेत त्यांत वस्तीला रहावें, असा विचार करून तेथें गेलों. गुहा साफ करवून तेथें आम्हीं मुक्काम केला. गुहेपासून पाणी सुमारें वीस पचवीस हातावर होतें. त्या दिवशीं जेवणाची तयारी करावयास मीं कुलीला सांगितलें. त्यानें मोठ्या मुष्किलीनें मसुरीच्या डाळीचें वरण व चपात्या तयार केल्या. आम्हीं सर्वांनीं प्रथम सरोवरावर स्नान केलें व नतर परमेश्वरास नैवेद्य अर्पण करून सुखानें व आनंदानें भोजन केलें. भोजन झाल्यावर विश्रांतीसाठीं मीं गुहेच्या बाहेर व्याघ्रचर्म पसरलें व मानस सरोवराकडे म्हणजे उत्तराभिमुख तोंड करून हातांत दुर्बीण घेऊन बसलों. त्या वेळेस सूर्यास्ताचा देखावा मला पहावयास सांपडला. मानस सरोवराचे कांठीं माझा मुक्काम सुमारें दहा बारा दिवस होता.

तेवढ्या अवकाशांत मला तेथें सूर्योदय, सूर्यास्त, चांदणी रात्र बर्फाचीं वादळें, गारांचा वर्षाव वगैरे निरनिराळ्या प्रसंगांचें, व निरनिराळ्या समयाचें सौंदर्य पहावयास सापडलें. नंतर मीं दुर्बिणींतून राकस्तालकडे पाहिलें.

राकस्ताल किंवा राक्षसताल अथवा रावणह्रद हें सरोवर दिसण्यांत मानस सरोवरापेक्षां मोठें दिसतें; कारण ह्या सरोवराचे फाटे जमिनीवर लांब लांब गेलेले आहेत, राकस्तालचा परिघ जवळ जवळ तीसपासून पस्तीस मैलांचा असावा. सभोंवार डोंगर आहेत. काठावर एक देखील वृक्ष नाहीं ! त्या सरोवराचे सभोंवार जर झाडी असती तर त्याला अवर्णनीय शोभा आली असती. ह्या सरोवराचें पाणी थोडेंसें मचूळ असून अस्वच्छ दिसतें. पाणी गार असून पचनशक्ति वाढविणारें आहे. ह्या तलावाचे मध्यभागीं एक लहानशी टेंकडी असून तीवर एक गुफा आहे, त्या गुंफेंत एक दोन लामा (बौद्धभिक्षु) तप करीत बसलेले आहेत असें ह्मणतात. ते लामा गुफेच्या बाहेर कधीं च येत नाहींत असें सांगतात. हिवाळ्यांत पाण्याचे पातळीवर जेव्हां बर्फाचा थर होतो तेव्हां बकऱ्यांवरून त्याना चहा व सत्तु पोहोंचवितात. एक वर्षाचा पुरवठा केलेला असतो. वाऱ्यामुळें पाण्याचे सपाटीवर जेव्हां लहान लहान लाटा येत असतात, तेव्हा मोठी मौज दिसते. मासे वगैरे जलचर ह्या सरोवरांत आहेत, परंतु मला कांहीं च दिसले नाहींत. सभोंवार एक हि वृक्ष नसल्यामुळें जिकडे तिकडे रखरखीत दिसतें व त्यामुळें मृगजळाचा देखावा दृष्टीस पडतो. जवळच्या टेंकडीवर उभें राहून ह्या सरोवराकडे पाहिलें कीं हें सरोवर गंभीर दिसतें व चित्ताला एक प्रकारची शांतता वाटते.

— त्यानंतर मीं दुर्बिणींतून मानस सरोवराकडे पाहिलें. त्या वेळेस हंस पक्ष्याचें एक जोडपें जलक्रीडा करीत असतांना मला दिसलें. मानस सरोवराचें वर्णन मी काय करूं शकणार! हें अत्यंत पवित्र व अतिशय रमणीय असें स्थल आहे. मानस सरोवर अगदीं वर्तुळाकार असून सभोंवतीं पर्वत आहेत. रावणह्रद सरोवराप्रमाणें मानस सरोवराचे कांठीं हि वृक्ष वगैरे नाहींत, ह्या सरोवराचे कांठावर चोहोंबाजूस जर हिरवीगार झाडी असती तर ह्या स्थळाला, आहे ह्यापेक्षां जास्त सौंदर्य प्राप्त झालें असतें! ह्या सरोवराचें जल मधुर, थंड व अतिशय पाचक असून अगदीं स्वच्छ आहे; ह्या सरोवराचे चारी दिशेस बौद्ध लोकाचे चार लहान लहान मठ आहेत; त्यांतून एक एक लामा राहतो; मठात लामाचे थोडेसे शिष्य हि असतात; बुद्धाची मूर्ति प्रत्येक मठांत आहे. माझी अशी कल्पना होती कीं मानस सरोवराचे आसपास कोठेंतरी एखादें रम्य असें शिवाचें स्थान असेल, परंतु चौकशीअंतीं असें समजलें कीं "लोचरनाथाखेरीज" हिंदु देवतांच्या इतर मूर्ती संबंध पश्चिम तिबेटात हल्लीं कोठें हि नाहींत. मानस सरोवर शांत, गंभीर व सुंदर दिसतें; सरोवरावरील जलतरंग अवलोकन करतांना अंतःकरण प्रसन्न होतें व मनात सात्विक, पवित्र, व आनंददायक विचार उत्पन्न होतात. ह्या ठिकाणीं हंस पक्ष्याची तर मोठी च मौज आहे. ह्या पवित्र, सुंदर, व भाग्यवान् पक्ष्याचे थवेच्या थवे सरोवरांतील त्या मधुर, थंड व स्वच्छ जलात इतस्ततः क्रीडा करतांना मनुष्याचे दृष्टीस फार च आनंदवीत असतात; ह्या हंस पक्ष्यांमुळें मानस

सरोवराला विशेष मोहकता आलेली आहे; हंस पक्ष्यांखेरीज इतर कोणते हि पक्षी, मी मानस सरोवरावर जितके दिवस राहिलों होतों तितक्या अवधींत, एकदां हि माझ्या दृष्टीस पडले नाहींत. हंस पक्ष्यांचे थवे दिवसभर मानस सरोवरांत जलक्रीडा करीत आनंदानें व स्वच्छदानें कालक्रमणा करीत असतात व रात्रीं डोंगरावर त्यांचीं घरटीं असतात तेथें विश्रांतीसाठीं जातात. सरोवरांतील मासे वगैरे जलचर प्राणी व पाण्यांतील वेली, ह्यांवर त्यांची उपजीविका होते. हंस दिसण्यांत सुदर असतो. पाण्यांत जेव्हां मान वर करून मोठ्या डौलानें पोहत असतो तेव्हां तर हंस पक्षी फार च सुंदर व ऐटबाज दिसतो. हंसाला सरोवराचे कांठावर येतांना मीं कधीं हि पाहिलें नाहीं. हंस - बदकापेक्षां थोडासा उंच व बगळ्या-पेक्षा लहान असून त्याचे सर्व अवयव प्रमाणांत दिसतात. हंस हा लांबवर उडणारा पक्षी आहे. हंसाचा रंग पांढरा स्वच्छ असून रुप्यासारखा चकाकतो. चोंच मध्यम असून लालभडक असते. डोळे हि गुंजेप्रमाणें लाल असतात. हंसाचे पाय माझे दृष्टीस च पडले नाहींत. हंस दूध व पाणी यांच्या मिश्रणांतून फक्त दूध च पितो असें आपण ऐकतों, ह्याची प्रचिती मला तेथें घेतां आली नाहीं; कारण तो पक्षी आमच्या जवळ येणें शक्य नव्हतें.

मानस सरोवराचे किनाऱ्यावर, जवळच्या कपारींतून वास करीत असलेले ससे पुष्कळ च येत असत व पाण्याच्या-कांठीं बागडत असत. सशांचे कळपचे कळप पाहण्याची संधि मला येथें मिळाली; हा मिशकल्या, चपळ, नाजुक आणि

निरुपद्रवी प्राण्यांचे थवे जेव्हां त्वरेनें परंतु दबत दबत धांवत असतात तेव्हां असें वाटतें कीं लहान लहान गारगोट्या च वाऱ्यामुळें सट सट उडत आहेत. मीं तेथें तशांचा सर्वांत मोठा कळप ह्मणजे अजमासें पन्नास प्राण्यांचा पाहिलेला आहे. असो; ह्या सरोवराच्या कांठावरची रेती पांढरी आहे. ह्या सुंदर व नैसर्गिक सरोवराचें क्षेत्रफळ सुमारें पस्तीस मैलांचें आहे.

एकंदरींत मानस सरोवर अत्यंत रमणीय स्थान आहे, येवढें च नव्हे तर पवित्रपणाचें हें केवळ माहेरघर च आहे ! शांततेचें हें निवासस्थान आहे ! सृष्टिदेवतेचें हृदय च असून, हें सरोवर असलेला प्रदेश या कष्टतर मृत्युलोकांतील नसून, तो स्वर्गांतील अथवा स्वानंदसाम्राज्यांतील च आहे, असें मला वाटलें ! मानस सरोवराच्या शांत, गंभीर, व स्वच्छ उदकांत, सभोंवतालच्या हिमाच्छादित शिखरांनीं युक्त असलेल्या पर्वताचें प्रतिबिंब जेव्हां पडतें; तसें च श्रीसूर्यनारायणाचें, त्याच्या अस्तोदयकालचें, त्याचप्रमाणें दिवसाच्या वेळीं आकाशाचें व चांदण्या रात्रीं उडुगणासह चंद्रमंडलाचें प्रतिबिंब जेव्हां त्या पवित्र व निर्मल जलांत पडतें, तेव्हां सृष्टिदेवतेच्या सौंदर्याची जी काय मनोहर शोभा दिसते ती अगदीं अवर्णनीय होय ! माझी खात्री आहे कीं ह्या प्रदेशांतील निरनिराळ्या समयींचें सृष्टिसौंदर्य प्रत्यक्ष अवलोकन केल्याशिवाय, कोणत्या हि उत्तम लेखकानें लिहिलेलें त्या प्रसंगाचें वर्णन वाचलें तरी, मनाची शांति होणें शक्य नाहीं ! अशा रम्य व एकान्त स्थलीं चित्त एकाग्र कां होणार नाहीं ? मीं मानस सरोवरास जाऊन पोहोंचलों त्याच्या

सुमारें एक महिन्यापूर्वी पाश्चिमात्य शोधक व प्रवाशी डॉक्टर स्वेन् हेडिन् हे तेथें होते. त्याचा मुक्काम तेथें सुमारें एक महिनाभर होता; तेवढ्या अवकाशात त्यानीं त्या प्रदेशातील निरनिराळ्या स्थळाचे व निरनिराळ्या वेळेचें सृष्टिसौंदर्य अवलोकन केलें, त्याचें वर्णन त्यांनीं आपल्या प्रवासवृत्तांतात असें च दिलेलें आहे. ते लिहितातः—

"Oh, what a wonderful lake it was! I have no words to describe it; till my dying day I shall never forget it, and even now it is in my mind as a legend, a poem, and a song. Nothing that I can recall through all my wanderings, can compare with the overwhelming beauty of this night journey. It was like listening to the silent and mighty throbs of the heart of nature, to feel her pulse grow numb in the clasp of night, and revive in the morning glow. It seemed as though this land-scape, ever changing as the hours creep slowly by, were unreal; as though it no longer belonged to this earth but lay on the borders of the world beyond, nearer to heaven the region of dreams and fantasies, of hopes and longings, a mysterious fairy land, rather than to this earth of men and sinners, of worldliness and vanity".

असो, मानस सरोवरावर अनुष्ठानानिमित्त मी दहा बारा दिवस होतों. रोज सकाळ सायंकाळ स्नान करणें ह्मणजे मृत्यूला आमंत्रण देण्याइतकें कठीण होतें. कौपीन नेसून कमरेइतक्या पाण्यांत पळत जाऊन एकदम डोकें बुडवावें. पाण्याचे वर उघडें अंग ठेवण्याची सोय नाहीं. जरा पाण्याचे वर डोकें निघालें कीं, असें वाटे कीं मानेच्या वरील भाग अगदीं निर्जीव झाला आहे. काठावर माझे गरम कपडे व भुटिया कांबळें घेऊन कुली अगदीं उभे असत. मी पाण्याचे बाहेर आल्याबरोबर अंगात कपडे घालून, वर भुटिया कांबळें पांघरून, गुहेंत जाऊन दहा पंधरा मिनिटें आसनावर स्वस्थ बसत असे. थंडी कमी होऊन शरिरात थोडीशी उष्णता आल्यावर मग मी ध्यानाला बसत असे. ह्या दहा बारा दिवसांपैकीं प्रथम दोन तीन दिवस माझ्या माणसांना तेथें राहणें बरें वाटलें, परंतु पुढें त्यांना एकांतवासाचा अगदीं कंटाळा आला. मी तेथून कधीं निघेन असें त्यांना झालें होतें. साहजिक च आहे एक दिवस नव्हे एक तासभर देखील जर त्यांना एकांतांत असण्याची कधीं संवय नव्हती तर दहा बारा दिवस त्या सुंदर व पवित्र परंतु निर्जन अशा स्थळीं त्यांना बरें कसें वाटणार! मी तेथें मौन व्रत धारण केलेलें असल्यामुळें माझ्याशीं बोलणें शक्य नव्हतें. दिवस-भर मी कांहीं च घेत नसे; रात्रीं अकरा वाजण्याचे सुमारास फक्त चहा घेत असे, तो घेण्याचे वेळीं मात्र त्यांची माझी दृष्टा-दृष्ट होत असे. श्रीसद्गुरुकृपेनें अनुष्ठान पुरें झालें; फार आनंद झाला. शेवटच्या दिवशीं पहाटे सुमारें पांच वाजतां मला असा भास झाला कीं, पश्चिम दिशेकडे कोणी मधुर स्वरांत गायन

करीत आहे. मी नीट लक्ष देऊन ऐकूं लागलों. मला असें वाटलें कीं कोणी तरी स्त्री गात असावी. पुढें कांहीं वेळानें मला असें वाटलें कीं श्री माण्डुक्य उपनिषदाचें गान सुरू आहे. माझ्या जवळ दुर्बीण होती च तींतून मी ज्या दिशेनें गायन ऐकूं येत होतें त्या बाजूनें पाहू लागलों, परतु मला मनुष्यप्राणी कोणी दिसेना. जिकडे तिकडे पाढरी रेती मात्र दिसत होती. चोहोंकडे मी पुष्कळ निरखून पाहिलें, परतु गाणारी स्त्री अगर पुरुष ह्यापैकीं मला कोणी च दिसेना. गायन सुमारें अर्धा तास होत होतें. माझ्या डोक्यात विचारतरंगाचें वादळ उत्पन्न झालें. ह्या निर्जन प्रदेशात इतक्या खड्या व मधुर आवाजांत कोण बरें उपनिषद ह्मणत असावें ? येथें कोणी महात्मा तर स्नानास आला नसेल ना ? अथवा कोणी यक्ष, किन्नर अगर देवता तर नसेल ना ? कांहीं च कल्पना येईना, तेव्हां जवळच्या बुद्ध मठांत चौकशी करण्यासाठीं मी माझ्या वाटाड्यास पाठविलें. त्यावेळीं सकाळचा सहा वाजण्याचा सुमार होता. वाटाड्यानें परत येऊन मला सागितलें कीं मठातील लामा तीन चार दिवसापासून येथें ( मठात ) नाहीं; तो ताकलाकोटला गेला असावा. मला जास्त च हुरहुर लागली. मानस सरोवराचे दक्षिण किनाऱ्यावरून मनाशीं विचार करीत व वाळूकडे पहात मी हळु हळु चालत होतों. माझें चित्त त्यावेळीं प्रातःकालच्या त्या सृष्टिसौंदर्याकडे एक निमिषमात्र देखील वेधलें नाहीं ! काय मौज पहा ! ! कीं ज्याच्या अवलोकनानें माझें चित्त त्या क्षणापर्यंत एकाग्र होऊन मी आनंदसागरांत बुड्या मारीत असे, तें च सृष्टिसौंदर्य ह्या वेळीं माझें मन गुंतवि-

ण्यास असमर्थ होतें! माझें मन इतकें निर्दय झालेलें पाहून सृष्टि-देवतेला किती वाईट वाटलें असेल बरें! प्रिय वाचकहो, त्या माउलीला वाईट तर वाटलें नाहीं च, परंतु उलट पक्षीं तिला जास्त आनंद झाला असावा; कारण, आपल्या लेंकराचें चित्त आपल्या बाह्य मोहक परंतु नाशवंत स्वरूपाचें ठिकाणीं तल्लीन न होतां आपल्या सत्य व अविनाशी स्वरूपाविषयीं विचार करण्यांत गढून गेलेलें आहे असें तिनें जाणलें व त्यामुळें प्रसन्न होऊन मला तिनें वर दिला. हा वर पुढें श्रीकैलास पर्वतावर फलद्रूप झाला.

अशा स्थितींत मी त्या वालुकामय प्रदेशावरून सावकाश चाललों असतांना, सुमारें दोनशें हातांवर गेल्यावर मला मनुष्यप्राण्याचीं पावलें वाळूवर उमटलेलीं दिसलीं. मनुष्याचीं पावलें पाहतां च अंतःकरणांतून अशी च भावना उभी राहिली कीं ज्या अर्थीं हीं मनुष्यप्राण्याचीं पावलें आहेत त्या अर्थीं येथें सरोवरावर स्नानासाठीं कोणीतरी महा तपस्वी पुरुष आलेला असावा. लागलीं च मीं निश्चय केला कीं ह्या पाव-लांच्या धोरणानें तीं नेतील तिकडे असें च जावयाचें; ह्मणून मीं कुलींना निघण्याची तयारी करून लवकर माझे मागोमाग यावें असें सुचविण्यासाठीं हातानें खूण केली. माझा तरुण कुली तसा च मजजवळ आला. त्याला मीं सांगितलें कीं श्रीकैलासला जावयासाठीं मी तर हा निघालों, तुह्मी सर्वजण लवकर या. कुली परत गुंफेंत गेला व त्यानें बाकीच्यांना माझा उद्देश कळ-वून सामान बांधून तो बाटाड्याचे स्वाधीन केला. इकडे मी

त्या पावलांच्या धोरणानें पुढें पुढें चाललों. सुमारें दहा पंधरा मिनिटांनीं मला माणसांच्या भांडणाचा गलबला ऐकूं आला. मला असा भास झाला कीं, ज्याचें मी चिंतन करीत आहे तो तपस्वी मला मागून मोठ्यानें हाक मारीत आहे. मी मागें वळून पाहिलें तों कुलींचें व वाटाड्याचें जोरानें भांडण चाललें असून वाटाड्यानें आपल्या भारवाहकावरील सर्व सामुग्री जमिनीवर टाकून देऊन ताकलाकोटचे दिशेनें गाढव हांकीत संतापानें चालला आहे व कुली मला हांका मारीत सामाना जवळ बसलेले आहेत, असा देखावा दृष्टीस पडला! मी गुरुनादा वाचाला व कुलींना या अशी हात वर करून खूण केली व पुढें पावलांचा माग काढीत चाललों. चालतां चालतां दक्षिण किनाऱ्यावरून मी पश्चिम किनाऱ्यावर आलों. सुमारें वीस पंचवीस हात चालल्यावर वालुकामय प्रदेश संपला व खड-काळ जमीन लागली. गुंफेपासून मी सुमारें दोन अडीच मैल चालून आलों होतों. यापुढें पावलांचा माग अस्पष्ट दिसूं लागला. तो माग कैलास पर्वताच्या च बाजूला गेलेला होता. सुमारें पाव मैल गेल्यावर माग एकदम दिसेनासा झाला व एक चढण लागली. पुढें माग दिसत नाहीं हें पाहून मला फार वाईट वाटलें. आतां काय करावें, म्हणून मी विचारांत पडलों. मला त्या वेळेस फार च थकवा आलेला होता. पायांनीं तरी किती दम धरावा? दहा दिवस माझ्या पोटांत चहाशिवाय कांहीं नव्हतें. केवळ एका आशेमुळें हे अडीच तीन मैल मी फार जलद चालून आलों होतों; परंतु माग जेव्हां दिसेनासा झाला, तेव्हां निराशेमुळें माझी कंबर एकदम बसली व मी श्रमामुळें

व पोटांत कांहीं नसल्यामुळें किंचित् बेशुद्ध होऊन त्या चढणीचे पायथ्याशीं च पडलों. ही माझी स्थिति माझ्या कुलींनीं दुरून पाहिली व ते जोरानें चालत मजजवळ येऊन थडकले. इतक्यात मी हि शुद्धीवर आलों. कांहीं वेळानें माझा वाटाड्या हि सर्व सामान घेऊन आपल्या त्या अशक्त झालेल्या गर्दभासह येऊन पोहोंचला. आल्याबरोबर तो रागारागानें तिबेटी भाषेंत मजजवळ कुलींच्या विरुद्ध तक्रार सांगू लागला. मी त्या वेळीं त्याला खुणेनें सांगितलें कीं थोडा वेळ स्वस्थ बैस. ती सकाळची आठ वाजण्याची वेळ होती. कुलीनें चहा तयार केला. तेव्हां प्रथम श्रीसद्गुरूला व ज्या तपस्व्याचे दर्शनाविषयीं मी इतका उत्सुक झालों होतों त्याला नैवेद्य अर्पण करून मग मीं चहा व बिस्किटें खाल्लीं. तेव्हां मला थोडेंसें बरें वाटलें. सर्वांचा फराळ झाल्यावर आह्मी सुमारें अर्धा तास विश्रांति घेत स्वस्थ बसलों. येथें मला एक गोष्ट सांगावीशी वाटते, ती अशी कीं, माझ्या कुलींनीं येतांना आपले लोटे व माझा कमंडलु मानस सरोवरांतून जर पाण्यानें भरून आणले नसते तर पाण्यासाठीं त्यांना पुन्हां अर्धा पाऊण मैल परत जावें लागलें असतें. तेव्हां या प्रसंगीं पाणी आणण्याचे बाबतींत माझ्या कुलींनीं हा प्रथमचा व त्याचप्रमाणें शेवटचा दूरदर्शीपणा दाखविला ह्यांत कांहीं संशय नाहीं. आमचा फराळ चालला असतां आमचें गाढव हि तेथें पडलेल्या रानशेणी खाऊन आपले उदराची भरती करीत होतें ! त्या प्राण्याची ती स्थिति पाहून मला एकदम रडू आलें ! तेव्हां अर्धा शेर सत्तु चहांत कालवून

त्या सोसाळु, कष्टाळु व उपासमार होत असलेल्या गाढवाला आह्मीं खावयास घातला; परंतु तेवढ्यानें थोडें च त्याचें पोट भरणार ! परंतु करणार काय ! आमचा हि तेथें इलाज नव्हता. त्या गाढवाचे प्राण वांचविण्यापुरते शक्य तेवढे उपाय आह्मीं केले व करीत होतों.

वर सांगितल्याप्रमाणें थोडीशी विश्रांति घेतल्यानंतर चढण चढण्यास आह्मीं सुरवात केली. सुमारें चार पांच मैलांवर डोंगराचे मथाळीवर एका लहानशा कपारींत आह्मीं मुक्काम केला. तेथून जवळ च " छूगुंफा ".ह्मणून एक गुफा आहे, तेथें एक लामा राहतो. गुंफेंत बुद्धाची मूर्ति आहे. ह्या गुंफेपासून मानस सरोवराचा पश्चिम किनारा सरळ रेषेनें समारें अर्धा मैल आहे; हा अर्धा मैल सबंध उतार आहे. आह्मीं मुक्काम केला होता त्या ठिकाणापासून जवळ च दोन उष्ण जलाचे झरे होते. त्यापैकीं एका झऱ्याचें पाणी अगदीं आधणाप्रमाणें उकळत होतें व त्याच्या वाफा दोन दोन पुरुष उंच दिसत होत्या. त्या कपारींत आह्मीं रात्रभर मुक्काम केला; कारण गुरुनादा बावाला दुपारीं चार वाजतां जोराचा ताप भरला व कपाळ आणि सर्व अंग फार दुखूं लागलें ! त्याच्यानें एक शब्द देखील बोलवेना. रात्रीं त्यानें फक्त चहा घेतला व निजून राहिला. तो रात्रभर मोठ्यानें कण्हत होता. त्याची प्रकृति जास्त बिघडते कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. सकाळीं काय होतें तें पाहून मग पुढें जाण्याचा विचार ठरवावा असें मीं मनांत योजून ठेवलें होतें. ह्या दिवशीं कैलास पर्वताचे [illegible] सुरू होतें: आकाश मेघाच्छादित [illegible] होऊन धुक्यामुळें दिशा धुंद झाल्या होत्या; दुपारचे तीन वाजल

होते तरी काळोख पडला होता. पलीकडच्या टेंकडीचे माथ्यावर धुक्यात कोणी शीळ घालीत आहे असें आह्मांस दिसलें. तेंव्हां वाटाड्याला त्यासबंधानें मीं प्रश्न केला. त्यानें सांगितलें कीं, शीळ घालणारा मनुष्य " छू " गुहेंत राहणाऱ्या लामाचा नोकर असून तो आपल्या बकऱ्यांना बोलावीत आहे. इतक्यांत सुमारें हजार दोन हजार बकऱ्यांचा कळप येतांना आमचे नजरेस पडला. लामा लोक लोंकरीचा देखील व्यापार करतात. त्यांच्या जवळ चार पांच हजार बकऱ्या व कांहीं वनगाई ( याक ) देखील असतात, हें मला त्या समयीं कळलें. हे लामा श्रीमंत असतात. ऋषिकालीं आपल्याकडे ज्याप्रमाणें आपल्या ऋषींची संपत्ति ह्मटली ह्मणजे गायी व बैल ही असे, त्याचप्रमाणें ह्या लामाची संपत्ति बकऱ्या व याक ही असते. फरक इतका च कीं ऋषी व्यापार करीत नसत व लामा करतात. संध्याकाळीं आह्मी आमचा फराळ वगैरे आटोपून व त्या कपारींत निजण्याची सोय करून, सहज चैनीनें गोष्टी बोलत बसलों, तों एकदम वादळ उत्पन्न होऊन जोरानें गारा पडूं लागल्या. सुमारें दोन तासपर्यंत वादळ होतें. आह्मी जरी कपारीचे आश्रयानें होतों, तरी गारारूपी बंदुकीच्या गोळ्यांचा सडकून मारा सुमारें अर्धा तासपर्यंत आह्मांला सहन करावा लागला. वादळ बंद झाल्यावर गार वारा सुटला. त्या वेळेस थंडीनें आपली पूर्ण सत्ता त्या प्रदेशावर बसविली; येवढें च नव्हे तर ती आपली सत्ता निर्दयपणानें व अनियंत्रितपणें चालवूं लागली ! मुख्य प्रधान बर्फ व सेनाधिपति वायु ह्यांच्या सहायानें तिनें जीवरूपी प्रजेला अमानुष पीडा देण्यास प्रारंभ

केला ! या तिच्या त्रासानें प्रजेनें तिजविरुद्ध गाऱ्हाणें करण्याचें मनांत आणलें व मुख्य न्यायाधिशाकडे ती न्याय मागण्यास गेली ! बरें, ह्या राशीचा मुख्य न्यायाधीश कोण तर, रात्रीचा गाढ अंधकार ! मग काय विचारतां ? न्यायाचा कांटा कोणीकडे झुकला असला पाहिजे हें सांगणे नको च ! अशा बेबंद नगरींत आह्मां प्रवाशाच्या त्या समयीं काय हालअपेष्टा झाल्या असतील, ह्याची कल्पना वाचकांनीं च करावी.

रात्रीं -सुमारे नऊ वाजतां, आह्मीं आमचे बिछान्यावर गुरगुटून पांघरूण घेऊन बसलों होतों; रात्र अंधारी असल्यामुळें जिकडे तिकडे काळोख पडलेला होता; नुकतें च गाराचें वादळ नाहींसें झाल्यामुळें सर्वत्र शांतता होती; वारा जोरानें वहात होता; इतक्यात, आमच्या समोर कोणी मनुष्य उभा आहे असें मला दिसलें. वाटाड्याला मी तो मनुष्य दाखविला. तो पुरुष नसून एक बाई आहे व आपण उतारू येथें आलों आहोंत असें तिला समजल्यावरून ती "छू" गुंफेंतून एक मूठभर सत्तु मागण्यासाठीं आलेली भिकारीण आहे असें मला त्यानें सांगितलें. हें ऐकून प्रथम मला फार च आश्चर्य वाटलें. नंतर दोन मुठी सत्तु त्या बाईला द्या, असें मीं कुलीला सांगितलें. वाटाड्या ह्मणाला, इतका सत्तु तिला तुह्मीं आतां दिलांत तर गुंफेंतून आतां दहा पंधरा भिकारी येतील व तेवढ्यांना तुह्मी इतका सत्तु देत गेलांत तर ताकला-कोटला जाईंतोंपर्यंत आपणास सत्तु कसा पुरेल ? मला वाटलें, येवढ्या थंडींत व अशा अंधारात कशाचे भिकारी येतात. या बाई-ला दोन मुठी सत्तु घाल असें पुन्हा मीं कुलीला सांगितलें. त्यानें त्या

बाईला सत्तु घातला. तिनें आनंदित मुद्रेनें " ज्यु ज्यु " म्हणून चारदां आम्हांला नमस्कार केला व चालती झाली. सुमारें अर्ध्या तासानें आमच्या कपारीजवळ वीस भिकारी काहीं पुरुष, काहीं बायका, कांहीं मुलें, तयार ! आतां काय करावें, अशा विचारांत मी पडलों. थाटाच्या तिबेटी भाषेंत शिव्या देऊन त्याना हांकून देऊं लागला ! ते कांहीं केल्या जाईनात, शेवटीं ती रात्रीची वेळ पाहून प्रत्येकाला अर्धी अर्धी मूठ सत्तु घालण्यास मीं कुलीला सांगितलें. सत्तु घेतल्या-वर सर्व भिकारी आनंदानें परत गेले, केवळ एक वितीची खळगी भरण्यासाठीं पंचमहाभूताना न जुमानता त्यांच्याशीं झगडत त्या भिकाऱ्याना इतक्या लांबवर यावें लागलें ना ! ह्या पोटापुढें केवळ मनुष्यप्राणी च काय, परंतु किडा मुंगीपासून तों व्याघ्रसिंहादि बलाढ्य व हिंस्र पशूपर्यंत सर्व प्राणी कसे अगदीं गोगलगाय बनतात ! वगैरे विचार माझ्या मनांत येऊं लागले. दारिद्र्यावस्थेंत मात्र जीवाला परमेश्वराच्या अस्तित्वाचें व त्याच्या सामर्थ्याचें स्मरण होतें व तेवढ्या समया-पुरता तो त्याची काकुळतीनें प्रार्थना करतो; परंतु तो च जीव परमेश्वराचे कृपाप्रसादाने जेव्हा श्रीमान, सुखी, यशस्वी व बल-वान होतो, त्या समयीं अहंकारानें व मदानें उन्मत्त होऊन त्या सर्वशक्तिमान परमेश्वराला विसरतो व आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाची शेखी मिरवूं लागतो, परंतु त्याचा परिणाम हि त्याला निश्चयानें कालांतरानें भोगावा लागतो ! ! !

रात्र निघून गेली, गुरूनादा बावाला बरें वाटूं लागलें व त्याच्या च मतानुसार पुढें निघण्याचा आम्हीं बेत केला. पहाटे

पांच वाजतां चहा वगैरे घेऊन आह्मी सर्वजण हळु हळु चालूं लागलों. आकाश अगदीं स्वच्छ होतें. कैलास पर्वत स्वच्छ दिसू लागला. सकाळचा मंद व शीतळ वायु वाहूं लागला. एकदरींत, आह्मीं निघालों तो समय शुभ व आनंददायक होता. गुरुनादा बावा अजारी, परंतु त्याला देखील चालण्यास हुषारी वाटू लागली, मग आह्मांला विशेष उल्हास वाटला ह्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. प्रसन्न अंतःकरणयुक्त होऊन आह्मी सर्वजण चालत असतां, दुपारीं अकरा वाजतां, आह्माला उन्हाची प्रखरता भासू लागली. ह्या वेळेस वारा जोरानें वहात नव्हता. थंडी हि होती च, परंतु आह्मी चालत असल्यामुळें आमच्या शरिरात उष्णता उत्पन्न झालेली होती व वरून प्रखर ऊन पडलेलें असल्याकारणानें आह्माला थोडीशी तलखी होऊं लागली. सुमारें पंधरा वीस मिनिटें विश्रांति घेण्यासाठीं, आह्मी त्या मैदानांत च बसलों. त्या वाटेनें आह्मांला निरनिराळ्या जातींच्या तिबेटी हरणाचे कळप पहावयास सापडले. सुमारें चाळीस एक हातांचे अंतरावरून आह्माला हरणांचे कळप दिसत असत व लांबून च ते कळप पाहण्याची जास्त मजा. असो. आह्मी उठून पुढें चालू लागलों तों सुमारें चाळीस पन्नास हातावर आह्माला धुळीचा लोट आकाशांत वर जात असलेला दिसला, तेव्हां माझ्या वाटाड्यानें सांगितलें कीं, तो पहा, रानटी घोड्याचा कळप आपणाकडे च येत आहे.

रानटी घोड्याचा कळप आमच्याकडे येत आहे हें पाहून, मी जागच्या जागीं उभा राहिलों. आमची चाहूल लागता च तो कळप दक्षिण दिशेला जाऊं लागला. मीं माझी दुर्बीण

काढ़ली व तींतून पाहूं लागलों. मोठी मौज दिसूं लागली. मला वाटतें, चार पांचशें घोड्याचा तो कळप असावा. तिबेटांतील रानटी घोडे फार उंच नसतात. त्यांच्या सर्वांगावर आपल्या घोड्यापेक्षां जास्त दाट व लांब केंस असतात. ज्या वेळेस हे रानटी घोडे माना वर करून व शें चवरीसारख्या वर धरून जोरानें पळत असतात, तेव्हां पाहणारास असा भास होतो कीं, एका घोडेस्वाराच्या तुकडीचा दुसऱ्या तुकडीवर जणू काय हल्ला च होत आहे. रानटी घोडे मनुष्याचे वाऱ्याला देखील उभे राहात नाहींत. तिबेटी लोक ह्या घोड्यांना मोठ्या खुबीनें व मुष्किलीनें पकडतात व त्यांना शिकवितात. तिबेटांतील घोडे मजबूत, काटक व चलाख असतात. तिबेटांतून प्रवास करात असताना दोन दोन दिवस ह्या घोड्याना खावयास देखील मिळत नाहीं. तो रानघोड्याचा कळप हां हां ह्मणता आमच्ये समोरून निघून गेला. दुपारीं बारा वाजण्याच्या सुमारास आह्मी "बखतिर्जन" ह्या गांवाला येऊन पोहोंचलों. ह्या ठिकाणीं पक्या इमारती नाहींत. येथील वस्ति छोलदारींची ( तंबूची ) आहे. सुमारें तीस चाळीस छोलदारी ह्या गांवांत आहेत. अलीकडे तीन चार वर्षांत धाब्याचीं दोन घरें बांधलेलीं आहेत. एक पोष्टाचें घर सरकारी आहे व दुसरें एका श्रीमंत व्यापाऱ्याचें आहे. आह्मी गेलो त्या समयीं तिसऱ्या एका घराचें काम चाललें होतें. तिकडे सर्व कच्च्या विटांचीं च घरें असतात. माती मात्र फार चिकट असते. ह्या गावांत तिबेटी सरकारचें पोष्ट आहे; परतु हें रयतेच्या उपयोगाकरिता ठेवलेलें नाहीं. "ल्हासा" व "गारटोक" ह्यांमध्यें सरकारी पत्रव्यवहार चालत असल्यामुळें तेवढ्याकरितां

हें पोष्ट येथें ठेवलेलें आहे. ह्यापासून बर्खातर्जेन हा सुमारें एकवीसावा किंवा बावीसावा टप्पा आहे. तिबेटी भाषेत पोष्टाला " तर्जेन " असें ह्मणतात. येथून ल्हासा पूर्वेकडे सुमारें वीस बावीस दिवसाच्या प्रवासाचे अंतरावर आहे. असें सांगतात कीं, ल्हासा व गारटोक या दरम्यान जो मनुष्य डांक घेऊन आंत येत असतो, त्याला घोड्याशीं मोहोरबंद करून ठेवतात; अशाकरता कीं एका टप्प्यापासून दुसऱ्या टप्प्यास पोहोंचे-पर्यंत त्यानें वाटेंत कोठें हि उतरतां कामा नये. मोहोर जर फुट-लेली दिसली तर त्या मनुष्यास जबरदस्त शिक्षा करतात.

हुणिया लोक ज्या छोलदारींतून राहतात, त्या फार मजबूत, जाड व उबदार अशा कांबळ्याच्या केलेल्या असतात; हीं कांबळीं वनगाईंच्या केंसाचीं तयार करतात. ह्या कांबळ्यातून पाणी आंत येत नाहीं. छोलदारीचें दार बंद केलें कीं, हवा अगर बर्फ ह्यापासून बिलकुल त्रास होत नाहीं. आह्मीं दुपारीं बारा वाजतां बर्खातर्जेनला आल्यावर, गावाचे शेजारीं मैदानांत च मुक्काम केला. आह्मीं आमच्या मुक्कामासा-ठीं गावाच्या जवळपास स्वच्छ जागा शोधून काढण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले, परंतु आह्माला स्वच्छ जागा कांहीं केल्या मिळेना! जिकडे पहावें तिकडे विष्ठा व जनावरांचीं हाडें पडलेलीं! शेवटीं, त्यापैकीं च थोडीशी जागा बाटाड्यानें साफ केली व मी तेथें बसलों. भोंवतीं सर्वत्र हाडें च हाडें पसरलेलीं होतीं! वर मध्यान्हीचा प्रखर सूर्य, सभोंवार घाण, प्रवासाचा शीण, भूक व तहान ह्यामुळें पोटांत काहूर उठलेले, वगैरे कारणामुळें आमची अगदीं त्रेधा उडून गेलेली होती. आह्मी

मुक्कामावर जाऊन बसतों मात्र, इतक्यात गांवातील सर्व पुरुष, स्त्रिया व मुलें, आमच्या भोंवतीं जमा झालीं. तरुण स्त्रिया मजकडे पाहून आपसात हळू हळू स्वभाषेंत बोलत व पुन्हां माझेकडे, माझ्या कुलींकडे व गुरुनादा बाबाकडे पहात, त्या मजकडे साश्चर्य मुद्रेनें पहात असत, मुलें आह्माला पाहून भीत होतीं; पुरुष सशययुक्त मुद्रेनें मजकडे पाहून आपसांत कांहीं बोलत असत. स्त्रियानीं व पुरुषानीं माझ्या कुलीला माझे सबधानें प्रश्न विचारून अगदीं भंडावून सोडलें. माझ्या तद्देशीय वाटाड्याला त्यापैकीं एकानें आपले घरीं बोलावलें. वाटाड्यानें आमची चहापाण्याची वगैरे कांहीं व्यवस्था न पाहता जाण्यास परवानगी मागितली; तेव्हा आह्माला गावातून थोडासा लाकूडफाटा आणून दे व मग जा असें त्याला मीं सांगि-तलें. नतर माझ्या एका कुलीबरोबर त्यानें दोन चार काटेरी झुडुपें पाठवून दिलीं; त्याबद्दल मला दोन आणे द्यावे लागले.

तिबेटमध्यें प्रवास करीत असतांना, डॉक्टर स्वेन हेडिन प्रभृति प्रवाशांना तिबेटी लोकाविषयीं काय अनुभव आला असेल तो येवो, परतु कांहीं व्यक्ति खेरीजकरून सर्वसाधारण तिबेटी लोकाविषयीं माझें मत अगदीं प्रतिकूल आहे. माझी अशी समजूत आहे कीं, हे लोक दुष्ट, लबाड, व निर्दय असे असले पाहिजेत. माणुसकी ह्मणजे काय असते याची त्याना कल्पना हि नाहीं. वाटेंत च प्रवाशाला एकटा सोडून देऊन चालते होण्यास भुटिया लोकांप्रमाणें च येथील लोक हि तयार होतात. त्याचा स्वभाव अतिशय भाडखोर असतो. प्रारब्धानें वाटाड्या व कुली चागलें मिळाले तर बरें, नाहींतर परकीय प्रवा-

शाची फार च हालअपेक्षा होते; आणि चांगले लोक मिळणें तर महा मुष्किलीचें काम असतें. भुटियाप्रमाणें हे लोक हि अर्धवट रानटी आहेत, असें ह्मणण्यास कांहीं च प्रत्यवाय नाहीं असें मला वाटतें. पश्चिम तिबेटांत सर्व कांहीं ठीक आहे, परंतु लोक मात्र चांगले नाहींत. येथें सृष्टिसौंदर्य अनुपम आहे, येथें खनिज पदार्थांचा मोठा भरणा आहे असें ह्मणतात; सैंधव व खारी ह्यांच्या मोठमोठ्या खाणी आहेत; मानस सरोवराचे दक्षिण किनाऱ्यावर राकस्ताल व मानस ह्याचेमध्यें, सोन्याची एक मोटी खाण आहे, असा शोध नुकता च लागलेला असून ती उकरण्यासंबधाचें बोलणें तिबेट व चीन सरकारामध्यें चाललें आहे असें ह्मणतात. जेथें खाण सापडलेली आहे त्या ठिकाणीं, चीनच्या एका अधिकाऱ्यानें ( शेपचित् यानें ) ठाणें दिलेलें आहे. पश्चिम तिबेटांतील हवापाणी निरोगी आहे. येथील लोकांचा मुख्य व्यापार ह्मटला ह्मणजे लोंकर, सैंधव व खारी व नेहमींचा उद्योग ह्मणजे कांबळीं विणणें, बकऱ्या व वनगाई चारणें व दरवडे घालणें. आतां शेवटचा धंदा एकंदर सर्व लोकांचा आहे असें जरी नाहीं, तरी तो धंदा करीत नाहींत असे लोक फार थोडे आहेत. ह्या लोकांत एका स्त्रीला एकापेक्षां जास्त नवरे करण्याची मोकळीक आहे. ताकलाकोटच्या झुपनला पांच भाऊ आहेत. या सहा भावांमिळून एक च बायको आहे असें मला कळलें, तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें. जिच्या पोटीं जन्म घेतला तिच्याशीं व सख्या बहिणीशीं मात्र लग्न लावतां येत नाहीं. ह्या लोकांचा धर्म बौद्ध आहे, हें मागें सांगितलें च आहे. ह्यांचीं करमणुकीचीं साधनें ह्मटलीं ह्मणजे

" भुतांचा नाच ", शिकार व एकत्र जमून मद्य ( जाण )-प्राशन व सत्तुभक्षण करीत गप्पा मारीत बसणें, हीं होत. " भुताचा नाच " मोठा मजेचा असतो. चित्रविचित्र रंगाचें व भेसुर आकाराचे मुखवटे घालून व पायांत घुंगरें बांधून ढोलक्याचे तालावर नाचणें याला " भुताचा नाच " ह्मणतात. परकीय प्रवाशाला ह्या नाचाची मोठी मौज दिसते. मला हा नाच गारटोकला पहावयास सांपडला. तिबेटी लोकांचा प्रेतविधि व लग्नसमारंभ पहावयाची संधि मला मिळाली नाहीं. पश्चिम तिबेटातील लोक बांध्यानें मजबूत व शूर आहेत. वर्ण थोडासा पिंवळट, तोंड थापट, डोळे बारीक व नाक बसकें असतें. बायका हि ह्याचप्रमाणें असतात. बखीतर्जनचे एका अधिकाऱ्याची मुलगी सौंदर्याबद्दल त्या प्रदेशात प्रसिद्ध आहे; ती मला पहावयास सांपडली; परंतु तिला पाहून तिच्या सौंदर्याचा ठसा माझे मनावर अनुकूल असा उठला नाहीं. ह्याचें कारण मला वाटतें, सौंदर्यासंबंधानें आपला जो ग्रह असतो, त्याच्या कसोटीला तें सौंदर्य उतरलें नाहीं. परंतु तिकडच्या इतर स्त्रियांच्या मानानें ती मुलगी पुष्कळ च चांगली दिसत होती. तिबेटातील स्त्रियांचे केंस फार लांब नसतात, तरी वनगायीचे केंसानीं ती उणीव त्या भरून काढतात. त्यांच्या केंसाच्या बारीक बारीक वेण्या मागच्या बाजूस पायापर्यंत लोंबत असतात. त्या आपल्या वेण्यात निळ्या, तांबड्या, अस्मानी, हिरव्या, वगैरे निरनिराळ्या रंगाच्या कांचेच्या लहान लहान मण्याचे दागिने घालतात, व त्यांच्या शेवटीं चांदीचे अथवा पितळेचे घुंगरु बांधलेले असतात. त्यांच्या गळ्यांत, कानांत व

डोक्यांत निरनिराळ्या रंगांच्या खड्यांचे व चांदीचे दागिने असतात. त्याचा पेहेराव ह्मटला ह्मणजे पायांत दोकचा (गुडघ्या-पर्यंत कातड्याचा अथवा बनातीचा व सुतळीचा तळ असलेला चोळणा ) अंगांत आपल्याकडे मुसलमान लोकांच्या बायका ज्याप्रमाणें लांब सदरा घालतात तसा गरम सदरा व वरून बखु ( मोटा कोट ); डोक्याला कुंचीच्या आकाराची खांद्यापर्यंत पाठीवर लोंबत असलेली व सैल अशी टोपी असते; परंतु बायका फारकरून डोक्याला कांहीं घालीत च नाहींत. लामा जे असतात त्याचे डोक्यावरील केस आंखूड कापलेले असतात व इतर लोकांचे केस चिनी लोकांप्रमाणें वेणी घालून पाठीवर सोडलेले असतात. तिकडे स्त्रियांना पडदा नाहीं. श्रीमंत लोक घोड्यावर बसून प्रवास करतात. तिकडे घोडे हें च वाहन जास्त प्रचारांत असावें असें मला दिसलें. याकचा उपयोग फक्त सामान वाहण्याचे कामीं मात्र करतात; असो.

बर्खांतर्जनला आमचे भोंवतीं त्या गावांतील स्त्रिया, पुरुष, व मुलें सुमारें अर्धा तासपर्यंत उभी होतीं. स्त्रिया व कांहीं पुरुष लोंकरीचा धागा चातीवर काढीत व एकीकडे आमची मजा पहात उभे होते. अर्ध्या तासानंतर गर्दी कमी कमी होऊं लागली. परंतु मग भिकाऱ्याचा त्रास आह्मांला होऊं लागला. कुलीनें चहा तयार केला. नंतर मीं चहा, बिस्किटें व गोंठलेलें दूध घेऊन विश्रांति घेत स्वस्थ बसलों. कुलींचा व गुरुनादाचा हि फराळ आटोपला. तिबेटांतील चहा करण्याची रीत आपल्या इकडल्याप्रमाणें नसते. तिकडे चहा करतात तो असा; चुलीवर पाण्याला अधण आलें कीं त्यांत चहा टाकावयाचा; नंतर थोडासा सैंधव टाकावयाचा, मग तो चहा बांबूच्या नळकांड्या-

सारख्या एका पात्रांत घालून त्यांत याकचें लोणी बरेंचसें घालून त्यांत सत्तु ( नियमानें घालतात च असें नाहीं ) कालवतात. मग तें मिश्रण रवीनें खूप घुसळतात; इतकें कीं, त्याचा एकजीव झाला पाहिजे. मग तो चहा बनतो. रवीची गति खालीवर असते, थोडक्यांत सांगावयाचें तर पिचकारीप्रमाणें च तें पात्र असतें. असो. मी अवधूतगीतेचा पाठ करीत बसलों होतों, तों वाटाड्या मद्य वगैरे पिऊन अगदीं बेहोष होऊन गावांतून येतांना मीं पाहिला, परंतु जवळ आल्यावर तो इतका बेहोष नव्हता असें दिसलें. तो येऊन ह्मणाला, संध्याकाळचे मुक्कामास आपण "दर्चिनला" जाऊं. मला हि त्याची ती सूचना पसंत पडली.

ताकलाकोटपासून मानस सरोवर अजमासें चाळीस पन्नास मैल आहे; मानस सरोवरापासून बर्खातर्जेन सुमारें पधरा वीस मैल आहे; व तेथून दर्चिन सुमारें बारा तेरा मैल आहे. दर्चिन हें लहानसें खेडें श्री कैलास पर्वताचे पायथ्याशीं दक्षिण दिशेला आहे. तिबेटांत पक्क्या सडका नाहींत, लहान रस्ते नाहींत, मग मैल कोठून असणार ! शिवाय, माझ्याजवळ किती अंतर चालून आलों हें दाखविणारें यंत्र नव्हतें; त्यामुळें नक्की अंतर सांगता येणें शक्य नाहीं. शास्त्रीय साधनें मजजवळ कांहीं च नव्हतीं. असो.

आमच्याजवळ जास्त सामान होतें तें बर्खातर्जेनला ठेवून त्याचे वाहनाला हि आह्मीं तेथें च सोडलें, कारण, तेथें त्याला चरावयास थोडेंसें गवत होतें. आह्मी दुपारीं दीड वाजतां दर्चिनला जावयास निघालों. सुमारें नऊ मैल आह्मी गेलों, तोंपर्यंत बारा

आह्मांला अनुकूल होता; परंतु नंतर एकदम सोसाट्याचा वारा वाहू लागला व वीस मिनिटाचे आंत, आकाश काळ्याभोर ढगानीं भरून गेलें; जिकडे तिकडे अंधकार पसरला व अतिशय भयाण दिसू लागलें! लागलीं च पावसाचे शितोडे पडण्यास सुरवात झाली. आह्मी हळु हळु चालत च होतों. निवाऱ्याला कोठेंतरी उभें रहावें तर त्या मैदानात, ना डोंगर, ना टेंकडी, ना एखादा वृक्ष. माझ्याजवळ छत्री होती ती मीं डोक्यावर धरली, गुरुनादानें आपलें भिक्षापात्र डोक्यावर घेतलें व कुलींनीं घोंगड्या पांघरल्या. सुमारें पांच मिनिटानीं जोरानें गाराच्या वादळास सुरवात झाली. माझी छत्री फाटून मोडून गेली! गुरुनादाचें भिक्षापात्र हि फुटून गेलें! आमच्या अंगावर व विशेषतः डोक्यावर मोठमोठ्या गाराचा बंदुकीच्या गोळ्यांप्रमाणें मारा होऊं लागला! परंतु आह्मांला तशा हि स्थितींत मार्गक्रमणाशिवाय दुसरा इलाज च नव्हता! सुमारें दोन घटका आह्मी त्या जोराच्या व भयंकर गाराच्या वादळात च हळु हळु खालीं माना घालून श्री नारायणाचें व कैलासनाथाचें चिंतन करीत पुढें चाललों होतों! त्या समयीं आह्मांला फार क्लेश सोसावे लागले. सर्व कपडे ओले चिंब झाले. वरून गाराचा जोराचा मारा, त्याजूनें अंगाला सुईचे अग्राप्रमाणें झोंबणारा तीक्ष्ण वारा व थंडी तर विलक्षण च. अशा त्या बिकट प्रसंगीं आमची स्थिति कशी झाली असेल तिचें वर्णन मला करतां येणें शक्य नाहीं; वाचकानीं च त्याची कल्पना करावी, हें बरें! गुरुनादानें तर शेवटीं शेवटीं अगदीं च धीर सोडला व त्याच्यानें जेव्हां अगदीं पाय टाकवेना तेव्हां तो मटकन खालीं बसला!

-मी व वाटाड्या सर्वांचे पुढें चाललों होतों. आमच्या मागें सुमारें अर्ध्या फर्लांगाचे अंतरानें माझे कुली चालत होते व त्यांच्या हि मागें पाव फर्लांगाचे अंतरानें गुरुनादा एकटा च हळुहळु येत होता! मला त्या गुरुनादाची वारंवार कींव येत असे परंतु त्याचा तेथें काय उपयोग! वादळामुळें ज्याचें त्याचें लक्ष आपल्या पाव-लांकडे असल्यामुळें असें अंतर पडत गेलें. मी श्रीसद्गुरुचर-णारविंदाचें ध्यान करीत व वाटाड्याचे पावलाबरोबर पाऊल टाकीत खालीं मान घालून चाललों होतों. सुमारें पांच वाजतां वादळ बंद झालें. वारा मंद मंद वाहूं लागला. सूर्यकिरणें दिसूं लागलीं. तेव्हां कुली व गुरुनादा येई तों सिंधुनदीचे दक्षिण किनाऱ्यावर आम्ही दोघे—वाटाड्या व मी—विश्रांति घेत स्वस्थ पडलों. सर्वजण एकत्र झाल्यावर आम्ही सिंधुनदी उतरून पार गेलों. ह्या ठिकाणीं सिंधुनदीची रुंदी दहा अकरा हात असून खोली कमरेइतकी होती. पाणी इतकें थंड होतें कीं अग्नीप्रमाणें तें आमच्या शरिरास झोंबलें! सिंधुनदीपार झाल्यावर आम्हीं सर्वांनीं सुमारें पंधरा मिनिटें विश्रांति घेतल्यानंतर पुढें चालूं लागलों व सुमारें साडे सहा वाजतां आम्ही दर्चिनला पोहोंचलों. येथें बौद्ध लामाची एक गुफा आहे. त्या गुफेंत आम्हाला जागा मिळाली नाहीं. मैदानांत च पडून राहिलों! दर्चिनला लामाजवळ सत्तु, चहा, गूळ, तांदूळ वगैरे जिन्नस विकाऊ होते, परंतु ते अतिशय वाईट असून फार च महाग होते. आमचा मुक्काम दर्चिनला एक रात्रभर होता. तेव्हां रात्रभर कोठें तरी एखादी निवाऱ्याची जागा मिळाली तर पहा असें मीं वाटाड्याला सांगितलें. त्यावरून

तीन माणसें राहतील येवढी एक कोठडी आह्मांला मिळाली. ही कोठडी ह्मणजे काय? नुसते दगड एकमेकावर रचून चारी बाजूनें बांधलेली व त्यावर एक दगडाची शिळा ठेवलेली होती. तेथें अतिशय घाण होती. अशी जरी ती जागा होती, तरी ती आह्माला त्या वेळेस राजवाड्याप्रमाणें वाटली.

चहा करावयाचा ह्मणून विस्तव पेटवूं लागलों. सुमारें चार तास विस्तव पेटेना! पोटांत भुकेनें काहूर उडवून दिलें होतें! शेवटीं रात्रीं अकरा वाजता चहा वगैरे तयार होण्याजोगा विस्तव झाला. बारा साडे बारा वाजतां आह्मीं सर्वांनी फराळ केला! निजावयास व्याघ्राजिन व अंगावरील कपडे व आठ दिवस पुरेल इतकी खाण्याची सामुग्री; येवढें काय तें सामान माझ्या जवळ होतें. त्या रात्रीं आमच्या पैकीं कोणाला च झोंप लागली नाहीं. वाटाड्या गुहेंत जाऊन निजला होता. रात्रभर जोराचा वारा व गाराचें वादळ मधून मधून सुरू च होतें. पहाटे पांच वाजतां मी कोठडीचे बाहेर येऊन चहूकडे पाहिलें तों आकाश स्वच्छ होतें. पर्जन्य वगैरे कांहींएक नव्हता. सहा वाजता वाटाड्या आह्मांला बोलवाव-यास आला. कारण, त्या दिवशीं कैलासच्या प्रदक्षणेस आह्मांला निघावयाचें होतें. साडे सहा वाजता आह्मीं प्रदक्षणेला प्रारंभ केला.

श्री कैलासची प्रदक्षणा सुमारें तीस बत्तीस मैलाची आहे. कैलास पर्वताचे सभोंवार तीन बाजूनीं तीन नद्या वहात आहेत. उत्तरेस हि एक लहानशी नदी आहे, ती कैलास पर्वतातून च निघालेली आहे. कैलास पर्वताचे पायथ्याशीं

चारी दिशेस चार बुद्ध लामांच्या गुंफा आहेत. हे लामा गृहस्थाश्रमी आहेत. आपल्याकडे जसे क्षेत्रस्थ उपाध्ये असतात, तसे च हे लामा येथील उपाध्ये होत. ह्यांचे जवळ शकऱ्या, याक वगैरे जनावरें असून हे लोंकरीचा व्यापार करतात. ह्याचे गुफेंत मुक्कामास जागा मिळते व मोलानें चहा, सत्तु व सरपण देखील मिळतें. कैलास पर्वताचे दक्षिणेस पायथ्याशीं "सिंधुनदी" आहे. तिचा उगम मानस सरोवरातून होऊन ती पश्चिमेकडे वहात जाते. कैलास पर्वताचे ईशान्य दिशेस सुमारें एकोणिस हजार फूट उंचीवर "गौरी कुंड" आहे. ह्या कुंडाचे पूर्वेस "ब्रह्मपुत्रा" नदीचा उगम झालेला आहे. ती कैलासाचे पूर्वेस पायथ्यापायथ्यानें वहात गेली आहे. ह्या दोन्ही नद्या उगमाजवळ लहान आहेत. कैलास पर्वताची उंची तीस हजार फूट आहे असें ह्मणतात.

दर्चिनला मला असें समजलें कीं, कैलासचे वायव्य व ईशान्य दिशेला मोठमोठ्या दऱ्या आहेत, तेथें यात्रेकरू, भुटिया व्यापारी, तिबेटी खपा, ह्यांना लुटण्याचे उद्देशानें आठ डांकू लोक दया धरून बसलेले आहेत. श्रीसद्गुरु महाराजाच्या चरणारविंदाचें ध्यान करून दर्चिनहून मी वर सांगितल्याप्रमाणें सकाळीं साडे सहा वाजतां कैलासप्रदक्षणेला निघालों. सुमारें साडे नऊ वाजतां पश्चिम गुंफेजवळ नदीचे कांठीं आह्मीं मुक्काम केला. येथें आह्मीं चहा वगैरे घेतला व लागलीं च चालूं लागलों. वाटेनें तांबड्या रंगानें रंगविलेल्या दगडांच्या रांगा आह्माला पुष्कळ लागल्या. बौद्ध लोक ह्यांना पवित्र मानतात व त्यांना उजवी घालून जातात. जाताना चढउतार विशेष

लागला नाहीं. रस्ता नदीचे किनाऱ्यानें च होता. सुमारें दीड दोन वाजतां आह्मी वायव्य दिशेच्या दरीजवळ व पहाडाजवळ आलों. खरोखर ही जागा फार च भयकर दिसत होती. चिट-पाखरूं देखील त्या वेळेस तेथें नव्हतें. आह्मी चालण्याचे श्रमानें अगदीं थकून गेलों होतों ह्मणून सुमारें अर्धा तास नदीचे कांठावर बसलों. मी ज्या ठिकाणीं बसलों होतों तेथें जवळ च पिवळ्या रंगाच्या पुष्पाचा गालिच्या च पसरलेला होता. पुष्कळ दिवसानीं ह्मणजे हिमालय सोडल्यापासून मला हीं पुष्पें प्रथम च नजरेस पडलीं. प्रदक्षणेच्या वाटेनें जातांना कैलास शिख-राकडे पाहिलें कीं फार च मौज दिसते. जिकडे तिकडे शांत व गभीर वाटतें. अशा ठिकाणीं अपवित्र विचार देखील मनांत येत नाहींत. त्या वायव्य दिशेच्या दरींत आह्मांला कोणता हि प्राणी भेटला नाहीं मग डांकू कोठचा भेटणार ! असो. सुमारें चार वाजतां आह्मी उत्तर दिशेच्या गुफेंत आलों. एकसारखे दहा तास आह्मी चालत होतों. तेथें आलों तेव्हां आह्मी अगदीं थकून जाऊन आमच्या हातापायाचे तुकडे पडल्याप्रमाणें झालें होतें व त्यांत बिलकुल त्राण राहिला नव्हता. शेवटीं रात्रीचा मुक्काम ह्या गुफेंत करावा असें मीं ठरविलें. रोजच्या प्रमाणें चहापान वगैरे करून व्याघ्राजिनावर मीं देह टाकला मात्र, तों निद्रादेवीनें पोटच्या लेंकराप्रमाणें मला अत्यंत प्रेमानें आपल्या पुढ्यात घेतलें.

ह्या गुफेंतून कैलास पर्वताची शोभा फार च चांगली दिसत होती. ह्या गुफेपासून कैलास जरी पाव मैलावर आहे तरी तो अगदीं चार हातांवर आहे असें वाटे. येथून मीं कैलासाकडे

पाहिलें तेव्हां, राकस्ताल सरोवराचे कांठावरून कैलास शिखर पाहिलें होतें, ( मागें पान १०६ पहा ) त्या वेळेचें मला स्मरण झालें. ह्या गुफेच्या गच्चीवरून सबंद कैलास जेव्हां मीं अवलोकन केला, तेव्हा माझे नेत्र आनंदाश्रूनीं भरून गेले व मी स्वानंद साम्राज्यात स्वैर सञ्चार करूं लागलों. आतां मी कैलास पर्वताच्या अगदीं पायथ्याशीं असल्यामुळें शिखर अगदीं जवळ व स्पष्ट दिसत होतें. तें पाहिल्यावर, मागें पान १०६ यावर वर्णन केलेल्या मद्रास इलाख्यातील चिदंबरं येथील त्या पवित्र, सुंदर, व रमणीय शिवस्थानाचें मला पुन्हा एकदा स्मरण झालें. अगदीं एक आकार ! फक्त तें शिखर मानवानें तयार केलेलें आहे व कैलासचें नैसर्गिक आहे; तेथील शिखर सवर्णाचे पत्र्यानें मढविलेलें आहे; कैलासचें शुभ्र हिमाच्छादित आहे; त्यामुळें जणूं काय तें रुप्याच्या च पत्र्यानें मढवलेलें आहे असें भासतें. साम्यतेचें आणखी एक उदाहरण द्यावयाचें म्हटलें तर त्र्यंबकेश्वर येथील शिवालयाचे सभामंडपाचें शिखर होय. त्या शिखराप्रमाणें च चिदंबरं येथील देवालयाचें आणि कैलासचें शिखर आहे. आकार अगदीं सारखा, रंग मात्र निरनिराळा. कैलासचें शुभ्र, चिदंबरं येथील पिंवळें, व त्र्यंबकेश्वर येथील काळें. ह्याप्रमाणें कैलास पर्वताची शोभा त्या गुफेच्या गच्चीवरून मी तीन चार तास एकसारखा अवलोकन करीत आनंदांत बसलों होतों. त्या वेळीं माझे प्रवासजन्य शारीरिक व मानसिक श्रम सर्व परिहार झाले असें मला वाटलें. मी तेथें बसलों असतांना त्या मठातील लामा, त्याचे शिष्य, त्यांच्या बायका वगैरे सर्व मंडळी मजजवळ येत,

माझेकडे पहात, माझ्या कुलीला मी कोण आहे वगैरे विचारीत आणि साशंक मुद्रेनें परत आपआपल्या खोलींत जात. असो. याप्रमाणें त्या गुफेंत रात्रभर मुक्काम करून दुसरे दिवशीं पहाटे सहा वाजता चहा वगैरे घेऊन आम्ही पुढें चालू लागलों.

आम्ही जावयास निघालों तेव्हां तेथील लामा सांगू लागला कीं, दोन तीन दिवस झाले, आठ डाकूनीं एका खंपाला ठार मारून त्याच्या दोनशें बकऱ्या व तितके च याक लुटून नेले. त्याचप्रमाणें जवळ च सैंधवाची एक खाण आहे; त्या खाणीजवळ दुसऱ्या एका व्यापाऱ्याच्या पांचशें बकऱ्या त्यांनीं लुटून नेल्या. हे डाकू लोक, झुपन, गर्पन वगैरे अमलदाराच्या हि बकऱ्या व याक एखाद्या वेळेस लुटून नेतात. अशा समयीं चार पाचशें लोकाचे सैन्य घेऊन हे अधिकारी त्याच्या टोळयाचा पाठलाग करतात, त्याच्याशीं लढतात व ते पळून गेले कीं माल परत आणतात. परंतु फारकरून अधिकारी लोकाचा माल ते लुटून नेत नाहींत. तिबेटी सरकार हि इकडे लक्ष पोंचवीत नाहीं. तिबेटांत हत्यारां-चा कायदा नसल्यामुळें वाटेल त्याला शस्त्र बाळगतां येतें, त्यामुळें डाकू लोक नेहमीं सशस्त्र असतात. आपणांजवळ शस्त्र असलें तरी त्याचा उपयोग आपणास ह्या डाकू लोकापासून स्वसंरक्षणार्थ कितपत करता येईल ह्याचा मला संशय च आहे. गुफेच्या बाहेर आल्याबरोबर मीं मागें सांगितल्या प्रकारचीं बारीक, नाजूक, पिवळ्या रंगाचीं पुष्पें पुन्हा दिसलीं. त्यापैकीं काहीं फुलें मीं तोडलीं व तीं मीं माझ्या अवधूतगीतेंत ठेवून दिलीं. तीं दोन चार फुलें मी धुळयास परत आल्यानंतर माझ्या एका

मित्राला भेट ह्मणून ( त्यानें मागितल्यावरून ) दिली; असो.

आता आह्मी कैलासचे पूर्वेस आलों. सुमारें बारा वाजता आह्मी फराळ करण्यासाठीं ब्रह्मपुत्रा नदीचे काठीं मुक्काम केला. चहा वगैरे घेऊन सुमारें तीन वाजता आह्मी पुढें चालूं लागलों. जाता जाता पूर्वाभिमुख असलेल्या एका वरच्या गुहेकडे पाहून मला माझा वाटाड्या सांगूं लागला कीं ह्या वरच्या गुहेंत एक मोठा हिंदु तपस्वी रहात आहे असें ऐकतों. मी त्या गुहेकडे पाहिलें; तों ती सुमारें एक हजार फूट उंचीवर असून आजूबाजूस चोहोंकडे कडा तुटलेला असल्यामुळें व गुहेच्या दोन्हीं बाजूला दोन हिमप्रवाह वहात असल्यामुळें त्या ठिकाणीं जाणें कठीण. तेव्हा अशा त्या गुहेंत त्या सत्पुरुषाचे दर्शनास आपणास कसें बरें जाता येईल, असा विचार करीत व त्या गुहेकडे पहात मी स्वस्थ उभा राहिलों. सुमारें पांच मिनिटांनीं मी त्या वाटाड्याला विचारलें कीं त्या गुहेला एखादी वाट जाते का व असलीतर ती तुला माहित आहे का ? तो ह्मणाला वाट तर नाहीं, परंतु तुमची इच्छा असल्यास आपण दोघे जाऊन येऊं तेव्हा मी माझ्या कुलींना सांगितलें कीं तुह्मी जवळच्या गुहेंत जाऊन बसा; आह्मी दोघे त्या गुहेंतील सत्पुरुषाचें दर्शन घेऊन येतों. त्याप्रमाणें कुली तिकडे गेले व आह्मी वर चढूं लागलों. सुमारें पाव रस्ता चढून गेलों तों वाटाड्याचें पोट अतिशय दुखूं लागलें व डोकें तर इतकें चढून गेलें कीं त्याच्यानें वर देखील बघवेना ! तो मटकन खालीं च बसला. प्रथम तर मला वाटलें कीं त्यानें ढोंग केलें असावें; परंतु नंतर एकदम

त्याचा चेहरा च सांगू लागला कीं, त्याचें पोट व डोकें खरो-खर च दुखत असावें. नंतर मी क्षणभर डोळे मिटून स्वस्थ उभा राहिलों. परिक्षेची खरी वेळ ही च आहे असें मनात आणून माझा निश्चय कायम झाला कीं देह जावो अथवा राहो, त्या महा पुरुषाचें दर्शन घेण्यासाठीं त्या गुहेंत जाव-याचें च. श्रीसद्गुरु महाराजाना व ज्याचे दर्शना करितां मी निघालों होतों त्या तपस्व्याला मनानें च साष्टांग नमस्कार केला व गुहेकडे जें एकदा मुख फिरविलें तें पुन्हां मागें वळविलें नाहीं, व तसा च निघालों. जाता जातां वाटाड्याला सांगितलें कीं जवळच्या गुंफेंत कुली आहेत तेथें तूं जा. तुह्मी माझी वाट सहा दिवसपर्यंत तेथें पहा व सातवे दिवशीं प्रात:काळीं तुह्मी ताकलाकोटला निघून जा. त्या भुटिया व्यापाऱ्या जवळ मीं पैसे ठेवलेले आहेत; त्यातून तुह्मी आपला पगार घ्या. माझ्या कुलींना सांग कीं तुह्मी हिंदुस्थानात गेल्यावर पहिल्यानें डाक-खाना भेटेल तेथें तुमच्या जवळ दिलेलें कार्ड टाका. जा. तुह्मी खुशाल असा. परमेश्वर तुमचें कल्याण करो. त्याप्रमाणें कुलींकडे तो वाटाड्या हळु हळु जाऊ लागला. जातांना त्यानें मला नमस्कार केला व माझा हेतु पूर्ण होवो, अशी आपली सदिच्छा व्यक्त केली. माझें लक्ष गुहेकडे वेधल्यामुळें मी आपलें तोंड मागें न वळविता माझे हेतु मी त्याला खुणेनें च कळ-विले व मला वाटतें ते त्याला समजले.

याप्रमाणें अखेरची निरवानिरव करून मी वर चढ-ण्यास सुरवात केली. तो रस्ता पूर्वीच्या सर्व मार्गांपेक्षां फार च बिकट होता. गुहा शभर एक हात राहिली, तेव्हां मला

मधून मधून बर्फावरून चालावें लागलें. ह्या समयीं माझ्या पायांत रोमन जोड्याप्रमाणें एक जोडा व पायमोजे होते. थंडी अतिशय पडूं लागली. मी गुहेजवळून वाहणाऱ्या हिम प्रवाहाजवळ तर येऊन ठेपलों. तो प्रवाह ओलांडून गुहेजवळ जावयाचें होतें; ह्मणून प्रवाह ओलांडण्याचा प्रयत्न करीत असतां बर्फावरून मी तीन चारदां पाय घसरून पडलों. तुट-लेल्या कड्याकडे झोंक जाऊ नये अशा बद्दल शक्य तेवढी काळजी प्रत्येक वेळेस घेत असे. शेवटीं तो हिमप्रवाह ओलां-डून गुहेजवळ तर आलों. तेथें नवीन च अडचण माझ्या नजरेस आली परंतु जों जों माझ्या वाटेंत ज्यास्त अडचणी येऊं लागल्या तों तों माझा निश्चय व धैर्य जास्त वाढू लागलें. ती अडचण ह्मणजे ही कीं गुहेच्या तोंडाशीं जावयाचें ह्मणजे एक पुरुष उंच चढून गेलें पाहिजे; पाय ठेवावयास तर मुळीं च जागा नाहीं, मग चढून जाणार कसा ? असा विचार करीत मी सूक्ष्म दृष्टीनें इकडे तिकडे पाहूं लागलों तों तीन चार हात पलीकडे एका खडकाला पायाचीं बोटें ठेवण्याजोगे लहान लहान खळगे कोरलेले आहेत असें दिसलें. तेथून वर गुहेकडे नजर ठेवून मी वानराप्रमाणें पटकन वर चढून गेलों व गुहेच्या द्वारांत जाऊन उभा राहिलों. आंत पाहतों तों अगदीं काळोख होता. आंता पुढें कोठें व कसें जावें असा विचार मनांत येणार तों माझ्या दृढ निश्चयानें त्यास पुढें येऊ च दिलें नाहीं; त्यामुळें व गुहेच्या आंत शिरतांना प्रथम च कमरेइतका खोल खळगा असेल अशी मला कल्पना नसल्यामुळें मीं एकदम पाय पुढें टाकला, तों जोरानें कमरेइतका खोल खालीं आपटलों. मला कांहीं च

दिसेना. मी रांगू लागलों व रांगतां रांगतां इकडे तिकडे चाच- पूं लागलों ! बराच वेळपर्यंत माझ्या हाताला काहीं लागेना. तसाच रांगत असताना शेवटीं कोणाच्या तरी मस्तकावर माझें मस्तक आपटलें असें मला वाटलें ! मीं चाचपून पाहिलें तेव्हां हें मस्तक खास मनुष्याचें आहे अशी माझी खात्री झाली; कारण मला केसांचा स्पर्श झाला. पुढें तेथें अधुक अंधुक दिसू हि लागलें. मला जेव्हां मनुष्याकृति दिसली तेव्हां मी लागलीं च पुढें साष्टांग नमस्कार घालून " त्राहि मा त्राहि मां " असें ह्मणून जमिनीवर तसा च पडून राहिलों ! लागलीं च मनुष्याचा शब्द ऐकला कीं ' तुम कौन है, हा कैसे आये ? ' पडल्या पडल्या च मीं ह्मटलें, ' महाराज, भगवन्, आपल्या कृपेनें च या आपल्या दासाला आपल्या चरणाजवळ आणलें. ' तेव्हां कोणी हसलें असें मला वाटलें. ' अच्छा, वत्स, उठकर बैठ !!' असे शब्द मीं ऐकले व मला हातानें कोणी उठवीत आहे असें वाटलें. तेव्हां मी उठून बसलों, परतु नेत्र उघडले नव्हते. पुढें डोळे उघडून पाहतों तों जवळ कोपऱ्यात एक दिवा मद मंद जळत आहे व माझ्या समोर एका व्याघ्राजि- नावर एक भव्य, सुंदर, गभीर व पुष्ट अशी मूर्ति पद्मासन घालून बसलेली आहे. मी पुन्हा प्रेमानें व आदरानें नमन केलें व "त्राहि मां त्राहि मां" अशी प्रार्थना केली. पुढें माझें देहभान नाहींसें झालें. ती प्रेमातिशयाची लाट शांत झाल्यावर मी त्या मूर्तीकडे न्याहाळून पाहूं लागलों. अहाहा ! किती तरी सुंदर स्वरूप तें ! त्या सत्पुरुषाचा देह उंच पुष्ट व मजबूत असून काटक होता, वर्ण गौर होता, भालप्रदेश व नेत्र

विशाल होते; डोळे इतके पाणीदार होते कीं, ब्रह्मतेजाचें तें केवळ माहेरघर च होतें; नासिका सरळ व तरतरीत असून थोडीशी कमानदार होती; मस्तकावर पिंगट व कुरळे केश असून ते स्कंधावर रुळत होते; दाढी चार पांच बोटे लांब असून तिचा हि रंग पिंगट च होता; कंठ भरलेला होता; स्कंध उन्नत होते; वक्षस्थळ रुंद व भरींव दिसत असून पोट अगदीं सडपातळ होतें; पोटावर तीन वळकट्या दिसत होत्या; मूर्ति दिगंबर असून शरीरावर विभूति वगैरे कांहीं एक नव्हती. जवळ एक कमंडलु व एक व्याघ्राजिन येवढी च काय ती संपत्ति. दिसण्यांत साठ बासष्ट वर्षांचें वय दिसत होतें. सारांश असा सुंदर व तेजस्वी पुरुष मीं आजन्मांत पाहिला नव्हता व अजूनपर्यंत नाहीं. मुखाकडे सारखी दृष्टि लावून पहात बसलें कीं, पाहणाराला असें च वाटलें पाहिजे कीं, शांतता, गांभीर्य, आनंद व तेज ह्याचें, हें केवळ वसतिस्थान च आहे; प्रेमाची तर केवळ खाण आहे; भाषण किती तरी मधुर! अशा त्या मूर्तीकडे मीं डोळे भरून कांहीं वेळ अवलोकन केल्यावर हर्षभरित होऊन बोलावयास प्रारंभ केला. महाराजाचें जन्मस्थान, कुल, शील, नाम, वगैरे संबधीं प्रश्न केल्याबरोबर उत्तर आलें कीं, हे प्रश्न विचारू नकोस. नंतर मी ध्यान योगासंबधीं माहिती विचारली. ती सांगून माझ्या शंका निरसन केल्या. मी आपल्या मातृभाषेंत ह्मणजे मराठींत च प्रश्न करीत असे व मला उत्तर देखील त्या च भाषेंत मिळत असे अगदीं शुद्ध मराठी भाषा मला तेथें ऐकावयास सांपडली. ते सत्पुरुष मला ह्मणाले कीं, जगांत जितक्या ह्मणून भाषा

असतील तितक्या सर्व मला येत आहेत, वाटेल त्या भाषेंत तूं बोल. आमचें बोलणें मधून मधून इंग्रजी भाषेंत हि होत असे. याप्रमाणें बोलताना एक गोष्ट माझ्या लक्षांत आली ती अशी कीं, ज्या भाषेंत प्रथम बोलण्यास सुरवात होत असे, त्या भाषेव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या हि भाषेंतील शब्द चुकून सुद्धां मध्यंतरीं उपयोगात आणला जात नसे. ह्या सत्पुरुषाला योगबल पूर्णपणें प्राप्त झालेलें आहे व हा खरोखर च ब्रह्मवेत्ता आहे, असें माझी मनोदेवता मला सांगू लागली व त्याप्रमाणें माझी खात्री हि झाली. आशा आहे कीं अशा महापुरुषाचें दर्शन सर्वांना होईल. तीन दिवस मला सत्समागम झाला; या तीन दिवसांत मी केवळ जलपान करून असें व रात्रंदिवस एका च आसनावर असें. मी श्री मानस सरोवराचे कांठीं असतांना शेवटच्या दिवशीं कोणी तरी एखादें उपनिषद् सुस्वरात गात आहे असें ऐकलें होतें व त्या गाणाराचा आतुरतेनें शोध करीत फिरत असता वाळवंटावर कोणा तरी मनुष्याचीं पावलें पाहिलीं होतीं व त्या पावलांचा माग काढीत काढीत मी चाललों होतों, हें वाचकास स्मरत असेलच. ( मागें पान ११६ पहा ). तीं पावलें ह्या च सत्पुरुषाचीं व तें ह्मणणें हि ह्या च महात्म्याचें होतें; ही गोष्ट मला त्या महाभागानें कृपावंत होऊन स्वमुखानें निवेदन केली तेव्हां मला अत्यानंद झाला. तीन दिवस पर्यंत माझें व त्या सत्पुरुषाचें संभाषण काय झालें तें लिहून काढता येणें शक्य नाहीं.

त्या महात्म्याचे समागमात ते तीन दिवस तीन क्षणां प्रमाणें गेले, फार आनंद झाला, असे सत्पुरुष पृथ्वीचे पाठीवर

कार च थोडे असावेत अशी माझी समजूत आहे. स्वामी विवेकानंद यांनीं एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, कांहीं कारणामुळें कांहीं महात्मे एकातांत बसून निमूटपणें जगताच्या कल्याणा विषयीं प्रयत्न करीत असतात व अशा च सत्पुरुषांनीं अत्यंत मोठमोठालीं कार्यें केवळ एकांतांत बसून घडवून आणलेलीं आहेत. असे पुरुष जगाला न दिसतां उत्पन्न झाले, होत आहेत व पुढें हि होतील; असो. चौथ्या दिवशीं प्रातःकाळीं जाण्याविषयीं मला आज्ञा झाली. मीं चरणावर मस्तक ठेवलें. नतर गुहेच्या तोंडापर्यंत व पुढें बाहेरील हिमप्रवाह ओलाडून जाईपर्यंत मला पोंचविण्यास ते माझ्याबरोबर आले व परत जातां जातां त्यानीं मला सागितलें कीं "तीर्थापुरीला माझे गुरुबधु आहेत त्यांचेकडे हि जावे विसरू नये. मीं पुन्हा चरणावर मस्तक ठेवलें व डोंगर उतरूं लागलों. नंतर काहीं वेळानें ज्या ठिकाणीं माझे कुली वगैरे मंडळी होती त्या ठिकाणीं मी येऊन पोहोंचलों. सर्वांना आनद झाला. याजबरोबर (माझ्यबरोबर) आपण गेलों नाहीं, हें मनांत येऊन गुरुनादाला पश्चात्ताप झाला व वाईट वाटलें; परंतु उपयेग काय ? नतर मला "गौरीकुडाला" जावयाचें आहे असें मीं माझ्या नोकराना सांगितलें; परतु गौरीकुडाला बरोबर यावयास कोणी हि तयार होईना. तेव्हां रात्रभर तेथें मुक्काम करून दुसरे दिवशीं पहाटे तीन वाजता गौरीकुडाला जाण्यासाठीं निघावयाचा माझा निश्चय झाला; व त्याप्रमाणें मी निघणार असें मीं सर्वांना सागितलें. मी गौरीकुडाला जाऊं नये ह्मणून कुलींनीं शिकस्त केली व वाटाड्यानें हि त्याना दुजोरा दिला. मी त्याना एक च जबाब दिला कीं मी

तेथें जाणार; या कार्यांत माझा देह जावो अथवा राहो. माझ्याबरोबर येण्यास कोणी हि तयार नाहीं असें पाहून, मीं सर्व नोकर लोकांना जवळ बोलावलें, व त्यांना ह्मणालों कीं ज्याप्रमाणें मी त्यागुहेंतील सत्पुरुषाच्या दर्शनास गेलों त्यावेळीं तुह्मी चार पाच दिवसपर्यंत माझी वाट पहात येथें बसला त्याचप्रमाणें आणखी सात दिवस तुह्मी माझी मार्गप्रतिक्षा करीत येथें बसा, तेवढ्या मुदतींत जर मी आलों तर ठीक च, नाहींतर तुह्मी ताकलाकोटला परत जावें; तेथें त्या सुटिया व्यापाऱ्यापासून आपला पगार घ्यावा व हिंदुस्थानचा रस्ता धरावा. जेथें पोष्ट ऑफिस प्रथम लागेल तेथें तुमच्याजवळ दिलेलें पत्र पोष्टात टाकण्यास विसरूं नये; याप्रमाणें व्यवस्था करून मी आपल्या पायाच्या भोंवतीं कांबळ्याच्या पट्टया गुंडाळल्या, अंगात आठ जाड गरम कपडे घातले, हातात पोलादी टोंक असलेली लांब काठी घेतली, डोळ्याला निळ्या रंगाचा चष्मा लावला, व खाण्यासाठीं खिशात मावतील तितकीं बिस्किटें भरून घेऊन गौरीकुंडाला जाण्याची सर्व तयारी केली. शिवाय रामेश्वराचा सेतु गौरीकुंडात अर्पण करण्यासाठीं मी बरोबर आणला होता तो एका खिशात घेतला होता. सर्वांचा निरोप घेऊन मीं आपला मार्ग सुधारला. मला ईशान्य दिशेस वर चढून जावयाचें होतें, त्याप्रमाणें दिशा ध्यानात धरून मी हळु हळु मार्ग क्रमण्यास सुरवात केली. आता मी एकटा च चालत असल्यामुळें चालताना माझे चित्ताला मध्यतरीं विक्षेप होण्याला कांहीं कारण उरलें नव्हतें; ह्मणून मी नामस्मरण करीत ध्येयाकडे लक्ष ठेवून एकसारखा

चाललों होतों. निवळ बर्फावरून चालण्याचा मला हा दुसरा प्रसंग होता. बर्फातून पायवाट देखील दिसत नव्हती. मधून मधून हिमप्रवाह वहात होते. पहाटपासून सकाळ होईतों ह्मणजे सुमारें दोन तीन तास मी एकटा जरी चाललों होतों, तरी मला भय बिलकुल वाटत नव्हतें व थकवाहि आला नाहीं. मोठ्या उत्साहानें व निश्चयानें मी चाललों होतों. ज्या ठिकाणा-पासून चढण लागते, तेथें मी सकाळीं सात वाजतां आलों. तेथें थोडा वेळ थांबून मी बिस्किटें खाल्लीं व थंड पाणी प्यालों; त्या-मुळें पोटात गार झालें. मी हळु हळु बर्फावरून वर चढू लागलों. सहा सात हात वर चढावें व पंधरा वीस मिनिटे विश्रांति घेण्या-साठीं उभें राहावें! एखादे वेळीं त्या बर्फावर च मी मटकन बसत असे! चढताना पाय घसरू लागले तेव्हां हातांत अस-लेली लांब काठीं बर्फांत रोंवावी व तिच्या आधारानें हळु हळु वर चढावें! श्वास जोरानें वाहू लागला. हाताचीं बोटें व तोंड लाल दिसू लागलें. हाताची बोटें थंडीमुळें बधिर झालीं व वळून गेलीं. सुमारें एक वाजता भूक लागलीशी वाटल्यामुळें एका बर्फाचे खडकावर मी बिस्किटें खात बसलों; थंड पाणी प्यालों व चढण्यास पुन्हां प्रारंभ केला. मी जसा जसा वर जाऊं लागलों तस तसा श्वासोछ्वास माझ्यानें नीट करवेना; अंगावर सूज येत आहे असे मला वाटू लागलें; सर्व शिरा टरटर फुगू लागल्या; वारा जोरानें वाहूं लागल्यामुळें थंडी असह्य वाटूं लागली. सुमारें पांच वाजता एका मोठ्या बर्फाचे खडकावर उभा राहून मी सभोंवतालची मजा पहात होतों. तेथून मानस व राकस्ताल हीं दोन्हीं सरोवरें फार च रमणीय दिसत असून "गेरुवा मांधाता"

वगैरे पर्वत शोभिवंत दिसत होते. तसेंच तिबेटची डोंगरसपाटी व त्यांतून सिंधु ब्रह्मपुत्रा, वगैरे नागमोडीनें वहात जाणाऱ्या मोठमोठ्या नद्या ह्याची हि मोठी मौज दिसत होती.

त्या दोन सरोवराचे पलीकडे असलेली पर्वतांची रांग हें च ज्याचें शीर, मानस व राकस्ताल हीं दोन सरोवरें ज्याचे नेत्र, ह्या दोन सरोवरांचे मध्यें असलेला पर्वत ही ज्याची नासिका, सरोवरांपासून कैलास पर्वतापर्यंतची डोंगरसपाटी हें ज्याचें उदर, मधून मधून नागमोडीप्रमाणें वाहणाऱ्या नद्या ह्या च ज्याच्या नाड्या व शिरा व कैलास पर्वतापासून दोन बाजूला गेलेल्या पर्वतांच्या उभ्या रांगा हेच ज्याचे पाय, असे तें परमेश्वराचें विराट स्वरूप पाहून मला फार मौज वाटली व याप्रमाणें त्या मौजेच्या भरांत मी असतांना मला असें वाटलें कीं, माझ्या पायाखालचा खडक हालला. झालें ! येवढी कल्पना मनांत आली तों व मी ज्या खडकावर उभा होतों तो खडक माझ्यासह खालीं चालला आहे असें मीं पाहिलें मात्र, तों आपण आता खास मरणार, अशी कल्पना एकदम मनांत उभी राहिली व मला घेरी आली ! ज्या ठिकाणाहून मी खालीं पडलों, तेथून गौरीकुंड सुमारें पंधरा सोळाशें फूट उंचीवर असावें असें मला वाटतें. रात्री सुमारें नऊ दहा वाजतां जेव्हा मी शुद्धीवर आलों, त्या वेळेस मी आसन्नमरण होऊन कमरेपर्यंत बर्फांत गाडलों गेलेला व पोटावर बर्फाचा पातळ थर असून उताणा पडलेला होतों ! प्रिय बधूंनों, त्या वेळच्या माझ्या स्थितीची आपण फक्त कल्पना कराल तर आपल्या अंगावर शहारे आल्याखेरीज राहणार नाहींत ! मीं डोळे उघ-

ऊन पाहिलें तों वर आकाश स्वच्छ असून तारे चमकत होते; परंतु जिकडे तिकडे काळोख होता त्यामुळें मला दिशाभूल झाली. शेवटीं उजव्या हातात असलेल्या काठीनें अर्धवट थिजलेला बर्फ फोडून स्वतःला मोकळे करून घेतल्यावर मी एकदां उभा राहिलों. त्या वेळेस माझे अंग थोडें थोडें ठणकत होतें. रात्रीची वेळ, आता जावे कोणत्या दिशेनें, अशा पचाइतींत मी पडलों. शेवटीं मनात असा विचार केला कीं उजाडेपर्यंत येथून हालू नये, सकाळीं पाहू काय काय होतें तें. येणेंप्रमाणें विचार ठरल्यावर, मी हातातल्या काठीनें बर्फ उकरून कमरेपर्यंत खोल असा एक खळगा केला, अंगावरचा मोठा कोट काढला, व तो डोक्यावरून पांघरून घेऊन त्या खळग्यात हातपाय पोटाशीं धरून रात्रभर बसून राहिलों. वीस वीस मिनिटांनीं कोटावरचें बर्फ झाडून टाकावें लागत होतें. त्या रात्रीं, मी अगदीं थकून गेलों होतों तरी मला झोंप बिलकुल लागली नाहीं. बर्फांत खळगा करून व वरून पांघरूण घेऊन तेथें बसलें कीं थंडीपासून व विशेषतः तिबेटातील अंगाला झोंबणाऱ्या वाऱ्यापासून बरेंचसें रक्षण होतें असें मीं ऐकलें होतें त्याचा अनुभव तेथें मला घ्यावयास सापडला! सकाळीं उजाडेपर्यंत बर्फ पडत होतें. रात्रभर थंडीत व बर्फांत कुडकुडत असलेला प्राणी त्या सबंध प्रदेशात काय तो मी च! त्या रात्रीं माझे काय काय व कसें कसें हाल झाले म्हणून सांगू! त्या बर्फमय, निर्जन व भयाण प्रदेशात, शुद्धीवर आल्यावर जेव्हा मी उभा राहिलों व इकडे तिकडे पाहू लागलों, तेव्हां मला कांहींएक विचार सुचेना! शून्य दृष्टीनें वर आकाशाकडे पहात च कांहीं वेळ मी उभा होतों.

वर सांगितल्याप्रमाणें खळग्यात, बसल्यावर, मी एकदां घड्याळ पाहिलें. तें बंद पडलें नव्हतें. त्या वेळीं बारा वाजले होते. सकाळीं उजाडल्यावर प्रथम मजजवळ असलेल्या बिस्किटांतून थोडीशीं मीं भक्षण केलीं व वर चढूं लागलों. परंतु दिशाभूल झाल्यामुळें मी खालीं खालीं च जाऊं लागलों. सबंध दिवस बर्फांतून फिरत होतों. गौरीकुंड दिसेना, व माझा क्याप (कुली राहिले होते तें ठिकाण) हि दिसेना! मला वाटलें कीं आपण रस्ता खास चुकलों. चालतां चालतां संध्याकाळ झाली. तेव्हां पुन्हां आदल्या दिवसाप्रमाणें त्या रात्रीं हि बर्फांत च मुक्काम करावा लागला! दुसरा मार्ग च नव्हता. सकाळ झाल्यावर भूक लागली म्हणून, मजजवळ जितकीं बिस्किटें शिल्लक होतीं, तीं सर्व खाऊन टाकलीं, व खालीं उतरण्यास प्रारंभ केला. सूर्यास्तापर्यंत बर्फमय प्रदेशातून सारखा चालत होता! अगदीं थकून गेलों! दिशाभूल झाल्यामुळें कोणीकडे जात आहे हें कळेना! आतां काय करावें असा विचार करीत करीत कैलासचे पायथ्याशीं येऊन पोहोंचलों. तेव्हां रात्रीचा मुक्काम तेथें च केला. भुक लागली परंतु जवळ खाण्यास काय आहे? तशी च रात्र काढली! तिसरा दिवस उजाडल्यावर पायथ्या पायथ्यानें चालूं लागलों. काहीं वेळानें प्रदक्षणेच्या वेळच्या खुणा दिसूं लागल्या तेव्हां मला पुष्कळ धीर आला. तिसऱ्या दिवशीं दुपारीं मी माझ्या तळावर येऊन पोहोंचलों. उपासामुळें, थंडीमुळें व चालण्याच्या श्रमामुळें मी अगदीं थकून जाऊन गोटांत आल्याबरोबर बेशुद्ध होऊन पडलों! सावध झाल्यावर कुलींनीं मला प्रथम खावयास बिस्किटें दिलीं, नंतर कमंडलू भरून ऊन ऊन

चहा प्यावयास दिला. तेव्हां कांहीं वेळानें मला हुषारी वाटली व कुलींशीं मी बोलू लागलों. झालेली सर्व हकीकत इत्थंभूत निवेदन केल्यावर त्यांना फार वाईट वाटलें. नंतर मी त्यांना सांगितलें कीं उद्यां पहाटे तीन वाजतां गौरीकुंडाला जावयास मी पुन्हां निघणार आहें, तर आणखी सात दिवस माझ्यासाठीं तुम्ही येथें मुक्काम करावा. तेव्हां माझे नोकर माझ्या हातापायां पडून हरतऱ्हेनें मला माझे निश्चयापासून व त्यांच्या दृष्टीनें माझ्या हट्टापासून मला परावृत्त करण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु मी माझा हट्ट सोडला नाहीं. माझा निश्चय फिरणें अशक्य होतें. मागील प्रमाणें मी माझी तयारी केली. खिसे बिस्किटांनीं भरून घेतले; पायांना कांबळ्याच्या नवीन पट्ट्या बांधल्या व पहाटे तीन वाजतां कुलींचा निरोप घेऊन मीं मार्ग धरिला. श्रीनारायणकृपेनें मध्यें कांहींएक विघ्न न येतां त्या च दिवशीं संध्याकाळीं साडे पांच वाजतां मी गौरीकुंडाचे कांठावर येऊन उभा राहिलों. तो दिवस शांत व स्वच्छ होता तरी न जाणों मध्यंतरी एखादें अकस्मात संकट उत्पन्न होईल या भीतीनें पहाटे तीनपासून तों संध्याकाळचे साडे पांच वाजे पर्यंत मी एकसारखा प्रवास करीत होतों. फक्त खाण्यासाठीं मी मधून मधून थांबत असे. सुमारें पांच हजार फुट उंचीवर चढून जाण्यास मला इतका वेळ लागला.

गौरीकुंड समुद्रसपाटीपासून सुमारें वीस हजार फूट उंचीवर आहे. गौरीकुंडाचा परीघ सुमारें तीन चार फर्लांगाचा आहे. हें कुंड नैसर्गिक च आहे. ह्या कुंडापासून कैलास शिखर दहा हजार फूट उंच असावें. ह्या ठिकाणीं बर्फाशिवाय

कांहींएक नाहीं. थंडी तर विचारावयास च नको. माझे ओंठ हिरवे निळे झाले; श्वासोछ्वासास फार च त्रास पडूं लागला; हातांचीं बोटें वाकून गेलीं; शिरा फुगूं लागल्या, जिकडे पहावें तिकडे बर्फ च बर्फ! तेवढ्या प्रदेशांत प्राणी काय तो एकटा मी! शहरांत राहणाऱ्या मनुष्याला, त्या ठिकाणीं शांततेचें व थंडीचें निव्वळ जुलमी राज्य आहे असें च वाटेल. कैलासचे शिखरावरून वहात येणारे हिमप्रवाह गौरीकुंडांत पडतात. हे हिमप्रावाह पाहण्याची फार च मौज आहे. गौरीकुंडांत खालीं पाणी असून पातळीवर चार पांच फूट जाडीचा बर्फाचा थर असतो इतकी थंडी! तेथें पाणी तर दिसत च नाहीं. वरील थर जेव्हां भाल्यासारख्या पोलादाचे टोकानें फोडावे तेव्हां पाणी वर येतें. माझ्यानें येथें स्नान करवलें नाहीं. पाण्याच्या पातळीवरील बर्फाचे थरावरून दहा बारा हात आंत चालत गेलों हातांतील काठीच्या टोंकानें बर्फ फोडलें. तेव्हां पाणी वर आल्यावर फक्त मार्जन केलें. परंतु काय! मार्जन करण्यासाठीं म्हणून बोट बुडविलें मात्र! विंचु डसल्याप्रमाणें सणक निघाली व बोट गळून पडलें असें वाटलें. मार्जन करतां करतां पाण्याच्या थेंबांचे लागलें च बारीक बारीक बर्फाचे कण होत असत. इतकी भयंकर थंडी होती; अशा ठिकाणीं स्नान करणें म्हणजे स्वतःस अखेरचें थंड करून घेणें होय. ह्याठिकाणीं रामेश्वराहून आणलेला सेतु मीं टाकला व परत जातांना पाहिलें तों त्यावर बर्फ सांचलेलें दिसलें.

असो. याप्रमाणें केवळ श्रीसद्गुरु महाराजांच्या च कृपेनें माझे हेतु पूर्ण झाले! अतिशय च आनंद झाला. तो आनंद

व्यक्त करण्यास मी असमर्थ आहे. श्रीकैलास, गौरीकुंड, मानस सरोवर ह्या त्रिस्थळींचें दर्शन झाल्यामुळें सर्व श्रम परिहार झाले; चित्त प्रसन्न झालें व जन्माचें सार्थक झालें असें वाटलें. अंतःकरण, मनांत विराम पावलें, मन अंतःकरणा-सह चित्तांत विराम पावलें, चित्त, अंतःकरण व मन ह्यां सह बुद्धींत विराम पावलें, व बुद्धि, अंतःकरण, मन व चित्त ह्यां सह अहंकारांत विराम पावून, अहंकार, अंतःकरण, मन, चित्त, व बुद्धि यांसह स्वरूपीं विराम पावला ! जिकडे तिकडे आनंद च आनंद ! जिकडे तिकडे प्रेम च प्रेम ! जिकडे तिकडे ज्ञान च ज्ञान ! अशा समयीं कसला देह आणि कसलें काय ! सर्व ब्रह्मांड सच्चिदानंदमय दिसलें ! नंतर कांहीं वेळानें देहभानावर आलों व परत फिरलों. दुसरे दिवशीं संध्याकाळीं मी माझ्या मुक्कामाचे ठिकाणीं परत आलों. तेव्हां सर्वांना आश्चर्य व आनंद वाटला. तेथें त्या रात्रीं मुक्काम करून "तीर्थापुरीला" जावयासाठीं दुसरे दिवशीं सकाळीं पाच वाजतां निघालों. तीर्थापुरीला आम्ही दोन दिवसांनीं पोहोंचलों. कैलासचे वायव्य दिशेस हें स्थान आहे. वाटेंत "सतलज" नदी उतरून जावें लागतें. सतलज नदी राक्-स्ताल सरोवरांतून निघून पश्चिमेकडे वहात गेली आहे. तीर्था-पुरीला वस्ति वगैरे कांहीं नाहीं. तेथें एक भस्माचा डोंगर आहे. ह्या च ठिकाणीं सतलज नदीचे कांठावरील वरडींत मला पहिल्या महात्म्यांनीं सांगितलेल्या सत्पुरुषाचें दर्शन झालें. लांबून मला येतांना पाहतां च ते महाशय मजकडे च येत होते; असें पाहतां च मी पळत गेलों व चरणांवर मस्तक ठेवलें. स्मित

वंदन करून त्यांनीं मला "वत्स" ह्मणून हांक मारिली व मला घेऊन आपले गुहेकडे चालूं लागले. माझ्या नोकरांकडे व गुरुनादाकडे त्यांनीं पाहिलें देखील नाहीं. मी जातांना जवळच्या गुहेंत तुह्मी वस्तीस रहा असें त्यांना सांगून मी पुढें गेलों. ही मूर्ति देखील पहिल्या मूर्तिप्रमाणें च होती. मात्र जरा जास्त वयातीत दिसत होती. मुखावर ती च शांतता, तें च गांभीर्य व तें च प्रेम दृग्गोचर होत असून नेत्रात तें च ब्रह्मतेज चमकत होतें. वाणींत हि तें च माधुर्य असून शरीर यष्टि हि तशी च सतेज व सुंदर होती. हे तपस्वी मला येवढें च ह्मणाले कीं आतां तूं हि नेत्र मिटून बैस व मी हि नेत्र मिटून बसतों. तुला आता काय मिळवावयाचें राहिलें आहे बरें ? मीं कांहीं च उत्तर केलें नाहीं. आज्ञेप्रमाणें ध्यानस्त बसलों. ह्या ठिकाणीं हि तीन दिवस सतसमागम घडला. संतसमागमाचा आनंद काय असतो तो मला तेथें अनुभवण्यास सापडला, असो. चवथ्या दिवशीं सकाळीं त्या दिव्य महात्म्याचे चरणांवर मस्तक ठेवून " गारटोक " ला जावयास निघालों. जातांना माझ्या कुलींना व गुरुनादाचा-वाला हि त्या सत्पुरुषाचें दर्शन झालें. गारटोकला जावयास आह्मांला दोन दिवस लागले. गारटोक ही पश्चिम तिबेटची राजधानी असून येथें तिबेटी गरपन ( गव्हरनर ) राहतो. गारटोक हें मोठें गांव असावें अशी माझी कल्पना होती. परतु तेथें गेल्यावर पाहातों तों वस्तुस्थिति अगदीं च निराळी. ताकलाकोटला जितकी वस्ति मला दिसली त्यापेक्षां हि कमी वस्ति गारटोक येथें आहे. येथें हिवाळ्यांत तर कांहीं च

वस्ति रहात नाहीं. येथून जवळ च " ले " म्हणून एक गांव आहे; तेथून तार्तरीमध्यें जाण्याचा रस्ता आहे. गारटोकला जाण्याचा रस्ता केवळ निर्जन प्रदेशांतून आहे. गारटोकला अतिशय थंडी असते. येथें इंग्रज सरकार चा एजन्ट ठाकूर जयचंद हा राहतो. गारटोकला दोन दिवस मुक्काम करून नतर मी आपल्या परत मार्गाला लागलों. तेथून आह्मी ग्यानिमा येथें न जाता पुन्हा मधल्या च वाटेनें ताकलाकोटला आलों. येवढ्या प्रवासांत माझी प्रकृति उत्तम राहिली होती. मात्र प्रवासाचे दगदगीमुळें व खाण्यापिण्याचे गैरसोयीमुळें शरीर फार कृश झालें होतें. एक दिवस रात्रौं बर्खातर्जनला मला मोठाले दोन जुलाब झाले. ताकलाकोटला परत जाताना राकस्तालचे आसमंत भागात आमचे फार च हाल झाले.

गारटोक व बर्खातर्जन ह्यांमधील प्रदेश अगदीं निर्जन आहे हें वर सांगितलें च आहे. आह्मी बर्खातर्जनला येत असतां वाटेंत अत्यंत भयंकर वादळांतून आह्माला चालावें लागलें. आमच्या उलट दिशेनें वारा फार च जोरानें वाहूं लागला. तो वारा अंगाला नुसता झोंबत होता, येवढें च नव्हे तर त्यामुळें आमचा श्वासोच्छ्वास हि नीट होत नव्हता. आमचे प्राण कासावीस होऊं लागले; जीव कोंडून गेला; डोळ्यांत व नाकातोंडात धूळ गेल्यामुळें नीट चालता येईना व पुढचें दिसेना. आकाश काळ्याभोर मेघानीं अगदीं भरून गेलें. तेथून बर्खातर्जन सुमारे पाच मैल राहिलें होते. ह्या वेळेस दुपारचे चार वाजण्याचा समय होता. शेंदोनशें हात

मोठ्या कष्टानें कसें तरी चालत गेलों; मग पाऊल च पुढें पडेना ! एक पाऊल पुढें टाकलें कीं वाऱ्याच्या जोरानें दोन पावलें आह्मी मागें हटत होतो. इतका भयंकर वाऱ्याचा जोर होता. जिकडे तिकडे धूळ च धूळ; त्यामुळें सर्व दिशा अगदीं धुंद झालेल्या होत्या. आह्मी चालत होतों तें सपाट मैदान असल्यामुळें, निवाऱ्याची एखादी जागा आह्मांस सांपडेल अशी आशा च नव्हती. आमच्यानें पुढें नीट तर चालवेना; अगदीं निरुपाय झाला ! वाऱ्याच्या झोतामुळें आमची चालण्याची दिशा बदलूं लागली. नीट पूर्वेस जावयाचें तें आह्मी दक्षिणेकडे झुकूं लागलों. शेवटीं निरुपाय ह्मणून आह्मी गुडघे टेंकून खालीं बसलों, माना खालीं करून तोंड दोन्ही गुडघ्यांत खुपसलें व त्यावर हात ठेवून जमिनीवर पालथें पडून राहिलों. आमच्या अंगावरून रेतीचे लोळचे लोळ चालले होते व सोसाट्याचा वारा एकसारखा वाहात होता. अशा स्थितींत आह्मीं तीन साडे तीन तास काढले ! वादळ थोडेंसें शांत झाल्यावर आह्मीं प्रवास करण्यास पुन्हा सुरवात केली व सुमारें नऊ वाजतां बर्खांतजेंनला येऊन पोहोंचलों.

सुमारें बारा तास आह्मी वर सांगितल्याप्रमाणे वाऱ्यांत चालत होतों. बर्खांतजेंनला मुक्कामावर आलों ह्या वेळेस तेथें सरकारी पोष्टाच्या घरात मला राहण्यासाठीं जागा मिळाली होती. एका रात्रीचें भाडें दोन आणे दिलें. ह्या रात्रीं मीं कांहीं च आहार केला नाहीं. मी अगदीं थकून गेलों होतों. नुसता चहा घेतला व निजून राहिलों. सकाळीं उठल्यावर बरें वाटलें.

नंतर ताकलाकोटला जाण्यासाठीं तेथून आम्ही दुसरे दिवशीं पहाटे पांच वाजतां निघालों त्या च वेळेस " खोचरनाथ " येथील एक लामा कातडीं खरेदी करण्यासाठीं बर्खातर्जनला आलेला होता, तो हि आमचे बरोबर निघाला. त्याच्या बरोबर देखील कातड्याचें ओझें वाहण्यासाठीं एक गाढव च होतें. सकाळीं वादळाचें वगैरें कांहींएक चिन्ह दिसत नव्हतें. सात वाजतां फराळासाठीं आम्ही पाणी पाहून मैदानात च मुक्काम केला. सुमारें अकरा वाजेपर्यंत त्या दोघा तिबेटी लोकांचें जेवण चाललें होतें, तोंपर्यंत आम्ही आकाशाकडे व सभोंवार इकडे तिकडे कांहीं वेळ पहात बसलों. नतर माझे कुली व गुरुनादा घोंगड्या अंगावर घेऊन निजले. मी डोळे झांकून उन्हामध्यें स्वस्थ बसलों. ह्या वेळेस छत्री देखील मजजवळ नव्हति. आम्ही तेथ मुक्काम केला होता तेवढ्या अवकाशात " ल्हासाचे " तीन तरुण लामा कैलासचे यात्रेसाठीं जात होते, त्यांनीं हि तेथें च मुक्काम केला. त्याचा पोषाख मोठा मजेचा होता. डोक्याला उंच टोंकाची बनातीची तांबड्या रंगाची टोपी, अगात तशा च रंगाचा बखु, पायात दोकच्या व हातात लाल रंगाचें निशाण असलेला भाला. त्या तिघांपैकीं एक गुरु व दोन शिष्य होते. जवळ आल्याबरोबर त्यांनीं तिबेटी भाषेंत धर्मग्रंथातील कांहीं पाठ म्हटला व हातात लाकडी भिक्षापात्र होतें तें पुढें केलें माझ्या वाटाड्यानें व त्या लामानें त्याना एक एक मूठ सत्तु दिला. आम्ही जाईंतों ते हि जेवण करीत बसले होते.

सुमारें बारा वाजता पुढें चालूं लागलों. पंधरा मिनि-

यांनीं आकाशांत ढग दिसू लागले. नंतर कांहीं वेळानें वारा हि सोसाट्याचा वाहूं लागला. मला वाटलें गारांचें वादळ आता लवकर च सुरूं होणार. राकस्तालच्या वायव्य किनाऱ्यावर असणाऱ्या पर्वताचे पायथ्याशीं येऊन आह्मी पोहोंचतों न पोहोंचतों तों धाड धाड गाराचा वर्षाव सुरू झाला. कसली विश्रांति आणि कसलें काय. ह्या समयीं आह्मा सर्वांना गाराचा मारा अतीशय च असह्य होत होता. सर्वांच्या पुढें माझा बाटाङ्या व त्याचें अयन कृश झालेलें व आसन्नमरण झालेलें तें बिचारें गाढव चाललें असून त्याचे शेजारी आमच्या सगतीचा तरूण लामा च त्याचें गाढव, चाललें होतें. त्याच्या पाठोंपाठ च मी स्वतःशी च रममाण होऊन मधून मधून तें वादळ अवलोकन करीत हळु हळुं चाललों होतों. माझ्या मागें सुमारें पंधरा वीस हाताचे अंतरावर गुरुनादा बावा अगदीं हताश झालेला व अगदीं दमून गेलेला असा खालीं मान घालून चालला असून त्याचे पाठोपाठ च माझे कुली त्याला धीर देत देत चालले होते. अजमासें अर्धी चढाई चढून येतों तों वादळाचा अगदीं कळस झाला ! एक पाऊलहि पुढें टाकवेना. आह्मी सर्वजण एकत्र असे जवळ जवळ खालीं डोकीं करून उभे राहिलों. गुरुनादा धाडकन जमिनीवर हागन्ने गाराच्या थरावर पडला ! त्यानें डोळे पांढर केले ! मारपली बावानें मला एक औषध देऊन ठेवलें होतें तें लागलेंच खिशातून काढून मी गुरुनादा बावाचें तोंडात सगळें घातलें. गाराचें वादळ कमी झालें नव्हतें, पूर्ण भर होता ! कांहीं वेळानें गुरुनादाला बरें वाटलें. तो शुद्धीवर आला. माझ्या एका तरुण

कुलीनें व तरुण लामानें बावाला दोन्ही बाजूंनीं धरून उभें केलें. बावाच्यानें एक पाऊल टाकवेना येवढें च नव्हे तर उभे देखील रहा वेना ! मला मोठा विचार पडला. शेवटीं मी विचार केला कीं येथें बादळांत उभे राहण्यात बिलकुल फायदा नाहीं; पुढें चालावें हें च चागले. एका कुलीनें व लामानें बावाला उचलून घेतलें व पुढें हलु हलु चालूं लागले. माझ्या वाटाड्यानें दोन्ही गाढ-वाची काळजी घेण्याचें पत्करिलें. चढाई चढून आम्ही पर्व-ताचे शिखरावर आलों. वादळ थांबतें मी. राक्षसताल दिसूं लागलें, मानस सरोवर दिसू लागलें. मागें पाहिलें तों श्री कैलास हि थोडा थोडा दिसत होता. येवढ्या भयंकर वादळात हि निसर्गदेवीनें आपल्या सौंदर्यानें माझें मन व चित्त मोहून टाकलें. आकाशाकडे पहाण्याची तर सोय च नव्हती कारण वरूनं एकसारखा गारारूपी गोळ्यांचा आमच्यावर वर्षाव चालला होता. खालीं जमिनीकडे पहावें तों सगळी डोंगर सपाटी पांढरी सफेत दिसत असून असें वाटे कीं जिकडे तिकडे कापसाची च जमीन आहे. उजव्या बाजूला पहावें तों काय ती राकसतालची शोभा ! त्या अफाट जलसमूहाचे पाण्यात टपटप गारा पडत त्यावेळेस बुडबुडे वर येत व वर्तुळाकार लाटा उत्पन्न होऊन त्या पुन्हा लीन होतात न होतात तों नवीन ऊर्मी तेथें दिसू लागत. सर्व सरोवरभर बुड-बुडे व त्या वर्तुळाकार ऊर्मी. गारा जलात पडतांना जे बारीक बारीक तुषार उडत ते मौक्तिकाप्रमाणें दिसत असत. जिकडे तिकडे पाण्यावर दिसत असलेले बुडबुडे मला काचेचे पोकळ फुग्याचे दिव्याप्रमाणें दिसत असत. सभोंवार पांढरी सफेत

जमीन व मध्यें तें निळें पाणी. अत्यंत मोहक देखावा त्यावेळचा होता, ह्यांत कांहीं संशय नाहीं. बरें डावे बाजूस पहावें तर त्या पवित्र वर्तुळाकार व अफाट मानस सरोवराचे पुर्वेकडील अर्ध वर्तुळावर सूर्य किरणें पडून तें अर्धे वर्तुळाकार सरोवरांतील जल व त्यांतील जलतरंग अगदीं चम चम चमकत असून पश्चिमेकडील अर्ध वर्तुळाकार जलावर मेघांची छाया आल्यामुळें अतीशय शांत व गंभीर दिसत होतें. मानस सरोवराकडे बादळ नसल्यामुळें त्यांतील लांबून दिसणारें तें जल कसें अगदीं शांत दिसत होतें. त्यामुळें ती एक निराळी च मौज दिसत होती. मी थंडी, वारा, गारा वगैरे सर्व विसरून गेलों. सर्व लोक त्या डोंगर सपाटीवरून माझे पुढें चालले होते. ते बरे च पुढें गेलेले होते व मी त्या सर्व शक्तिमान अशा अनंत ब्रह्माण्डनायकाच्या अगाध शक्तीचें कौतुक करीत करीत त्या बादळांतून हळु हळु व सभोंवतालची शोभा पहात पहात चाललों होतों. माझ्यात व त्यांच्यांत बरें च अंतर पडलें. सर्व लोक उतार उतरावयास लागले होते. त्या वेळेस मी पर्वताचे माथ्यावर च होतों. गारांचें बादळ कमी कमी होऊं लागलें व कापसाप्रमाणें मऊ मऊ बर्फ पडण्यास प्रारंभ झाला. चालतांना आमचे अंगावर तें मऊ मऊ बर्फ पडे व थिजावयास लागे. आह्मी वारंवार अंगावरचें बर्फ झाडून टाकीत असू. उतार उतरून पर्वताचे पायथ्याशीं राकस्तालचे कांठावर आह्मी संध्याकाळीं पांच वाजतां येऊन पोहोंचलों. ह्या वेळेस बर्फ हि थोडें थोडें च पडत होतें. आह्मी सर्व जण विश्रांति घ्यावयास कांहीं वेळ बसून सुमारें दीड मैलावर एक चार पांच माणसांस बसतां

येईल अशी डोंगराची कपार होती त्या कपारींत रात्रीचा मुक्काम करण्याचे हेतूनें राहिलों. कपारीमध्यें मोठ्या प्रयत्नानें आम्ही विस्तव पेटविला. चकमकीची रुई सर्द होऊन गेल्यामुळें विस्तव पेटविण्यास आम्हाला तीन तास पर्यंत श्रम करावे लागले. जागा हि ओलसर, काटेरी झुडुपें हि ओलीं; व चकमकीची रुई दमट. मोठ्या प्रयत्नानें विस्तव पेटविल्यावर चहा तयार केला व आहार वगैरे करून रात्रौ नऊ वाजतां आम्ही धरणीवर देह टाकले. रात्री मला झोप मुळींच लागली नाहीं. पहाटे मी सर्वांना उठविले. प्रातर्विधी आटोपून चहा वगैरे घेऊन पुढचा रस्ता सुमारें आठ वाजता सुधारला. सकाळपासून च आकाश अभ्राच्छादित होतें. राकस्तालचे पूर्व किनाऱ्याने आम्हीं चाललों होतों. दक्षिण किनाऱ्यावरील डोंगर चढून डोंगर सपाटीवर आलों तों पाहतों वादळ वगैरे कांहीं एक नव्हतें. कैलास पर्वत, व गेरवामधाता पर्वत अगदीं स्पष्ट दिसत होते. ह्यावेळस आकाश निरभ्र असून माध्यान्हीचें कडक ऊन पडलेलें होतें. कैलास पर्वताचें शेवटचें दर्शन घेऊन आम्ही पुढें चालूं लागलों. सुमारें पाव एक मैल आम्हीं जातों न जातों तों माझा वाटाड्या एकदम खालीं बसला. त्याला काय झाले हें पाहण्यासाठीं आम्ही बाकीचे त्याच्या सभोंवती उभे राहून त्याच्याकडे पहात त्याला विचारू लागलों. त्यानें खुणेनें सांगितलें कीं कपाळ अतीशय दुखतें. त्याचे डोळ्यातून पाणी वाहू लागलें. त्याच्यानें वर बिलकुल पहावेना. जमिनीवर तो पालथा पडून राहिला. काळीं मिरीं व गूळ त्याला खावयास दिलीं परंतु त्याला बरें

वाटेना. त्यानें सांगितलें कीं तुह्मी हळूं हळूं पुढें चालूं लागा मी येथें थोडा वेळ निजतों. बरें वाटलें कीं येतों. आह्मी चालूं लागलों. मागें बऱ्याच लांब अंतरावर तो येत आहे असें आह्मी पाहिलें. सुमारें दोन वाजतां वारा जोरानें वाहण्यास प्रारंभ झाला. आह्मी ज्या दिशेकडे ह्मणजे दक्षिणेस चाललों होतों, त्या दिशेच्या उलट दिशेनें ह्मणजे आमच्या तोंडावर वारा वाहत होता. संध्याकाळचें सात वाजे पर्यंत आमचे त्या वाऱ्याच्या योगानें फार हाल झाले ! आमचीं गात्रें अगदीं गळित होऊन गेलीं होतीं ! तोंडें सुकून गेलेलीं होतीं व पायांत पेटक्या येऊं लागल्या ! आमच्या पेक्षा त्या तरुण लामाला त्रास पुष्कळ च कमी झाला, कारण तो तिकडचा च होता. शिवाय सवा महिन्याच्या प्रवासाचें दगदगीनें आह्मी फार अशक्त झालेला होतों मी तर फार च अशक्त झालेलों होतों. संध्याकाळीं साडे सात वाजता आह्मी " रुगवंग " नावाच्या एका लहान खेड्याजवळ आलों.

ह्या दिवशीं दिवसभर आमचे सर्वांचे च हाल झाले खरे, परंतु त्यातल्या त्यांत माझ्या तद्देशीय वाटाड्याचे फार हाल झाले. त्याची प्रकृति फार च बिघडली होती, तशांत भयंकर वाऱ्यात त्याला त्या दिवशीं चालावें लागलें त्यामुळें त्याला ताप भरला. चालतांना त्याचा झोंक जात असे. दुसऱ्याच्या मदतीवाचून त्याच्यानें चालवेना. माझ्या कुलीच्या व त्या तरुण लामाच्या मदतीनें आह्मी त्याला रुगवंग पर्यंत तर आणलें. एक स्वच्छ पाण्याचा प्रवाह वाहात होता त्याचे कांठीं आह्मी राहिलों. खाणें आटोपल्यावर आह्मी मैदानांत

तसें च पडून राहिलों. मला झोप लागेना. वाटाड्या व गुरुनादा मोठमोठ्यानें कण्हत होते. तें त्यांचे कण्हणें ऐकून मला फार वाईट वाटलें ! त्यांच्या जवळ थोडा थोडा वेळ बसून मी माझ्या अंथरुणावर ( घोंगडीवर ) येऊन बसलों. सकाळीं उठल्यावर दोघांना हि बरें वाटलें. प्रातःकाळीं चहा वगैरे घेतल्यावर वाटाड्याला बरी च हुषारी वाटली. दुपारचे बारा वाजेतों आम्ही तेथें च मुक्काम केला. एक दोन वाजतां ताकलाकोटला जाण्यासाठीं आम्ही रुगबग सोडलें. सध्याकाळीं सहा वाजतां सवा महिन्यापूर्वीं ज्या वडारांत ( गुहेंत ) आम्ही उतरलों होतों तेथें येऊन पोहोंचलों. ही गुहा " कर्नाळी " नदीचे काठावर आहे. येथें आल्यावर आमच्या बरोबरचा लामा खोचरनाथला गेला. वाटाड्या आपल्या भारवाहकाला घेऊन घरी गेला व आम्ही चौघे जण ताकलाकोटला जावयास निघालों. सात वाजण्याचे सुमारास आम्ही ताकलाकोट येथें एक भुटिया व्यापारी माझे परिचयाचा होता त्याचे तंबूत येऊन पोहोंचलों. ताकलाकोटला येतांना वाटेंत मला एक मोठा रेंच झालेला होता त्यामुळें मी अगदीं गळून गेलों होतों. त्या व्यापाऱ्याचे तंबूत येतां च मला घेरी आली व सुमारें पाव तास मीं स्वस्थ पडून होतों. कांहीं वेळानें मला बरें वाटलें. काळीं मिरीं व खडीसाखर त्या व्यापाऱ्यानें मला दिली. ती खाऊन थंड पाणी प्यालों; मग मला चांगली च हुषारी आली. त्या च व्यापाऱ्याचें दुसरें एक पाल होतें त्यांत माझी राहण्याची सोय झाली.

मानस सरोवराला जाण्याचे समयीं ह्या ठिकाणीं बिल-

दा. क्र. (१६४)

कुल [illegible] असे पांच सहाशें तंबूंचे एक गाव च बसलेलें होतें. ब्यास, दार्मा, चौदास वगैरे पट्टीतले भुटिया व्यापारी हिंदुस्थानांतून गरम कापड, किराणा, पोंवळीं, काहीं मोती, धान्य वगैरे व्यापाराचे जिन्नस घेऊन आलेले होते. त्या तंबूंचे गावांत जिकडे तिकडे सामानानें लादलेल्या बकऱ्या, झुबु, याक, घोडीं दिसत होतीं. सामानानें भरलेल्या लहान मोठ्या गोण्यांचे व्यवस्थित रीतीनें रचून ठेवलेले ढीगचे ढीग दिसत होते. व्यापाराच्या मोसमाची सुरवात होण्याचा तो समय असल्यामुळें हुणिया, झुमली, भुटिया वगैरे लोकांची रहदार सुरू होत चालली होती. ताकलाकोट व ग्यानिमा ह्या दोन ठिकाणीं हें चार महिने—जुलई, आगस्ट, सप्टंबर व आक्टोबर—मडई भरते. ह्या वेळेस बरी च देवघेव होते. ताकलाकोट येथें मालावर जकात घेतात. जोहार पट्टीतील भुटिया ग्यानिमा येथें जातात, कारण " जोहार " घाटानें त्यांना येण्याचा रस्ता आहे व तेथून ग्यानीमा जवळ आहे. जोहार परगण्यांतील भुटिया लोक ब्यास पट्टीतील लोकांपेक्षां जास्त सुशिक्षित आहेत.

ताकलाकोटला एक दिवस मुक्काम करून मी खोचरनाथला गेलों. हें स्थान ताकलाकोटचें पूर्वेस बारा तेरा मैलावर आहे. खोचरनाथला जातांना वाटेंत आह्माला दोन तीन खेडीं लागलीं. चार पांच घरांची वस्ती प्रत्येक खेड्यात असे. वाटेनें जातांना चार पांच हिरवेगार वृक्ष आह्माला दिसले. पश्चिम तिबेटात वृक्ष असे मला येथें च प्रथम दृष्टीस पडले. खोचरनाथला राममंदीर आहे. मंदीर बौद्ध चालीचें असून पूजा वगैरे त्या च पद्धतीनें होते. पुजारी

एक लामा च आहे. मंदीर मोठें असून बरें च पुरातन कालाचें दिसतें. कर्नाळी नदीचें काठीं च हें स्थान असल्यामुळें ह्याला थोडीशी शोभा आलेली आहे. नदीला घाट वगैरे कांहीं नाहीं. राम लक्ष्मण व सीता ह्यांच्या मूर्ति सुमारें सहा फूट उंच असून त्या पंचधातूच्या केलेल्या आहेत. सिंहासन हि त्याच धातूचें केलेलें आहे. ह्या सिंहासनावरील नक्षीचें काम पाहण्यासारखें आहे. येथें बौद्धधर्मग्रंथांचें एक पुस्तकालय आहे. ह्या देवळांत रावण, काली, वगैरे राक्षस व देवता ह्यांच्या व दुसऱ्या पुष्कळ मूर्ति आहेत. देवळाचे भोंवतीं तट आहे. आंत सभोंवतीं पटांगण आहे. एक रात्र मुक्काम करून आह्मी ताकलाकोटला परत आलो. ह्या दिवशीं ताकलाकोटला धर्मग्रंथांची मीरवणूक निघालेली होती. सुमारें पांच सहाशे ग्रंथ रंगीत लाकडी पेटींतून घातलेले होते. प्रत्येक स्त्रीनें एक एक पेटी डोक्यावर घेतलेली होती; व नवीन पोषाख केलेल्या त्या स्त्रिया रांगेनें एका मागून एक चालल्या होत्या. पुढें ढोल वाजत होते. पुरुष चित्रविचित्र पोषाख करून पुढें, मागें व बाजूनें घोड्यावर बसून चालले होते. परकीय प्रवाशाला तो देखावा मौजेचा दिसतो.

ताकलाकोटला आल्यावर दोन दिवस मुक्काम होता. एके दिवशीं सध्याकाळीं झुपन एका व्यापाऱ्याचे दुकानीं आला असतां त्याची व माझी गांठ पडली. मला कुशलप्रश्न विचारल्यावर माझ्याकडे पाहून तो ह्मणाला तुह्माला तिबेटची हवा चागली मानवलेली दिसते. "ल्हासाला" जर तुह्माला यावयाचें असेल तर एक वर्ष मज जवळ खुशाल

आनंदांत रहावें व पुढचे वर्षी मजबरोबर ल्हासास यावें. तुम्हाला बिलकुल त्रास होणार नाहीं. मी त्याच्या चांगुलपणा-बद्दल आभार मानले व सांगितलें कीं आपल्या ऋणण्याप्रमाणें एक वर्ष मला आतां राहता येणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत परत यावयास ताकलाकोटहून मी सकाळीं पांच वाजतां निघालों. सवा रुपाया भाडें देऊन एक झुबु बरोबर घेतला. मी फार च अशक्त झालेला होतों परतु प्रकृति निकोप होती. झुबु कालापाणीपर्यंत च घेतलेला होता. "लिपु" घाटाचे रस्त्यानें जाण्याचा विचार केला होता. लिपुघाटाचे खिंडींत मी दुपारीं साडेबारा वाजतां येऊन पोहोंचलों येथें तिबेटची हद्द संपते. हा घाट सतरा हजार फूट उंचीचा आहे. लिपुघाटाचे माथ्यावर उभें राहून मी एकदा तिबेटचे बाजूस व एकदां हिंदुस्थानचे बाजूस पाहिलें. सुमारें पंधरा वीस मिनिटें माझें अवलोकन चाललें होतें. लिपुघाटांत ह्या वेळीं बर्फ फार नव्हतें. हा घाट तिंकर घाटापेक्षां सोपा असून जास्त रमणीय आहे. तिबेटात जातांना हिंदुस्थानांत कडक उन्हाळा होता. परत आलों त्या वेळीं पर्जन्य काल लागलेला होता. हिमालय पर्वताची शोभा ह्या वेळेस निराळी च झालेली होती. कालापाणीला येतांना वाटेंत जंगली गुलाबांच्या झाडाचे ताटवे फुलले होते. शुभ्र, गुलाबी, तांबडा, पिंवळा, अशा निरनिराळ्या रंगाची गुलाबाचीं फुलें नेत्रास आनंदवीत होतीं. शिवाय इतर नाना तऱ्हेच्या व नाना रंगाच्या जंगली फुलांचे ठिक-ठिकाणीं गालिचे च पसरून ठेवलेले आहेत कीं काय, असें

वाटत होतें. देवदारु, ओक व भूर्ज पत्राचे वृक्ष हिरवेगार दिसत होते. तांदूळ, मुंडवा, जव वगैरे धान्यांचीं तीं हिरवीगार शेतें पाहून चित्तास फार च आनंद वाटला. तिबेटांत एक दीड महिन्यात हिरवें पान देखील पहावयास मिळालें नव्हतें. कैलास, मानस सरोवर वगैरे स्थळीं अवलोकन केलेलें सृष्टिसौंदर्य व हिमाचलातील हें सृष्टिसौंदर्य ह्या दोहोंचें स्मरण मी आजन्म विसरणार नाहीं. येवढें च नव्हे परतु जेव्हां जेव्हां मला ह्या स्थलांचा देखावा डोळ्यापुढें दिसतो तेव्हां तेव्हां मला आनंद होतो व परमेश्वराचे ठिकाणीं माझें चित्त विराम पावतें.

हिमालयांतील हि वर्षाऋतूची शोभा अवलोकन करून माझें चित्त फार च प्रसन्न झालें. अशा रीतीची हिमालयाची शोभा पहात पहात सावकाशपणें मार्गक्रमण करीत असता वाटेंत एक नदी लागली. नदी ओलाडून गेलों. पुढें सुमारें पधरा वीस फूट उचीची खडी चढाई चढून जात असतां झुबुवर बसण्यासाठीं जें खोगीर बाधलें होतें तें त्याचे पाठीवरून सरकलें, व मी एकदम खालीं पडलों. नदींत च पडावयाचा, परतु थोडक्यात बचावलों. काळ आला होता पण वेळ आलेली नव्हती, येवढेंच खरें. सध्याकाळीं सहा वाजता आह्मी काळापाणी येथें आलों. येथे शुद्ध जगल आहे. दाट झाडी असून प्रदेश जरी रमणीय व शात आहे तरी भय वाटतें. कालीगगेचा उगम येथूनच झालेला आहे. उगमाजवळ एक देवीची मूर्ति आहे. शेतातील एका खळ्यांत आह्मी मुक्काम केला. कालापाणी येथील जगल फार गमतीचें आहे. आह्मी जेथें मुक्काम केला

होता तेथें स्वच्छ जलप्रवाहाचें सुंदर जाळें पसरलेलें होतें. सभों-वृती देवदारू वृक्ष असून, मधून मधून हिरव्यागार वेलींचे जणूं-काय पडदेच टांगलेले होते. ह्या ठिकाणीं माझ्या कुलीनें गव्हाची रोटी व मसुरीच्या डाळीची आमटी तयार केली. आम्ही तेथें आनंदानें भोजन केलें. जेवण झाल्यावर सभोंवतालची वनश्री व गगनचुंबित पर्वत ह्यांची शोभा अवलोकन करीत जंगलामध्यें गंगेच्या कांठा-कांठानें ईश्वरचिंतनांत निमग्न होऊन आनंदानें मी इकडे तिकडे फिरत होतों. कुली भोजन आटोपून धूम्रपान कर-ण्यासाठीं गंगाकिनाऱ्यावरील एका वृक्षाखालीं आराम करीत स्वभाषेंत ( पहाडी भाषेंत ) एकदर प्रवाससंबंधीं व घरच्या भावी सुखासंबंधीं बोलत बसलेले माझे नजरेस पडले. मी त्याचे जवळ येऊन तुम्ही काय बोलत बसला आहांत, प्रवास कसा काय झाला वगैरे संबंधीं दोन चार शब्द बोलून मी पुन्हा दुसरीकडे निघून गेलों. अशा रीतीनें संध्याकाळचा तो एक दिड तास मोठ्या आनंदांत घाल-विला. अंधार पडूं लागला व पर्जन्यास हि प्रारंभ झाला. मी झोपडींत आलों व घोंगडीवर स्वस्थ पडून राहिलों. सुमारें पांच वाजतां उठून शौच मुखमार्जन आटोपलें व कुलींना उठवून मी जंगलांत आदल्या दिवसाप्रमाणें चहा तयार होईतों फिरावयास गेलों. ताकलाकोट व कालापाणी यांचे मध्यें सुमारें पंचवीस तीस मैलाचें अंतर असावें. चहा वगैरे घेऊन गर्बियांगला जाण्यासाठीं आम्ही सकाळीं आठ वाजतां काळापाणी सोडलें.

गर्बियांगला जावयासाठीं दोन रस्ते आहेत. एक काली पारचा, नेपाळचे हद्दींतून व दुसरा गुंजीकडून ह्मणजे कालीगंगा नदीचे अलीकडच्या कांठानें. कालीपारच्या रस्त्यानें तीन साडे-तीन मैलाचा फेरा पडत नाहीं. आह्मी कालापाणीपासून दोन मैलांवर कालीगंगा उतरून नेपाळचे हद्दींत शिरलों. गंगापार जावयास पूल ह्मटला ह्मणजे सागाच्या मोठाल्या दोन तुळया ह्या कांठावरून त्या कांठावर टाकलेल्या आहेत. पात्र लहान च आहे.

वर्षाऋतूंतील हिमराजाची शोभा फार च आल्हाददायक व सुंदर असते. परंतु ह्या दिवसांत हिमालयांत प्रवास करणें फार च त्रासदायक व धोक्याचें असतें. कालापाणीहून काली-गंगेच्या कांठाकांठानें च जावें लागतें. भूर्ज, देवदारु, ओक, चीड वगैरे वृक्षांच्या दाट जंगलांतून रस्ता आहे, त्यामुळें हिर-व्यागार वृक्षांच्या छायेमधून चालावें लागतें; अशा त्या सुंदर रस्त्यानें मी प्रवास करीत होतों; तो प्रातःकाळचा समय होता; थंड, आनंददायक व मंद मंद वायु वहात होता; दोन्ही बाजूंला लांब-वर गहूं, मुडवा, मकई, वगैरे धान्याचीं हिरवींगार शेतें दिसत होतीं. पर्वतशिखरावरून जागजागीं थंड, स्वच्छ व मधुर जलाचे प्रवाह जोरानें खालीं पडत होते; गंगेचा शांत व गंभीर असा घो घो शब्द सतत चालू होता, सभोंवतालच्या शेतां-तून व अरण्यातील वृक्षांवरून पक्षी मंजुळ व गोड शब्द करीत तिकडे इकडे आनंदानें विहार करीत होते; एखाद्या कड्यावर सहज दृष्टि गेली कीं तेथें एखादा कस्तुरीमृग चंचल दृष्टीनें इकडे तिकडे पहात उभा असलेला प्रवाशी जनांना दिसे; गगनचुंबित पर्वतशि-खरांकडे दृष्टि फेंकली कीं काळेभोर व पांढरे स्वच्छ मेघ इकडून

तिकडे आकाशांत धावतांना दिसत होते; जिकडे पहावें तिकडे भूदेवी ही नाना तऱ्हेच्या सुंदर पुष्पलतांनीं सुशोभित झालेली व हिरवीगार दिसत होती; त्या वेळीं सर्वत्र एकांतपणाचें साम्राज्य दिसत होतें. माझे कुली माझ्या मागून हळु हळु येत होते. त्याच्या अगोदर अर्धा तास मी एकटा च पुढें निघून गेल्यामुळें त्यांच्यांत व माझ्यांत एक मैलाचें अंतर पडलें होतें. सभोंवतालचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत गंगेच्या काठानें मी सावकाश चाललों असतां, मला आनंदाच्या व [illegible]

आपल्याशीं च गुणगुण करीत व मधून मधून मोठ्यानें गात मी चाललों होतों. कांहीं वेळानें एका दाट व थंड अशा वृक्षछाये-खालीं येऊन पोहोंचलों. तेथें गंगेच्या गंभीर जलप्रवाहाकडे पहात कांहीं वेळ उभा राहिलों. नंतर नेत्र मिटून एकदम त्या वृक्षाचे बुंध्याशीं स्वस्थ बसलों; तों माझें चित्त एका क्षणांत एकाग्र झालें व मी देहभान विसरलों. डोळे उघडून पाहतों तों कुली माझ्या पासून कांहीं अंतरावरील दुसऱ्या एका वृक्षाखालीं विश्रांति घेत व धूम्रपान करीत मजकडे पहात बसलेले आहेत असें दिसलें. मला वाटते त्या स्थितींत मी एक दीड तास होतों. या चिंतनानें मला अतिशय आनंद झाला.

असो, छांगरु गांवाला मी सुमारें अकरा साडे अकरा वाजता पोहोंचलो. येथें गुरखाली पोलीसची चौकी आहे. हे पोलीस मला पूर्वीपासून ओळखीत होते. त्यानीं मला संध्या-काळपर्यंत तेथें राहण्याचा आग्रह केला. त्यांच्या इच्छेनुसार मीं तेथें मुक्काम केला. येथून गर्बियांग एक मैल आहे. कुलींनीं स्वैंपाक केल्यावर मीं भोजन केलें. दोन प्रहरीं विश्रांति घेऊन

सुमारें पांच वाजतां गर्बियांगला जाण्यासाठीं मी निघालों. सुमारें अर्ध्या तासांत आम्ही गर्बियांगला पोहोंचलों. त्या च दिवशीं खालून पोलिटिकल पेष्कार कुमार जगतसिंग पाल हे हि तेथें आले. मी व ते बंगल्यांत राहिलों. गर्बियांगला माझा पांच दिवस मुक्काम झाला. माझ्या परिचयाच्या तेथील सर्व मंडळीस मी सुखरूप आलेला पाहून आनंद झाला. दीड महिन्यात त्यांना माझें कुशल बिलकुल कळलें नव्हतें, असो.

कुमार जगतसिंग "कुटी" "नावी" "गुंजी" वगैरे ठिकाणीं जावयास निघाले. त्याचे बरोबर मी हि निघालों. ह्या समयीं मीं माझ्या एका कुलीला रजा दिली. तरुण कुली मात्र मजबरोबर ठेवला होता. तो शेवटपर्यंत ह्मणजे काथगोदाम रेल्वे स्टेशनवर मी येईतों मजबरोबर होता. पोलिटिकल पेष्कारबरोबर मी गेल्यामुळें मला बिलकुल त्रास झाला नाहीं. त्यांची छावणी जेथें पडे तेथें जवळ च माझा हि तंबू असे. गर्बियांगपासून कुटी वीस मैल आहे. हें खेडें सुमारें तेरा हजार फूट उंचीवर आहे. गावांत दीडशें घराची वस्ति असून येथील भुटिया लोक श्रीमंत आहेत. सभोंवार फार च सुंदर देखावा आहे. आमचा मुक्काम येथें तीन दिवस होता. कुटीला जाण्याचा रस्ता मात्र फार वाईट आहे. ह्या गावापासून सुमारें पंधरा मैलांवर " ज्युलिंगकांग " ह्मणून एक दर्शनीय स्थान आहे. ज्युलिंगकांग कुटीचे पश्चिमेस असून कुटीपेक्षा थोडेंसें उंचीवर आहे. हें स्थान पहावयास जाण्याची माझी इच्छा पाहून पेष्कार साहेबांनीं घोड्याची व्यवस्था केली. पटवारी, एक चपराशी, पेष्कार साहेबांचा पुतण्या व मी असे आम्ही

होता तेथें स्वच्छ जलप्रवाहानें सुंदर जाळें पसरलेलें होतें. सभों-वृती देवदारू वृक्ष असून, मधून मधून हिरव्यागार वेलींचे जणूं-काय पडदेच टांगलेले होते. ह्या ठिकाणीं माझ्या कुलीनें गव्हाची रोटी व मसुरीच्या डाळीची आमटी तयार केली. आह्मी तेथें आनंदानें भोजन केलें. जेवण झाल्यावर सभोंवतालची वनश्री व गगनचुंबित पर्वत ह्यांची शोभा अवलोकन करीत जंगलामध्यें गंगेच्या कांठा-कांठानें ईश्वरचिंतनांत निमग्न होऊन आनंदानें मी इकडे तिकडे फिरत होतों. कुली भोजन आटोपून धूम्रपान कर-ण्यासाठीं गंगाकिनाऱ्यावरील एका वृक्षाखालीं आराम करीत स्वभाषेंत ( पहाडी भाषेंत ) एकदर प्रवासासंबधीं व घरच्या भावी सुखासंबधीं बोलत बसलेले माझे नजरेस पडले. मी त्याचे जवळ येऊन तुह्मी काय बोलत बसला आहांत, प्रवास कसा काय झाला वगैरे संबंधीं दोन चार शब्द बोलून मी पुन्हा दुसरीकडे निघून गेलों. अशा रीतीनें संध्याकाळचा तो एक दिड तास मोठ्या आनंदांत घाल-विला. अंधार पडूं लागला व पर्जन्यास हि प्रारंभ झाला. मी झोपडींत आलों व घोंगडीवर स्वस्थ पडून राहिलों. सुमारें पांच वाजता उठून शौच मुखमार्जन आटोंपलें व कुलींना उठवून मी जंगलांत आदल्या दिवसाप्रमाणें चहा तयार होईतों फिरावयास गेलों. ताकलाकोट व कालापाणी याचे मध्यें सुमारें पंचवीस तीस मैलाचें अंतर असावें. चहा वगैरे घेऊन गर्बियांगला जाण्यासाठीं आह्मी सकाळीं आठ वाजतां काळापाणी सोडलें.

गर्बियांगला जावयासाठीं दोन रस्ते आहेत. एक कालीपारचा, नेपाळचे हद्दींतून व दुसरा गुंजीकडून ह्मणजे कालीगंगा नदीचे अलीकडच्या कांठानें. कालीपारच्या रस्त्यानें तीन साडेतीन मैलाचा फेरा पडत नाहीं. आह्मी कालापाणीपासून दोन मैलांवर कालीगंगा उतरून नेपाळचे हद्दींत शिरलों. गंगापार जावयास पूल ह्मटला ह्मणजे सागाच्या मोठाल्या दोन तुळया ह्या कांठावरून त्या कांठावर टाकलेल्या आहेत. पात्र लहान च आहे.

वर्षाऋतूंतील हिमराजाची शोभा फार च आल्हाददायक व सुंदर असते. परंतु ह्या दिवसांत हिमालयांत प्रवास करणें फार च त्रासदायक व धोक्याचें असतें. कालापाणीहून कालीगंगेच्या कांठाकांठानें च जावें लागतें. भूर्ज, देवदारु, ओक, चीड वगैरे वृक्षांच्या दाट जंगलांतून रस्ता आहे, त्यामुळें हिर-
[illegible]

मी प्रवास करीत होतों; तो प्रातःकाळचा समय होता; थंड, आनंददायक व मंद मंद वायु वहात होता; दोन्ही बाजूला लांबवर गहू, मुंडवा, मकई, वगैरे धान्याचीं हिरवींगार शेतें दिसत होतीं. पर्वतशिखरावरून जागजागीं थंड, स्वच्छ व मधुर जलाचे प्रवाह जोरानें खालीं पडत होते; गंगेचा शांत व गंभीर असा घों घों शब्द सतत चालूं होता; सभोंवतालच्या शेतांतून व अरण्यांतील वृक्षांवरून पक्षी मंजुळ व गोड शब्द करीत तिकडे इकडे आनंदानें विहार करीत होते; एखाद्या कड्यावर सहज दृष्टि गेली कीं तेथें एखादा कस्तुरीमृग चंचल दृष्टीनें इकडे तिकडे पहात उभा असलेला प्रवासी जनांना दिसे; गगनचुंबित पर्वतशिखरांकडे दृष्टि फेंकली कीं काळेभोर व पांढरे स्वच्छ मेघ [illegible]

तिकडे आकाशांत धावतांना दिसत होते; जिकडे पहावें तिकडे भूदेवी ही नाना तऱ्हेच्या सुंदर पुष्पलतांनीं सुशोभित झालेली व हिरवीगार दिसत होती; त्या वेळीं सर्वत्र एकांतपणाचें साम्राज्य दिसत होतें. माझे कुली माझ्या मागून हळु हळु येत होते. त्यांच्या अगोदर अर्धा तास मी एकटा च पुढें निघून गेल्यामुळें त्यांच्यांत व माझ्यांत एक मैलाचें अंतर पडलें होतें. सभोंवतालचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत गंगेच्या कांठानें मी सावकाश चाललों असतां, मला आनंदाच्या व प्रेमाच्या लहरी वारंवार येऊं लागल्या. आपल्याशीं च गुणगुण करीत व मधून मधून मोठ्यानें गात मी चाललों होतों. कांहीं वेळानें एका दाट व थंड अशा वृक्षछाये-खालीं येऊन पोहोंचलों. तेथें गंगेच्या गंभीर जलप्रवाहाकडे पहात कांहीं वेळ उभा राहिलों. नंतर नेत्र मिटून एकदम त्या वृक्षाचे बुंध्याशीं स्वस्थ बसलों; तों माझें चित्त एका क्षणांत एकाग्र झालें व मी देहभान विसरलों. डोळे उघडून पाहतों तों कुली माझ्या पासून कांहीं अंतरावरील दुसऱ्या एका वृक्षाखालीं विश्रांति घेत व धूम्रपान करीत मजकडे पहात बसलेले आहेत असें दिसलें. मला वाटतें त्या स्थितींत मी एक दीड तास होतों. ह्या चिंतनानें मला अतिशय आनंद झाला.

असो, छांगरु गावाला मी सुमारें अकरा साडे अकरा वाजतां पोहोंचलों. येथें गुरखाली पोलीसची चौकी आहे. हे पोलीस मला पूर्वींपासून ओळखीत होते. त्यांनीं मला संध्या-काळपर्यंत तेथें राहण्याचा आग्रह केला. त्यांच्या इच्छेनुसार मीं तेथें मुक्काम केला. येथून गर्बियांग एक मैल आहे. कुलींनीं स्वैंपाक केल्यावर मीं भोजन केलें. दोन प्रहरीं विश्रांति घेऊन

सुमारें पांच वाजतां गर्बियांगला जाण्यासाठीं मी निघालों. सुमारें अर्ध्या तासांत आह्मी गर्बियांगला पोहोंचलों. त्या च दिवशीं खालून पोलिटिकल पेष्कार कुमार जगतसिंग पाल हे हि तेथें आले. मी व ते बंगल्यांत राहिलों. गर्बियांगला माझा पांच दिवस मुक्काम झाला. माझ्या परिचयाच्या तेथील सर्व मंडळीस मी सुखरूप आलेला पाहून आनंद झाला. दीड महिन्यांत त्यांना माझें कुशल बिलकुल कळलें नव्हतें, असो.

कुमार जगतसिंग "कुटी" "नावी" "गुंजी" वगैरे ठिकाणीं जावयास निघाले. त्याचे बरोबर मी हि निघालों. ह्या समयीं मीं माझ्या एका कुलीला रजा दिली. तरुण कुली मात्र मजबरोबर ठेवला होता. तो शेवटपर्यंत ह्मणजे काथगोदाम रेल्वे स्टेशनवर मी येईतों मजबरोबर होता. पोलिटिकल पेष्कारबरोबर मी गेल्यामुळें मला बिलकुल त्रास झाला नाहीं. त्यांची छावणी जेथें पडे तेथें जवळ च माझा हि तंबू असे. गर्बियांगपासून कुटी वीस मैल आहे. हें खेडें सुमारें तेरा हजार फूट उंचीवर आहे. गांवांत दीडशें घराची वस्ति असून येथील भुटिया लोक श्रीमंत आहेत. सभोंवार फार च सुंदर देखावा आहे. आमचा मुक्काम येथें तीन दिवस होता. कुटीला जाण्याचा रस्ता मात्र फार वाईट आहे. ह्या गांवापासून सुमारें पंधरा मैलांवर "ज्युलिंगकांग" ह्मणून एक दर्शनीय स्थान आहे. ज्युलिंगकांग कुटीचे पश्चिमेस असून कुटीपेक्षा थोडेंसें उंचीवर आहे. हें स्थान पहावयास जाण्याची माझी इच्छा पाहून पेष्कार साहेबांनीं घोड्याची व्यवस्था केली. पटवारी, एक चपराशी, पेष्कार साहेबांचा पुतण्या व मी असे आह्मी

चौघेजण घोड्यावर बसून कुटीहून सकाळीं सात वाजतां निघालों. रस्ता वाईट ह्मणजे खडकाळ व चढउताराचा असल्या-मुळें आह्मीं घोडे सावकाश चालविले; सुमारें बारा वाजतां आह्मी ज्युलिंगकांगला येऊन पोहोंचलों. कैलास व मानस सरोवर जसें आहे त्या च प्रमाणें हुबेहूब परंतु पुष्कळ च लहान प्रमाणावर ज्युलिंगकांग हें ठिकाण आहे. ज्युलिंगकागचें सरोवर मानस सरोवराचे एक चतुर्थांश आहे; कैलास पर्वताची उंची तीस हजार फूट ( अजमासें ) तर येथील पर्वत अठरा हजार फुट उंचीचा आहे. येथें तांदूळ व मुढवा धान्याचीं दोन शेतें आहेत. असें ह्मणतात कीं, हीं शेतें मनुष्यानें लावलेलीं नाहींत. परंतु पाहणारास असें वाटतें कीं तीं जणू काय शेतकऱ्यानें च पेरलेलीं आहेत ! नंतर आह्मी ज्युलिंगकागचे " हिमप्रवाह " ( ग्लेशर्स ) पाहिले. येथें सरोवराचे पश्चिमेस पांच सहा मैलांची सारखी डोंगरसपाटी आहे. हें मैदान त्या वेळेस हिरवें-गार असून निरनिराळ्या रंगांच्या सुंदर फुलांनीं सुशोभित असल्यामुळें मनोहर दिसत होतें. ह्या मैदानांत सभोंवतालचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत, आह्मी आमचे घोडे केव्हां केव्हां सावकाश तर केव्हां केव्हां भरधाव चालवीत होतों. सुमारें एक वाजेपर्यंत ह्या मैदानांत आनंदानें क्रीडा करून आह्मी सरोवराचे काठीं स्नानास आलों. घोडे चरावयास सोडून दिले. स्नानसंध्यादि आटोपून आह्मी थोडासा फलाहार केला व त्या हिरव्यागार व कोमल तृणांकुरांवर अंग टाकलें; आणि परमेश्व-राचे लीलेविषयीं आश्चर्य करण्यांत व त्याचे गुणानुवर्णन करण्यांत सुमारें एक तास घालविला. सुमारें दोन वाजतां

कुटीला जाण्यासाठीं आह्मी ग्युलिंगकागहून निघालों. परत जातांना पटवारी व मी घोडे जलद चालवीत असल्यामुळें आह्मी दोघे पुढें चालला होतों. वाटेनें चढणीवर माधव-लालचा घोडा थकल्यामुळें तो पायीं चालला होता. चप-राशी घोड्यावर त्याचे च मागून हळु हळु चालत होता. माधवलाल आपल्या घोड्याचा लगाम हातांत धरून घोड्याचे पुढें हळु हळु चालला होता. इतक्यांत घोडा एकदम पडला व खालीं खालीं घसरू लागला ! माधवलालनें आपल्याकडून करवेल तितका प्रयत्न करून घोडा खालीं न घसरेल असें केलें, परतु घोडा त्याच्यासह खालीं खालीं च चालला. चपराश्यानें मोठ्यानें शिळ घालून आह्मांला परत बोलावलें. भरधाव घोडे टाकीत आह्मी परत आलों. चपराशी व पटवारी ह्यांनीं तो घोडा मोठ्या मुष्किलीनें वर ओढून आणला. त्या दिवशीं घोडा व स्वार हे दोघे हि गंगार्पण व्हावयाचे, पण परमेश्वरकृपेनें तें संकट टळलें. अर्ध्या वाटेंत तो घोडा बदलला. नंतर आह्मी चौघेजण वेगानें घोडे चालवू लागलों. इतक्या जोरानें मी त्या दिवसापर्यंत घोडा कधीं हि पळविला नव्हता. पांच वाजता पटवारी व मी कुटी येथील मुक्कामाच्या ठिकाणीं येऊन पोहोंचलों. त्या दिवशीं दहा तास एकसारखा मी घोड्यावर बसलों होतों; त्यामुळें माझ्या मांड्या अगदीं भरून आल्या होत्या. रात्रभर आंग ठणकत होतें. कुटीहून गर्बियांगला परत जातांना आह्मीं गुंजीला मुक्काम केला होता. त्या रात्रीं भुटिया मुलींचें गाणें तेथें ऐकाव-यास सांपडलें व नाच हि पहावयास सांपडला. सुमारें दहाव्या दिवशीं कुटीचा प्रवास आटोंपून आह्मी गर्बियांगला आलों.

गर्बियांगला आल्यावर तेथें आणखी पांच दिवस आमचा मुक्काम झाला. पर्जन्यकाल असल्यामुळें रोज पर्जन्य अहोरात्र पडत असे. माझ्या मनात असें आलें कीं पावसाळा संपेपर्यंत सगमावर च ( गर्बियांगजवळ ) रहावें व हिवाळ्यास प्रारंभ झाला कीं खालीं उतरावें. हा विचार मीं पेष्कार साहे-बांना सांगितला. ते ह्मणाले, येथें राहण्यापेक्षा अस्कोटला च तुह्मी रहा. तेथें हि दोन तीन मैलावर सगम आहे. तेथें तुमची राहण्याची सोय करून देईन. शिवाय आतां माझ्या बरोबर अस्कोटपर्यंत आला तर आपणास वाटेनें बिलकुल त्रास होणार नाहीं. मला त्याचें ह्मणणें खरें वाटलें व त्याचे च बरोबर खालीं जावयाचा माझा बेत कायम झाला. पाच दिवसांनीं आह्मी गर्बियांगहून अस्कोटला जाण्यासाठीं सध्याकाळीं पांच वाजतां निघालों; कारण चार मैलावर च मुक्काम व्हावयाचा होता. ह्या वेळचा माझा थाट निराळा च होता. वाटेनें खाण्यापिण्याची, अथवा उतरावयास जागा कशी व कोठें मिळेल वगैरे गोष्टींची मला बिलकुल काळजी करावी लागत नसे. पेष्कारसाहेबांनीं सर्व व्यवस्था ठेवली होती. पावसाळ्यामुळें लहान लहान मुक्काम करीत, आह्मी सुमारें आठ दहा दिवसांनीं अस्कोटला आलों. ह्या आठ दहा दिवसात असा एक हि दिवस नव्हता कीं, त्या दिवशीं आह्माला तीन चार तास पावसाचे सतत धारेनें सोडलें नाहीं. त्या वेळेस पावसांत चालण्याची च मोठी मजा वाटत असे. सुमारें अडीच तीन महिने थंड हवेची सवय झाल्यामुळें चालताना मला फार तलखी होत असे व जसे जसे खालीं येऊं लागलों तसे तसे

ऊष्णतेचें प्रमाण वाढू लागलें, त्यामुळें मला त्रास होऊं लागला. पावसांतून चालतांना माझी कफनी वगैरे ओलीचिंब होई व त्यामुळें थंड वाटत असे व तलखी हि फार होत नसे. अस्कोटला आल्यावर पूर्वी ठरल्याप्रमाणें कांहीं दिवस माझा तेथें मुक्काम झाला. पेष्कारसाहेबांनीं झटल्याप्रमाणें दोन तीन दिवसांत माझी सर्व व्यवस्था केली. अस्कोटपासून तीन मैलावर मी राहिलों होतों.

कालीगंगा व गोरीगंगा ह्या दोन नद्यांचे संगमावर एक लहानशी टेंकडी आहे. ह्या टेंकडीवर देवदारु व सागाच्या वृक्षांचें दाट जंगल आहे. ह्या जंगलांत एका मोठ्या देवदारु वृक्षा-खालीं दुहेरी कनातीचा व छताचा लहानसा तंबु त्यांनीं मज-करितां ठोकून देवविला. सभोंवतालची चार चार हात जागा साफ करून देवविली. तंबूंत, जमिनीवर, एका तंबूला पुरेल अशी मोठी चटई, एक चारपायी, शामदान ठेवावयास एक लहानशी घडवंची व दिवा, येवढें सामान होतें. मी ज्या ठिकाणीं होतों तेथून अखंड बर्फाची ओळ, आकाश स्वच्छ असतांना दिसत होती. नदीच्या दोन्ही बाजूंनीं सुंदर देखावा होता च, जंगल हि दाट होतें. ह्या जंगलांत वाघ, हरणें, अस्वलें वगैरे वन्यपशू असत. एकदरींत मला हें स्थान मनापासून आव-डलें. ह्या रमणीय व एकान्त ठिकाणीं मी दीड महिना ईश्वर-चिंतनांत आनंदानें घालविला. ह्या ठिकाणाला "हरेश्वर" असें नामाधिकरण केलेलें होतें. ह्या दीड महिन्यांत पेष्कार साहेबांनीं सर्व प्रकारें माझी उत्तम व्यवस्था ठेवल्यामुळें माझी शरीरप्रकृति हि पूर्वीप्रमाणें झाली. पावसाळा कमी झाला. आतां

येथें राहण्याची जरुरी नाहीं असें मनात आणून, पेष्कारसाहेबांना माझा जाण्याचा बेत मीं कळविला. ते ह्मणाले, दोन दिवसात पोष्ट-खात्याचे इन्स्पेक्टर येथें अलमोऱ्याहून येणार आहेत, त्याचे बरोबर आपण पुढे जावें ह्मणजे बरें. तोपर्यंत अस्कोटला आमचे घरीं तीन चार दिवस रहावें. ठरल्याप्रमाणें श्रीयुत त्रिवेदी, पोष्ट इन्स्पेक्टर तेथें आले व मी तीन दिवसानीं त्याचे बरोबर अस्कोटहून अलमोरा येथें जावयास निघालों. अस्कोटहून जातांना पेष्कार साहेबाना फार वाईट वाटलें. मी त्यांची समजूत केली व त्याचा निरोप घेऊन निघालों. पिठोरागड, लोहाघाट, ह्या मार्गानें आह्मी अलमोऱ्यास न जाता, अस्कोटहून अलमोऱ्यास जो निराळा रस्ता आहे, त्या रस्त्यानें गेलों. हा रस्ता लोहाघाटचे रस्त्यापेक्षा जास्त रमणीय आहे. तिसरे दिवशीं संध्याकाळीं आह्मी अलमोरा येथें येऊन पोहोंचलों. मायावतीस माझी लोखंडी पेटी व पैसे होते, ते अलमोरा येथें श्रीयुत त्रिवेदी यांनीं आणविण्याची व्यवस्था केली व त्याप्रमाणें तीन चार दिवसांत तें सामान आलें. अलमोरा हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. शिवाय हवा खाण्याचें हि हें एक स्थान आहे. अलमोरा ज्या टेंकडीवर आहे त्या टेंकडीवर व सभोंवतालचे टेंकड्यांवरून पाईन वृक्षाचीं जंगलें जंगलखात्याकडून मुद्दाम लावलेलीं आहेत. येथें क्षयरोग्यासाठीं एक दवाखाना आहे. पाईन वृक्षाच्या सान्निध्यानें क्षयरोग्याला फायदा होतो, असें नजरेस आल्यावरून वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम पाईन वृक्षांचीं जंगलें राखून ठेवलेलीं आहेत. ह्या जंगलांमुळें अलमोरा फार च शोभायमान दिसतें. अलमोरा येथें माझा दहा पधरा

दिवस मुक्काम होता. तेथील पोष्ट मास्तर पंडित मनोरथ भट याचे घरीं माझा मुक्काम होता. येथें पावसाळा अगदीं च बंद झाला होता. हवा स्वच्छ होती. माझी प्रकृति हि चांगली झाली. पंडित मनोरथ ह्यांनीं मीं एक महिना तेथें रहावें म्हणून फार च आग्रह केला. मीं त्यांना सांगितलें कीं सध्यां मला गेलें पाहिजे, पुढें येईन तेव्हां आपल्या इच्छे-नुसार राहीन. अलमोरा येथें माझी बऱ्या च जणाशीं ओळख झाली होती; त्याचे संगतींत माझे दहा दिवस फार च आनंदांत गेले. नंतर तेथून निघालों व तिसरे दिवशीं दुपारीं दोन वाजतां काथगोदाम रेल्वे स्टेशनवर येऊन पोहोंचलों. बरोबरच्या तरुण कुलीला येथें निरोप दिला. त्या वेळेस त्याला फार च वाईट वाटलें. मजबरोबर तो सुमारें पाच महिने होता. गाडी निघावयास एक तास अवकाश होता. हिमालयाच्या पायथ्याशीं आल्यावर मला फार च उन्हाळा भासू लागला. तो आक्टोबर महिना होता. पहिला मुक्काम बरेलीला केला. तेथें एक दिवस राहिलों व पंजाब मेलनें थेट मुंबईस येऊन पोहोंचलों.

अलमोरा येथें आल्यावर, मी माझे मस्तकावरील जटाभार व दाढी वगैरे वाढलेली होती ती सर्व काढून टाकली. ह्या एकंदर प्रवासाला मला सात महिने एक दिवस लागला. येवढ्या काळांत माझी प्रकृति फक्त एकदां च व ती हि एक दिवस च बिघडली होती. प्राणावरचीं संकटें येऊन, त्यांतून बचावून, मनोरथ पूर्ण होऊन, मी निर्विघ्नपणें व सुखरूपपणें मुंबईला परत येऊन पोहोंचलों हें केवळ श्रीसद्गुरु महाराजांचे कृपादृष्टीचें च फल होय.

बरेलीहून मुंबईस येईतों बेचाळीस तास आगगाडीनें सारखा प्रवास केला. मुंबईस स्टेशनवर माझे तीन चार मित्र मला सामोरे आले होते. मी सुखरूप परत आल्याचें पाहून, त्यांना फार आनंद झाला. त्यांचे बरोबर घरीं गेलों. मुंबईस माझा मुक्काम पंधरा दिवस होता. नंतर धुळ्यास मी आपल्या घरीं आलों. प्रिय वाचकहो, येणेंप्रमाणें मीं आपल्या प्रवासाची हकीकत आपल्या पुढें नम्रपणें व यथाशक्ति वेड्यावाकड्या शब्दांत मांडली आहे तिचा आपण प्रेमानें स्वीकार करावा. आतां श्रीसद्गुरुचरणीं मस्तक ठेवून, सनातन धर्मांचा, माझ्या मातृभूमीचा व तिच्या लेंकरांचा लवकर अभ्युदय होवो व भरतभूमीवर वैभवरवी लवकर उगवो, अशी अनन्यभावें परमेश्वराची प्रार्थना करून लेखणी खालीं ठेवतों.

॥ ॐ तत्सत् ॥

धुळें, गुरुवार

भाद्रपद व. ३० शके १

REFBK-0000651